# काव्य समर्पणाचे

राजेश भुतकर



# काव्य  समर्पणाचे

राजेश भुतकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# काव्य समर्पणाचे

## कवी : राजेश भुतकर

संपर्क : वारजे माळवाडी, सर्व्हे क्र. 138, पुणे 411058.

इमेल : rbhutkarmmm@gmail.com

फोन : 9689931458

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य. चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन :  ३१ ऑक्टोबर २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# काव्य समर्पणाचे

**राजेश भुतकर**

अत्यंत जाज्वल्य आणि क्रांतीकारी अद्वैत विचार ज्यामुळे जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन सर्वोच्च पातळीवर जाण्यास मदत होईल.

# Contents


अर्पण पत्रिका........................................

लेखक परिचय........................................

मनोगत ........................................

1. विनम्र आवाहन........................................

2. श्री गुरू शरण प्रार्थना ........................................

3. माझे मन गणपती ........................................

4. नमन तुला हे श्रीस्वातंत्र्य देवी........................................

5. काव्य स्फुरावे........................................

6. कृपा ........................................

7. जोहार ........................................

8. संतमय व्हावी काया ........................................

9. पाहता श्रीगुरुदेवा तुम्हा ........................................

10. जिथे जाशी ........................................

11. वडवानल........................................

12. निरोप त्याचा ........................................

13. तूच ईश्वरा........................................

14. पाहता मी आकाशा........................................

15. घ्यावे नाम देवाचे ........................................

16. प्रसंग युद्धाचा ........................................

17. सामर्थ्य दे........................................

18. साध्य तुला रे सर्व ईश्वरा........................................

19. मीच पोरका मला इथे हा........................................

20. भावद्वंद्व ........................................

21. रामनामामृत हे प्याहो........................................

22. सकल मायेची महामाया ........................................

23. मांडीयेला ग माये ........................................

24. हरी माझी माता........................................................................
25. ऊन्ह तापले तापले........................................................................
26. आकाश ........................................................................
27. सृजनत्वाचे व्रत ........................................................................
28. अमृत नाव........................................................................
29. गंध तुझा........................................................................
30. सांत अनंत........................................................................
31. सावळं सुंदर ........................................................................
32. ओ मेरे प्रीतम प्यारे ........................................................................
33. व्हावी ऐसी कृपा........................................................................
34. शब्द माझे फूल ........................................................................
35. एनकॅश ........................................................................
36. वेगळेपणा........................................................................
37. दृष्टांत ........................................................................
38. तुझं असं येणं ........................................................................
39. काटेरी वाट ........................................................................
40. सरण........................................................................
41. अस्वस्थता........................................................................
42. कुठे हा आत्मा........................................................................
43. रे मना ........................................................................
44. म्हणे माझा श्री गुरू रामदासी........................................................................
45. राम राम बोल राम नाम ........................................................................
46. व्यक्त ते अव्यक्त ........................................................................
47. निश्चयाचा महामेरू ........................................................................
48. “मी” पणा आणि मी........................................................................
49. अनंतयात्रीचा झंझावात ........................................................................
50. सम्मान किजीये ........................................................................

51. आईचे नाव ................................................................................
52. श्रीरामप्रभु मुझे ऐसे मिल जावे........................................................................
53. अनहद नाद ................................................................................
54. रूथलेसनेस ................................................................................
55. आमच्या हातून ................................................................................
56. आम्ही निर्गुण गावचे रहिवासी ................................................................................
57. कठपुतली................................................................................
58. अनिर्वचनीय मद्स्वरूप ................................................................................
59. उद्दात्त उद्दिष्टे गाठताना................................................................................
60. एक अनोखा दीपोत्सव................................................................................
61. विपर्यस्त... वास्तव................................................................................
62. कुठेच नसलेल्या गावामध्ये................................................................................
63. गुलाम बन के उन पांचो का................................................................................
64. सत्वपरीक्षा................................................................................
65. गूढ असे त्या विश्वाचे ................................................................................
66. सौंदर्य रहस्य ................................................................................
67. जो कुछ................................................................................
68. सावन आया हे सखी री ................................................................................
69. कर्ता कर्ते को देखता है ................................................................................
70. मकसद ................................................................................
71. ज्ञानाचा दिवा ................................................................................
72. भेट तिची................................................................................
73. सखीरी मैं तो ................................................................................
74. मनमोहना................................................................................
75. तू योगियांचा योगी................................................................................
76. ज्ञानियाची आस ................................................................................
77. परिस स्पर्श ................................................................................

78. मी कोण कुठला ..........
79. प्रकाश मी ..........
80. शून्य अहंभावाच्या उंबरठ्यावर ..........
81. तो मृत्यू जगतो..........
82. वचन होते दिलेस तू ..........
83. परक्या जाणिवा..........
84. प्राणेश्वरा जगदीश्वरा..........
85. गूढत्वाचे गूढ ..........
86. बुद्ध्याविष्कार ..........
87. मार्दवता शोधतो मी..........
88. कलियुगाचे नाव ..........
89. मी ..........
90. मैं ना मालिक कहलावू रे ..........
91. रंग नको टाकूस ..........
92. कसा साधावा परमार्थ..........
93. स्वप्न आणि त्याची शक्ती..........
94. आपके लिये ..........
95. स्वप्न कसे पाहिले ..........
96. दीपोत्सव ..........
97. अनिर्वचनीयतेच्या पलीकडे ..........
98. हे कवीमना ..........
99. तृष्णा ..........
100. मृत्युदान ..........
101. Universe And Me ..........
102. The Mystery Of This Self-Realization..........
103. I am the space..........
104. जे जे भेटे भूत..........

105. सप्तपदी ...................................................................................................
106. साज शृंगार ...................................................................................................
107. रुखसत लेता हूँ ...................................................................................................
108. का रे का रे कागा ...................................................................................................
109. आझाद जिंदगी ...................................................................................................
110. विवेके जाणीले मी ...................................................................................................
111. तू एक ओमकार ...................................................................................................
112. तू मेरा पिता ...................................................................................................
113. तव विन्मुखतेपरि विष चांगले ...................................................................................................
114. सुंदर हा सारंगपाणि ...................................................................................................
115. सखीरी मैं तो शाम की भई री ...................................................................................................
116. काया ...................................................................................................
117. परब्रह्म मायबाप ...................................................................................................
118. कर्ता नका बोलू ...................................................................................................
119. In This So Called Human Society ...................................................................................................
120. आईचे एक गाव असतं ...................................................................................................
121. ऐसे पाहाता ते विश्व ...................................................................................................
122. नीर नयनो बहे ...................................................................................................
123. मदमायेचे भव मद्य प्राशूनी ...................................................................................................
124. जाऊ जेंव्हा ...................................................................................................
125. हरी संग ...................................................................................................
126. नीत नीत शरण ...................................................................................................
127. फुलांचा रंग तुझ्या ...................................................................................................
128. मंगलाहून मंगल ...................................................................................................
129. राम सांग मज राम ग ...................................................................................................
130. वर्षाव झाला ...................................................................................................
131. माई मोको होली खेलन की आंस ...................................................................................................

132. परमानंद प्रशांत पद ....................
133. शब्दब्रह्म ....................
134. शबद ....................
135. सखा मित मेरे ....................
136. री माई मोसे हरिहर ना बिसारे ....................
137. चोख प्रचिती ....................
138. तुकयाची गाथा ....................
139. श्रद्धेच्या पलीकडे ....................
140. चोरी झाली ....................
141. जाऊ पंढरीला ....................
142. विवेक माझा भ्रतार ....................
143. संसाररूपी आखाड्यात ....................
144. या अनाम गावी ....................
145. नामा तू आमुचा शिंपी ....................
146. घट घट वासी ....................
147. प्रतिपालक तू ....................
148. मन हताश हताश ....................
149. मेरी मां ....................
150. तव चरण रज कण ते उठले ....................
151. भवरोग उतारा ....................
152. श्वास ....................
153. अजनबी ....................
154. ये ग माझे माई ....................
155. कन्यादान ....................
156. अंतर्बाह्य मी व्हावे आकाश ....................
157. जगद् मिथ्या ....................
158. भेटल्या एकदा ....................

159. जन्मों का प्यासा ....................................................................
160. ओढी जो चुनरी....................................................................
161. प्रतिपाले तू ....................................................................
162. या स्वरांनो आर्त व्हा....................................................................
163. तुझे एक नाम ....................................................................
164. नाम ज्याचे ओठी....................................................................
165. करू तुझे गं ध्यान....................................................................
166. मन मैला....................................................................
167. शून्यत्व मागतो मी ....................................................................
168. राखे तू....................................................................
169. बिरहा बिरहा....................................................................
170. नेती नेती....................................................................
171. म्या जीवरूप मी ब्रह्मरूप....................................................................
172. साक्षी चैतन्य....................................................................
173. अनंत अपार या ब्रह्मांडी ....................................................................
174. स्त्रीशक्ती वंदना....................................................................
175. ज्ञानियाचे चित्त....................................................................
176. जागला गं जागला ....................................................................
177. रोम है जितने....................................................................
178. मन पवित्र सुंदर ....................................................................
179. खुल खुल जाए मेरे बंध....................................................................
180. अनंत संत अवस्था ....................................................................
181. श्रीराम-सीता कर्तव्य दर्शन ....................................................................
182. हे ऽऽ गोविंद हे ऽ गोपाऽळ....................................................................
183. विठ्ठलाने घेतली भक्त पुंडलीकाची आण/ शपथ....................................................................
184. हीच एक आस ....................................................................
185. समरथ है श्री नानकदेव गुरुबाणी ....................................................................

186. प्रभ पाया ..........
187. कमल नयन विशाल अतिसुंदर ..........
188. मैं चातक जनमों का प्यासा ..........
189. विश्व कणांनो ..........
190. प्रार्थना ..........
191. सभै रचना तेरी ..........
192. पाहाणे ..........
193. प्रभु दर्शन प्यास बुझा पंचसखी री ..........
194. प्रित जुडी ..........
195. घन जलद सावळा ..........
196. जाळले जाळले ..........
197. पारब्रह्म परमेशर ..........
198. जे जे भेटे भूत ..........
199. तेज प्रखर ..........
200. प्रिय बोल सखी री ..........
201. चल शोधू तिथे ..........
202. जरी मी आहे इथला ..........
203. अज्ञानी मी असा ..........
204. जीवन वास्तव प्रखर ..........
205. लुटले लुटले ..........
206. रखो राखणहारे ..........
207. बिरहनिया ..........
208. प्राण सख्या श्रीरामा ..........
209. मी अनाथ ..........
210. येळकोट ..........
211. श्रीराम हृदयी पाहिले ..........
212. स्वप्न माझे हे स्वप्न माझे ..........

213. श्री गुरू सन्मुख ........................................................................
214. निर्गुण समाधी........................................................................
215. मनोकमल ........................................................................
216. निरागस तू निरागस मीही........................................................................
217. Lets have a feeling........................................................................
218. भगवंत तू माझा भगवंत तू ........................................................................
219. कठपुतळी ओळखली........................................................................
220. देवपूजा ........................................................................
221. किती वाहती या नयनी........................................................................
222. दर्शन की अभिलाषा ........................................................................
223. कठपुतली श्रीकृष्ण कन्हैया की........................................................................
224. आत्मनिवेदन........................................................................
225. ऐसी व्याकूळता........................................................................
226. कोंदण अद्वैताचे........................................................................
227. कोण इथे?........................................................................
228. कशी करू देवा मी पूजा आरती........................................................................
229. पाहणाऱ्याने एक दिवस ........................................................................
230. धर्म क्या हैं?........................................................................
231. अविद्येचे पेव फुटले........................................................................
232. वैराग्याचे सजीव पुतळे........................................................................
233. झडकरी मज कर तव चरणांची ती धूळ ........................................................................
234. महास्नान काकड आरती........................................................................
235. चिन्मय रूप घेऊन ये ग माय........................................................................
236. आज माझा ज्ञानराज निवृत्ती पावला........................................................................
237. मोह ना अन्य जडो........................................................................
238. कोण हा “मी” ........................................................................
239. सांगतो तुला गुज दीपांचे........................................................................

240. Revolutionary Thought Vibe ........................................................
241. अश्रुंच्या या संतत धारा ........................................................
242. संतांची दिवाळी........................................................
243. तू प्राणसखी माझी ........................................................
244. कुणी नाही इथे........................................................
245. हा गडी आला कुठून........................................................
246. जेंव्हा मन ते शिणते........................................................
247. नमितो श्रीगुरुचरण मी........................................................
248. तिथे तुला ईश्वरा........................................................
249. बाबा ........................................................
250. जशा पावसाच्या सरी ........................................................
251. अनंताचा ठाव ........................................................
252. माया महाभयंकर........................................................
253. कधीच नाही ........................................................
254. परब्रह्म........................................................
255. भरून पावलो ........................................................
256. मी तर आकाश आहे ........................................................
257. मैत्र ........................................................
258. निष्कला परमात्म रूपा........................................................
259. शबद रखो उरधार........................................................
260. महादेवी योगिनी ........................................................
261. लाभो मज संतांची दृष्टी ........................................................
262. परमानंद दर्शन ........................................................
263. निर्गुण निर्गुण........................................................
264. साक्षात परब्रह्म........................................................
265. तू बा विश्वा ........................................................
266. निहत्था मी उभा ........................................................

267. हे ईश्वरा ..........
268. म्हणून मला ..........
269. तुज ठावे ..........
270. मन निर्मल निर्मल ..........
271. मांगन ..........
272. क्या गत मिले.. क्या मन पावत ..........
273. सगुण मी ही माया ..........
274. रीक्त रीक्त तुम्ही श्वास हो माझे ..........
275. श्री गुरू चरण मानस पूजा ..........
276. मन सात्त्विक सात्त्विक ..........
277. संजीवन मज द्यावे ..........
278. आम्ही परब्रह्माचे हो पुत्र ..........
279. भेटावी तिथे मज श्रीराम रघुराई ..........
280. श्रीमंती हवी ..........
281. शिवकारा ..........
282. जागर व्हावा माय मराठीचा ..........
283. आई माझी पार्वती ..........
284. हे ईश्वरी प्रकृती गे माये ..........
285. ग्रंथ साहित्य शब्दामृत ..........
286. अपार आधार ..........
287. जाहलो सुखरूप ..........
288. रोज तुझे दर्शन घेता ..........
289. कोण तू कुठलासा तू ..........
290. प्राणांना तळहाती घेऊन ..........
291. घर माझे ..........
292. परब्रह्म पिता ..........
293. याचसाठी केला आहे अट्टाहास ..........

294. होऊ दे प्रेमवर्षाव ........................................................................
295. चैतन्य स्पर्श ........................................................................
296. काहीच नाही घडले........................................................................
297. श्रीगुरू माझे पाठीराखे........................................................................
298. चित्त माझे विसरेना तुला ........................................................................
299. मातपित्यांचा मिळता आशिष........................................................................
300. शक्ती तुझी........................................................................
301. तु मेरा प्राण सखा ........................................................................
302. कर्मे जळाली........................................................................
303. प्रभ बिन नाही कोई दुजा........................................................................
304. यार मितर........................................................................
305. भरम सुणिया, भरम बोलिया ........................................................................
306. कित्येक जन्मी तो मी जाळला ........................................................................
307. शेवटच्याच चार पायऱ्या........................................................................
308. बसावे सुखासनी ........................................................................
309. प्रस्थान त्रयी ........................................................................
310. सोहळा मिलनाचा........................................................................
311. अंतरानुभूती प्रार्थना ........................................................................
312. आओ आओ जी मेरे पीर........................................................................
313. कोइ न आयेगा साथ तुम्हारे........................................................................
314. तूच शोध देवा आता........................................................................
315. श्रावण आला ग सखी हा ........................................................................
316. दीनानाथा नारायणा ........................................................................
317. आनंद ........................................................................
318. या झोळीचा संग सुटू दे ........................................................................
319. परब्रह्म अद्वितीय ........................................................................
अद्वैत चिंतन........................................................................

द्वैताद्वैत चिंतन ..........................................................................................................
320. महाप्रसाद..........................................................................................................
321. आभार श्रीगुरूंचे ..........................................................................................................

# अर्पण पत्रिका

परम पूज्य कैलासवासी आई-बाबा यांनी माझ्या मनामध्ये भावभक्तीचे बीज लावले व त्याचा खूप मोठा विस्तार त्यांनी त्यांच्या सुसंस्कारांच्या साहाय्याने केला. माझे परम पूज्य श्रीगुरू यांच्या श्रीगुरुग्रंथसाहित्याच्या आधारे ईश्वरीय तत्त्वाकडे पाहण्याचा माझा अद्वैत दृष्टिकोन विकसित होण्यास मला सातत्याने मदत होत आहे. माझे आराध्य साक्षात श्री नीलसरस्वती तारा माँ च्या कृपेने हा काव्यप्रसाद प्रत्यक्षात आला आहे. तिच्याच विज्ञानस्वरूपाने मला क्वांटम मेकॅनिक्स या विज्ञान शाखेची ओळख करून दिली आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून असे जे जे सर्व काही इथे स्फुरले आहे, ते ते सर्व या सर्वांचे एकत्रित सार आहे म्हणून त्यांच्या चरणी हा काव्यसंग्रह मनोभावे अर्पित करत आहे.

राजेश गजानन भुतकर

# लेखक परिचय

**राजेश गजानन भुतकर**

बी.ई., एम.ई.



पुणे विद्यापीठातून अभियांत्रिकीमध्ये पदव्युत्तर पदवी घेतल्यानंतर काही वर्षे अभियांत्रिकी महाविद्यालयात लेक्चरर म्हणून काम केले. नंतर शासकीय नोकरी मिळाली आणि किमान भौतिक गरजांची पूर्तता करण्यासाठी सध्या पुणे महानगरपालिकेमध्ये कार्यरत आहे. पण जीवनाचे उद्दिष्ट हे नोकरी नसून आत्मोन्नती असल्याने आपल्या वैदिक धर्मामधील ग्रंथ व संतसाहित्य याचे सतत वाचन करत असतो. असे वाचन झाले की, त्यावर अखंड चिंतन व मनन सुरू असते. संतवचनांच्या पार्श्वभूमीवर वेगवेगळया दृष्टीने विश्वाकडे आणि आपल्या अस्तित्वाकडे पाहताना उत्कट भाव निर्माण होतात आणि अचानक काव्य स्फुरते. अशा रीतीने गेल्या अनेक वर्षांपासून कविता होत आहेत. या कविता मराठी, हिंदी, पंजाबी, उर्दू, इंग्लिश अशा कोणत्याही भाषेच्या माध्यमातून निर्माण व्हायच्या आणि त्यानुसार आजपर्यंत झालेला हा कविता-संग्रह इथे प्रसिद्ध करत आहे. आता श्रद्धेच्या पलीकडे मन घट्ट टिकून राहण्यासाठी व भक्तिरस गाण्यासाठी शास्त्रीय संगीताचा अभ्यास करणे, विचारांच्या माध्यमातून घडून आलेले दृष्टांत लिहून काढणे अशा रीतीने जीवनमार्गाची दिशा आत्मोन्नतीकडे पक्की करून या मार्गावरील प्रयाणोत्सव ईश्वरीय सत्तेच्या बळावर सुरू आहे.

॥ शुभं भवतु ॥

# मनोगत

अद्वैताच्या कोंदणी भक्ती प्रखरतेने विलसत असते. भगवंत आणि आपण असे द्वैत साधून ईश्वराशी भक्तीपूर्ण संवाद साधला जाणे ही अद्वैताकडे जाण्याची पहिली पायरी आहे. द्वैतातील मर्यादा, पण त्या मर्यादेला ओलांडून जाणारा संत साहित्यातून निर्माण होणारा भक्तीचा अमृत गोडवा अनुभवाला की अद्वैताचे आर्त मनी प्रकट होते. अद्वैत एकटे कधीच अभ्यासता येत नाही त्यामधील संकल्पना वैज्ञानिक पार्श्वभूमीवर पुन्हा अभ्यासून पाहाव्या लागतात. तिथे अध्यात्म आणि विज्ञान यांचा संगम घडून येतो. ईश्वर विज्ञानमय होऊन जातो. असे प्रत्यक्ष घडू लागले की मनामध्ये श्रीगुरू तत्त्व व ईश्वरीय तत्त्व यांच्याबद्दल उत्कट भाव निर्माण होणे हे काही नवीन नाही. हा टप्पा आपोआपच अनुभवास येतो. मनामध्ये उत्कट भाव निर्माण झाले की प्रतिभेचा झरा शब्दांच्या साहाय्याने वाहू लागतो. तिथे भाषेचे बंधन येत नाही. मग येथे शब्द त्यांच्या लयबद्धतेने मनात अवतरित होतात. मग तिथे आपण फक्त लिहायचे काम करायचे.

*आम्ही पुतळे विनम्रतेचे...*
*दहन केले अहंकाराचे...*
*तुमच्या मनास जपण्या...*
*वागणे आमुचे असे संवेदनशीलतेचे...*
*विज्ञानाच्या हाती घेऊनिया मशाली...*
*दवितो वाट तुम्हा येथे नव-अध्यात्माची...*
*तुमच्या अध्यात्म सेवेसाठी आम्ही येथे जन्मिलो...*
*तुम्ही मानिली आमुची सेवा आम्ही समाधान पावलो...*
*चला आमुच्या सवे त्या पवित्र संगमावर...*
*जेथे विज्ञान अन् अध्यात्म सरिता करेल तुम्हा पावन...*

*राजेश भुतकर*

# 1. विनम्र आवाहन

*आम्ही पुतळे विनम्रतेचे ॥*
*दहन केले अहंकाराचे ॥धृ॥*

*तुमच्या मनास जपण्या ॥*
*वागणे आमुचे असे संवेदनशीलतेचे ॥1॥*

*विज्ञानाच्या हाती घेऊनिया मशाली ॥*
*दवितो वाट तुम्हा येथे नव-अध्यात्माची ॥2॥*

*तुमच्या अध्यात्म सेवेसाठी आम्ही येथे जन्मिलो ॥*
*तुम्ही मानिली आमुची सेवा आम्ही समाधान पावलो ॥3॥*

*चला आमुच्या सवे त्या पवित्र संगमावर ॥*
*जेथे विज्ञान अन अध्यात्म सरिता करेल तुम्हा पावन ॥4॥*

# 2. श्री गुरू शरण प्रार्थना

आपण अनुभवत असलेले अनेकत्व किंवा द्वंद्व हे अद्वय तत्त्वात अदृश्य क्षमतेप्रमाणे लपलेले असते. या अदृश्य क्षमता म्हणजे शून्य आणि म्हणजेच अवकाश पोकळी होय. चैतन्याश्रित निरीक्षक जेंव्हा त्या अद्वय तत्त्वाचे प्रतिक असलेल्या शून्यामध्ये “मी कोण आहे” हे पाहण्यास गेला तेंव्हा ही सृष्टी निर्माण झाली. आता अनेकत्वातून एकत्व शोधण्याच्या प्रयत्नात आपण सर्वजण आहोत. आता निरिच्छ अवस्थेत जाऊन शून्यत्व अनुभवले की आपले आत्मभान अनेकत्वातून एकत्वात सहज विलीन होईल.

दरम्यान आपण आपल्या भौतिक व मानसिक गरजांचे व्यवस्थापन करतो आणि त्यालाच समग्र जीवन असे म्हणतो. पण ते नेहमी अपूर्ण राहणार आहे. जीवनाचे उद्दिष्ट हे स्वत:मध्ये देवत्व प्रकट करणे आहे म्हणजेच पूर्णत्व प्राप्त करणे आहे. पूर्णत्वाच्या पलीकडे गेल्याशिवाय पूर्णत्व प्राप्त होत नाही. आणि तिथे काहीही प्राप्त करायचे राहत नसल्याने “मी पूर्णत्व प्राप्त केले आहे” हा भाव निर्माण करायची आणि त्याचा स्वतंत्रपणे अनुभव घेण्याचीसुद्धा आवश्यकता उरत नाही. म्हणून “...पूर्णात पूर्णमुदच्यते” असे उपनिषदांत म्हटले आहे.

अशा या भौतिक व मानसिक गरजांचे व्यवस्थापन करता करता आपल्याला हे जीवन उद्दिष्ट गाठावयाचे आहे. हे लवकरात लवकर समजून घेतले पाहिजे. देवत्व म्हणजे काय? देवत्व म्हणजे जे जे काही आपण आहे म्हणतो आणि जे जे काही नाही म्हणतो त्याच्या पलीकडील परम तत्त्व होय. देवत्व हे वर्णन करण्यापलीकडे असून अगदीच वर्णन करायचे झाल्यास त्याला आपण निरहंकार, निर्विकार, निराकार, निर्गुण व अनंत तत्त्व असे म्हणूयात.

श्री गुरू तत्त्व हे आपल्या व देवामधील दुवा असते. आपण प्रयत्न करायचे आणि आपल्या प्रयत्नांना योग्य दिशा देऊन त्या देवाच्या प्रत्यक्ष

अनुभवापर्यंत घेऊन जाण्याचे महत्त्वाचे कार्य श्री गुरू करतात. श्री गुरू आपल्याला आपल्यातूनच हे देवत्व प्रकट करण्यास मदत करतात. तमोगुण आणि रजोगुणांच्या चक्रव्यूहातून सोडवून सात्त्विकतेच्या प्रशस्त मार्गाने ते शून्यत्वाचा उंबरा ओलांडून आपल्याला आपल्यातल्या निर्गुण देवतत्त्वापर्यंत ते घेऊन जातात.

ही पात्रता आपल्यामध्ये निर्माण होण्यासाठी श्री गुरूंचे आशीर्वाद आणि त्यांची कृपादृष्टी आवश्यक असते. श्री गुरू वैश्विक शक्तीशी थेट जोडले गेलेले असल्याने मनाच्या गतीवर त्यांच्या मार्गदर्शनाचा थेट परिणाम होतो.

अद्वैत शास्त्रात या जीवनाला आभासी सत्यता असे संबोधले आहे. क्वांटम शास्त्राच्या अभ्यासानंतर, तर्काच्या दृष्टीने हे आपण सहज सिद्ध करू शकतो, की जीवनानुभव हे आभासी सत्यता प्रकट करतात. वस्तुमय जग ही वास्तव सत्यता आणि मनामध्ये त्याचे अर्थ प्रकट होणे ही आभासी सत्यता, असे हे द्वंद्व या विश्वात प्रकट झाले आहे. अद्वैतातून हे द्वैत प्रकट झाले असून आपल्याला हे द्वैत कायम असंतुष्ट व तहानलेल्या अवस्थेत ठेवत असते. म्हणून या द्वैताचा त्याग करून अद्वैत मार्गाने श्री गुरूंच्या मार्गदर्शनाखाली प्रस्थान ठेवणे हे मानवी जीवनाचे सर्वोच्च उद्दिष्ट आहे. त्यासाठी ही श्री गुरू प्रार्थना लिहिली गेली आहे.

॥ श्री गणेशाय नम: ॥

*हे जयजयाजी श्री गुरुदेवा, साक्षात श्री गुरुतत्त्व अधिष्ठाना,*
*सात्त्विक बुद्धीयोगे स्थिर करण्या मना, आशीर्वच दे आम्हा हे दयाघना ॥धृ॥*

*उद्दिष्ट जीवनाचे जाणण्या कित्येक जन्म गेले,*
*"अद्वैतस्वरूप जाणण्या जीवन ते प्राप्त झाले",*
*तुझिया कृपेकरुनी या जन्मी जाणिले ते आम्ही पुरते,*
*परि मनोगती थांबविण्या आम्ही दुर्बल गे श्री गुरुमाते. ॥1॥*

*म्हणुनी धरिले चरण तुझे हे श्री जगद्गुरू माते,*

*समर्पित केले अवघे जीवन आम्ही आमुचे तुला ते,*
*आता हाती धरुनी तुझिया घट्ट धरावे आमुचे हे कर,*
*दे आत्मबल पार करण्या हा आभासाचा भवसागर. ॥2॥*

*साक्षात अद्वैत आनंदरूप असे ती जगन्माता,*
*तिची लेकरे आम्ही द्वैतामध्ये अडकलो जी,*
*कृपा करूनी हे श्री गुरुराया घालावे साकडे तिजला,*
*भक्तांना देशी अभय आणि प्रसाद अद्वय आनंदाचा. ॥3॥*

*तो धाक आपल्या आशीर्वादाचा, नियंत्रित करिती मनोव्यापार,*
*श्री गुरुकृपेनेची साधना होते निर्विघ्नतेने ती पार,*
*घेउनी ताबा मनानेच मनाचा अहंभाव तो विरघळला,*
*वृत्ती प्रवृत्ती इच्छा वासनांचा आभास हा कोसळला. ॥4॥*

*आता हे श्री गुरुराया राहो सतत समवेत आम्हा,*
*द्यावे आशीर्वाद आम्हा सिद्ध करावया साधना,*
*दिव्य तेज आपुले भक्तिमार्ग हा अवघा उजळूनी टाका,*
*घेउनी जावे आम्हा त्या परम धामा जेथे असे अद्वैत जगन्माता ॥5॥*

# 3. माझे मन गणपती

आपल्या सर्वांच्याच सर्वात आवडीचा बाप्पा आणि आराध्यदैवत. प्रत्येक गोष्टीची सुरुवात गणपती बाप्पाला वंदन करून.

*माझे मन गणपती माझे तन गणपती ॥*
*विशुद्ध झाली मम सकल बुद्धी मती॥धृ॥*

*तुज जाणिले जाणिले क्षणोक्षणी ॥*
*तू परम अगम्य देवाधिदेव जगदाधिपति॥1॥*

*तू मातापिता तू बंधु तू माझी भगिनी ॥*
*हात  माझा हाती तू घेतलास या जीवनी॥2॥*

*देवा आर्त ठेवितो तव कमलचरणी ॥*
*मम भवजल फेरा चुकव चुकव श्रीगुरू गणेशस्वामी॥3॥*

# 4. नमन तुला हे श्रीस्वातंत्र्य देवी

स्वातंत्र्य म्हणजे एक परमोच्च तत्त्व त्याच्याशी निगडीत होऊन आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सुविधा समानतेचे, उन्नत जीवन जगता येणे. स्वातंत्र्य म्हणजे जिथे अंतर्गत व बाह्य  शत्रूंचा संहार तात्काळ होतो, स्वातंत्र्य म्हणजे जिथे न्याय्य व आत्मनिर्भर समाज व्यवस्था अस्तित्वात असते. स्वातंत्र्य म्हणजे देशाबद्दल असणारी नितांत जबाबदारी, विश्वास, आदर व राष्ट्रप्रेम, स्वातंत्र्य म्हणजे शिस्त आणि स्वातंत्र्य म्हणजे संपूर्ण जीवन राष्ट्रासाठी अर्पण होणे.

*नमन तुला हे श्रीस्वातंत्र्य देवी,*
*नमन तुला आमुचे हे आई श्रीस्वातंत्र्य देवी ॥धृ॥*

*प्राण वाहतो आम्ही तव पवित्र यज्ञवेदी ॥*
*उन्नत होवो आमुचे जीवन सदा तव चरणी ॥1॥*

*पूजा करितो समत्व बंधुत्व प्रेम अन् निसर्गाची ॥*
*संचार तव आमुच्या तनमनी तू शत्रूसंघ निवारिणी ॥2॥*

*तू उर्जा तू अर्थ तू जननी सकल सुविधांची ॥*
*तू विद्या तू संस्कृती तू अपार प्रेरणादायिनी ॥3॥*

*आज नमितो चरण तयांचे ॥*
*रक्त अर्पिले ज्यांनी तव शरणार्थी ॥4॥*

# 5. काव्य स्फुरावे

*काव्य स्फुरावे काव्य लिहावे ॥धृ॥*

*विश्वाने तयाचे माध्यम करावे ॥*
*कल्पना कराव्या कल्पनेने अन ॥1॥*

*शब्दांनी ते साहाय्य करावे ॥*
*सकल जनांचे हृदय हरवावे ॥2॥*

*मनोरंजन ते सर्वांचे व्हावे ॥*
*सुंदर प्रतिभेचे रंग उधळावे ॥3॥*

*त्यात दिसावे त्यात दिसावे ॥*
*श्रीरूप ते सरस्वतीचे ॥4॥*

# 6. कृपा

ही रचना संत श्री कबीर दास यांच्या “अब के बार बक्श बंदे को...” या पंजाबी भजनावर आधारीत आहे. (थेट अनुवाद नाही.) देह रूपी गावात जीवनरूपी शेती करण्यासाठी दहा इंद्रिये येतात असे रूपक येथे वर्णिले आहे. पाच कर्मेंद्रिये आणि पाच ज्ञानेंद्रिये अशी ती दहा इंद्रिये आहेत. या गावात हा अदृश्य “मी” आपोआप निर्माण झाला आहे. त्याने त्याच्या इच्छावृत्तीरूपी पाण्याने ही आभासी जमीन कसण्यासाठी जीवन खर्ची घातले.

जे काही त्याच्या हाती आले ते भ्रांतमय होते. वास्तव सत्यता आपल्याला भौतिक सत्यतेच्या रूपाने अनुभवास येतात. आणि मन दिसत नसूनही त्याचे अदृश्य अस्तित्व प्रखरतेने जाणवते म्हणून दुसरी मनरूपी आभासी सत्यता आहे. या दोन्ही सत्यता व जीवनातील सातत्याने जाणवणारी फरकाची जाणीव, मानवी जीवनात अनुभवातून इच्छा, वासना, आकांक्षा, महत्वाकांक्षा वृत्ती, या भ्रांती निर्माण करतात. अशा या भ्रांती निर्माण झाल्या की मद, मोह. मत्सर, काम, क्रोध, लोभ हे षड्रिपू त्या “मी” ला सहज लुटून नेतात. जे काही मिळविल्यासारखे वाटते, ते सतत संपत असल्याची आणि कमी असल्याची भ्रांती हे षड्रिपू तीव्र करत जातात. मग तो “मी” नैतिकता व धर्म विसरतो. शेवटी ते षड्रिपू त्याला देशोधडीला लावतात.

आता नियती जेंव्हा या केलेल्या प्रत्येक कर्माचा लेखाजोखा मागते, तेंव्हा ही दहा इंद्रिये, तो मी नव्हेच म्हणून पळून जातात. आणि “मी” एकटा पडतो. परंतु तोपर्यंत हा “मी” दिशाहीन झालेला असतो, सैरभैर झालेला असतो. म्हणून तो श्री गुरूंना कळकळीने हाक देतो आणि गुणातीत म्हणजे अद्वैतात विसावा द्या अशी विनंती करतो.

*आता कृपा एवढी जी करा ॥*
*न धाडी पुन्हा गर्भवासा मला ॥धृ॥*

*दशेंद्रिये इथे कसती शेती ॥*
*परि जमीन आभासी असे ती ॥*
*कोठून कुणी हा "मी" पातविला ॥*
*बहुइच्छांनी त्याने सिंचियले तिजला ॥1॥*

*भ्रांतीचे जे बहु शेत बहरले ॥*
*षड्रिपूंनी ते सहजची लुटले ॥*
*असा हा त्यांनी डाव साधला ॥*
*लावले हो मजला देशोधडीला ॥2॥*

*नियती मागे हिशेब मजला ॥*
*दे रे आता त्या क्षणाक्षणाचा ॥*
*जेंव्हा मांडीला तो लेखाजोखा ॥*
*गेली दशेंद्रिये ती पलायनाला ॥3॥*

*एकटा इथे मी दमलो भागलो ॥*
*दिशाहीन मी हा कुठे बहकलो ॥*
*ये गं ये गं श्री गुरुमाई आता ॥*
*दे मजला गुणातित विसावा ॥4॥*

# 7. जोहार

जोहार = लवून नमस्कार करणे.

*उपाधी ही इथे आम्हा असे विस्तवासमान,*
*जोहार जोहार तुम्हा आम्ही घालतो आदबीनं... ॥धृ॥*

*असे हा देह या विश्वाची निर्मिती,*
*निमित्त मात्र तयात असे आमुची वसती...*
*आम्ही हो रहिवासी स्वानुभवाच्या गावचे,*
*चालण्या इथे आलो श्रीगुरूंच्या मार्गाने... ॥1॥*

(आपल्याला आपल्या शरीराचा व विश्वाचा अनुभव येतो पण स्वतःचा अनुभव घेण्यासाठी आपल्याला इंद्रिय नाही. म्हणून आपण स्वानुभवाच्या गावाचे वाट चुकलेले रहिवासी.)

*कर्मे आमुची सदा ती इथे हो निष्काम,*
*उर्जारूप देहमन तिथे आत्मतत्त्व अधिष्ठान... ॥2॥*

*ईच्छा वासना वृत्तींनी देह रंगविला संसारी,*
*रंगमंच सोडूनी आता स्नान करीतो शून्य प्रवाही... ॥3॥*

*लाभले आम्हांस असे प्रेम ते ईश्वराचे,*
*विश्व-हृदयातून फुटले ते उमाळे प्रेमाचे... ॥4॥*

*पाहतो हृदयी तुमच्या सदा सखा सारंगपाणि,*
*जोहार जोहार त्याला आम्ही घालतो मनोमनी... ॥5॥*

# 8. संतमय व्हावी काया

*पावलांची दिशा व्हावी कुंभार गोरा ॥*
*हातीची ती कर्मे व्हावी माळी सावता ॥धृ॥*

*हृदयातील भाव व्हावा संत जनाबाई ॥*
*नाम येती ओठी नामदेव यावे त्या नामी ॥1॥*

*कंठी यावी मंगल वाणी ती कृपा एकनाथ ॥*
*श्वासांमध्ये प्राण तो व्हावा निवृत्ती नाथ ॥2॥*

*तुका व्हावा दृष्टी शोधण्या त्या भगवंता ॥*
*ज्ञानदेव भेटवि तव चरणी ठेविता माथा ॥3॥*

*तेजाळू दे काया संत चोख्याचिया तेजा ॥*
*त्यावर फुलू दे रोमरोम माई मुक्ताईचा ॥4॥*

*काया अवघी व्हावी ऐसी संतगुणांचे आगर ॥*
*मन माझे गा व्हावे परमानंदाचा सागर ॥5॥*

*विश्वाचे आर्त मम चित्ती प्रकटावे ॥*
*शरणागती होऊन अश्रू ते वाहू दे ॥6॥*

*ज्ञानाविना जीव इथे झालासे निष्प्राण ॥*
*स्वस्वरूपी प्रकटूनी देवा तुम्ही व्हावे माझे  प्राण ॥7॥*

*श्रीगुरुतत्त्व होण्या आसनस्थ मम बुद्धीचे आसनी ॥*
*आत्मभान वाहतो मी आपुलीया चरणकमळी ॥8॥*

# 9. पाहता श्रीगुरुदेवा तुम्हा

आपण सर्वच जण मायेच्या मोहपाशात आत्मभान हरपून जीवन जगत असतो. त्यामुळे जीवन संघर्षमय होऊन जाते. या मायेच्या मोहपाशापासून सुटका होण्यासाठी श्रीगुरुदेव यांनी त्यांच्या शक्तीने संमोहित केले असता आपण या सामान्य द्वैतातून परम अशा अद्वैतात स्थिर होऊ शकणार आहोत. मायेचे मोहपाश तोडण्यासाठी श्रीगुरुदेवांचे संमोहन अस्त्र आवश्यक आहे. त्यासाठी केलेली ही प्रार्थना. "हम बिस्म भई मुख लागे..." श्री गुरू रामदासजी यांच्या या अत्यंत सुमधुर पंजाबी भजनावरून ही रचना निर्माण झाली आहे. (थेट अनुवाद नाही.)

ही विश्वमाया म्हणजे विश्वाची महाऊर्जा आणि तिच्या इच्छाशक्तीने तिने "मी" ची निर्मिती केली आहे. तसेच या विश्वात असलेल्या अनंत क्षमतांना काळ, अवकाश आणि वस्तू विषयांना प्रकट केले आहे. त्या स्वत:च्या "मी" ला तिने तिच्या या अद्भुत अविष्कारात गुंतविले असून श्री गुरूंच्या संमोहनाने हा मायेचा पाश तुटणार आहे.

मायेने तिच्यातून तिच्याच प्रभावाने सर्व जीव विश्व निर्माण केल्याने मायेची ओढ मायेकडेच असते. परंतु श्री गुरू यांनी या मायेच्या सर्व शक्तीला जिंकले असल्याने त्यांनी त्यांच्या संमोहनाने बुद्धी स्थिर केली असता या मायेच्या बंधनातून सुटणे शक्य होणार आहे. जगद्भाव म्हणजे मायेकडील मनाची ओढ. हा जगद्भाव नाहीसा होण्यासाठी श्री गुरूंचे सहकार्य येथे प्रार्थिले आहे.

श्री गुरू हे साक्षात योगियांचे योगी, निर्गुण स्वरूप आहेत. वैराग्य आणि भक्ती यांचा सर्वोत्कृष्ट अविष्कार म्हणजे श्री गुरू आहेत. त्यांच्या मार्गदर्शनासाठी साधकामध्ये ती पात्रता निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी श्री गुरूंच्या आशीर्वादाने कारणदेह/आनंदमय कोष, विज्ञानमय कोष, मनोमय

कोष, प्राणमय कोष आणि अन्नमय कोष या पाच कोषांची शुद्धी होऊ दे अशी प्रार्थना येथे केली आहे. त्यायोगे साधकामध्ये संपूर्ण सात्त्विकता परिस्थिती निर्माण होणार आहे आणि आता जेंव्हा हा साधक ध्यानात बसेल तेंव्हा ते ध्यान इतके घट्ट लागेल की श्री गुरू सहजच त्याच्या अंतर्यामी येऊन त्याला निर्गुणाच्या धामी घेऊन जातील.

*पाहता श्रीगुरुदेवा तुम्हा, हा विस्मयची मनी दाटला ॥*
*तुमचे संमोहीनी जीव माझा मोहवा ॥धृ॥*

*पाहा हा खेळ मायेचा ॥*
*दुफळी माजवुनी सर्वत्र ॥*
*मोहपाशा गुंतवी सर्व जीवा ॥*
*तुम्ही आता कृपा मजवरी करा ॥1॥*

*विश्वमाया ही सर्वान्तर्यामी ॥*
*आपुलाच आपुला निर्माण करी "मी" ॥*
*पातुनी काळ-आकाश-वस्तूविषयाला ॥*
*स्वसंमोहूनी मांडीयिले जगद-व्यापाला ॥2॥*

*करीता प्रयत्न कितीही तरी ॥*
*मायेची ओढ मायेकडे ही ॥*
*तुमचे संमोहीनी स्थिर बुद्धी योगा ॥*
*अशी द्यावी सिद्धी मायामोह तोडण्या ॥3॥*

*तुम्ही साक्षात निर्गुणाचे निधान ॥*
*माया घेतसे तुम्हा चरणी लोळण ॥*
*आम्ही चातक होऊ दे करुणेची वर्षा ॥*
*विलय करा सत्वर जगद्भाव हा आमुचा ॥4॥*

*निर्मळ व्हावी आमुची पंचकोषकाया ॥*
*तुमचेच नाव सदा यावे आमुच्या ओठा ॥*

*वाहू द्या रोमरोमांत तव सात्विक ऊर्जा ॥*
*तुमचे चरणी माझ्या सर्वस्वाची माया ॥5॥*

*योगियांचे योगी तुम्ही अद्वैताचे धनी ॥*
*पिता तुमचा वैराग्य, भक्ती असे माता ॥*
*तुमच्या अनुरोधे बैसलो आम्ही ध्याना ॥*
*अंतर्यामी तुम्ही घेऊनी जा निर्गुण-धामा ॥6॥*

# 10. जिथे जाशी

श्री हनुमान हे या विश्वातील सर्वोत्तम शिष्य आणि म्हणूनच सर्व साधकांचे ते श्री गुरू आहेत. ही रचना "जिथे जाये बाहे मेरा सतगुरू...." या पंजाबी भजनाच्या धर्तीवर संपन्न झाली आहे. (थेट अनुवाद नाही.) आवडेल तुम्हाला...

श्री हनुमान हे मृत्युंजय असून त्यांना येथे अमर्त्यभूषणा हे विशेषण दिले आहे. त्यांना शेवटी अशी विनंती केली आहे की तुम्ही मला श्रीरामाच्या धामी संपूर्ण आनंदमय अशा अवस्थेत घेऊन जा. मृत्यू नव्हे, तर प्रयाणोत्सव म्हणून हा एक आनंदमय सोहळा व्हावा इतका माझा भाव श्रीरामाच्या चरणी दृढ व्हावा.

*जिथे जाशी माझ्या श्रीगुरू रामदासा ॥*
*तिथे श्रीराम जानकी येती निवासा ॥धृ॥*

*महाकाय तू महाबली वायुसूता ॥*
*महाकाल थांबती बजरंग नाव घेता ॥1॥*

*अतिबुद्धि दिगंत तिला वेग तुझा ॥*
*मनोवेगाशी तू जिंकीले मारुती राया ॥2॥*

*ब्रह्मांड थरारे तुझा कोप होता ॥*
*दुष्टशक्ती निवारी तू हनुमंता ॥3॥*

*महामाया स्वरूप असे तुझी काया ॥*
*अणूपासूनी ब्रह्म व्यापिले बलभीमा ॥4॥*

*भक्तिप्रेम अपार तुझे हे महारुद्रा ॥*
*तुझ्या रोमरोमांत वसे श्रीरामराया ॥5॥*

*सुवर्ण कांती तुझी प्रकाशाच्या तेजा ॥*
*नवग्रह कापिती तुला हे भानूप्रतापा ॥6॥*

*प्राणसखा तू लक्ष्मणाचा अंजनीच्या सूता ॥*
*पंचप्राण वाहिले मी तुझिया चरणा ॥7॥*

*वैराग्याचे वरदान तुला अमर्त्यभूषणा ॥*
*योगीयांचा तू योगी हे श्रीरामानंदा ॥8॥*

*दाव दाव मजला तव श्रीगुरुचरण आता ॥*
*ने मजसी ने आनंदे श्रीरामाच्या धामा ॥9॥*

# 11. वडवानल

*वडवानल हा द्वंद्वाचा गं उठला मायेचा ॥*
*सापेक्षतेचे इंधन त्याचे पाहतो ग्रासाया ॥धृ॥*

*तनमनाची रचना ऐशी हे द्वैतची वाटे खरे ॥*
*जोर तयाचा इतुका की हा जीव प्रपाती पडे ॥1॥*

*वास्तव भासे जैसा विस्तव ॥*
*कधी उब तर कधी होरपळ ॥2॥*

*कुठे निवारा तो शोधू इथे ॥*
*अग्निकांड ते द्वैताचे उठले ॥3॥*

*दुःखाची कधी वीज पडे ॥*
*अन वादळ संघर्षांचे ॥4॥*

*अद्वैताचा घेऊ आसरा मनात वसंत फुलवू गं ॥*
*जे जे भेटे भूत तयात चैतन्यची ते पाहू गं ॥5॥*

*वैराग्याचे कुंपण ते बांधू ॥*
*त्याग करूनी भोग ते भोगू ॥6॥*

*श्रीरामाचे नामामृत ते मनी आपुल्या आणू गं ॥*
*द्वंद्वाचा वडवानल हा श्रीगुरू कृपेने विझेल गं ॥7॥*

# 12. निरोप त्याचा

*आज कुणी घेतला राम राम जगाचा ॥*
*त्याचा हा उठला पाहा हो जनाजा ॥धृ॥*

*लाविले पाहा कोणी चार खांदेकरी ॥*
*वैकुंठधामा त्याला नेती सत्वरी ॥1॥*

*किती सगेसोयरे मागे मागे चालती ॥*
*अश्रुंची फुले त्यांच्या रस्त्यावर सांडिती ॥2॥*

*निष्प्राण देहावर कुणी फुले उधळती ॥*
*त्यातील कित्येक रस्त्यावर पडती ॥3॥*

*त्यातील हो मी आहे फुल एक ॥*
*माझ्याशी त्या आत्म्याने केले हितगुज ॥4॥*

*म्हणे येथे आज मी पाहतो सोहळा ॥*
*माझ्या या मरणाचा आगळावेगळा ॥5॥*

*कित्येक यातील त्यांनी केले अपमान ॥*
*आज हो माझ्या प्रेताला का देतात हे मान ॥6॥*

*कित्येक यातील त्यांनी सावरले मला ॥*
*सर्वांमध्ये त्या मी ईश्वर पाहिला ॥7॥*

*आज माझ्यासवे माझी पुण्याई हो असे ॥*
*सांगा यांना तुम्ही मी एकटा हा नसे ॥8॥*

*कशाला ते विधी ते माझ्या मरणाचे दिवस ॥*
*मरणाआधीच मी येथे झालो मुक्त सहज ॥9॥*

*आता उठले पाहा लोळ ते अग्नीचे ॥*

*झाले विघटन देहातील पंचतत्त्वांचे ॥10॥*

*आता बोलती गुज माझ्याशी ती माया ॥*
*तुला आता कधी इथे नसे येरझारा ॥11॥*

*जातो आता आम्ही आमुच्या गावाला ॥*
*राम राम घ्यावा आमुचा ॥*
*जीव द्या हो जीवाला... ॥12॥*

# 13. तूच ईश्वरा

*तूच ईश्वरा ही मांडून दुनिया ॥*
*त्यात नांदतो जणू तूचि खेळीया ॥धृ॥*

*भासे भोग भोगी तू ते सगळे ॥*
*परि तू चैतन्य मायेपासून वेगळे ॥1॥*

*आम्ही पुतळे ते मातीचे सगळे ॥*
*परि दिले आम्हा तू आत्मभान स्वत्वाचे ॥2॥*

*तूझे स्वत्व आम्ही तूज अर्पावे ॥*
*नीत नीत तू इथे आम्हा रक्षावे ॥3॥*

*पंचप्राणांनी आम्ही ओवाळू तुज ते ॥*
*तव मंगल गीत पंचसखींनी गावे ॥4॥*

(पंचसखी = शरीरातील पंचतत्त्वे)

*आम्ही सर्व जणू एकतत्त्व इथे हे ॥*
*दे आम्हा दान तव अभयतेचे ॥5॥*

*जर कोणी कष्टी इथे संकट येता, ॥*
*तू व्हावे त्यांचा साक्षात पाठीराखा ॥6॥*

*हीच प्रार्थना ईश्वरा तुजला ॥*
*कर दीर्घायु आम्हा प्रत्येकाला ॥7॥*

# 14. पाहता मी आकाशा

*पाहाता मी आकाशा तुजला रे तुझ्यात असे मी विरून जावे ॥*
*कवेत सृष्टी क्षणात घेता सर्वांहून मी अलिप्त व्हावे ॥धृ॥*

*वसेल हृदयी अवकाश होऊनि ॥*
*सकल जनांचे दुःख हर्पूनी ॥1॥*

*चैतन्याच्या गावी मी क्षितीज होऊन जाईन ॥*
*प्रभु हृदयाकाशी त्या मलाच गं मी पाहीन ॥2॥*

# 15. घ्यावे नाम देवाचे

*घ्यावे नाम देवाचे ऐसे क्षणाक्षणाला ॥*
*ऐसे दिले महा वरदान देवाने मानवाला ॥धृ॥*

*करूया ऐसे कर्म तेथे नामाचा गजर ॥*
*पाहा आपल्या समोर ईश्वर सखा तो सादर ॥1॥*

*आकाश तयाचे स्वरूप त्यामध्ये आपण ॥*
*आपल्यामध्ये तो आहे जसा एक दर्पण ॥2॥*

*ठेऊया विशुद्ध मनो-शरीर एक साधन ॥*
*नको अभक्ष्य भक्षण नको मदीरापान ॥3॥*

*सात्त्विक आहार अन् शुद्ध जलपान ॥*
*होईल कणखर शुद्ध सात्त्विक तन-मन ॥4॥*

*कुबुद्धी ती सर्व पालटू दे सर्वांची ॥*
*सुबुद्धी सुमती मिळो आम्हांला सदगती ॥5॥*

*ऐका प्रिय जनहो मी ना कोणी वेगळा ॥*
*तुमच्यासम मला ही आहे चैतन्याचा आसरा ॥6॥*

*शपथ तुम्हा घालतो या ईश्वरीय चैतन्याची ॥*
*वाट केवळ चाला हो फक्त अध्यात्माची ॥7॥*

# 16. प्रसंग युद्धाचा

खरे तर आपण जीवनात अनेक संघर्ष अनुभवत असतो जे आध्यात्मिक दृष्टीने सपशेल आभासी असतात. पण त्याला वास्तव मानून आपण जीवन जगत असतो. जोपर्यंत अज्ञान जात नाही तोपर्यंत हे तथाकथित आभासी सत्यतेचे नियोजन अनिवार्य आहे. हीच ती मदमाया होय. मग पुढे काय? यावर संत कबीर जी यांनी जो उपाय सांगितला तो इथे दिला आहे.

*क्षणोक्षणी आम्हा प्रसंग युद्धाचा... ॥*
*चुकवायचा सतत हा द्वंद्वाचा मारा... ॥धृ॥*

*अहं आभासी परि निरिक्षक मायेचा... ॥*
*बंदी सदा हा वृत्ती इच्छा वासनांचा, ॥1॥*

*भ्रांतीने मानितो इथे आभासी सत्यता... ॥*
*जे मानिले ते भोगूनही ना मिटे तयाची तृष्णा , ॥2॥*

*भार ना सोसवे आता या मदमायेचा... ॥*
*फेरा चुकवूया या आपुल्या जन्ममरणाचा, ॥3॥*

*योगभक्तीने लववूनी माया, ॥*
*करुया धनुष्य त्या मायेचा, ॥4॥*

*एकाग्रतेची ओढूया प्रत्यंचा, ॥*
*लक्ष्य करुया त्या शून्याकाश तत्त्वाला, ॥5॥*

*लागेल ठाव तिथे आपुल्या स्वस्वरूपाचा... ॥*
*आता उरलो इथे उपकारापूरता... ॥6॥*

# 17. सामर्थ्य दे

*सामर्थ्य दे देवा सामर्थ्य दे ॥*
*तव गुण गाण्याचे सामर्थ्य दे ॥धृ॥*

*विशुद्ध मन दे ॥*
*सशक्त तन दे ॥1॥*
*सदसद्विवेक दे ॥*
*षड्रिपू विजय दे ॥2॥*

*बुद्धी नजर जिथे जाते ॥*
*तिथे तुला पाहाण्याची ॥*
*मजला विज्ञान दृष्टी दे ॥3॥*

*तुझी कृपा होऊ दे ॥*
*सतसंग तो घडू दे ॥*
*तुझे नाम सदा... सदा मुखी दे ॥4॥*

*तू श्रीगुरु तू आराध्य माझे ॥*
*आधारी तू..., तू मज संगे ॥*
*आदि, मध्य अन् अंतःकाले ॥5॥*

# 18. साध्य तुला रे सर्व ईश्वरा

*साध्य तुला रे सर्व ईश्वरा ॥*
*माझ्या विठ्ठला पांडुरंगा ॥*
*हाक ऐक या लेकरांची ॥*
*आण तुझ्या वीटेची तुजला ॥धृ॥*

*तू आणिले आम्हा या विश्वामाजी ॥*
*नच आम्हा जाण त्या तव मायेची ॥*
*क्षणात हसवी ती क्षणात रडवी ॥*
*दे बल आमुच्या काया मन बुद्धीला ॥1॥*

*आम्ही पुतळे ते मातीचे ॥*
*हजार गतीने झिजायचे ॥*
*या मातीतून तुज शोधू ॥*
*ऐसे वरदान दे आम्हांला ॥2॥*

*जरी ना जमली भक्ती तुझी ॥*
*परि तव छबी निरंतर हृदयांतरी ॥*
*आज आम्ही भ्रमसंकटी देवा ॥*
*न धरावा आम्हावरी रुसवा ॥3॥*

*कर कर कृपा तू आम्हावरती ॥*
*दे आम्हा आत्मजाणीव रोकडी ॥*
*आम्ही होऊ तुझे उतराई देवा ॥*
*निवार निवार भ्रम संकट रे आता ॥4॥*

# 19. मीच पोरका मला इथे हा

आत्मा अमर आहे असे अध्यात्म आणि शास्त्र एकमुखाने सांगतात. आपण स्वत: आत्मस्वरूप असूनही त्याची  ओळख आपल्याला पटत नाही. असंख्य भेद निर्माण झाल्याने आपली ओळख त्यामध्ये हरवून गेली आहे. अशा या आत्मतत्त्वाचे स्वगत इथे या रचनेमध्ये आले आहे. हेच मानवी जीवनाचे परम उद्दिष्ट आहे असे वेद म्हणतात.

*मीच पोरका मला इथे हा ॥*
*कुठे मला मदस्वरूप दिसेना ॥धृ॥*

*सर्वांतर्यामी वसे परि मी ॥*
*मीच मला तो अखम आंधळा ॥1॥*

*धुळलोट उसळले द्वंद्वाचे ते ॥*
*अद्वयाचा तो भाव गवसेना ॥2॥*

*व्हावी ऐसी श्रीगुरु कृपा ती ॥*
*इथे गळून पडावे मी माझे मला ॥3॥*

*बीज अहं ते द्वंद्वाचे ह्या ॥*
*त्यातून हुंकार ब्रह्माचा निघावा ॥4॥*

*जलामध्ये जलभाव जसा हा ॥*
*मम आत्मभाव तो मज दिसावा ॥5॥*

*दृष्टादृष्ट ती व्हावी आता ॥*
*स्वसंवेद्य मी, मला ब्रह्मस्वरूप भेटवा... देवा.... ॥6॥*

# 20. भावद्वंद्व

विश्वात आपल्याला द्वैत सगळीकडे आढळून येते. आपल्याला सर्वसामान्यपणे जे ज्ञान होते ते फरकाचे होते. विश्वाचे एकत्व आपल्यातच सामावलेले असल्याने एकत्वाचे वेगळे ज्ञान होणेच शक्य नाही. हे या विश्वाचे अत्यंत गूढ असे रहस्य आहे. परंतु या द्वैतातून निर्माण होणारे भावद्वंद्वच आपल्याला या द्वैतातून सोडवेल जेंव्हा तिथे ईश्वराप्रती असलेला विरह साधने दरम्यान कमाल मर्यादा गाठेल.

*तूच माधवा द्वैत निर्मुनी ॥*
*शृंखला घडविली संघर्षांची ॥धृ॥*

*द्वैत निर्मिले स्थूल-सूक्ष्माचे ॥*
*सांत अस्तित्वाशी अनंत "मी" चे ॥1॥*

*द्वैत असे ते "नसल्याचे" त्या "असल्याशी" ॥*
*जे काही "आहे" त्याच्या विरुद्ध तत्त्वाशी... ॥2॥*

*द्वैत म्हणुनी अद्वैत निपजले ॥*
*हरी विना कुणी जाणले ते वेगळे ॥3॥*

*तू ठेवून आहेस रे साक्ष तुझी ही ॥*
*माझ्यात तू वेगळा द्वैत-अद्वैताहुनी ॥4॥*

*द्वैतात माधवा तू सदा अद्वयी ॥*
*भोग भोगुनी शोभे योगियांचा तू योगी ॥5॥*

*परि तू अन् मी असे एक असूनही ॥*
*भाव-द्वंद्व पेटले मम अंतर्मनातूनी ॥6॥*

*काय सांगू तुज हरी आर्त मनाची ॥*

*तहानलेल्या माश्याची अवस्था जशी ॥7॥*

*भाव-द्वंद्वातूनि त्या उठतील ज्वाला ॥*
*हृदय वितळेल जिथे तुझा विरह माधवा ॥8॥*

*घडू दे साधना त्या तापातून ॥*
*"मी-पण" होईल सर्व भस्मीभूत ॥9॥*

*कुठे असेल मग ते द्वैत-अद्वैत ॥*
*होऊन राहू तू-मी अद्वय... ॥*
*माधवा होऊन राहू तू-मी अद्वय... ॥10॥*

# 21. रामनामामृत हे प्याहो

श्री रामाचे नाव मुखामध्ये सातत्याने येत राहणे ही मनाची विशुद्ध अवस्था आहे. श्री गोंदवलेकर महाराजांनी व श्री रामदास स्वामींनी श्री रामनामाची अपरिमित महती कथन केली आहे. ही रचना "पीव्हो पीव्हो अमृत पीव्हो..." या पंजाबी भजनावरून सुचली आहे. (थेट अनुवाद नाही.) आवडेल तुम्हांला...

*प्याहो प्याहो रामनामामृत हे प्याहो ॥*
*अमृत प्याहो चिरंजीव व्हा हो ॥धृ॥*

*भवतापांचा लवलेश न राहती ॥*
*परमानंदी तुम्ही विलीन व्हा हो ॥1॥*

*सद्गुण सद्बुद्धी सद्गती मिळती ॥*
*प्रभू चरणी तुम्ही लीन व्हा हो ॥2॥*

*षड्रीपू ते स्वनियंत्रणात येती ॥*
*श्रीरामाचा पराक्रम गा हो ॥3॥*

*आदर, त्याग प्रेमाने तनमन भरती ॥*
*श्रीरामपंचायतन स्तुती ती गा हो ॥4॥*

*सात्त्विकता अन् शुचिता ती प्रकटे ॥*
*जानकीचे सदा स्मरण करा हो ॥5॥*

*भक्तीशक्तीचे वरदान ते मिळती ॥*
*रामदासी ती उपासना करा हो ॥6॥*

*धैर्यशील राजशील ते लवकुश ॥*
*त्यांच्यासह तुम्ही रामायण गा हो ॥7॥*

*श्रीराम स्मरता श्रीगुरू आशिष मिळती ॥*
*भवभ्रांतीतूनी बाहेर पडा हो ॥8॥*

# 22. सकल मायेची महामाया

ही देवीची स्तुती वा प्रार्थना आहे. देवी ही मूलत: निर्गुण स्वरूप आहे. परंतु तिचे हे निर्गुण स्वरूप चैतन्याच्या सान्निध्यात सगुण स्वरूपात प्रकट होण्याच्या अमर्याद क्षमता राखून असते. हे विश्व त्या निर्गुण ऊर्जा क्षमतांचा व्यक्त असा अविष्कार आहे. क्वांटम शास्त्र हे अगदी सुस्पष्टपणे आपल्याला दाखवून देते. प्राणिमात्रांसह आपल्या सर्वांच्या सगुण स्वरूपाचे मूळ अधिष्ठान देवीचे निर्गुण स्वरूप आहे. तथापि जोपर्यंत आपल्या मनाचा विलय होत नाही तोपर्यंत त्या निर्गुण स्वरूपाचे प्रकटीकरण अशक्य आहे. यात गंमत अशी आहे की मनच अमन झाले तर तेथे अनुभव घेणारा कोणीच नसणार आहे. त्यामुळे सिद्ध श्री गुरूसुद्धा त्या देवीला अगम्य शक्ती असे संबोधतात.

देवी तत्त्व हे अत्यंत दयाळू तत्त्व असून ती अष्टसात्त्विक स्वरूपात किंवा महाकालीरूपी रौद्र स्वरूपात ती भक्तांना दर्शन देते. अशी तिची ख्याती आहे. आता अत्याधुनिक विज्ञानसुद्धा सिद्ध करते आहे की हे देवी तत्त्व साक्षात जगद्‌जननी आहे. ज्यावेळेस साधक त्याच्या उपासनेच्या मार्फत देवी तत्त्वाचे आवाहन करतो तेंव्हा तिच्या निर्गुण स्वरूपापूर्वी त्याला शून्यत्वाचा अनुभव येतो असे आपल्या वेदांतात व अद्वैत शास्त्रात म्हटले आहे. ही रचना “सब राजन के राजा ....” या श्रीगुरू तेगबहादूर यांच्यावर आधारीत पंजाबी भजनावरून सुचली आहे. परंतु त्या रचनेचे भाषांतर केलेले नाही.

*सकल मायेची महामाया तू ग ॥*
*तुझ्यासम तूचि दयाळू असे ग ॥धृ॥*

*प्रसविले तू महाकाल दिगंत ॥*
*उदरी तुझ्या ब्रह्मांडं अनंत ॥*
*कलीकाल भयनाशिनी तू ग ॥*
*दुष्टबुद्धी संहारीणी तू ग ॥1॥*

*दशमहाविद्या ती तू असे ग ॥*
*नवदुर्गा ती तूचि असे ग ॥*
*काली कराली कधी भयंकर ॥*
*कधी सात्त्विक सरस्वती दिसे ग ॥2॥*

*मिटो चिंता दे आम्हा आरोग्य ॥*
*होऊ दे ती सुकर्मे सुयोग्य ॥*
*शीघ्र सुबुद्धी विवेक दे ग ॥*
*घडू दे हातून विश्वसेवा ग ॥3॥*

*तव चरणाभिषेक होण्या आता ॥*
*दे मज अश्रुंचे दान असे ग ॥*
*दे मज शक्ती भक्ती अपार ॥*
*तव गुण गाण्या कवित्व दे ग ॥4॥*

*निर्गुण तू ती सदा असे ग*
*परि सगुण तू कार्यार्थ दिसे ग*
*अष्टसात्त्विक भाव प्रकटू दे ग*
*दाव शून्यत्वाचे सत्वर शिखर ॥5॥*

*दे वरदान प्रकटू दे वैराग्य ॥*
*होऊ दे हा अहंभाव-विलय ॥*
*घेउनी हात माझा हाती ग ॥*
*निर्गुणी गावा घेउनी जा ग ॥6॥*

# 23. मांडीयेला ग माये

*मांडीयेला गं माये तू डाव भाव रंगांचा ॥*
*घेतला तू वेध स्व-आत्मभानाचा ॥धृ॥*

*माये गं माये आम्ही तुझी गं लेकरं ॥*
*सांभाळीशी तू आम्हा असता तव मार्गावर ॥1॥*

*रंगलो दंगलो त्रिगुणांच्या रंगाने ॥*
*तुज रंगवितो मम भक्तीभाव रंगाने ॥2॥*

*तुज ओळखिले मी तू रूप तुझे गं दाव ॥*
*तव चरणी या मी वाहतो हृद-भाव ॥3॥*

*चैतन्याची तू खाणी तुला शून्याचे गं कोंदण ॥*
*तृष्णा मम शमविण्या दे गं अमृताचे दान ॥4॥*

*मम आत्मभान ते होते परब्रह्म साक्षात ॥*
*श्रीगुरू रूप तू घेउनिया मज दे हा दृष्टांत ॥5॥*

*अणुरेणू ग कायेचे कर शून्यातिशून्य ॥*
*प्रकटव तिथे तू तव निर्गुणत्व अनन्य ॥6॥*

*जळामध्ये जळ मिसळता ते जैसे ॥*
*कालव हा अहं ब्रह्मामध्ये तू तैसे ॥7॥*

*माये गं माये तव चरणी मला घातला ॥*
*माझा न मी राहिलो आता हा कोण गं कुठला ॥8॥*

# 24. हरी माझी माता

*हरी माझी माता, हरी माझा पिता ॥*
*हरी माझा बंधु, हरी माझा सखा ॥धृ॥*

*हरी माझे हृदयी, चित्त माझे त्याचे चरणी ॥*
*दर्शन होता तुमचे , देही रोमांच उभे राहती ॥1॥*
*कर धरूनिया करी, त्याच्या घरा नेई हरी ॥*
*विठठल नामाचा गजर, सगळीकडे तोच सादर ॥2॥*

*विठठल नाम संकिर्तनी, ॥*
*त्याचा ज्ञानप्रकाश दाटे मनी ॥*
*विठ्ठल, विठ्ठल हा एकला विचार, ॥*
*आता करू कोणता मी आचार ॥3॥*

*हरीचा विसर पडला जगाला, ॥*
*तरी भार सर्वांचा का हा वाही ॥*
*हरीला विसर नाही कुणाचा ॥*
*साक्षी मी त्याचा झालो हा द्रष्टा ॥4॥*

*देवा तुज भक्तीरसाची लागिलीया तृष्णा ॥*
*फोडीला माझ्या हृदयी पाझर भक्तीचा ॥*
*हाक ती ऐकीली माझी तू माउली ॥*
*भक्तपणाची ती अहंभावना निमाली ॥5॥*

*कोणी केले कर्म, कधी संपले कर्म ॥*
*आता कर्तेपणाचा भाव निमाला ॥*
*होता समर्पण देवाचिया चरणी ॥*
*कर्मभोगाची बाधा न हो कोणत्याही क्षणी ॥6॥*

# 25. ऊन्ह तापले तापले

*ऊन्ह तापले तापले ॥*
*ग्रीष्म सोसेना सोसेना ॥*
*झाली अंगाची ही लाही ॥*
*शोष कंठाला पडला ॥धृ॥*

*ऊन्ह कशाचे तापले ॥*
*जीवनाच्या हव्यासाचे ॥*
*तापला हा इच्छा देह ॥*
*पितो पाणी हे भ्रांतीचे ॥1॥*

*वृत्तीच्या घामाने अंग हे भिजले ॥*
*षड्रीपुंच्या तापे हे पाय हो भाजले ॥*
*शोधिशी कुठे ही प्रेमाची सावली ॥*
*भेट बापरखुमादेव विठ्ठल ती माउली ॥2॥*

*प्रेम-सावलीत प्यावा भक्तिरस हा निवांत ॥*
*गुरुकृपे होईल तुझ्या भ्रांतीचा हा अंत ॥*
*दाटतील तिथे आनंदघन परमज्ञानाचे ॥*
*लोट वाहतील तिथे विवेक प्रलयाचे ॥3॥*

*जाता गुहेमध्ये वैराग्याच्या ॥*
*त्या तुर्येला भेटी सच्चिदानंद ॥*
*सहजे ओलांडी तू शून्याचा उंबरा ॥*
*होईल तुझा अवघा परमानंद ॥4॥*

# 26. आकाश

*आकाश अलिप्त सर्वांहून सदा असे ॥*
*परम शांती तिथे सदा ही निवासे ॥धृ॥*

*आकाश जरी सदा असे निर्गुण निराकार ॥*
*त्याचे पोटी विलसे विश्व सगुण साकार ॥1॥*

*आकाशातून प्रसवे कित्येक त्या ऊर्जा क्षमता ॥*
*कल्लोळ उठे हा तिथे जीवांच्या जाणिवांचा ॥2॥*

*परि आकाश सदा अलिप्त ते उदासीन असे ॥*
*हीच एक इच्छा-क्षमता आता मनी ती वसे ॥3॥*

*आकाश अरूप जणू वाटे रूप ते माझे ॥*
*परमात्म्याचा जणू तो आरसा स्वच्छ असे ॥4॥*

*आगम अविनाशी तू एक परम अरूप ॥*
*आकाशात प्रतिबिंब तुझे मी झालो तदस्वरूप ॥5॥*

# 27. सृजनत्वाचे व्रत

*व्रत तू दिधले सृजनत्वाचे ॥*
*सृजन करितो तव क्षमतांचे ॥धृ॥*

*पात्रासह तू दान घातले ॥*
*अज्ञाने ते माझेच मानले ॥1॥*

*सृजनासह अहं हा निपजे ॥*
*रसातळाला कित्येक ते गेले ॥2॥*

*जेंव्हा जेंव्हा अहं मज हरवे ॥*
*तुझे मंद अवीट स्मित मी पाहे ॥3॥*

*रहस्य विचारण्या मन ते धावे ॥*
*परि मज तेंव्हा तू कुठे ना दिसे ॥4॥*

*अहंभाव भ्रम तो बलशाली असे ॥*
*त्यापुढे ठाव माझा ना मुळी लागे ॥5॥*

*बैसता साधुसंतांचिया संगे ॥*
*अहं एक भ्रम मज ते कळले ॥6॥*

*ऐसे करून संतांच्या उपदेशे ॥*
*सृजन सर्व तव चरणी ठेविले ॥7॥*
*रहस्य सहजी आता मज समजे ॥*
*तू कर्ता असूनही अकर्मी असे ॥8॥*
*मूळ स्वरूप ते निर्गुण ऊर्जेचे ॥*
*गुण संक्रमणात परि सगुण ते भासे ॥9॥*
*सृजनत्वाने करितो पूजा; आराध्य तू माझे ॥*
*सर्वांतर्यामी तव अमृत स्मित मी सदा सदा पाहे...॥10॥*

# 28. अमृत नाव

गुरुग्रंथ साहेब मध्ये श्री गुरू अर्जनदेव जी यांचे “अमरित नाम परमेशर तेरा, जो सिमरे सो जीवै” हे अतिसुंदर भजन आहे. त्यावरून हे काव्य सुचले. अर्थात थेट अनुवाद केलेला नाही. हे भजन ऐकताना अचानक हे काव्य स्फुरले.

*अमृत नाव तुझे परमेशा ॥*
*तुझा विसर न व्हावा ही अभिलाषा ॥धृ॥*

*आता कोठे षड्रिपु ते दावा ॥*
*कायेतून वाहती तव अमृतधारा ॥1॥*

*महाशक्ती तू स्थूलसूक्ष्मा ॥*
*कणकणांत विलसे ब्रह्मांड ते पाहा ॥2॥*

*जरी असशी तू निर्गुणाचा पुतळा ॥*
*सगुण तू जाहला ती सृष्टी स्थापण्या ॥3॥*

*प्रशांत अनंत परमानंद निधाना ॥*
*राखणहार तू महासुख दाता ॥4॥*

*तव नामामृत प्राशन करता ॥*
*विशुद्ध होईल मन बुद्धी अन् काया ॥5॥*

# 29. गंध तुझा

*गंध तुझा तू सुगंधित ॥*
*रस तुझा तू रसिक ॥*
*प्रेम तुझे तू प्रेमी ॥धृ॥*

*रंग तुझे बहुविध तू रंगुला ॥*
*खेळ तुझा तू खेळीया ॥*
*सखा तू अन् तूच तुझा सखिया ॥1॥*

*चैतन्य तुझे तू बहुजीवा ॥*
*विश्व तुझे तू विश्व सोहळा ॥*
*मी तूझा तू माझा जिव्हाळा ॥2॥*

# 30. सांत अनंत

मोजमाप हे जीवनाचे अविभाज्य अंग आहे. जागृत असताना पाच ज्ञानेंद्रियांनी आपण अखंडपणे हे सगुण विश्व मोजत असतो. मन आणि मेंदूद्वारा ही मोजणी अगणितीय पद्धतीने होते, असे शास्त्रज्ञ म्हणतात. मोजल्यावर किती ते न सांगता येणारे असंख्य अनुभव असतात. इथे फुलांच्या सान्निध्यात त्यांचा नाजूकपणा, सुगंध आणि सौंदर्य या त्यांच्या सगुण अनुभवांचे मोजमाप आपणास निःशब्द कसे करते याचे वर्णन आले आहे. पाहा ना सगुण व अंत असणारा निसर्गसुद्धा आपल्याला विश्वाच्या अनंतपणाची झलक अगदी सहज देऊन जातो. म्हणून सांत साधकाकडून होणारी सगुण भक्ती त्याला रहस्यमयरीत्या अनंताकडे घेऊन जाते आणि म्हणूनच ती सर्वश्रेष्ठ मानली आहे.

सांत = स+अंत = ज्याला अंत आहे ते...

*फुले...*
*नाजूक किती ती फुले जुईची ॥*
*ओंजळभर मी आज वेचली ॥धृ॥*

*कोमलता मोजण्या जाता मी ॥*
*त्या स्पर्शातच ती कोमलता विरली ॥1॥*

*परिमळ हा केवड्याच्या अंगी ॥*
*धुंद किती मी त्याच्या गंधी ॥2॥*

*कसे वर्णू गंधमुग्धा कशी ती ॥*
*होता मी मुग्ध तर कोण मोजेल ती ॥3॥*

*सौंदर्याशी स्पर्धा कमळांची ॥*
*नयनांतून ओसंडूनिया ती वाही ॥4॥*

*सौंदर्य कसे तयांचे साठवू मनी ॥*

*कमलदली जर नजर गुंतली ॥5॥*

*कोमल सुंदर जरी फुले ही सुगंधित ॥*
*तया कसे मी वर्णू... मी मर्यादित ॥6॥*

*अगाध देवा तुझी अशी रे लीला, ॥*
*सगुण सांत राहे साक्षी अनंतपणाला... ॥7॥*

*तुझिया रे सगुण स्वरूपी देवा, ॥*
*या भक्तीमधुनी तू अनंत दे गा.. ॥8॥*

# 31. सावळं सुंदर

*सावळं सुंदर परब्रह्म ते अवतरलं, ॥*
*मन झाले हो पंढरी त्यानं विठ्ठल रूप ल्यायलं ॥धृ॥*

*मन माझे व्याकूळ त्यासी आस नारायण, ॥*
*आर्त ऐकून माझी तू केलेस रे अवतरण ॥1॥*

*तू अद्वैताचा राणा, द्वैताचे मी अज्ञान, ॥*
*ज्ञानगंगा वाहे, स्पर्शिता तव समचरण ॥2॥*

*सवे रुक्मिणी माझी गुरू, मी तुजला शरण, ॥*
*आता सोसवेना येथे हे तव मायेचे गं स्वप्न ॥3॥*

*तू तारणहार तूचि निवारीशी असार, ॥*
*विनवणी तुज आता नको येरझार ॥4॥*

*मी म्हणजे तू असा द्यावा जी मज एक भाव, ॥*
*चरण ना मी सोडू आता जरी कायेला खाई काळ ॥5॥*

*मी ना जाणी तुझा योगमार्ग अद्वैत, ॥*
*अजाण मी दे रे मज तव भक्तीचे ते दान ॥6॥*

*तुझा भक्तिरस अपार त्याचे करीन अमृतपान, ॥*
*चिरंतन राहो देवा तव चरणी आत्मभान ॥7॥*

# 32. ओ मेरे प्रीतम प्यारे

*ओ मेरे प्रीतम प्यारे ॥*
*तुम आए हृद मंदीर मेरे ॥धृ॥*

*चले गये सब मन के किल्मिष ॥*
*यह ज्ञान प्रकाश जो तेरा है आशिष ॥*
*तू दयाल मुझे नितसार संभाले ॥1॥*

नितसार = नित्य

*तुम हो मेरे जी के जीवना ॥*
*तुम ही बसे हो यह तन-धी-मना ॥*
*तुम स्वामी सरजनहार हो मेरे ॥2॥*

धी = बुद्धी

सरजनहार = सृजन करणारा, पालनपोषण करणारा

*देहंद तू बक्षंद तू ॥*
*आठो प्रहर मैं नित नित रहूं तेरे ॥*
*मैं मसकीन तुम बिसीयार हो मेरे ॥3॥*

देहंद = दाता

बक्षंद = माफ करणारा

मसकीन = नगण्य

बिसीयार = अगाध, अनंत

*उनका साथ सदा मैं पाऊं ॥*
*साधसंगत मैं उनकी ना तोडू ॥*

*जिनका पद राम नाम से चल्ले ॥4॥*

चल्ले = चालणे

*मैं जन तेरा तुम मालिक हो मेरे ॥*
*हाथ जोड द्वार खडा नित तेरे ॥*
*बरसाओ श्रीगुरू किरपा प्रभू मेरे ॥5॥*

जन = सेवक

# 33. व्हावी ऐसी कृपा

*व्हावी व्हावी ऐसी कृपा हो तुमची ॥*
*वास राहावा आपुला सदा माझे हृदयी ॥*
*श्री रामचंद्र बाप माझा आई सितामाई ॥धृ॥*

*मला हो इथे ना वाली तुम्हाविण कोणी ॥*
*भवारण्य हे चालताना व्हावे तुम्ही माझी साउली ॥*
*श्री रामचंद्र बाप माझा आई सितामाई ॥1॥*

*दंगलो रंगलो तुमचे नामामृत रंगी ॥*
*सदा नांदतो इथे या साधुसंतांच्या संगती ॥*
*श्री रामचंद्र बाप माझा आई सितामाई ॥1॥*

*गाऊ मी तुमचे गुण हो किती या भजनी ॥*
*विलय होतसे तेथे ती मम माया बुद्धी मती ॥*
*श्री रामचंद्र बाप माझा आई सितामाई ॥2॥*

*विश्व सारे केवळ वश तुम्हांलाच होई ॥*
*तुम्ही ठेवाल तैसे राहतो आम्ही या जीवनी ॥*
*श्री रामचंद्र बाप माझा आई सितामाई ॥3॥*

*जन्मजन्मांतरीची ती नासे मम भ्रांती ॥*
*जेंव्हा जेंव्हा येतसे तव नाम हो माझे ओठी ॥*
*श्री रामचंद्र बाप माझा आई सितामाई ॥4॥*

*तुम्ही भेटावे ही आस हो खोल माझी ॥*
*एकच हे मनोरथ माझे, व्हावी हो त्याची पूर्ती ॥*
*श्री रामचंद्र बाप माझा आई सितामाई ॥5॥*

# 34. शब्द माझे फूल

*शब्द माझे फूल शब्द माझे सुगंध ॥*
*आपुलकी ती वाहे अनिर्बंध अनिर्बंध ॥धृ॥*

*मन माझे जिव्हाळा कल्लोळ प्रेमाचा ॥*
*संबंध आपले जसे बरसे वर्षाव अमृताचा ॥1॥*

*मी न जाणी चातुर्य अन् व्यवहार या जगाचा ॥*
*श्रद्धा माझी तुमच्यावरी देई दिलासा मला ॥2॥*

*चुकून झाल्या चुका तर घाला की हो पोटी ॥*
*आवरेना मज वेग जीवनाचा ही माया असे हो खोटी ॥3॥*

*तुम्ही आणि मी फरक कुठे ते सांगा ॥*
*अहो आपुल्या हृदयी पाहा केवळ चैतन्याच्या खुणा ॥4॥*

*निष्ठूर ही दुनिया परि तुम्ही माझे हो आधार ॥*
*मिळून आपण सारे निर्मूया सुखानंद सागर ॥5॥*

# 35. एनकॅश

*चैतन्य एनकॅश करताना अस्तित्व अस्तित्वात येतं,*
*आपल्या सर्वांना ते सारखच लाभतं...*
*पण प्रत्येकाचं ते स्वतंत्र असतं... ॥धृ॥*

*अस्तित्व एनकॅश करताना आत्मभान हरपतं,*
*आता ही ओळ लिहीताना माझं...*
*आणि वाचताना तुमचही तेच होतं... ॥1॥*

*अनुभव एनकॅश करताना तिथे व्यवहार होतात,*
*कधी ते फायद्याचे...*
*तर कधी आतबट्ट्याचे ठरतात... ॥2॥*

*चैतन्य, अस्तित्व आणि अनुभव यांनी जीवन घडतं...*
*जे केवळ सुखी किंवा दुःखीही नसतं...*
*ते अनिर्वचनिय असतं, अवर्णनीय असतं...*
*तुमचं आणि माझं फारसं वेगळं असं नसतं... ॥3॥*

# 36. वेगळेपणा

*आपण हरवलोय तर नाही ना... ॥*
*बालपण गेले त्यापासून मी वेगळा ॥धृ॥*

*तरुणपण भोगले त्यापासून मी वेगळा ॥*
*वृद्धअवस्थेत पदार्पण करताना त्या अवस्थेपासून मी वेगळा ॥1॥*

*वानप्रस्थाश्रमापासून मी वेगळा ॥*
*संन्यासाश्रमापासून मी वेगळा ॥2॥*

*कायेच्या आणि जीवनाच्या प्रत्येक अवस्थेपासून मी हा असा वेगळा ॥*
*म्हणून शेवटी मृत्यूपासूनही मी वेगळाच ॥3॥*

*तो मी आपण असूनही सापडणं किंवा आवाक्यात आणणं सोपं नाही... त्याल ॥*
*ज्याला तो मी सापडतो त्याचे वर्णन करण्यास तो असमर्थ ठरला ॥4॥*

*शरीराला बाजूला ठेवले तर मग जीवन कोण जगतं ॥*
*"माझी इच्छा" असं म्हटलं तरी इच्छा वेगळी आणि मी वेगळा. ॥5॥*

*"माझा संघर्ष" म्हटलं तरी संघर्ष वेगळा ॥*
*आणि त्यापासून मी वेगळाच. ॥6॥*

*जगणाराच शेवटपर्यंत हाती येत नाही ॥*
*तरी आपण सहज नकळत वापरतो..तो मी ॥7॥*

*याहून अधिक गूढ रहस्य कोणतेच नाही. ॥*
*सोडवावयास जाणे हेच रहस्य होऊन राही... ॥8॥*

*साक्षात वापरले जात असतानाही सपशेल अज्ञेय असा हा कोण... ॥*
*आणि ज्याचा शोध घ्यायचा आहे तो स्वतःच जर तो असेल ॥*
*तर मग ईश्वर शोधणारा हा कोण ॥9॥*

*आपला मीपणा असूनही मी पासून हरवलोय असे तर नाही ना? ॥*
*रहस्याचे रहस्य आपणच तर नाही ना? ॥10॥*

# 37. दृष्टांत

क्वांटम शास्त्राच्या सिद्धांतानुसार हे विश्वऊर्जेच्या असीम व अनंत अशा क्षमतांचा विस्तार आहे. हा विस्तार भौतिक व मानसिक पातळीवर स्वतंत्रपणे पण एकाच वेळी घडून येत असल्याने त्याच्या आभासी सत्यतेचे सातत्य टिकून राहते. वास्तव व आभासी या ऊर्जेच्या दोन स्वतंत्र अवस्था पण परस्परावलंबी आहेत व त्यामधील फरकामुळे संवेदना, अनुभव आणि प्रतिसाद यांचे जाणीवक्षेत्र सजीवांच्या माध्यमातून प्रतीत होते.

वरवरचे तथाकथित भौतिक जीवन जगताना मानव क्षणाक्षणाला भीती आणि तृष्णा यामुळे भ्रमिष्ट होऊन जीवन जगतो. तथापि संतांच्या मार्गदर्शनाखाली जाणिवांच्या खोलवर त्यांच्या कारणमुळाशी पोहोचल्यावर आध्यात्मिक शिखर प्राप्त होते आणि स्वत:तील दैवी क्षमता आपल्याला बंधमुक्त करतात.

*सागराचे जल जणू ब्रह्मभाव अवघा ॥*
*ऊर्जेने निर्मिल्या त्यावरी अगणित त्या लाटा ॥धृ॥*

*लाटा होती खाली-वर क्षमतांच्या त्या साक्षी ॥*
*खाली जाता वास्तव अन् वर येता प्रकटे आभासी ॥1॥*

*या फरकातून जो आवेग पसरे ॥*
*क्षमतारूपे हा सर्व संसार तो प्रसवे ॥2॥*

*मासोळीची काया ती स्थूल रूप माया ॥*
*आत जीवभाव प्रकटे ब्रह्माची ती छाया ॥3॥*

*लाटांच्या संवेगे तेथे साम्राज्य जाणिवांचे ॥*
*मासोळीत भाव प्रकटे कर्त्याचे अन् भोयाचे ॥4॥*

*अज्ञानरूपी जहाजातून षड्रिपुंचे जणू कोळी येती, ॥*

*इच्छा वासनांच्या जाळीत मासोळ्या त्या किती पकडती ॥5॥*

*मासोळी अडकता जाळ्यात ती होते तेथे मायांध ॥*
*सागराचे जणू डबके होई, मरणांतीही ती राहे बेधुंद ॥6॥*

*जी मासोळी गुणवंती ती ज्ञानदृष्टे पाही ॥*
*जाळी अन् जहाज तेथे अदृश्यची होई ॥7॥*

*गाठूनिया तळ तो ब्रह्मज्ञानाचा ॥*
*गुणवंती मासोळी घेई ध्यास साधनेचा ॥8॥*

*साधन होता सिद्ध तिचा जीवभाव सरला ॥*
*मासोळीच्या आत ब्रह्मभाव तो प्रकटला ॥9॥*

*झाली मासोळी अशी ब्रह्मभावरूप अंतर्बाह्य ॥*
*दृष्टांत हा उलगडवे आपुल्या जीवनाचे हो गुह्य ॥10॥*

# 38. तुझं असं येणं

रसिकहो ही रचना कोणावर आधारित आहे ओळखा पाहू...!

*गं तुझं हे असं येणं ॥*
*आणि मी मलाच हरपून जाणं ॥धृ॥*

*तुझं येणं  अनिश्चितपणाचं ॥*
*त्याची चाहूल मला कधी न लागणं ॥1॥*

*तुझं येणं तृप्ततेचं देणं ॥*
*शब्दांच्या शृंगारात रूप तुझं गं देखणं ॥2॥*

*दर्शन तुझं तुझ्या अर्थाचं रूपडं ॥*
*आगळंवेगळं असतं तुझं प्रतित होणं ॥3॥*

*मम सृजनतेचे गं तू स्फुरण ॥*
*दिलेस प्रतिभेचे तू मज आंदण ॥4॥*

*माझ्या वैखरीची सविता तू ॥*
*तव भाव सरितेत नहालो गं ॥5॥*

*जाणिवांच्या पलीकडे तुझा असे प्रांत ॥*
*कशी पडलीस तू माझिया प्रेमात ॥6॥*

*तू वदलीस...इथे तू जन्माला आतूर... ॥*
*माझिया लेखणीतून तुज रुप लाभते सुंदर ॥7॥*

*ईश्वरीय संकेत असं तुझं येणं... ॥*
*एकदा तू येताना ईश्वर होऊन ये गं... ॥8॥*

# 39. काटेरी वाट

*इथे पायात जातोच एखादा तरी काटा ॥*
*कुचकामीच ठरते सर्वांची सतर्कता ॥धृ॥*

*काटा जाणारच नाही ॥*
*असे मुळीच होत नाही ॥*
*काढायचा कसा रुतलेला तो ॥*
*विचार असा करावाच लागतो ॥1॥*

*भले भले गेले याच वाटेवरूनी ॥*
*दु:खाला "तात्पुरते" सुखी करूनी ॥*
*जोपर्यंत काटा रुतत नाही ॥*
*तोपर्यंतच फक्त "दु:ख नाही" ॥2॥*

(मुद्दाम इथे सुख शब्द वापरला नाही कारण "भौतिक चौकटीत दु:खाचा पडलेला तात्पुरता विसर" म्हणजे सुख होय असे सिद्धार्थ गौतम बुद्ध म्हणत असत.)

*जेंव्हा काटा रुतून निघतो ॥*
*"काल्पनिक अंत" दु:खाचा होतो ॥3॥*

(मुद्दाम इथे "काल्पनिक अंत" असे म्हटले आहे कारण दु:खाचा अंत म्हणजे दु:खाचा पडलेला तात्पुरता विसर होय.)

*इथे काटे असंख्य प्रकारचे ॥*
*तेवढेच प्रकार वेदनांचे ॥*
*जरी एकच काटा सर्वांना लागे ॥*
*परि दु:खांचे स्वरूप वेगळे ॥*
*काही जण काटे काढतच नाहीत ॥*

*कित्येकांचे तर निघतच नाहीत ॥4॥*

*कधी काटा एकास रुतता ॥*
*प्रिय-जन येती मदतीला ॥*
*आप्तच कधी रुतवती काटा ॥*
*तेंव्हा कोण येईल मदतीला? ॥*
*जरी निघाला काटा तो प्रयत्ने ॥*
*"शेवटा"पर्यंत जखम ती सलते ॥5॥*

*कधी काट्याचे होते भांडवल ॥*
*तर कधी होते शल्य-प्रदर्शन ॥*
*घालती लोक काट्यांची भीती ॥*
*कधी चालते काट्यांवर कू-निती ॥*
*जरी काढता काट्याने काटे ॥*
*नशिबाला फुटती वैमनस्याचे फाटे ॥6॥*

*काट्यांना टाळून जगण्याची कला ॥*
*काट्यांच्या वेदना सहनशक्ती मर्यादा ॥*
*यातूनच उपजे ओळख व्यक्तित्वाची ॥*
*इथे गातात गाणी त्यांच्या यशस्वीतेची ॥*
*परि या काट्यांच्या वाटेवरती ॥*
*साथ हवी नशिबाची ॥7॥*

*जेथे संपतो काट्यांचा रस्ता ॥*
*दाखवा मला तो दगड मैलाचा ॥*
*परि कधी न संपे हा काटेरी रस्ता ॥*
*मृत्यूचा तिथे तो तात्पुरता थांबा ॥*
*हा विचारच जर इथे असेल काटा ॥*
*रुतण्यापूर्वीच त्याला बाजूला करूया ॥8॥*

*हे काटे रुते कुणाला? ॥*

*कोण निरखे त्या वाटेला? ॥*
*पाहणाऱ्याचे पाय कसे ते ॥*
*चालण्याचे काय ते उद्दिष्ट असे? ॥*
*ही वाट काटेरी जी इथे असे ॥*
*का पाहणाऱ्यास नित्य ती सत्य भासे? ॥9॥*

*संत म्हणती पाहा विश्व अद्वैत नजरेतून ॥*
*निरीक्षक अन् शरीर मग येतील कोठून? ॥*
*तृष्णेची काटेरी वाट ना आता दिसे, ॥*
*कसले काटे? कोणास अन् कुठे ते रुते? ॥*
*काय सत्य अन् काय असत्य इथे? ॥*
*त्यापल्याड जाणे हेच जीवन-उद्दिष्ट असे... ॥*
*हेच जीवन-उद्दिष्ट असे... ॥10॥*

# 40. सरण

*सरण माझे तिकडे तयार असताना, ॥*
*मांडून बसलो होतो मी सुखदुःखाच्या प्रदर्शनाला... ॥धृ॥*

*सरण माझे तिकडे तयार असताना, ॥*
*जाणिवांची उंची गाठत होतो जोर लावून वासनांच्या झोक्यांना ॥1॥*

*सरण माझे तिकडे तयार असताना, ॥*
*सत्ता प्रसिद्धी संपत्तीसह हुकूमशाहीसाठी करत होतो ईर्षा.... ॥2॥*

*सरण माझे तिकडे तयार असताना, ॥*
*शुभेच्छांसह शिव्याशापही कोंबत होतो पिशवीत मनाच्या.... ॥3॥*

*सरण माझे तिकडे तयार असताना, ॥*
*सगळीकडे नारळ फोडून होतो करत आध्यात्माच्या बाता.... ॥4॥*

*सरण माझे तिकडे तयार असताना, ॥*
*देत होतो हुलकावण्या नसलेल्या मृत्यूला... ॥5॥*

*सरण माझे तिकडे तयार असताना, ॥*
*त्याच्याकडे पाहात साक्षी होत होतो जे गेले त्यांच्या विधीला.... ॥6॥*

*ऐक जरा ते सरण म्हणाले ॥*
*अरे, असेच कित्येक मी देह जाळले... ॥7॥*

*जरी मी त्यांना इथे कितीदा जाळले, ॥*
*तरी कर्म त्यांचे कधी नाही रे जळले... ॥8॥*

*तेच तेच पुन्हा इथे येतात, ॥*
*मला जवळ घेऊन जळून जातात... ॥9॥*

*थकलो आता मी त्यांना पुन्हा पुन्हा जाळून, ॥*

*जन्मास तुझं का येणं तू तरी घे समजून... ॥10॥*

*माझी ही आस मी ठेवलीय रे जपून ॥*
*तू ये इथे केवळ तुझे निष्काम कर्म करून... ॥11॥*

*तेंव्हाच होईल सार्थक माझे जाळणे तुला ॥*
*जेंव्हा तुझ्या देही तू भोगशील निर्गुणा... ॥12॥*

*जेंव्हा तुझ्या देही तू भोगशील निर्गुणा... ॥*

# 41. अस्वस्थता

*का विचारते हे विश्व मला की हा असा मी कसा ॥*
*अगम्य अस्वस्थता आहे सतत या जीवाच्या "मी"पणाला ॥धृ॥*

*का लाभते अपूर्णतेचे क्षितीज माझ्या पूर्णत्वाच्या शिखरांना ॥*
*पूर्णत्वापलिकडील अनंततत्त्व अनुभवायचे आहे माझ्या अपूर्णतेला ॥1॥*

*का येथे अंत नसावा सततच्या अनिश्चिततेला ॥*
*धैर्याचा आश्रय हवा आहे माझ्या अनाहुत भीतीला ॥2॥*

*का येथे वासना भरते एकामागे एक माझ्या अतृप्तेचा प्याला ॥*
*अमृतामध्ये विरघळून जायचे आहे माझ्या त्या अमर्याद तृष्णेला ॥3॥*

*का येथे दुःखाचा किनारा लाभला रे सुखाला ॥*
*त्यापलिकडील चिदानंदामध्ये सामावून जायचे आहे माझ्या दुःखाला ॥4॥*

*कोणी बांधल्या ह्या बंधांच्या गाठी त्या सुटता सुटेना ॥*
*तटस्थतेचा किनारा व्हायचे आहे माझ्या असंख्य अनुबंधांना ॥5॥*

*तु तुझे अन् मी माझे काय म्हणावे या भ्रांतीला ॥*
*अद्वैताची दिव्य दृष्टी हवी आहे माझ्यातील द्वैताला ॥6॥*

*शाप अशांतीचा का लाभला त्या समाधानाच्या प्रयत्नांना ॥*
*शांतीचाच गाभारा होऊन राहायचे आहे आता माझ्यातील अशांतीला ॥7॥*

*निवृत्तीच्या वृत्तीतूनही निवृत्त झाल्यानंतर हा अहंभाव का उरला ॥*
*परमचैतन्याचा परिसस्पर्श हवा आहे माझ्या मनाला ॥8॥*

# 42. कुठे हा आत्मा

*कुठे हा आत्मा अन् कसले ब्रह्म ॥*
*प्रश्न नच ते जणू जन्म - विघ्न ॥धृ॥*

*अंधकार अर्थबोधित करीती ॥*
*सूर्याचे ते तेज ही वदति ॥*
*अंधकार अन् तेजाहून अन्य ॥1॥*

*पवित्रतेचे पावित्र्य वर्णिती ॥*
*सौंदर्याचे सौंदर्य दाविती ॥*
*निर्गुण ते सर्व गुणावगुणातित ॥2॥*

*स्थिरतेचे स्थैर्य दाविती ॥*
*वेगाचा ते वेग पाहती ॥*
*त्रिकाळाच्या पलीकडे त्यांना करी ते दृष्य ॥3॥*

*आईचे मातृत्व वदती ॥*
*पित्याचे पितृत्व वर्णिती ॥*
*ऐसे सर्व जीवांत वसती परम आत्मतत्त्व ॥4॥*

*अज्ञानासह ज्ञान प्रकाशे ॥*
*आकार विकार अहं अलिकडे ॥*
*अनंतापल्याड ते शून्याहून अन्य ॥5॥*

*सर्वांभूति तरी अलेप्य ते असे ॥*
*अकर्ता अकर्मी अनिर्वचनिय ते... ॥*
*निर्गुण निराकार निर्विकार अनंत परम चैतन्य ॥6॥*

*अजन्मा, अजरा असे ते अमृत ॥*
*वृत्ती निवृत्तीच्या पल्याड कित्येक ॥*
*नेति नेति म्हणती श्रुतीसह वेद ॥7॥*

# 43. रे मना

*तुझ्या कर्मातून घडे तुझे प्रारब्ध ॥*
*तुझ्या जीवनात मी असे सदा निःशब्द ॥धृ॥*

*सुखदुःखरूपे तू मांडीलीस सूत्रं ॥*
*तूच विणशी तुझे अनुभव-वस्त्र ॥1॥*

*हौस तुला भारी तुझ्या मी पणाची ॥*
*तहानलेली तृष्णा बेपर्वा भागवायची ॥2॥*

*जिथे तुझे शत्रू तिथे आहे तुझा संघर्ष ॥*
*जिथे तुझे मित्र तिथे तुमचे परामर्श (सल्ला/मत) ॥3॥*

*तुझिया सत्यसापेक्ष तुझेच रे असत्य ॥*
*स्वप्नांत या तुझ्या असतोस तू नित्य ॥4॥*

*तुझ्या उर्मीसह तू दावी तुझ्या क्षमता ॥*
*मी अलेप्य सदा असे दार्शनिक निर्गुणाचा ॥5॥*

*कुणाचे शरीर कुणाची ती बुद्धी ॥*
*निर्माण करतोस इथे ती सत्यता आभासी ॥6॥*

*कसा हा तुझा असे भाव मालकीचा ॥*
*सांग जरा पत्ता तुझ्यातील चैतन्याचा ॥7॥*

*द्वैताच्या दावणीला तुझे भ्रांतीचे फेरे ॥*
*इथे अद्वैत असे माझ्या प्रकाशी प्रकटे ॥8॥*

*आहे आजीवन तुझे अस्तित्व सापेक्ष ॥*
*तिथे मी निर्भाव सदा निरपेक्ष ॥9॥*

*मी अनंत अविनाशी अगम्य तुजला ॥*

*इथे मृत्यूभय आहे तुज क्षणोक्षणाला ॥10॥*

*जेंव्हा तुझ्यातून ते संक्रमती विश्वगुण ॥*
*निर्गुण असून ऊर्जा तिला तू करीशी सगुण ॥11॥*

*जोपर्यंत तुझ्यात हा तुझा असेल मी (अहं) ॥*
*मी असून तुझ्यात तुझा कुठेही नाही (कूटस्थ आत्मा) ॥12॥*

*मी पूर्णत्वाचे पूर्णत्व तुला अपूर्णतेचे कोंदण ॥*
*मी प्रकटेल तिथे जेंव्हा तू होशील अमन ॥13॥*

# 44. म्हणे माझा श्री गुरू रामदासी

*तो अकर्ता अकर्मी ॥*
*पक्का निर्गुण निराकारी ॥*
*मायेने रंगला पाहा हा श्रीहरी ॥*
*अहो हे स्वप्नची भासे संसारी ॥*
*म्हणे माझा श्री गुरू हा रामदासी ॥1॥*

*मुर्तामूर्त क्षमतांच्या सागरी ॥*
*परम शांतीच्या आनंदासनी ॥*
*शून्य समाधिस्थ परब्रह्म त्यावरी ॥*
*कोट ब्रह्मांड तव चैतन्य व्यापती ॥2॥*

*सत्वाच्या पावन कमलपुष्पी ॥*
*अमृत चैतन्याच्या दवबिंदू ठायी ॥*
*निष्कल परब्रह्म नित्य प्रतिबिंबी ॥*
*तेथे देवीदेवता श्रीगुरू प्रकटती ॥3॥*

*ओमकाराचा घननाद घुमती ॥*
*क्षमतांच्या महालाटा उसळती ॥*
*परब्रह्म प्रतिबिंबी चैतन्य साक्षी ॥*
*मायोद्भाव प्रकटे पिंडी ब्रह्मांडी ॥4॥*

*बैसला जाऊनी जीवाच्या हृदयी ॥*
*निर्गुण मी रूपी स्फुरण पावूनी ॥*
*अहं रूपाने प्रतिसाद देऊनी ॥*
*माया खेळतो जीव भ्रम भावी ॥5॥*

*आता ब्रह्म वचन श्रीगुरू बोलती ॥*
*ऐकूनिया आर्त जीव-हृदयाची ॥*

*अहं समर्पित करशील तू प्रभू चरणी ॥*
*निजरूप दाविन तुज तव सत्वासनी ॥6॥*

# 45. राम राम बोल राम नाम

*राम राम बोल राम नाम ॥*
*हो हो दयाळ मेरे कोदंड राम ॥धृ॥*

*तुम जी हो अगम अति अपार ॥*
*तुम जी हो मम सरब जीवन सार ॥1॥*

*तुमरे जी के नाम शांती धाम ॥*
*तुमरे जी के नाम आनंद निधान ॥2॥*

*तुमरे जी के नाम ना होवे रोग संताप ॥*
*तुमरे जी के नाम अखंड जप तप ॥3॥*

*तुमरे जी के नाम भव भय हरण ॥*
*तुमरे जी के नाम भव सागर तरण ॥4॥*

*तुम ही जी हो मेरे श्री गुरू ग्यान ध्यान ॥*
*तुमरे जी के चरण रखू मैं उर धार ॥5॥*

*तुमरे जी की किरपा तुम ही करो प्रतिपाल ॥*
*तुम ही जी के हाथ हो हमरा हाथ अंतकाल ॥6॥*

# 46. व्यक्त ते अव्यक्त

विश्व व्यक्त अवस्थेत येण्यापूर्वी ते अव्यक्त होते. शून्यत्वातून सर्व निर्माण झाले आहे कारण शून्यात हे विश्व प्रकट स्वरूपात अस्तित्वात येण्याच्या असंख्य क्षमता दडलेल्या असतात असे क्वांटम शास्त्र सिद्ध करते.

विश्व जेंव्हा स्थूल सूक्ष्म स्वरूपात जीवांच्या अनुभवास येऊ लागले तेंव्हा त्याने निर्माण केलेल्या निसर्ग नियमांमध्ये,आकर्षण, प्रतिकर्षण आणि बौद्धिक आविष्कार यामध्ये अडकले. त्याचे स्वत:मध्ये आणि स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या नियोजनात त्याला जीवनाची इतिश्री आणि धन्यता वाटू लागली. हेच ते अज्ञान होय कारण त्यातून तृष्णा वाढत गेली समाधान कमी होत गेले.

हे अज्ञानरूपी जंगल फोफावत आहे आणि त्यामध्ये जीवन जगण्याचा अनुभव घेताना सार आणि असार किंवा श्रेयस आणि प्रेयस अशा दोनच दिशा दिसून येतात. हे अज्ञान रूपी जंगल कशा प्रकारे अनुभवास येते आहे? ते चौथ्या कडव्यात दिले आहे. या जंगलातील वातावरण खूप अस्वस्थ करणारे आहे.

साधक हा विश्वाचे व्यक्त स्वरूप आहे. साधकाचे मन जेंव्हा मुक्तीच्या विचारांशी एकरूप होईल तेंव्हा प्रत्यक्ष मुक्ती तिचे स्वरूप प्रकट करण्यासाठी निधिध्यासन करेल. त्यातून पुढे त्याला दिव्यत्वाची म्हणजेच त्याच्यामधील अद्वैत तत्त्वाची दृष्टी त्याला लाभेल आणि परमज्ञान त्या साधकाला होईल. या परमज्ञानाची किरणे या जंगलात पसरली की मग त्या अज्ञान रूपी जंगलाचे अस्तित्वच नाहीसे होऊन जाईल. शेवटी तो व्यक्त साधक त्याच्या अव्यक्तात परम ज्ञान स्वरूपात किवा अद्वैत स्वरूपात स्थिर होईल. त्यामुळे त्याला जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून बाहेर पडता येईल.

सामान्य माणसासारखे मृत्यूनंतर आसक्तीयुक्त द्वैत स्वरूप असलेल्या ऊर्जेत त्याचे रूपांतर होणार नाही. ही आसक्तीयुक्त द्वैत स्वरूप असलेली ऊर्जा त्या सामान्य जनांना पुन्हा जन्म घेण्यास प्रवृत्त करते.

*अव्यक्ताला लागली आस व्यक्तपणाची ॥*
*व्यक्तपणाला मात्र होती साथ अज्ञानाची ॥धृ॥*

*हे विश्वची व्यक्त झाले अन् विश्वातच गुंतून बसले ॥*
*अव्यक्त त्या व्यक्तामध्ये त्याच्या नकळतच अदृष्य झाले ॥1॥*

*अज्ञानाच्या जंगलामध्ये विश्वानुभावाच्या असंख्य वाटा ॥*
*विश्वानुभावाच्या या वाटांना सारासारांच्या दोनच दिशा ॥2॥*

*येथे वस्तुविषयांच्या दरडी, षड्रीपुंचे मळभ अन् भ्रांतीची संध्या ॥*
*बुद्धीच्या असंख्य तुकड्यांमध्ये मायेच्या अगणित प्रतिमा ॥3॥*

*येथे इच्छावासनांची वादळे अन् अहंभावाचा वारा ॥*
*विवेकाच्या वाटेवर तितिक्षतेचा वणवा ॥4॥*

*त्या मुक्तीने जेंव्हा स्वीकारले शिष्यत्व निधिध्यासाचे ॥*
*अव्यक्ताचा शोध घेण्याचे तेंव्हाच व्यक्ताने जाणले ॥5॥*

*त्या व्यक्ताला लाभली दृष्टी दिव्यत्वाची ॥*
*किरणे पसरली सगळीकडे त्या परमज्ञानसूर्याची ॥6॥*

*सामावली जेंव्हा येथे मुक्ती अद्वैतामध्ये ॥*
*अज्ञानयुक्त जंगल तेंव्हा होत्याचे नव्हते झाले ॥7॥*

*क्षण हा असा त्याला लाभला परमभाग्याचा ॥*
*अव्यक्ताच्या अनुभवात व्यक्त कायमचाच स्थिरावला ॥8॥*

# 47. निश्चयाचा महामेरू

या कवितेत साधक कसा असला पाहिजे, त्याने कशापासून सावध असले पाहिजे आणि मुक्तीच्या दिशेने कसे गेले पाहिजे याचे वर्णन केले आहे. त्याच्या अस्तित्वाचे मूळ स्वरूप चैतन्य आहे. चैतन्याचे वर्णन येथे त्याची स्वत:ची ओळख म्हणून करून दिले आहे.

*ध्यानयोगाच्या आधारू ॥*
*सारासार विचार विवेक हत्यारे छेदिशी माया ॥*
*तो उडेल धुराळा सर्व मायेचा ॥*
*अन् जाशील होऊन परब्रह्मस्वरूप सदा ॥धृ॥*

*"मी, माझे, मला" अन् " तू, तुझे, तुला" ॥*
*हा सर्व मायावी द्वंद्वाचा बाजार ॥*
*जेथे द्वंद्व तेथे छेद आणि भेद ॥*
*सुखानंदाचा अभास अन् नित्य असे खेद ॥1॥*

*सुखानंदासाठी येथे द्वंद्वाचा आधार ॥*
*सुख भेटूनी शेवटी वाढेल दु:ख फार ॥*
*जेथे आकार तेथे विकार ॥*
*कफ, मल, मूत्र यांनी व्यापले शरीर ॥2॥*

*स्त्रीशरीरे स्त्रीत्व आले ॥*
*ते "मी" म्हणून "माझे"मानले ॥*
*पुरुषशरीरे पुरुषत्व आले ॥*
*ते "मी" म्हणून "माझे"मानले ॥3॥*

*पुरुषत्व भासाने स्त्रीत्व आकर्षिले ॥*
*स्त्रीत्वभासाने पुरुषत्व आकर्षिले ॥*
*शरीरइंद्रिये मनोसंवेदना ही मायेची करणी ॥*

*स्त्रीपुरुषत्वाच्या भासामध्ये झाली अधिक भरणी ॥*
*भासामुळे पेटला त्यातील हा तृष्णेचा अग्नी ॥4॥*

*स्त्रीपुरुषत्वाच्या भासे शरीरइंद्रिये कारणे ॥*
*केली क्षणिक सुखांची निर्मिती मायावी शक्तीने ॥*
*भासातून निर्मिती होते फक्त भासाची ॥*
*अधोगती झाली मूळ जीवात्म्याची ॥5॥*

*सुखानंदासाठी विषयवस्तू,देहमनबुद्धीचा आधार, ॥*
*चिंता, दु:ख, दैन्य, असामाधान, ॥*
*अन् जन्म मृत्यूचे फेरे होतील फार ॥6॥*

*स्त्रीत्व आणि पुरुषत्व हे मायावी गुण, ॥*
*त्यांना प्रकाशित करणारे परब्रह्म निर्गुण ॥*
*म्हणून त्याग हे स्त्रीपुरुषत्वाचे द्वंद्व ॥*
*अन् अनुभव तू तुझेच निर्मल, निर्गुण, निरुद्देष्य स्वस्वरूप ॥7॥*

*शोक, मोह, भय, लोभ, राग, द्वेष, हर्ष अन् गर्व ॥*
*अत्यंत सावधतेने जाण मायावी भास आभास हे सर्व ॥*
*दृष्य वस्तू विषय हे अस्थिर मनाला कारण, ॥*
*त्यागून सर्वांना भोगे ते एक विवेक लक्षण ॥8॥*

*सूर्याने दिसे पृथ्वी जणू दाणा खसखसीचा ॥*
*सूर्यही प्रकाशित होतो तो प्रकाश परब्रह्माचा ॥*
*मग तुला का जडला हा उपदव्याप जडत्व वाहण्याचा ॥*
*शरीरमनोबुद्धीशी एकरूप होण्याचा ॥9॥*

*शरीरमनोबुद्धी म्हणजे "मी" असे का मानावे ॥*
*रक्त, मांस, कफ, मल, मूत्रादी यांचा मालक का व्हावे ॥*
*तूच एकमेव परब्रह्म, देहभाव हीच एक खोट ॥*
*स्वस्वरूपानुभवे लाव या मायेची विल्हेवाट ॥10॥*

*मायेने लावीले पाठी त्रिगुण फार वेगे ॥*
*माजले ते अधिक शरीरमनोबुद्धीकारणे ॥*
*भुलवी माया दाखवी जग अन् भास अन्य अन्य ॥*
*तू एक ते परब्रह्म अनन्य, निव्वळ असे चैतन्य ॥11॥*

*शरीरमनोबुद्धी निव्वळ निर्जीव ते ॥*
*परब्रह्म चैतन्यकारणे झाले अहंभावीत ते ॥12॥*

*अहंभावाने साधला उभा दावा ॥*
*अन् त्रिगुणांना देऊन आश्रय दावी मायेचा खोटा देखावा ॥13॥*

*मायोदभाव कारणे काल त्रिकाल झाला ॥*
*चैतन्यकारणे त्रिकाल कालातीत झाला ॥14॥*

*चैतन्यकारणे कळले चैतन्य प्रकाशमान ॥*
*त्याचमुळे जाणला जगताचा जगदोद्भाव ॥15॥*

*चैतन्यकारणे तुला देह तुझा समजला ॥*
*चैतन्यकारणे तुला मनोबुद्धी उमजली ॥16॥*

*चैतन्यकारणे तुझा अहंभाव निपजला ॥*
*चैतन्यकारणे तुझे त्रिगुण निपजले ॥17॥*

*चैतन्यकारणे तुला भाव ते भावले ॥*
*चैतन्यकारणे कर्ता, कर्म तू ते केले ॥18॥*

*चैतन्यकारणे वस्तूविषय ते आकाले ॥*
*चैतन्यकारणे तुझ्यामध्ये मायेचे वाद उठले ॥19॥*

*चैतन्यकारणे तुझ्यात चैतन्य ते संचारले ॥*
*चैतन्यकारणे तू भोगातून अनेक भोग भोगले ॥20॥*

*चैतन्यकारणे तुला पश्चात्ताप झाला ॥*
*चैतन्यकारणे तुला सर्व कारणे कळाली ॥21॥*

*चैतन्यकारणे तु सर्व काही जाणले ॥*
*चैतन्यकारणे अज्ञानाचेही ज्ञान झाले ॥22॥*

*चैतन्यकारणे ज्ञानाच्याही पार ज्ञान झाले ॥*
*चैतन्यकारणे चैतन्यच ज्ञानरूप झाले ॥23॥*

*चैतन्यकारणे ध्यान, धारणा, समाधी, ॥*
*चैतन्यकारणे तुर्येतून होते मोक्षाची नांदी ॥24॥*

*चैतन्यकारणे पडला उघडा मायेचा हा डाव ॥*
*ती माया निर्जीव, परब्रह्मच एक आहे चैतन्यभाव ॥25॥*

*वेगाने वेग घेऊन वेग वेगाने सुटले ॥*
*त्याच्याही पुढे सदा चैतन्यची राहीले ॥26॥*

*स्थाननिश्चिती केली स्थानाने स्थानबद्ध होऊन ॥*
*चैतन्य असे की स्थानालाच स्थायी केले ॥27॥*

*चैतन्य कारणे जरी होते सर्व प्रकाशमान ॥*
*चैतन्य कारणे जरी येते मायेची ती सर्व जाण ॥28॥*

*तरी चैतन्य असे अलिप्त, विमल, विशुद्ध ॥*
*अचल, सर्वव्याप्त, निराकार, अव्यक्त ॥29॥*

*चैतन्यकारणे सर्व काही जाणले ॥*
*जाणलेले त्यागून चैतन्यची अनुभवले ॥30॥*

*तोच एक साधक सावध मानावा ॥*
*कर्ता, कर्म, फल, भोग आदींची त्यास होत नाही बाधा ॥31॥*

*चैतन्याने होऊन दृष्टी ॥*
*चैतन्यच पाहे चैतन्याला ॥32॥*

*चैतन्याने होऊन वाणी ॥*

*चैतन्यच बोलले चैतन्याला ॥33॥*

*कान होऊन चैतन्याने ॥*
*श्रवण केले चैतन्याला ॥34॥*

*चव होऊनि चैतन्याने ॥*
*चाखले चैतन्याला ॥35॥*

*स्पर्श होऊन चैतन्याने ॥*
*संवेदिले चैतन्याला ॥36॥*

*ऐसे वाटे भोगिले भोग चैतन्यातून चैतन्याने ॥*
*परि दाखवी ते भोग वेगळे स्वप्रकाशे अलिप्तपणे ॥37॥*

*मग उरले कोठे मी अन् माझेपण ॥*
*अहंकार गेला असा हा कायमचाच जळून ॥38॥*

*वैराग्यअग्नीत जाळूनी देहभावाला ॥*
*नामस्मरणे तो अहंकार ठेचला ॥39॥*

*जाणले, विवेकाने अनन्यभावे या चैतन्याला ॥*
*गेली माया आपोआप लयाला ॥40॥*

*कर्मे घडतील आता अशी ही अकर्मी म्हणून ॥*
*सर्वबाधा मुक्त चैतन्यास मी अनन्यभावे जाणून ॥41॥*

*नकोस होऊ तू प्रभावित अन् ठेव सतत उदासवृत्ती ॥*
*ती मायाच कंटाळेल तुजला मिळेल निवृत्तीतूनही निवृत्ती ॥42॥*

# 48. “मी” पणा आणि मी

बालपण उत्तम गेले. तारुण्यात साजेसा, मनमिळाऊ, समजूतदार जीवनसाथी मिळाला. मुले निरोगी व अत्यंत बुद्धिमान झाली. आर्थिक उत्पन्न उत्तम मिळाले. संसारात जे जे हवे होते ते ते सर्व मिळाले. बंगला, गाडी, दागदागिने अगदी सर्व अत्याधुनिक व सुखवस्तू.... सामाजिक आणि कामाच्या ठिकाणी उत्तम प्रतिष्ठा मिळाली. आरोग्य उत्तम राखले. जगातील सर्वोत्तम ठिकाणे पाहून घेतली. मुलगा त्याच्या कुटुंबासह अमेरिकेत उच्चपदस्थ व मुलगीसुद्धा अमेरिकेत तिच्या कुटुंबासह स्थिरावलेली. भरपूर दानधर्म केला आणि अजूनही करतोय.

इकडे आता आम्ही दोघे निवृत्त जीवन जगत आहोत. कशाची ददात नाही. जे जे काही एक प्रतिष्ठित व्यक्ती म्हणवून घेण्यासाठी आवश्यक असते ते ते सर्व आज माझ्याकडे आहे. मी अत्यंत समाधानी आणि सुखी आहे. पण.... हा “पण” मनाला खूप विचलित करतो. हा “पण” कुठून आला. त्याचा शोध घेतला आणि असे लक्षात आले की, हा माझ्यातील “मी” जो स्वत:ला जीवनात अत्यंत यशस्वी, सुखवस्तू, बुद्धिमान, कर्तृत्ववान व उत्तम गृहस्थी समजतो तो “मी” नक्की कोण आहे? याची मला अद्याप ओळख झालेली नाही. माझे शरीर म्हणजे तो “मी” नाही कारण वयोमानाप्रमाणे शरीर जरी बदलत गेले तरी त्या बालवयातील “मी” चे स्वरूप बदललेले नाही.

आता संध्याछाया झुकल्या तरीही हा माझ्यातील “मी” मला अजिबात ओळखता आलेला नाही. याची खंत आहे. यामुळे तो “पण” निर्माण होतो. त्या “मी” ला जाणून घेण्यासाठी आध्यात्माला हात घालणे एवढाच एक उपाय आहे, हे मी समजून आहे. चला सुरूवात तर करतो. तरीही पुन्हा “पण” आहेच कारण अध्यात्मात त्यासाठी अट अशी ठेवली गेली आहे, की त्या “मी” ला बाजूला ठेवून साधना करावी लागते. हा पण कधी थांबेल? अशा या “मी”पणाची ही एक विद्रोही कविता आहे.

*वाढदिवशी मला माझं वय भेटलं , ॥*
*थोडंसं मला ते नाराज वाटलं ॥*
*स्माईल करून बोलतं केलं मी त्याला ॥*
*ते म्हणालं "माझ्यापेक्षा तुझा "मी" खूपच वाढला" ॥धृ॥*

*मी म्हटले "नाराज होण्यासारखं काय आहे त्यात ॥*
*मी वाढतोच मुळी तुझ्याहून विपर्यस्त प्रमाणात" ॥*
*ते म्हणाले "तुझ्या "मी" ला सगळे म्हणतात अहंकार ॥*
*तुला जडलाय गंभीर मनोविकार" ॥1॥*

*मी म्हटले "जाणीव नाही मला त्याची ॥*
*कशाला करू मी काळजी दुसऱ्यांची ॥*
*मीच सर्वेसर्वा, माझे सर्वच गुलाम ॥*
*मी म्हणेल तेच झाले पाहिजे नाहीतर घेईन बदला अन् करीन अपमान" ॥2॥*

*ते म्हणाले "सर्वात भितरा तू, हीच तुझी भ्रांती अन् हाच तो मनोविकार ॥*
*लोक करतात तुझा सपशेल खोटा मान सन्मान ॥*
*वय वाढेल वाढेल पण अचानक थांबेल ॥*
*तुझ्या मृत्यूचे कारण हाच अहंकार असेल" ॥3॥*

*मी म्हटले "मेलो तरी चालेल पण सोडणार नाही अहंकार ॥*
*राबवून घेईन सर्वांना हा कसला आलाय विकार" ॥*
*वय म्हणाले "म्हणूनच मी नाराज असतो ॥*
*परत विचारू नकोस "मी" हा असा का असतो" ॥4॥*

# 49. अनंतयात्रीचा झंझावात

*आशा निराशेच्या झोक्यावर का राहावे बसून ॥*
*एक झंझावात बनून जाऊ त्यापलीकडे निघून ॥1॥*

*एका ध्रुव ताऱ्याकडे पाहून का पाळाव्या दिशांच्या चौकटी ॥*
*सर्व ताऱ्याशी करून मैत्री होऊन जाऊ अनंत यात्री ॥2॥*

*का शोधावा आनंद नश्वर वस्तू विषयात ॥*
*होऊन जाऊ आनंद या प्रेमाच्या झंझावातात ॥3॥*

*का करावी जीवाची ओढाताण श्रेय अन् संधीसाठी ॥*
*स्त्रोत होऊन साऱ्यांचा कास धरूया नवनिर्मितीची ॥4॥*

# 50. सम्मान किजीये

*सम्मान किजीये सम्मान किजीये ॥धृ॥*

*मिट्टी के इस बेजान बुतक मे ॥*
*चेतन का सम्मान किजीये ॥1॥*

*किसी बेसहारे का हाथ थाम के ॥*
*चेतन का सम्मान किजीये ॥2॥*

*सम्मान किजीये सम्मान किजीये ॥*
*चेतन का सम्मान किजीये ॥3॥*

*किसी दुखियारे के आसू पोंछ के ॥*
*चेतन का सम्मान किजीये ॥4॥*

*वसुंधरा को प्रेम से सिंच कर ॥*
*चेतन का सम्मान किजीये ॥5॥*

*सम्मान किजीये सम्मान किजीये ॥*
*चेतन का सम्मान किजीये ॥6॥*

*प्रज्ञा-शील-करुणा को अपना के ॥*
*चेतन का सम्मान किजीये ॥7॥*

*चेतन को भगवान मान कर ॥*
*चेतन का सम्मान किजीये ॥8॥*

*सम्मान किजीये सम्मान किजीये ॥*
*चेतन का सम्मान किजीये ॥9॥*

*बल बल जा कर अपने गुरू को ॥*
*चेतन का सम्मान किजीये ॥10॥*

*अंतसमय अमर होकर के ॥*
*चेतन का सम्मान किजीये ॥11॥*

*सम्मान किजीये सम्मान किजीये ॥*
*चेतन का सम्मान किजीये ॥12॥*

# 51. आईचे नाव

आई या विषयावर आतापर्यंत खूप लिहिले गेले असून अनेक काव्य रचना रचल्या गेलेल्या आहेत. तरीही या विषयावर आपण खूप काही लिहू शकतो. सृजनशीलतेशिवाय विश्व नाही आणि विश्व अस्तित्वात आल्याशिवाय सृजनशीलता नाही इतकी ती दोघे एकमेकांत गुंतली आहेत. वैज्ञानिकदृष्ट्या जर मी भौतिक विश्व पाहत असेल तर मला सृजनशक्तीच्या स्वरूपात विश्वाची अमूर्त क्वांटम ऊर्जा शक्ती मान्य करावीच लागते. अशा रीतीने तो सृजनशीलतेचा आविष्कार या दोघांमध्ये आणि दोघांमुळे अविभाज्य आहे. विश्वाचे प्रसविणे हा सृजनशीलतेचा आविष्कार असल्याचे प्रतीत होते. म्हणजेच आई किंवा मातृतत्त्व हे विश्वाचे मूळ तत्त्व आहे असे आपल्याला म्हणता येईल.

म्हणूनच की काय साक्षात ईश्वरापेक्षा आई ही सर्वोच्च मानली गेली आहे. याचा दाखलाच द्यायचा झाला तर संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्वर माउलींची ही विरहिणी आठवते, "पैल तोगे काऊ कोकताहे, शकून गे माये सांगताहे..." यातील "माये" हा शब्द आई किंवा मातृतत्त्व प्रदर्शित करतो. आनंद-साहिब मध्ये श्री गुरू नानकजी म्हणतात "अनंद भया मेरी माए सतिगुरू मै पाया॥" यामध्ये ही हे जगद्गुरू ईश्वराचा दृष्टांत सर्वप्रथम आईला सांगतात. असे अनेक साधुसंतांच्या रचनेत आढळून येईल. याचा अर्थ जीवनातील प्रत्येक नवीन, क्रांतिकारी, परम आणि दिव्य अशा जाणिवेची साक्ष सर्वप्रथम आईपुढे मांडली गेली आहे आणि आईच्या उल्लेखाशिवाय तिचे पूर्णत्व सिद्ध होत नाही. म्हणजेच सृजनत्वाशिवाय सृजनत्वाला अस्तित्व नाही. पूर्णात पूर्ण सामावले जाणे आणि पूर्णत्वातून पूर्णत्व प्रसृत होणे ते हेच.

आई ही विश्वाच्या चैतन्याला आविष्कृत करणारे सर्वोच्च तत्त्व आहे. क्वांटम शास्त्र असे सिद्ध करते की चैतन्याशिवाय विश्व संवेदनांचे अर्थबोधनच घडून येऊ शकत नाही. म्हणजे विश्वाने विश्वाला जाणून घेण्यासाठी सर्वप्रथम मातृतत्त्व आवश्यक होते. आणि आता ह्या संतांच्या अंतर्मनात अद्वैत अनुभवाला प्रसविणारेसुद्धा तेच मातृतत्त्व आहे आणि म्हणून "अग आई पाहा तो शुभशकून....पंढरीचा राजा घराकडे येतोय" असे माउली म्हणतात. म्हणून प्रत्येक स्त्रीतत्त्व हे अद्वितीय अशा मातृतत्त्वाचे अमूर्त स्वरूप असते. ती जेंव्हा आई होते तेंव्हा

ते मातृत्व मूर्त स्वरूपात अनुभवास येते आणि प्रत्येक पुरुष तत्त्वातसुद्धा मातृतत्त्व असेलच पाहिजे अन्यथा शौर्य, धाडस, धैर्य, कणखरपणा हे विश्वाच्या सृजनशीलतेसाठी लागणाऱ्या क्षमता त्यांच्यात विकसित झाल्या नसत्या. म्हणून विश्व हे मातृतत्त्वाचा मूर्त अमूर्त असा अनिर्वचनिय अविष्कार आहे असे म्हणता येईल.

*का नावात माझ्या तुझे नाव नाही ॥*
*अशी ही कशी प्रथा सांग ना ग आई ॥धृ॥*

*काया, प्राण अन् स्वत्व दिलेस तू मजला ॥*
*प्राणाहून अधिक जपलेस ग तू मजला ॥1॥*

*पालनपोषण माझे तू केलेस क्षणाक्षणाला ॥*
*सुसंस्कारित तू केलेस माझिया मनाला ॥2॥*

*पडता आजारी असाच मी किंवा दिसे नाराज ॥*
*का ग होतो जीव हा तुझा असा कासावीस ॥3॥*

*आई म्हणे ऐक बाळ रहस्य हे विश्वाचे ॥*
*एक मी निमित्तमात्र सर्वोच्च सृजनत्व ते तयाचे ॥4॥*

*होता जन्म तुझा मजवर तुझेच अनंत उपकार ॥*
*अशी तृप्त झाले की या आनंदा नसे पारावार ॥5॥*

*डोळ्यात तुझ्या मी पाहते माझेच स्वरूप नेहमी ॥*
*चिरंजीव ज्योत माझी राहील या भूवरी ॥6॥*

*काय करायचे रे मला यत्किश्चित त्या नावाशी ॥*
*तू साक्षात मूर्ती माझी ही ओळख रे मजला पुरेशी ॥7॥*

*जरी ना ती ओळखे दुनिया मला कधी रे ॥*
*मी तिला तुझ्या डोळ्यातून निरंतर पाहते रे... ॥*
*....निरंतर पाहते रे.... ॥8॥*

# 52. श्रीरामप्रभु मुझे ऐसे मिल जावे

समीर म्हणजे वाऱ्याची हलकी झुळूक ही भौतिकता परंतु तुकाराम बीजेच्या दिवशी देहूला पिंपळ वृक्षावरील पान न् पान विठ्ठलाचा नामघोष ऐकून काही वेळ सळसळते. ती सळसळ ज्यामुळे निर्माण होते तो समीर होय.

*श्रीरामप्रभु मुझे ऐसे मिल जावे ॥*
*भवसागर युँही पार हो जाए ॥धृ॥*

*समा जाऊ मैं तुझमें जैसे ॥*
*समीराकाश मिलन होत जाए ॥1॥*

*सुनकर मल्हार केतकीसह पल्लवी डोले ॥*
*परमानंदमय समीर में सब जुग समा जाए ॥2॥*

*बिन तेरे अब कछु ना सुहावै ॥*
*नाम सुमिरण समीर वेग होत जाए ॥3॥*

*अंत:काल जब नयन दिखावे ॥*
*शीतल सुगंध समीर बन आप आवे ॥4॥*

# 53. अनहद नाद

*सुन सुन सुन अनहद नाद रे बंधो ॥*
*चढ चढ रे मन की सिढी बंधो ॥धृ॥*

*साधसंग नित नित रे साधो ॥*
*पल पल रे हरीनाम धियाहो ॥1॥*

*सांस सांस इक प्राण लगाओ ॥*
*पंचतत-लय सहेज रे साधो ॥2॥*

*सतगुरु शरण शरण रे जाओ ॥*
*मदमाया से मन पार उतारो ॥3॥*

*भावभगत रंग रत हो जाओ ॥*
*जहाँ जहाँ देख वहा परमेशर पावो ॥4॥*

*अंतर बाहर इक परम तत  जानो ॥*
*हर हर सब अब निर्गुण हो जाओ ॥5॥*

# 54. रूथलेसनेस

*दंगलीमध्ये एका माझ्या दिशेने एक दगड येताना पाहिला*
*काय तो रूथलेस दगड त्याला कसे सांगू की मी निर्दोष आहे*
*असा विचार मी केला ॥1॥*

*का कोण जाणे पुढचाच एक क्षण तो जरा थांबल्यासारखा वाटला*
*पाहतोय तर काय तो दगडच हवेतल्या हवेत माझ्याशी बोलू लागला ॥2॥*

*त्याने मला विचारले,*
*मला जर तू रूथलेस म्हणत असशील तर ज्या माणसाने मला भिरकावले त्याला*
*तू काय म्हणशील ॥3॥*

*सत्ता, मत्ता, पैसा, प्रसिद्धी, अधिकार यांच्यासाठी लाखोंच्या जीवाची पर्वा न*
*करता जगणाऱ्यांना तू काय म्हणशील ॥4॥*

*असाहाय्यतेचा, कनिष्ठतेचा, अपरिहार्यतेचा गैरफायदा घेऊन त्यांच्यावर*
*जबरदस्ती करणारे रूथलेस नाहीत का ॥5॥*

*एकट्यादुकट्या स्त्रीवर अत्याचार करणारे, पैशासाठी तिचा वापर व छळ करणारे*
*रूथलेस नाहीत का ॥6॥*

*जातपात धर्म वर्ण वंश यांचे भेद करून एकमेकांचा जीव घेणाऱ्याच्या संवेदना*
*कोठे जातात ॥7॥*
*सतत वशिलेबाजी, हांजीहांजी, राजकारण व भ्रष्टाचार करून देशाला*
*लुटणाऱ्यांच्या संवेदना कोठे जातात ॥8॥*

*भुयारे, बोगदे, खाणी, धरणे यांसाठी लाखो डोंगर जमिनींची खोदाई करताना*
*त्यांच्या मनाचा दगड नाही होत ॥9॥*

*इमारती, रस्ते, औद्योगिक वसाहतींसाठी लाखो निरपराध झाडांची कत्तल*
*करताना त्यांच्या मनाचा दगड नाही होत ॥10॥*

*मी आहे त्याच जागेवर संपूर्ण विश्वासह स्तब्ध झालो*
*विवेक नि:शब्द झाला अन् मी शून्यात पाहात राहिलो ॥11॥*

*पुढच्याच क्षणी जोराची एक वावटळ आली*
*झाडाची वाळलेली फांदी दगडाला कवेत घेऊन जमिनीवर पडली ॥12॥*

*जमिनीवरील दगडाने मला जखमी नव्हते केले*
*निर्दोष मला वाचवण्यासाठी त्याला वारा व वाळलेल्या फांदीने सहकार्य केले होते ॥13॥*

*माझा एक अश्रू दगडावर आणि एक फांदीवर पडण्यासाठी आता वारा थांबला होता*
*दगडाच्या स्मित हास्यातून मला त्याच्यातील संवेदना कळून आल्या होत्या ॥14॥*

# 55. आमच्या हातून

*आमच्या हातून घडावीत सत्कार्ये अन श्रेय त्याचे सर्वांनी घ्यावे ॥*
*आम्ही करावे पुण्य अन् ते सर्वांना मिळावे ॥धृ॥*

*आम्ही मिळवावे सुख अन् त्यामुळे सगळे सुखी व्हावे ॥*
*आम्ही द्यावे इतके प्रेम की सर्वांच्या हृदयात त्याचा सागर व्हावा ॥1॥*

*आमच्याकडून व्हावी प्रार्थना अन् देवाने सर्वांना सांभाळावे ॥*
*आम्ही निमित्तमात्र केवळ शेवटी आपल्या सर्वांचे आशीर्वाद मिळावे ॥2॥*

*आपले आशीर्वाद आहेत भक्कम इतके की काळसुद्धा थोडा थांबेल जरासा ॥*
*तेवढ्यात जाऊया वैराग्याच्या गावा आमच्या मीपणाचा आता सर्वांनी रामराम घ्यावा ॥3॥*

# 56. आम्ही निर्गुण गावचे रहिवासी

*आम्ही निर्गुण गावचे रहिवासी ॥*
*सगुणांच्या या गावी आलो ॥धृ॥*

*ओळख आमुची  निरपेक्ष ॥*
*तरी अपेक्षांचे रस्ते चाललो ॥1॥*

*काया गावी आमुची निराकार ॥*
*परि इथे आकारांनी बद्ध जाहलो ॥2॥*

*स्वरूप आमुचे निर्विकार ॥*
*विकारांनी इथे संभ्रमित जाहलो ॥3॥*

*असूनही निरहंकार सदा निवृत्त ॥*
*अहंपणाने वृत्तीत राहिलो ॥4॥*

*अनंताशी लावूनिया पैजा ॥*
*इकडे मर्यादित असे का झालो ॥5॥*

*सोडून तिथला संवाद शांतीचा ॥*
*इकडे अस्वस्थ ते का झालो ॥6॥*

*अद्वय आमुचे विश्व तिकडचे*
*परि द्वंद्वाच्या झोपाळ्यावर झुललो ॥7॥*

*योगीजन ते इथे भेटले*
*निर्गुणात मग जागृत जाहलो ॥8॥*

*सगुणांच्या या गावी  आता*
*सगुणरूपी ते स्वप्नची जगलो ॥9॥*

*काय पुरावा द्यावा तुम्हा*

*दृष्टीने आमुच्या ते पाहा ॥10॥*

*आकाशाची खूण सांगतो*
*अनुभव तुम्ही तो घ्यावा रोकडा ॥11॥*

*आकाशाचे उघडूनी दार*
*निर्गुणाच्या त्या गावी परतलो. ॥12॥*

# 57. कठपुतली

नमस्कार, कार्यालयातून घरी जाताना संध्याकाळी सगळीकडे माणसांची गर्दी. त्यांच्यासह मी ही गर्दीचा एक भाग. अनेक बंधने पुढे पुढे जाण्यासाठी गर्दीला ओढत होती. जणू सर्व कठपुतळ्याच. पण पुढच्या क्षणी मनःपटलावरचे चित्र पालटले आणि सर्व जीव चैतन्याने भारलेले सगुण ब्रह्म वाटू लागले. सगळीकडे चैतन्यच चैतन्य. मग मनाला समजावले की बाबा तू कठपुतली नाहीस. तू ब्रह्माचा अंश आहेस. एवढेच नव्हे, तर तुझ्या ब्रह्म स्वरूपात ही अनेक विश्वे जणू मायेने प्रकट झाली आहेत, असे दिसत आहे. “माटी को पुतरा कैसे नचत है” या श्रीगुरुबाणी मधील (शबद) संकल्पनेवर आधारित ही रचना सुचली. थेट भाषांतर नाही.

*डोले डोले रे बाबा, कठपुतली डोले, ॥*
*कठपुतली डोले रे बाबा, कठपुतली डोले॥धृ॥*

*तू ब्रह्म तुझ मे बाबा ॥*
*यह कठपुतली डोले ॥*
*सुणे बोले रे बाबा सुणे बोले रे ॥*
*देखे भागे रे बाबा देखे भागे रे ॥1॥*

*तू पूरण तू अपार बाबा ॥*
*ता कैसी तृष्णा रे, ॥*
*ना जाने कठपुतली बाबा ॥*
*यह कठपुतली ना जाने ॥2॥*

पूरण = पूर्ण

*तू चिर परम पुरुख बाबा ॥*
*ता कैसा यह जीवन रे, ॥*
*नाही कठपुतली तू बाबा, ॥*

*तू ना कठपुतली रे ॥3॥*

चिर = चिरंजीव

*तू परम परगास बाबा, ॥*
*तू माया नाही रे, ॥*
*जीव जगत माया रे बाबा ॥*
*कठपुतली माया रे ॥4॥*

परम परगास = परम आत्मप्रकाश

*श्रीगुरू पारब्रह्म सहाई, ॥*
*तू गुरुमुख अब होवे, ॥*
*कठपुतली सुपना होई रे बाबा, ॥*
*तब तू जाई समाई तूझ मे ॥5॥*

सुपना = स्वप्न

# 58. अनिर्वचनीय मद्स्वरूप

*आहेपणाने जगण्यास आलो तर नाही सोबत आला. ॥*
*नाही सोबत नाहीसा झालो तर नाहीच होऊन राहिलो ॥धृ॥*

*आहे हे नसते हे एकवेळ समजेल ॥*
*पण नाही हे पण नसते ॥*
*या अनुभवाच्या पलीकडे गुरुदेवच नेतील. ॥1॥*

*जाणिवेच्या कक्षेत जे जे येते ॥*
*त्याला प्रकाशित करणारे तत्त्व निर्गुण मी. ॥*
*जाणिवांमध्ये गुंतणारा अहंकार तो सगुण मी... ॥2॥*

*जे कुठेही नसून नाही म्हणून सर्वत्र असते ॥*
*जे सर्वत्र असूनही आहे म्हणून कुठेच नसते ॥*
*ते अनिर्वचनीय मद्स्वरूप असते ॥3॥*

# 59. उद्दात्त उद्दिष्टे गाठताना

*अपूर्णत्वाच्या अर्थावर त्या उमटवू  पूर्णत्वाची मोहोर,*
*आर गेलेल्या प्रत्येक गोष्टीला पार करूया लाउनिया जोर. ॥धृ॥*

*प्राक्तनाच्या पल्याड जाऊन भविष्य त्याचे घडवू आपण,*
*कष्टांवरही मात करूया स्वार होऊन सहजतेवर. ॥1॥*

*सृजनशीलता, विवेक आणि विज्ञानाला प्रमाण करू,*
*सर्व भेद विसरूनी सर्व ते एक दिलाने काम करू. ॥2॥*

*प्रतिक्षेच्या काठावरती का राहावे उगा बसून,*
*पर्यायांचे नवप्रवाह ते कार्यसिद्धी देती मिळवून. ॥3॥*

*जो पाडेल खिंडार आपल्या उद्दात्त अशा उद्दिष्टांना,*
*सहकार्याचे भान देऊ वा बद्ध करू कायमचे त्यांना. ॥4॥*

*निसर्गाच्या प्रकोपाला भीती घालू सुव्यवस्थेची,*
*सजगता व सतर्कतेने जाऊन भिडूया त्या शक्तीशी. ॥5॥*

*उत्साहाला सदा येते भरती आपल्या उत्सुकतेची,*
*अचूकतेचा वेग पाहता धांदल उडते त्या विजेची. ॥6॥*

*विस्तारता क्षमता आपल्या, विलया सर्व जाती मर्यादा,*
*उत्तुंगतेची शिखरे आपुल्या यशासमोर झुकतील शतदा. ॥7॥*

*स्पर्धा करता कोणी येथे निकोपतेची कास धरू,*
*मिळवुनी हातात हात शेवटी स्पर्धेवरही मात करू. ॥8॥*

*कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन,*
*अहंकाराचे पाणी करूनी घेऊ त्याचे आचमन. ॥9॥*

# 60. एक अनोखा दीपोत्सव

*सर्व काही कळत असूनही दुर्लक्ष करण्याची वृत्ती प्रकाशित करतो*
*तर काहीही कळले नाही तरी सर्व कळल्याचा आणलेला खोटा आवही*
*प्रकाशित करतो. ॥धृ॥*

*मुद्दाम दुष्कृत्य करण्याच्या वृत्तीसह*
*सत्कर्मातील कर्तेपण व भोक्तेपणाचा त्यागही प्रकाशित करतो. ॥1॥*

*विनय, चारित्र्य शीलता, नितीमत्तेसह*
*उद्दामपणा, भ्रष्ट आचार  व अनितीही प्रकाशित करतो. ॥2॥*

*दारि, दुःख, अज्ञान, अंधकारासह*
*समृद्धी, सुख, ज्ञान व प्रकाशालाही प्रकाशित करतो. ॥3॥*

*शांततेची शांती प्रकाशित करतो तर अशांततेची वेदनाही प्रकाशित करतो. ॥4॥*

*चांगले व वाईट यांच्या व्याख्या प्रकाशित करतो तर*
*त्या समजूनही त्याच्या उलट वागण्याचा मार्गही प्रकाशित करतो. ॥5॥*

*लाचारी, परावलंबीत्व यांच्याबरोबर स्वावलंबित्वही प्रकाशित करतो.*
*देव, देश, अन् धर्मासह दानव, द्रोह व अधर्मही प्रकाशित करतो.*
*सर्व क्षणभंगुर आहे हे कळत असूनही मायेतील गुंतणे प्रकाशित करतो. ॥6॥*

*सर्व येथेच ठेवून जायचे आहे हे कळत असूनही,*
*हव्यासासह संन्याशाच्या त्यागालाही प्रकाशित करतो. ॥7॥*

*एक दिपोत्सव आपल्या अंतर्मनात युगानुयुगे सुरू आहे.*
*त्याला जाणून घ्यायचे जीवनाचे उद्दिष्ट क्षणाक्षणाला प्रकाशित करण्याचा*
*प्रकाशोत्सव म्हणजेच दिपोत्सव. ॥8॥*

# 61. विपर्यस्त... वास्तव

कधी कधी माणूस परिस्थितीचा इतका विपर्यस्त अर्थ काढतो की वस्तुस्थिती त्याहून खूपच वेगळी असते असे नंतर आपल्या लक्षात येते. माणूस अनेकदा भितो, चिंता करतो, तीव्र इच्छा करतो, काहीतरी अर्धवट माहितीवर पक्का गैरसमज करून घेतो, नाही नाही त्या कल्पना करतो आणि विनाकारण मनाला दमव दमव दमवितो. साप एकीकडे आणि भुइधोपट दुसरीकडे असे काहीसे होते. मात्र पुन्हा आपण सजगतेने व सावधतेने परिस्थिती न्याहाळून पाहिली असता, ती खूपच सामान्य असल्याचे आणि तिचे व्यवस्थापन सहज करता येण्यासारखे असल्याचे दिसून येते. ही अशी माणसाच्या वागण्यातील विकृती येथे विडंबनात्मक काव्याच्या स्वरूपात मांडली आहे.

*झाडावरचे पान पडले ॥*
*जमिनीला भगदाड पडले ॥*
*मुंगी त्यात शिरेना तेवढ्यात ॥*
*चार हत्ती तिथून निघून गेले ॥धृ॥*

*तुपात पडली माशी ॥*
*माशीने तूप पिऊन टाकले ॥*
*थोड्या वेळाने पाहतो तर ॥*
*झाकले भांडे तुपाने भरलेले होते ॥1॥*

*सूर्य आला माथ्यावर ॥*
*समुद्र सगळा आटला ॥*
*लाटा मोजता मोजता ॥*
*अंधार हा दाटला ॥2॥*

*वीज पडली ढगातून ॥*
*डोळे गेले दिपून ॥*

*डोळे उघडून पाहताच ॥*
*चांदणे पडले टिपूर ॥3॥*

*धबधब्याचे पाणी ॥*
*खालून चालले वर ॥*
*वरून पाहता खाली ॥*
*पाणी वाहतेय उतारावर ॥4॥*

*वादळ आले घोंगावत ॥*
*लोट उठले धुळीचे ॥*
*पुढे मी पाळता मागे ॥*
*नि:स्तब्ध सगळे तसेच राहिले ॥5॥*

*आज उगवला कालचाच दिवस ॥*
*उद्या कधीतरी आज उगवेल ॥*
*वेळेत मी येता भानावर ॥*
*कालच्या नंतर आज अन् ॥*
*उद्या मात्र उद्याच उगवेल ॥6॥*

*भ्रांत असे हे सगळे वाटे ॥*
*जर मानले असता भिऊन, ॥*
*ते वास्तव आहे कसे पाहा ॥*
*विवेकदृष्टीने धीर धरून. ॥7॥*

# 62. कुठेच नसलेल्या गावामध्ये

क्वांटम शास्त्राने हे सर्व जगाला सुस्पष्टपणे दाखवून दिले आहे की विश्वाच्या अगणित क्षमता मनाच्या, शरीराच्या आणि विषय वस्तूंच्या माध्यमातून प्रतीत होत आहेत. या सर्व क्षमता अवकाशात शून्य ऊर्जा पातळीवर अनिर्वचनीय अवस्थेमध्ये असतात. चैतन्याश्रित मनाच्या माध्यमातून निरीक्षणाद्वारे त्या क्षमतांना त्यांचा अर्थ प्राप्त होतात आणि त्या सजीवांच्या जाणीवकक्षेत येतात.

याचा अर्थ सर्व विश्व शून्यतत्त्वातून प्रसविले गेले आहे, हे वेदांत शास्त्रानुसार व आधुनिक विज्ञानानुसार सुस्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर ही रचना निर्माण झाली आहे.

*गर्व, इच्छा, वासना व वृत्ती शून्यातून निपजले ॥*
*कुठेच नसलेल्या गावाकडे निघाले ते अडते हट्टाने ॥धृ॥*

*कुठेच नसलेल्या गावामध्ये अडते आले मुक्कामी ॥*
*भरविले त्यांनी बाजार षड्रिपुंच्या घेउनिया जमिनी ॥1॥*

*कुठेच नसलेल्या गावात असाच एक बाजार भरला ॥*
*उठाव आला अचानक संवेदनांच्या घाऊक मालाला ॥2॥*

*अडते होते पाच त्यांनी लावल्या प्रतिसादांच्या बोली ॥*
*जाणिवा गेल्या कवडीमोलाने तटस्थतेचे मोल देऊनही ॥3॥*

*कुठेच नसलेल्या गावात असाच एक बाजार भरला ॥*
*उठाव आला अचानक बुद्धीरूपी घाऊक मालाला ॥4॥*

*मायावी त्या अडत्यांनी चंचलतेच्या लावल्या बोली, ॥*
*बुद्धी गेली कवडीमोलाने सृजनतेचे मोल देऊनही ॥5॥*

*कुठेच नसलेल्या गावात असाच एक बाजार भरला ॥*
*उठाव आला अचानक शक्तीरूपी घाऊक मालाला ॥6॥*

*उन्मादरूपी अडत्यांनी मोहमायेच्या लावल्या बोली ॥*
*शक्ती गेली कवडीमोलाने सेवेचे ते मोल देऊनही ॥7॥*

*कुठेच नसलेल्या गावात असाच एक बाजार भरला ॥*
*उठाव आला अचानक विवेकरूपी घाऊक मालाला ॥8॥*

*अज्ञानी त्या अडत्यांनी लावल्या गर्वाहंकाराच्या बोली ॥*
*विवेक गेला कवडीमोलाने त्यागाचे ते मोल देऊनही ॥9॥*

*कुठेच नसलेल्या गावात कहर माजविला त्या अडत्यांनी ॥*
*धडा शिकविण्या त्यांना तेथे योगी आले मुक्कामी ॥10॥*

*जाणिवांसह झाले तेथे बुद्धी-शक्तीचे विवेकाचरण ॥*
*जमिनी झाल्या नाहीशा तेथे अडत्यांना त्या आले मरण ॥11॥*

*कुठेच नसलेल्या गावात आता शून्यत्वाचा संचार ॥*
*अंतर्यामी ते योगी तेथे पाहती निर्गुण संसार ॥12॥*

*कुठेच नसलेले ते गाव गेले नसल्याच्याही पलीकडे ॥*
*ब्रह्मरूप झाले योगी अन् तेथे अनंत पुन्हा प्रकटले ॥13॥*

# 63. गुलाम बन के उन पांचो का

*गुलाम बन के उन पांचो का ॥*
*हँसी उडाई मैने ही मुझ पे ॥धृ॥*

*आधी उमर बीत गई भाई ॥*
*यह तो हुई धोकाधाडी रे ॥1॥*

*जो कुछ मन कही सब आभास हैं ॥*
*एक माया ही उसकी जननी हैं ॥2॥*

*जो संवेदीत करे वह कुछ भी नही ॥*
*जब तक ना हो मन की सुनवाई रे ॥3॥*

*अब मैं संभालू खुद को यारों ॥*
*अपने अंदर ही ईश्वर को पाना हैं ॥4॥*

# 64. सत्वपरीक्षा

*अजूनही कृपा माझ्यावर झाली नाही तुझी ॥*
*का अशी सत्वपरीक्षा घेतोस या भक्ताची ॥धृ॥*

*जरी भक्त मी तुझा, परि ना जमली भक्ती ॥*
*तुज जाणून घेण्या दुबळी माझी मती ॥1॥*

इच्छा-वासना लचके तोडती, रज-तम मज भ्रमिष्ट करिती

*षड्रिपू मज खूप दमविती ॥*
*अहंकार रसातळाला नेती ॥2॥*

*आभासी सत्याचा देखावा मांडला जाणिवांनी ॥*
*भ्रांतीच्या दरीत लोटले त्या सुखदुःखांनी ॥3॥*

*माझे हे सत्व नका हिरावू तुम्ही ॥*
*त्यात होईल प्रतिबिंबित माझा सखा हरी ॥4॥*

*काया मन बुद्धी अशी वाया गेली ॥*
*यमदूत ते असे घिरट्या घाली ॥5॥*

*परि तुझ्या दर्शनाची आस ना शमली ॥*
*राहू दे त्राण तव दर्शनमात्रे या शरीरी ॥6॥*

*आता दे विसावा तव मंगल चरणी ॥*
*चुकव चुकव माझी जन्म मरणाची फेरी ॥7॥*

# 65. गूढ असे त्या विश्वाचे

*गूढ असे त्या विश्वाचे उकलून सांगे ती वेदऋचा ॥धृ॥*

*निर्गुणाचे गुण गाण्या शक्तीने केली ईषणा ॥*
*सगुण झाली सज्ज ती तयाचे वर्णन ते करण्या ॥1॥*

*निर्माण केले तिने बुद्धी, प्रज्ञा अन् विवेकाला ॥*
*असंख्य क्षमता निर्माण करूनी प्रकटविले विश्वाला ॥2॥*

*परि नेती नेती म्हणे श्रुती अंती काही न लागले हाताला ॥*
*जेंव्हा जाऊन मिळाली परमात्मतत्त्वाला शब्दातीत ती झाली पुन्हा... ॥3॥*

# 66. सौंदर्य रहस्य

Orchestrated Objective Reduction ही एक सर्वमान्य थिअरी डॉ. रॉजर पेनरोज आणि स्टुअर्ट हॅमरऑफ यांनी मांडली जी क्वांटम शास्त्रावर आधारित आहे. आपल्या मेंदूमध्ये संवेदनांचे अर्थपूर्ण आकलन कसे होते? ते त्यांनी यात सविस्तर सांगितले आहे. सौंदर्याचा अनुभव आपल्याला आनंदी का वाटतो त्याचे mechanics यामुळे आपल्याला कळू शकले.

*सौंदर्य आणि नजाकत यांनी फुलबाग सजली ॥*
*पुसले एका फूलास जे मना वेड लावी ॥*
*सांग, मन माझे तिथे कसे रे मोही ॥*
*परि मज ते बोलले काहीच नाही ॥धृ॥*

*ऐसे हे रहस्य विचारले ॥*
*एका ललनेस तिच्या सौंदर्याचे ॥*
*स्मित करूनी ती ही गेली ॥*
*बोलली काहीच नाही ॥1॥*

*ज्यास लाभे सौंदर्य असे मनमोही ॥*
*त्याचे रहस्य त्यास माहीत नाही ॥*
*म्हणून निसर्गास विचारता कहाणी ॥*
*उकल केली त्याने त्याच्या रहस्याची ॥2॥*

*रंग आणि आकार असे एकत्र येती ॥*
*तेथे होई निश्चित त्या रूपाची प्रचिती ॥*
*काठिण्य अन् मृदुता तेथे ऐसे संमिश्रति ॥*
*त्या आकारास तेंव्हा अधिक उठाव मिळती ॥3॥*

*गूढ असे सृजनत्व धारण करे ती प्रकृती ॥*
*परि ती अंध पाहण्या ही कलाकृती ॥*

*तिजला ना ठावे याची काय प्रतिती ॥*
*कसले हे सौंदर्य अन् कसली कुरूपता ती ॥4॥*

*ऐसा हा गुण समुच्चय जो जीव पाही ॥*
*वृंद उठे मनोऊर्जा कणांचा त्याच रे क्षणी ॥*
*मनोबल जे असे त्याच्या मनोक्षेत्री ॥*
*संवेग करी निर्माण तिथे संवेदनांच्या लहरी ॥5॥*

*सौंदर्य अन् कुरूपता ॥*
*असे इथे नसेच रे काही ॥*
*मनातून जो वृंदध्वनी उठे ॥*
*त्याने हरपती जीवांची मति ॥6॥*

*मालकी मनोक्षेत्राची ॥*
*जी असे ईश्वराची ॥*
*रूप घेतले प्रकृतीने ॥*
*ती गती उर्जाकणांची ॥7॥*

*जीवाने का मग ठेविले ॥*
*हे सौंदर्य त्याचे भांडवली ॥*
*कोण जीव दुजा हा ॥*
*त्याचे प्रती सर्वस्व अर्पिती ॥8॥*

*ही तर अखिल विश्व-ऊर्जा कणांची गती ॥*
*त्यातून येती सगुण साकाराची प्रचिती ॥9॥*

*ती आंदोलित मति, ॥*
*ओळख असे ना तुझी ॥*
*त्यामाजी ते चैतन्य अथर्व; ॥*
*ते तू असशी, ते तू असशी... ॥10॥*

# 67. जो कुछ

*जो कुछ नही था वही पाया मैने ॥*
*जो कुछ खोया वह कभी था ही नही ॥1॥*

*जो कुछ किया सा लगता हैं मैने ॥*
*करने जैसा कुछ था ही नही ॥2॥*

*छोडने का बहाना क्युं करू ॥*
*मुझमे मेरा अब कुछ भी नही ॥3॥*

*अब ना रहू मैं मेरा तो ॥*
*यह तुम तेरा की तो बात ही नही ॥4॥*

*इसी बहाने तो मैं आया जीवन मे ॥*
*अब यह जानने की भी जरूरत नही ॥5॥*

# 68. सावन आया हे सखी री

*सावन आया हे सखी री*
*नेहानंद नयन बरसे री ॥धृ॥*

*बैठे हम चातक की न्यायी*
*जुग जुग से जो बिरह हम सांही ॥1॥*

*कांत हृद में और दुनिया ढुंढी*
*मदमाया से हमरी मत थी मारी ॥2॥*

*मनमरूस्थल गुरु बाणी जो पांई*
*प्रभू प्रेम के बादल छांए घनेरी ॥3॥*

*करुणा की अमृत धारा जो बरसी*
*मनमृदगंध को प्राणपवन ले आयी ॥4॥*

*मैं-मेरा अब मुझ में कछु नाही*
*तन मन सह सब जगत गई बिसरी ॥5॥*

**पंजाबी भाषेत सुचलेली कविता.**

# 69. कर्ता कर्ते को देखता है

ब्रह्मसूत्रांमध्ये “ईशना” या शब्दाने ब्रह्माच्या “बहु व्हावे” या इच्छेबद्दल नमूद केले आहे. क्वांटम शास्त्रीयदृष्ट्या वैश्विक ऊर्जेने तिच्या क्षमतेचे तिच्यावर स्वयंप्रक्षेपण करून स्वत:तून अनंत क्षमता प्रसविल्या असल्याचे दिसून येते. येथे ईश्वराला सर्व कारणाचे कारण म्हणून मूळ कर्ता असे मानले आहे. ईश्वर हा अकर्मी कर्ता आहे. तो भौतिक व मानसिक अवस्थांना प्रकाशित करतो, पण त्यामध्ये सहभागी होत नाही. त्याने इच्छा केली तथापि त्यापासून तो अनिर्वचनीयपणे तटस्थ आहे.

ऊर्जा चैतन्याला धारण करते. चैतन्य हे परम तत्त्व परब्रह्म आहे. ऊर्जेने चैतन्याला धारण केले आणि तिच्यामध्ये “मी स्वतंत्र आहे” असा मी पणाचा भाव निर्माण झाला. तिने संत ऋषी मुनी यांच्या माध्यमातून अलौकिक क्षमतांचा विस्तार केला आणि निर्भाव अवस्थेत परब्रह्म जाणले. तथापि त्या अलौकिक जाणिवांमध्ये ते विलीन झाले आणि त्याचा अनुभव सांगणारा तथाकथित कर्ता शिल्लकच राहिला नाही. ही रचनेद्वारा हे सर्व वेगळ्या पद्धतीने मांडले आहे.

*इक्तिजा से आइना-सऽजी कर के ॥*
*कर्ता कर्ते को देखता है ॥धृ॥*

इक्तिजा = स्वेच्छा

आईना सजी = आईना बना कर उसको सजाना

*कर्ते की प्रतिछांही आइने मे हैं ॥*
*आइने को अब कुछ हुआ तो हैं ॥1॥*

*कर्ते का देखना बेमिसाल हैं ॥*
*आइना खुद को मै समझता हैं ॥2॥*

*आईना अब एक अलग सी इक्तिजा हैं ॥*

*कर्ते को यह पता तक तो नही हैं ॥3॥*

*आइना औसफ अकार हैं ॥*
*कर्ता अलख निराकार हैं ॥4॥*

औसफ = सगुण

अलख = निर्गुण

*आइना कर्ते को ढुंढता हैं ॥*
*लेकीन औसफ से वह अंधा हैं ॥5॥*

*कर्ता अजल ए उजाला हैं ॥*
*आईना उसमे ही आंहे भरता हैं ॥6॥*

अजल ए उजाला = परम तत्त्वाचा प्रकाश

*इस उजाले से आइने की पहचान हैं ॥*
*यह पहचान आईने का एक आभास हैं ॥7॥*

*अब पहचान आभास से परहे हैं ॥*
*मैं और इक्तिजा आईने से अलग हुए हैं ॥8॥*

*अब आईना खुद आईना नही हैं ॥*
*जो हुआ हैं रूहबरुह कर्ते से ॥9॥*

*अब आईना कर्ता है और ॥*
*आईने को वह पता तक नही हैं ॥10॥*

# 70. मकसद

काल व्हरांड्यातील दिव्याची वायर काही कारणाने तुटली. दोन्ही टोके लोंबकळत होती दोन बाजूला. त्यांना जुळवून पुन्हा दिवा सुरू केला. दिवा लागल्यावर तो कशाच्या तरी पार्श्वभूमीवर प्रकाशमय होतो, हा जुनाच अनुभव पुन्हा नव्याने पाहात होतो. "पार्श्वभूमी" या शब्दाच्या घसरगुंडीवरून मी माझ्या अंतर्मनात जाऊन पडलो आणि लिहिता झालो.

मला नेहमी असे वाटते की माझे हे भौतिक अस्तित्व हे माझ्या निरास्तित्वाच्या पार्श्वभूमीवर दिसून येत आहे. माझी एक चिरंतन अप्रकट अवस्था अशी असलीच पाहिजे की ती या माझ्या प्रकट अवस्थेची पार्श्वभूमी म्हणून माझ्या प्रत्ययास येते आहे. माझा प्रवास हा माझ्या अप्रकट अवस्थेकडे जाणारा आहे, हे मला या प्रकट अवस्थेत कळून चुकले आहे. मात्र यात एक मेख अशी आहे की त्या अप्रकट अवस्थेचे मोजमाप घेण्यासाठी आपल्याकडे काहीच नाहीये. Logically ते बरोबरच आहे, कारण इथे द्वंद्व आणि तिथे अद्वय.अद्वैताच्या प्रांतात कोण कुणाला पाहणार? नाही का.

जन्म, जीवन आणि मृत्यू या तीनही अवस्था या माझ्याच अप्रकट चिरंतन अवस्थेच्या मनरूपी पडद्यावर प्रक्षेपित होत आहेत. तेथे मनाने स्वत:च संयोजक, आयोजक, नेपथ्यकार, कथाकार, पटकथाकार, कलाकार व प्रेक्षक होऊन संपूर्ण जीवन अर्थपूर्ण करण्याचा खटाटोप सुरू ठेवला आहे. निरर्थक म्हणजे काय? हे ही त्याने स्वत:नेच ठरविलेले आहे, हे सुद्धा आताशा माझ्या लक्षात येऊ लागले आहे. जेथे निरर्थकच काही नाहीये तेथे अर्थपूर्णतेचा खटाटोप कोण, का आणि कशासाठी करतोय?

एक जड देह आणि परम चैतन्य एकत्र येऊन एक जीवरूपी खेळ मांडू शकतात? आणि स्वत:च्या असंख्य जाणिवांचे तुषार निर्माण करू शकतात? ही अखिल विश्वाची जादू आहे. ही त्याचीच किमया आहे. हे विश्वरूप मनाचेच

स्वसंमोहन आहे. हे सपशेल आभासी आहे. याला आता आधुनिक शास्त्रे पुष्टी देत आहेत.

भौतिक पातळीवर आपण आपले अनुभव व आपल्या जाणिवा सत्य मानून त्याचे सुव्यवस्थापन करतो, हे अनिवार्यच आहे. अन्यथा या आधीच आभासी सत्य असलेल्या जीवदशेमध्ये जीवास खूप (तथाकथित) दु:खमय जीवन जगावे लागले असते. तसे पहिले तर भौतिक आणि आभासी असे काही येथे आहे का? हे आपण आधी rationalize केले पाहिजे असे मला नेहमीच वाटत आले आहे. म्हणून अज्ञानरूपी खडकाला पडलेल्या फटीतून क्वांटमशास्त्रासारख्या अपरिचित प्रांतात माझे पाहाणे झाले.

“हे असले तत्त्वज्ञान पुरे, वाढदिवस साजरा करा आधी, ती दोघे सबमिशनला बसलीयेत, जावा श्रीखंड घेऊन या चितळेंकडून”, असे माझ्या नकळत मागे येऊन उभी राहिलेली आमची आभासी सत्यतेत आकंठ बुडालेली सौ. म्हणाली. तेंव्हा विचारांची ही तार तुटली, पण या सुद्धा तारेची दोन टोके अप्रकट आणि प्रकट अवस्थेच्या दोन्ही बाजूला पुन्हा त्या दिव्याच्या तारेसारखी तशीच बेवारस लोंबकळत राहिली आहेत. जोडू आता पुन्हा कधीतरी...मलाच जोडणी करावी लागेल, नाहीतर ज्ञानाचा प्रकाश पडणार नाही. किंबहुना श्री ज्ञानेश्वर माउलींच्या “काट्याच्या अणीवर...” सारखी ती तारच आभासी असेल तर? बापरे.... आता चला वाढदिवस साजरा करायला.... असो, दरवर्षी जीवनाकडे अत्यंत नवीन अशा क्रांतिकारी दृष्टीने पाहाता येणे म्हणजे वाढदिवस साजरा करणे होय असे मला वाटते. ही क्रांती आंतरिक असावी व अध्यात्मिक उन्नतीकडे घेऊन जाणारी असावी इतकेच मला इथे सांगायचे आहे.

*कमी नही थी जहाँ मे मेरे यहाँ आने से पहले.... ॥*
*वैसा ही रहेगा जहाँ, ना होगी कमी बाद मेरे जाने से ... ॥1॥*

*एक मालिक ही तो बसा हैं हरएक जीव में, ॥*
*जिसने ना बनाया कभी तुम और ना कभी मैं.... ॥2॥*

*मायाजाल हैं ये सब कुछ, ये कहना भी यहाँ माया का खेल हैं.... ॥*

*ना कभी आये थे और ना ही कभी जायेंगे यही तो हमारी पेहचान हैं.... ॥3॥*

*मौज में रहो यारों के यह समझ कर जिना ही जिंदगी का मकसद हैं.... ॥*
*मौज में रहो यारों के यह समझ कर जिना ही जिंदगी का मकसद हैं.... ॥4॥*

# 71. ज्ञानाचा दिवा

*दिवा घडविला ज्ञानाचा ॥*
*अन् तेल घातले त्यागाचे ॥*
*समर्पणाची वात लावून ॥*
*ज्योत लावली ध्यानाग्निने ॥धृ॥*

*प्रकाश पडला विवेकाचा ॥*
*अज्ञानाचा अंधकार निमाला ॥*
*वैराग्याचे देऊनिया मोल ॥*
*दिप चिरंतन तो झाला ॥1॥*

*त्या ज्योतीच्या तेजाने ॥*
*अहंकार तो सर्व जळाला ॥*
*लावूनिया त्याचे भस्म अंगाला ॥*
*सजला निर्गुण योग्याचा पुतळा ॥2॥*

*प्रशांतिच्या संवादातून ॥*
*चैतन्याची ओळख पटली ॥*
*शून्याचा ओलांडून उंबरा ॥*
*ब्रह्मरूप ती झाली विभूती. ॥3॥*

# 72. भेट तिची

*तिची ओळख तशी जुनीच, पण आताशा नजरा चुकवायची,*
*सर्व धाडस एकवटून फोन केला तिला खूप दिवसांनी... ॥धृ॥*

*ये म्हटले वाडेश्वरला...भेटू तिथे मोकळे करायला मन,*
*पण उत्तराऐवजी नि:शब्दच गेले काही क्षण, ॥1॥*

*मी चपापलो आणि म्हटले चुकले का काही,*
*अतिशय क्षीण स्वरांत तिने "येईन" म्हणून दिली ग्वाही. ॥2॥*

*मी नेहमीप्रमाणे वेळेआधी दहा मिनिटे बाहेर उभा,*
*पण कळलेच नाही वाट पाहण्यात अर्धा तास कसा गेला. ॥3॥*

*गर्दीत मान खाली घालून भरभर येताना ती दिसली मला,*
*थोडी कावरी बावरी होती, काय झाले असावे तिला? ॥4॥*

*कपडे खूप साधे, सात्त्विक मुद्रा..., पण वाटली कणखर तितकीच,*
*मी पण इकडे सावध व धिटाई आणली काकणभर जास्तीच. ॥5॥*

*तिचे हसून न हसल्यासारखे अन् नजर देऊन न दिल्यासारखे,*
*मी मात्र होतो शांत अन् तिचे स्वागत केले नेहमीसारखे. ॥6॥*

*पापणी लवू न देता मी नजर होतो तिच्यावर खिळवून,*
*आवंढा गिळला तिने तिचा रूमाल डोळ्याला लावून झटकन. ॥7॥*

*पश्चात्ताप करू नकोस झाले गेले ते जा सर्व विसरून,*
*खूप खेळविलेस तू मला मी बोललो हे तिला निक्षून. ॥8॥*

*ती ही झाली पुन्हा कणखर अन् फेकले फासे टाकला प्रभाव,*
*यावेळेस मी सावध शांत काहीच नाही तिचा लागला टिकाव. ॥9॥*

*ती हरली होती या खेळात अन् मी जिंकलो होतो,*

*पण हे जर कळले तिला तर मी पुन्हा तिच्यात अडकणार होतो. ॥10॥*

*एकेकाळी तिने होते दाविले मला आसमान,*
*वेड्यासारखा तिच्यामागे धावत होतो मी पिसाट गुमान. ॥11॥*

*मी जसा बदलेल त्याहून ती अधिक बदलत होती,*
*भ्रमिष्ट करून मला ती अक्षरशः नागवित होती. ॥12॥*

*उत्तान तिची लाईफ-स्टाईल होती झिंग आणणारी,*
*नेहमीच असे मी बेभान आणि असे वेगाची नशा ती भारी. ॥13॥*

*पण नेहमीच माझी फसगत अन् नेहमीच मी तहानलेला,*
*उर फुटायची वेळ आली तरी मी काहीच हाती न लागलेला. ॥14॥*

*ठरविले एकदा येऊन भानावर, पडदा करू फाश तिचा,*
*गुपित सारे तिचे मी शोधून तिचाच आरसा दाखविला तिला. ॥15॥*

*डाव ओळखण्याची त्या मायेची कला मी होती जोपासलेली,*
*साक्षात ती आज माझ्यासमोर सात्त्विक अन् शांत बसलेली. ॥16॥*

*मी विजयी झाल्याचे तिनेच केले मान्य,*
*वचन दिले तिने मजला नेईन तिथे जिथे नसेल कोणी अन्य. ॥17॥*

*वदली मला ती या विश्वाचे होऊन मी रे दिवा-स्वप्न,*
*देऊन जाणिवा जीवांना त्या सर्वांना केले मी माया-मग्न. ॥18॥*

*जो ओळखिल मूळ स्वरूप ते माझे,*
*मी नेईन रे त्याला त्या स्वप्नाच्या पलीकडे. ॥19॥*

*माझी सीमा असेल आकाशाची,*
*जेथे नांदी असेल केवळ सात्विकतेची. ॥20॥*

*त्यापलीकडे मी निर्गुण, निरहंकार अन् निराकारी,*
*तुला तेथे सोडून फिरेल रे मी माघारी. ॥21॥*

*मी तरीही राहिलो तटस्थ अन् उदास तिच्या वचनांवरती,*
*अंतदृष्टी लाभली मला अन् ती असून पुढ्यात झाली दिसेनाशी. ॥22॥*

# 73. सखीरी मैं तो

*सखीरी मैं तो शाम की भई री ॥*
*उनके सनेह रंग ऐसी मैं रंगी री ॥धृ॥*

*देखे जो मैने उनके कमलनयन री ॥*
*नजर अब मेरी उनकी भई री ॥1॥*

*जह जह देंखू तह तह कान्हा पांऊ री ॥*
*झांकू अंतर तो उत देखू मुरारीजी ॥2॥*

*धुन मुरली की सुन सुन रे सखी री ॥*
*सुदबुध सब यह मैने खोई री ॥3॥*

*बिन हरीनाम अब कछु ना सुहावे री ॥*
*हृद कमल मेरे एकु गोविंदु विराजे री ॥4॥*

*मैं भिगी ऐसी जो अमृतधारा बरसे री ॥*
*गोपालभाव मे आनंद धुंद भई री ॥5॥*

# 74. मनमोहना

*मनमोहना विनवितो तुज मी, माझा भार हा तू का रे वाही ॥धृ॥*

*मायांध हा दिशाहीन मी, जगतो हे ऐसे जीवन आभासी ॥*
*हात धरूनिया माझा तू हाती, हरी तू झाला या आंधळ्याची काठी ॥1॥*

*ना कळे मला काय हे जगणे, अजाण मी हा असा अज्ञानी ॥*
*तूच कसा रे राखतो कान्हा, लाज ही माझी वारंवार या जगी ॥2॥*

*ना बैसलो कधी तव भजनी, ना केली कधी तुझी भावभक्ती ॥*
*माझे कर्म कुटील मी हीन जाती, तरी हे गोपाला कैसे तू मज तारी ॥3॥*

*तव अगाध लीला घनश्यामा, गुरुकृपे रे आता मी जाणिली ॥*
*ही माया स्वयं प्रसवली, तव मुरलीच्या रे सुस्वरी ॥4॥*

*मम आत्म्याचे त्या प्रतिबिंबी, स्वये तू तुजला असा पाहशी ॥*
*माधवा घे मजला तव हृदयी, ऐकीव अनहद नाद सत्वरी ॥5॥*

# 75. तू योगियांचा योगी

"तू नानकी दा वीर, तन मन दा फकीर..." हे पंजाबी भाषेमध्ये अतिशय प्रेरणादायी गीत आहे. या गीतावर आधारित खालील रचना तयार झाली असून त्या मूळ पंजाबी रचनेचा हा थेट अनुवाद नाही.

*तू योगियांचा योगी आम्ही तन मनाचे फकीर ॥*
*तू स्वामी त्रैलोक्याचा आम्ही वीरांचे ते वीर ॥धृ॥*

*क्षमतांचे शस्त्र देऊनी तू केले आम्हा सुसज्ज ॥*
*बुद्धी-मती ती स्थिर ठेवण्या दिलास आम्हा धीर ॥*
*तू योगियांचा योगी आम्ही तन मनाचे फकीर ॥*
*तू स्वामी त्रैलोक्याचा आम्ही वीरांचे ते वीर ॥1॥*

*करीतो आम्ही पार ते भवारण्य घनघोर ॥*
*दिलेस आम्हा मन कणखर अन वज्राचे ते शरीर ॥*
*तू योगियांचा योगी आम्ही तन मनाचे फकीर ॥*
*तू स्वामी त्रैलोक्याचा आम्ही वीरांचे ते वीर ॥2॥*

*होण्या षड्रिपू-दमन ते मनाचिया युद्धक्षेत्रे ॥*
*केलेस तू आम्हा ज्ञानवंत, शीलवंत अन् शूर ॥*
*तू योगियांचा योगी आम्ही तन मनाचे फकीर ॥*
*तू स्वामी त्रैलोक्याचा आम्ही वीरांचे ते वीर ॥3॥*

*देऊनिया आम्हा येथे तू वैराग्याचे वरदान ॥*
*साधन ते करूनि साध्य झालो आम्ही सुधीर ॥*
*तू योगियांचा योगी आम्ही तन मनाचे फकीर ॥*
*तू स्वामी त्रैलोक्याचा आम्ही वीरांचे ते वीर ॥4॥*

*ऐशा या इंद्रियांच्या वळविल्या वृत्ती आत सर्व ॥*

*जिंकला अहंकार ज्याने तो ओळखावा धर्मवीर ॥*
*तू योगियांचा योगी आम्ही तन मनाचे फकीर ॥*
*तू स्वामी त्रैलोक्याचा आम्ही वीरांचे ते वीर ॥5॥*

*भ्रांतीची करूनि सांगता तिला भेदिले ते पार ॥*
*तृष्णेच्या मृगजळातून प्राशितो अमृतमयी ते नीर ॥*
*तू योगियांचा योगी आम्ही तन मनाचे फकीर ॥*
*तू स्वामी त्रैलोक्याचा आम्ही वीरांचे ते वीर ॥6॥*

*इच्छा वासना आकांक्षा आमुच्या पायाची ती धूळ ॥*
*उदात्ततेला आमुच्या आहे अनंत दिव्य लकीर ॥*
*तू योगियांचा योगी आम्ही तन मनाचे फकीर ॥*
*तू स्वामी त्रैलोक्याचा आम्ही वीरांचे ते वीर ॥7॥*

*पंचप्राण गुंफूनिया केला पंचतत्त्वांचा हा दोर ॥*
*निर्गुण तत्त्वाचे ते आम्ही चढून जाऊ शिखर ॥*
*तू योगियांचा योगी आम्ही तन मनाचे फकीर ॥*
*तू स्वामी त्रैलोक्याचा आम्ही वीरांचे ते वीर ॥8॥*

*निर्भयतेने गातो आमुचे असे हे विजय गीत ॥*
*आता चरणी वाहतो आम्ही आमुचे विनम्र शीर ॥*
*तू योगियांचा योगी आम्ही तन मनाचे फकीर ॥*
*तू स्वामी त्रैलोक्याचा आम्ही वीरांचे ते वीर ॥9॥*

# 76. ज्ञानियाची आस

*लागली ज्ञानियाची आस ॥*
*तोडतो इथे मायेचे हे फास ॥धृ॥*

*धनिया पक्की विवेकाची कास ॥*
*तरूनिया आलो इथे जन्मे अनेक ॥1॥*

*ज्ञानदेवा तुमचा जन्मोजन्मीचा विरह ॥*
*चित्ती का उठति हे अज्ञानाचे कलह ॥2॥*

*पडो माझे पाऊल तुझिया पाऊले ॥*
*झडो ती माया तुझिया ज्ञानदर्शने ॥3॥*

*गातो तुझी महती तो रेडा बोलविसी ॥*
*मज द्यावी सद्बुद्धी परमार्थ साधण्या ॥4॥*

*ज्ञानदेवा लाभले गा ते गुरु नाथ निवृत्ती ॥*
*अमृता ते पैजा जिंकी आमुची ज्ञानेश्वरी गुरुमाउली ॥5॥*

*आता देवा भेटवि ज्ञानदेवा हृदयी ॥*
*करूनिया ज्ञानयज्ञ सुफल सफल ॥6॥*

*येऊ दे योग तुझिया ज्ञानतत्त्वे ॥*
*विश्व माझ्यातील व्हावे एकदेशी ॥7॥*

*ज्ञानाच्या पलीकडे ज्ञानदेव कृपे जाऊ ॥*
*शून्याचे ओलांडून ते माप निर्गुणाचे गुण गाऊ ॥8॥*

*देशी दिव्य दृष्टी होण्या भ्रांतीची ती वाफ ॥*
*दिस आमुचा शेवटचा ऐसा व्हावा अवघा ज्ञानस्वरूप ॥9॥*

# 77. परिस स्पर्श

*लोहाशी व्हावा परिसस्पर्श अन् व्हावे त्याचे सोने.... ॥*
*तैसे अचेतन मनोकणांना परब्रह्म ते स्पर्शिले. ॥धृ॥*

*हुंकार निघाला मी पणाचा जो निव्वळ उसना असे.... ॥*
*मालकीचा आव आणूनी हे जीवन तो जगतो असे. ॥1॥*

*नसे अणूची एकाही मालकी तेथे शरीर माझे कसे... ॥*
*विश्व ऊर्जेतून मन ते घडले ते मन ही माझे नसे. ॥2॥*

*निर्माण होती आपोआप तेथे वासना इच्छा अन् इरादे.... ॥*
*वृत्ती प्रवृत्ती अन् उर्मीचे हे मनोक्षेत्र हो कोणाचे? ॥3॥*

*मालकी त्यांची मानून आता भ्रांत मी का व्हावे.... ॥*
*मी माझे मला म्हणूनी असे हट्टी कधी नसावे. ॥4॥*

*चैतन्याच्या प्रकाशात ते कार्य मनाचे चाले... ॥*
*आविर्भाव मनाचा जसा की तोच कर्ता स्वत: असे. ॥5॥*

*शक्ती बुद्धीच्या क्षमता हे तर विश्वाचे देणे... ॥*
*संवेदना अन् प्रतिसादाचे हे यंत्र आपोआप हो चाले. ॥6॥*

*मी कोण कुठला माझ्याकडे त्यांचे स्वामित्व हो कुठले... ॥*
*हे स्वप्न आहे केवळ समजून घेण्या विश्व इथे प्रकटले. ॥7॥*
*आत्मभान प्रकटे तेथे जेथे विवेक होईल जागा... ॥*
*आत्मभान ठेवण्या जागे मी मायेत ना लिप्त व्हावा. ॥8॥*
*वृत्ती प्रवृत्तीच्या यज्ञवेदी प्रकटावा अग्नी साधनसिद्धीचा... ॥*
*अहंभावासह इच्छा वासनांच्या त्यात आहुती पडाव्या. ॥9॥*
*अद्वैताचे तेज प्रकटावे मनामध्ये सर्वांच्या... ॥*
*आत्मभान मिसळू सर्वांचे ब्रह्मानंदात एका... ॥10॥*

# 78. मी कोण कुठला

*शब्द तयाचे त्यांच्या अर्थाचे ऐश्वर्य तयाचे... ॥धृ॥*

*कल्पना त्याच्या अन् स्वप्नाचे साम्राज्य तयाचे... ॥*
*प्रज्ञा त्याची अन् प्रतिभेची धारा तयाची.... ॥1॥*

*क्षमतांचे आसमान त्याचे मी क्षितिज असे मर्यादांचे... ॥*
*मी कोण कुठला, मम काव्याची ती हौस कोण पुरवे... ॥2॥*

*प्रतिभेच्या या हिंदोळ्यावर कोण मजला झुलवे... ॥*
*शब्दांचा मी याचक मजला शब्दब्रह्म ते कसे स्पर्शिले... ॥3॥*

*विश्वमनातील भावविश्व मम हृदयी ते कसे प्रकटले... ॥*
*समर्पणाशी जाता आता ते अश्रूही नसतील माझे... ॥4॥*

*मी इतका शून्यार्त असा आता की मम विनम्रता ही माझी नसे... ॥*
*अस्तित्वाचे उगळूनिया चंदन आता चरणकमल लेपितो देवाचे... ॥5॥*

# 79. प्रकाश मी

दाट अंधाऱ्या खोलीमध्ये स्थान माहीत असलेली एखादी वस्तू शोधण्यास जाताना आपण आपल्या स्मृतीचा वापर करून तिचे यापूर्वी पाहिलेले स्थान मनाच्या पटलावर दृश्यमान करण्याचा प्रयत्न करतो आणि चाचपडत तिथे पोहोचून चाचपून ती वस्तू बाहेर घेऊन येतो. परंतु तिचे स्थान माहीत नसल्यास आपल्याला प्रकाशाची गरज भासते. यात विशेष असे आहे, की स्मृतीचा वापर करून तिचे यापूर्वी पाहिलेले स्थान मनाच्या पटलावर दृश्यमान करतानासुद्धा आपल्याला प्रकाशाची गरज भासते परंतु तो प्रकाश भौतिकशास्त्राच्या चौकटीत सिद्ध होणारा नसतो. भौतिक शास्त्राच्या चौकटीत तो अंतर्मनातील प्रकाश सिद्ध होत नसला तरी त्याचा अनुभव कोणीही नाकारू शकत नाही. या प्रकाशाला परमात्म तत्त्वाचा दिव्य प्रकाश असे वेदांतात म्हटले गेलेले आहे. आपण पाहत असलेली स्वप्ने आपण याच दिव्य प्रकाशात पाहतो. अन्यथा मेंदूत कुठेही वेगळी प्रकाशयोजना नाही. हा दिव्य प्रकाश केवळ तेज:पुंज सूर्यालाच प्रकाशित करत नाही, तर अंधारालासुद्धा प्रकाशित करतो. वेगळ्या शब्दांत सांगायचे म्हणजे हा दिव्य प्रकाश सूर्याच्या तेजाला आणि अंधाराला समानतेने अर्थबोधित करतो आणि त्यानंतरच त्याचा अनुभव मन व मेंदू यांच्या प्रणालीमध्ये अवतरीत होतो. चांगदेवपासष्टीमध्ये संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माउलींनी "अनुभव, अनुभावक आणि अनुभाव्य ही त्रिपुटी याच दिव्य प्रकाशाने प्रकाशमान झाल्याशिवाय विश्वाचे ज्ञान होऊ शकत नाही" असे नमूद केले आहे. क्वांटम शास्त्रावर आधारीत Orchestrated Objective Reduction हा जगद्मान्य सिद्धांत डॉ. रॉजर पेनरोज आणि डॉ. हॅमरऑफ यांनी मांडला. त्यामध्ये त्यांनी मेंदू आणि चैतन्य यांच्या संयुक्त प्रणालीमध्ये अर्थबोधन कसे घडून येते याचे विश्लेषण केले आहे. क्वांटम शास्त्रातील मोजमाप प्रक्रिया ही एक मध्यवर्ती आधारभूत संकल्पना आहे. त्यानुसार जर मेंदू आणि चैतन्य यांच्या संयुक्त प्रणालीमध्ये मनाच्या प्रत्येक अवस्थेचे अंतर्गत मोजमाप घडून

येत असेल तर आपल्याला या दिव्य परमात्म तत्त्वाचा प्रकाश मानावाच लागेल. तथापि मोजमापाशिवाय विज्ञान कोणताही अनुभव शास्त्रीय मानित नाही. तसेच परमात्म तत्त्वाच्या दिव्य प्रकाशाची सिद्धता फक्त आपल्या प्रत्येकाच्या स्वानुभूतीशीच निगडीत असल्याने त्याचे स्वतंत्रपणे मोजमाप करणे अशक्य आहे. असे असल्याने अजून विज्ञानाने त्याला मान्यता दिलेली नाही. पण चांगदेवपासष्टीमधील ओव्या आपल्याला विज्ञानाच्या पुढे सहजच घेऊन जातात नाही का.

*सूर्याचे तेज घेवूनि दवबिंदुमध्ये मी आलो, ॥*
*पर्णफुलांच्या सौंदर्याचा वाहक मी हा झालो. ॥धृ॥*

*धवल करूनिया हिमशिखरे ती रौद्र सौंदर्य त्यांचे झालो, ॥*
*निळासावळा होऊनि मी गंगेसह ओघवता झालो. ॥1॥*

*कडाडता ती विद्युल्लता क्षणात एका क्षितीज व्यापले, ॥*
*मी माझ्यातच विलीन होऊन पाहणाऱ्याचे डोळे दिपविले. ॥2॥*

*जलधारांच्या मधून जाता इंद्रधनू सुंदर मी झालो, ॥*
*असंख्य रंगछटा उधळूनिया निसर्ग चित्रकार जाहलो. ॥3॥*

*भिजलेल्या रानवाटांवर धीर गंभीर मी झालो, ॥*
*कोणाची ही पावले त्यांचा दिशादर्शक मी झालो. ॥4॥*

*डोळ्याची होऊनिया चमक आरसपानी मी झालो, ॥*
*भाव होऊनि त्या जीवाचे हृदयात तुमच्या मी आलो. ॥5॥*

*होऊनि मी प्रकाश येथे अंधाराला वाट दावतो ॥*
*परी अर्थाच्या या प्रकाशण्याला चैतन्याचा प्रकाश झालो. ॥6॥*

# 80. शून्य अहंभावाच्या उंबरठ्यावर

*पाहुनिया साधकाची साधनशूचिता ॥*
*येतील स्वागता तेथे विवेक आणि विनम्रता ॥धृ॥*

*उघडले जाईल दार निरहंकार अन् निर्गुणाचे ॥*
*पाहील एकतत्त्व चैतन्य तो विश्वात सर्व जीवित्वांचे ॥1॥*

*तप्त होता अद्वैत ज्ञानसूर्य मनाच्या मरुभूमीवर ॥*
*सिंचतो आता वैराग्य तो त्या मी पणाच्या मृगजळावर ॥2॥*

*तर्काच्या तळहातावर घेऊन विवेकरूपी दिव्य रत्न ॥*
*उजळीतो साधनमार्ग तो मुक्तीच्या त्या शिखरापर्यंत ॥3॥*

*लेवूनिया वस्त्रे ध्यानात मनाच्या सहज अवस्थेची ॥*
*उर्मीवर करूनिया मात तो लावितो पताका विजयाची ॥4॥*

# 81. तो मृत्यू जगतो

*जो मीपणा ने जगतो तो मृत्यू जगतो ॥*
*जो तुलना सतत करतो तो मृत्यू जगतो ॥धृ॥*

*जो भोक्ता होऊन राहतो तो मृत्यू जगतो ॥*
*जो कर्ता होऊन राहतो तो मृत्यू जगतो ॥1॥*

*जो इर्षा करून जगतो तो मृत्यू जगतो ॥*
*जो द्वेषाने इतरा वागवतो तो मृत्यू जगतो ॥2॥*

*जो सुखदुःखे बाधित होतो तो मृत्यू जगतो ॥*
*जो भेदाभेदाने इतरा वागवतो तो मृत्यू जगतो ॥3॥*

*जो प्रेयस ते नेहमी वांछितो तो मृत्यू जगतो ॥*
*जो अतृप्त भाव असतो तो मृत्यू जगतो ॥4॥*

*जो भासात आभास ते पाहतो तो मृत्यू जगतो ॥*
*जो द्वैतातून द्वैत माजवितो तो मृत्यू जगतो ॥5॥*

*जो असंयमित वागतो तो मृत्यू जगतो ॥*
*जो षड्रीपुंशी हारतो तो मृत्यू जगतो ॥6॥*

एस.एन.डी.टी. महाविद्यालयातील निवृत्त प्राचार्य डॉ. श्री तापकीर सर यांनी मला दिलेले हे आशीर्वाद.

*तू अध्यात्माचा कवी तू शब्दांचा सर्वेश ॥*
*साधना साधताना तू यशस्वी हो राजेश ॥*

त्यावर मला स्फुरलेल्या ओळी,

*अहो आपण केवळ निमित्त मात्र ॥*
*एका ईश्वरी शक्तीचे हे गूढ असे सूत्र... ॥*
*हा त्या विश्वाचा प्रसाद प्राप्त होतसे काव्यरूपाने ॥*
*आपणा सर्वांना वाटतो तो अतीव आनंदाने ॥*

# 82. वचन होते दिलेस तू

नमस्कार, शरीररूपी उर्जातत्त्व आणि आत्मरूपी चैतन्य तत्त्व यांच्यातील हा संवाद आहे. या दोन तत्त्वांचा संगम म्हणजे आपण आणि आपले विश्व होय. आपल्यासमोरचे विश्व सातत्याने बदलत असते. एका क्षणी ते आपल्या इच्छापूर्तीच्या रूपाने साकारते तर एका क्षणी ते आपले पूर्वकर्मांचे परिणाम म्हणून प्रारब्धवश आपल्यासमोर उभे ठाकते. खरे तर हे जीवन कधी अद्याप सुरूही झालेले नाही आणि कधी संपुष्टातही येणार नाहीये, कारण महाऊर्जेचे हे एक केवळ स्वप्नवत अवस्थांतरच आहे. आता अत्याधुनिक अशा क्वांटम शास्त्राच्या साहाय्याने हे सहज सिद्ध करता येते. फक्त आपण त्याच महाऊर्जेचे घटक म्हणून ते स्वतंत्रपणे अनुभवत असतो इतकेच. ही स्वतंत्रता आभासी सत्यतेचा एक भाग आहे. या आभासी सत्यतेच्या जन्म-जीवन-मृत्यू या प्रमुख तीन अवस्था आहेत. त्या अवस्थांतरांना समजून त्यांच्या पलीकडे जाऊन त्यांचा साक्षी होता आले तर...? तर आपण त्यातून उद्भविणाऱ्या सुखदु:खाने सीमित होऊन राहणार नाही. हेच रहस्य आपले सर्व महान ग्रंथ आणि संतसाहित्य आपल्याला युगानुयुगे सांगत आहेत. मराठी भाषेचे वैभव इतके अपार आहे की मला तिच्याच कृपेने हे सर्व वेगळ्या पद्धतीने इथे मांडता आले आहे....

ऊर्जेने एक जीव म्हणून चैतन्याच्या आश्रयाने शरीररूप धारण केलेले होते. आता तिची शरीराला धारण करून जगण्याची क्षमता संपुष्टात आलेली असल्याने ती मृत झाली आहे. पण स्वत: चैतन्यस्वरूप असूनही जीवात्म्याला स्वस्वरूपाचा विसर पडला आहे. शरीर मृत झाले म्हणून दु:खी झालेला जीवात्मा तिथे त्या मृत शरीराच्या अंत्यविधीला शोक करत आहे. त्याला उद्देशून ती महाऊर्जा म्हणते....

*वचन होते दिलेस तू मजला, ॥*
*नाही करणार रूदन तू माझ्या अंत्यविधीला ॥धृ॥*

*तुझ्यातून मी अन् माझ्यातून तू प्रकटलास ॥*
*समजावूनि घेण्या मर्म जीवनाचे ॥*
*मी कधी तू तर तू कधी मी झालास ॥*
*तळहाती आपण ठेवूनि आपुल्या रहस्याला ॥1॥*

*आलो आपण येथे माध्यमातून जीवाच्या ॥*
*दिल्या मी त्याला संवेदना अन् उर्मी प्रतिसादांच्या ॥*
*त्यातून केले निर्माण त्याने त्याच्या अस्तित्वाला ॥*
*तूच होता इथे या सर्व घटना साक्षीला ॥2॥*

*प्रतिबिंबित तू झालास माझ्यात मी होऊन ॥*
*झालास तू कर्ता-भोक्ता, मी साकार सगुण ॥*
*माझ्यातून निर्माण केले मी आकर्षणाला ॥*
*प्रकटविले द्वंद्व त्यास जुंपियले जीवाला ॥3॥*

*नाही इथे कुठेही पुरुषत्व आणि स्त्रीत्व ॥*
*माझ्याच भ्रांत रूपाने मला केले मी आकृष्ट ॥*
*हास्याचे ते उडाले फवारे जेंव्हा दाविले तुला ॥*
*की मीच होऊन कामेच्छा संभोगीले मीच मजला ॥4॥*

*उलगडविताना आपण हे जीवनाचे गौप्य ॥*
*कधी मी झाले इच्छा तर कधी झाले मी प्रारब्ध ॥*
*निव्वळ वस्तूंची उठाठेव, उर्जासंक्रमण अन् स्थित्यंतर ॥*
*जीवांनी दिला विपर्यस्त अर्थ उद्भवित जाणिवांना ॥5॥*

*अरे माझीच ही माया अन् माझीच रे मोहिनी ॥*
*तुझ्या सवेच फक्त ती आली रे माझ्याच स्वप्नी ॥*
*षड्रीपुंना पाजुनी इच्छावासनांची ऊर्जा ॥*
*मीच या भ्रांतीचा रे उठविला रंगधुराळा ॥6॥*

*तुला होते ठाऊक की मी मर्त्य तू अमर्त्य ॥*

*मी इथे अनिर्वचनीय अन् तू परम सत्य ॥*
*तू अनादीअनंत आणि मी विकारी सान्त ॥*
*म्हणून तू जाग रे दिल्या वचनाला ॥7॥*

*मला असे तुझी ओढ तू परमानंद संन्यस्त ॥*
*होता श्रीगुरुकृपा, माझ्यातून मी होईल रे तटस्थ ॥*
*अंगी माझ्या यावी ती योगियांची योग्यता ॥*
*मी तद्रूप होऊन करेन भ्रांतीची सु-सांगता ॥8॥*

# 83. परक्या जाणिवा

*जाणीवरूपी क्षेत्राचा राजा असे हा “मी” ॥*
*संवेदना अन् विचार नेहमी त्यास आक्रमी ॥धृ॥*

*वादळे अनेक इच्छांची, वृत्तींची अन् वासनांची ॥*
*हरवून बसलो जाणीव रे माझ्याच “मी” पणाची ॥1॥*

*बंदी त्या जाणिवांचा हे का न कळे मजला ॥*
*आपोआप उठती लाटा संवेदना अन् प्रतिसादांच्या ॥2॥*

*जाणिवांच्या कल्पित पंखांनी घेतली भरारी आकाशी ॥*
*कधी सुखावर तरंगे मी तर कधी खेचले दु:खाने खाली ॥3॥*

*देह अवघा झाला माध्यम त्या जाणिवांचे ॥*
*मनाने त्या जाणिवांवर इमले बांधले अर्थानर्थांचे ॥4॥*

*जाणिवांनी मांडला खेळ हा जाणिवांचा ॥*
*साक्षी मी त्याला असा हा जन्मोजन्मांतरीचा ॥5॥*

*माझ्याच जाणीवांनी खेळ भ्रमाचा मांडला ॥*
*केवळ एका विवेकाने वाचविले त्यातून मजला ॥6॥*

*जाणिवांची जाणीव कोण हा भोगतो ॥*
*मी असे चैतन्यरूप कोण येथे हा जगतो ॥7॥*

*विवेकाने दाविले अद्वैत-तत्त्व सर्वसाक्षी ॥*
*अनुभविले येथेच “अहं ब्रह्मास्मि” अन् “तत्त्वमसि” ॥8॥*

*वाटते आता परके राज्य ते जाणिवांचे ॥*
*ज्यांनी निर्मिले विश्व त्या आभासी सत्याचे ॥9॥*

*गरज त्या जाणिवांची उरली मला न आता ॥*

*ओळख पटली माझ्यातील निर्गुणतत्त्वाची मजला ॥10॥*

*आता जाणिवांनी त्यांचा खेळ हा आटोपला ॥*
*स्वस्वरूपानुभव हा झाला याची देही याची डोळा ॥11॥*

# 84. प्राणेश्वरा जगदीश्वरा

*प्राणेश्वरा जगदीश्वरा, आर्त मला न्या पैलतीरा ॥धृ॥*

*समष्टी तुम्ही महाप्राण असे ॥*
*व्यष्टी तुम्ही पंचप्राण वसे ॥*
*तुमच्यामुळे ही वाहे जीवनधारा ॥1॥*

*हठयोगी तव आठ आयाम असे ॥*
*तव आयाम हे योगाधार असे ॥*
*व्हावी नियंत्रित मम विचारधारा ॥2॥*

*स्वरूप तुमचे असे साक्षात निर्गुण ॥*
*निर्विकार, निरहंकार, निराकार, अनंत ॥*
*तव स्वरूपी विलय करा त्या अहंकारा ॥3॥*

*महाअधिपती तुम्ही सर्व जाणिवांचे ॥*
*तुमच्याविना इथे घाट मृत्यूचे ॥*
*विज्ञान, विवेक अन् प्रज्ञाधारा ॥4॥*

*महाभूतरूपी तुम्ही सगुण ते भासे ॥*
*परि निर्गुण ते असे प्रत्यक्षरूपाने ॥*
*हे ईश्वरीय सात्विकतेच्या साक्षीस्वरूपा ॥5॥*

*शुद्ध करूनिया सर्व मम नाड्या ॥*
*षटचक्रांना त्या पार करूनिया ॥*
*शिवशक्ती ती ऊर्ध्वगामी करा ॥6॥*

*ताटी उघडूनिया आकाशाची ॥*
*वाट मज दावा जी निर्गुणाची ॥*
*ब्रह्मस्वरूप होण्या... आता करा हो त्वरा ॥7॥*

# 85. गूढत्वाचे गूढ

इथे आत्ता आपण कोणीतरी आहोत आणि ब्रह्मांडाचा विचार करता कुणीच नाही या दोन टोकाच्या विचारातून जरा मोकळीक मिळावी म्हणून केलेला हा छोटासा प्रयत्न.

येथे काव्याची रचना करणारा “मी” नसून कोणीतरी आहे, ही या काव्याची खासियत आहे. भौतिक वास्तव हे मनरूपी आभासी सत्यतेच्या माध्यमातून अर्थरूप जाणिवेच्या कक्षेत येते म्हणून वास्तव हे आभासी सत्य आहे. मी, माझे आणि मला हे या शरीररूपी यंत्रामध्ये आपोआप निर्माण झाले असून ते सपशेल आभासी आहेत. जाणिवांची मालकी स्वत:कडे घेऊन ते आभासी जीवन जगतात. आपल्याला तसे जाणवत नाही कारण तो आभासच आपल्यासाठी प्रखर वास्तव आहे इतकी प्रचंड क्षमता त्या आभासी सत्यतेत आहे असे क्वांटम शास्त्रज्ञांना प्रखरपणे दिसून आलेले आहे.

साधक अहंकाराला भेदतात आणि शून्यत्व अनुभवतात. पुढे निर्गुणाचा प्रांत सुरू होतो. पण या तुर्यावस्थेत साधकाची स्वत:बद्दलची धारणा अनंतपट झाल्याने तेथे शून्यत्व भोगणारा कोणीही नसतो. मग प्रश्न असा पडतो, की या सगुणरूपी स्वप्नवत संसाराचे प्रकटीकरण कसे झाले. क्वांटम शास्त्र सांगते की शून्यत्वात सगुण साकार संसार क्षमतारूपाने अप्रकट असतो तो चैतन्याश्रित मनाच्या निरीक्षणातून प्रकट होतो. पण मग वेदांतात सांगितल्याप्रमाणे आपण निर्गुण ब्रह्माचे अंश असू तर त्या निर्गुणत्वाच्या अधिष्ठानावर हे स्वप्नवत सगुणत्व “मी” पणाने कसे साकार झाले आणि तसे झाले असले तरी ते निर्गुणत्व सगुण संसाराचे स्वप्न कसे पाहील. असे हे गूढत्व या विश्वात गूढपणे लपून राहिले आहे.

*आभास वास्तवाचे जे कधी अस्तित्वातच नव्हते ॥*
*अनेक जन्म त्यामागे आगतिक हे कोण धावे ॥धृ॥*

*हा स्व कोण कुठला जो जाणिवा घेऊन येतो ॥*
*एका बेसावध क्षणी तो कुणाला संभ्रमित करून जातो ॥1॥*

*स्व ने घ्यावी या रक्त-हाडामासाची मालकी ॥*
*अशी वासना अन् इच्छा सांगा विश्वात कशी उद्भवी ॥2॥*

*कोणाचा जन्म, कोणाचे जीवन, कोण हा मरतो ॥*
*मी, माझे अन् मला हा इथे आभासची जगतो अन् आभासची मरतो ॥3॥*

*सांगा सांगा या जाणिवांची मालकी हो कोणाची ॥*
*कोणी स्वीकारली गुलामी इथे या आभासी सत्यतेची ॥4॥*

*सत्व रज तम गुणावगुणांचा नुसताच हा कल्लोळ ॥*
*अविष्कार तयांचे निव्वळ निष्फळ निष्फळ ॥5॥*

*करूनिया अहंकारा शून्य शून्याला त्या कुणी भेदले ॥*
*एक तत्त्व निर्गुण पलीकडे, सगुण स्वप्न हे कुणी पाहिले ॥6॥*

*निर्गुणाला कसे दिसेल सांगा स्वप्न ते सगुणांचे ॥*
*नेती नेती असे हे सर्व गूढत्वातून गूढची निपजे ॥7॥*

# 86. बुद्ध्याविष्कार

*घे मूठभर माती अन् आंब्याचा त्यातून काढावा स्वाद, ॥*
*अशी नाही रचना निसर्गाची सार्वभौमत्व त्याचे निर्विवाद. ॥धृ॥*

*घे मूठभर माती अन् गुलाबाचा त्यातून काढावा सुगंध, ॥*
*जमणार नाही तुला मानवा नको होऊस अंदाधुंद. ॥1॥*

*घे कितीही पाणी, हवा अन् असंख्य पदार्थ, ॥*
*रक्त निर्माण होते केवळ शरीरात ते अन्नरसाचा अर्क. ॥2॥*

*कोण कुठले अवकाश असे जे असे निव्वळ पोकळीस्त, ॥*
*कुणाची ही संकल्पना जे पसरले सूक्ष्मपासून अनंतापर्यंत. ॥3॥*

*कोण कुठले बळ ते गुरुत्वाचे त्याला ना आदी ना अंत, ॥*
*अवकाशात लटकती अजस्त्र ग्रहतारे परी आहे ते दिगंत. ॥4॥*

*अनंत बुद्धिमत्ता या विश्वाची विलसत आहे युगांतरी, ॥*
*जेथे हा बुद्ध्याविष्कार तेथे नतमस्तक होऊ आतातरी. ॥5॥*

# 87. मार्दवता शोधतो मी

*परी न मजला ठावे का मार्दवता शोधतो ती ॥*
*मार्दवता शोधतो मी मार्दवता शोधतो मी ॥धृ॥*

*मला न का ठावे मार्दवता ती आईच्या वात्सल्यात ॥*
*मला न का ठावे मार्दवता ती बाबांच्या त्या स्पर्शात ॥1॥*

*मला न का ठावे मार्दवता ती गुरूवचनात ॥*
*मला न का ठावे मार्दवता ती बंधुमित्रांच्या स्वागतात ॥2॥*

*मला न का ठावे मार्दवता ती माझ्याच प्रार्थनेत ॥*
*मला न का ठावे मार्दवता ती संतवचनात ॥3॥*

*सांगा कधी वादळाच्या ठायी मजला गवसेल का ती ॥*
*सांगा सूर्याच्या दाहात मजला कधी सापडेल का ती ॥4॥*

*प्रपातात त्या पहाडावरच्या कशी मजला दिसेल ती ॥*
*दगडमातीच्या भूमीमध्ये कोठे मजला मिळेल ती ॥5॥*

*पोकळ अदृश्य अवकाशात त्या कुठेच रे नसणार ती ॥*
*कधी देईल मला ते विश्व कणाकणांतून साक्ष तिची ॥6॥*

*साधू भेटला एक मजला त्याला पुसले असता मी ॥*
*तो सांगता झाला साध वेध तू माझिया दिव्य वचनी ॥7॥*

*जाता वादळ तेथून आता मार्दवता ती अशी प्रकटे ॥*
*बघ घाबरलेल्या पाडसाला ती गाय जिव्हाळी कसे ॥8॥*

*सूर्याच्या दाहामध्ये तहानलेला बघ तो जीव ॥*
*अनोळखीच्या हृदयातून आले बघ मार्दवतारूपी नीर ॥9॥*

*प्रपातातून जल खाली येता जन्म जाहला सरितेचा ॥*

*अरे मार्दवता सिंचून ती अवघी, जीवन देते अगणित जीवा ॥10॥*

*भूमीमधून मार्दव ते उगवे पाहा फूलांचा सदाबहार ॥*
*अवकाशाचे माध्यम तेथे होतो मार्दवतेचा स्वरविहार ॥11॥*

*मार्दवता ती लपून राहे कारणात पंचतत्वांच्या ॥*
*परिणामांच्या दृश्य रूपाने जाणून घे रे सत्वरी तिजला ॥12॥*

# 88. कलियुगाचे नाव

*कलियुगाचे नाव दुसरे अहंकार ॥*
*जो होतसे बाधित त्याचे मन भ्रमाकार ॥धृ॥*

*हा अहंभाव इतुका पातळ ॥*
*जैसे समोर असोनि दिसे ना मुसळ ॥1॥*

*साधुसंतांनाही याने केले हैराण कित्येक ॥*
*मरणांतिही ना सोडे तो बाकी जीवांस प्रत्येक ॥2॥*

*जो जाणी कैसे उपजे हा अहंभाव ॥*
*त्याचे बखोटी बैसतो ऐसा की त्याला नसे ठाव ॥3॥*

*जरी केले धर्माचरण अर्थासह वेदपठण ॥*
*परि दृष्टीत द्वैतभाव तिथे अढळ अहं स्थान ॥4॥*

*तिथे पाहिजे जातीचा ॥*
*अवतार परब्रह्माचा ॥5॥*

*ऐसा भेटता सद्गुरू अद्वैताकार ॥*
*त्या शिष्यास ना कधी बाधती अहंकार ॥6॥*

*अहंभावावर मिळविता विजय ॥*
*होई कलियुगाचा साधकाप्रती लय ॥7॥*

*परि साधकास हवी कळकळ इतुकी ॥*
*जिवंतपणी त्याने जाळावी द्वैत बुद्धीमती ॥8॥*

*अहंभाव असे एक महाशक्ती ॥*
*संत म्हणती करा अनन्यभावे ईशभक्ती ॥9॥*

*ऐसा भक्तियोग साधता सर्वोच्च ॥*
*कोण तिथे मग उरे होण्या अहंभावमुक्त ॥10॥*

# 89. मी

कशाच्या तरी पार्श्वभूमीवर आपल्याला मनामधील विविध भाव जाणवत असतात. ती पार्श्वभूमी किती अलौकिक आहे ते सांगणारी ही रचना.

*मी अनादी म्हणून विखंडता ॥*
*मी पूर्ण आहे म्हणून अपूर्णता ॥1॥*

*मी अनंत आहे म्हणून मर्यादा ॥*
*मी सदानंद आहे म्हणून सुखदुःखे ॥2॥*

*मी प्रशांत आहे म्हणून तृष्णेचे भय ॥*
*मी निवृत्त आहे म्हणून वृत्तीप्रवृत्तींचा खेळ ॥3॥*

*मी निर्गुण आहे म्हणून गुणांचा कल्लोळ ॥*
*मी निराकार म्हणून आकारबद्ध जाणिवा ॥4॥*

*मी निर्विकार म्हणून विकारदर्शन ॥*
*मी निरहंकार म्हणून अहंभावाचे साम्राज्य ॥5॥*

*मी अद्वय म्हणून द्वंद्वाचे थैमान ॥*
*मी अनिर्वचनीय म्हणून मी आहे अन् मी नाही ॥6॥*

*जाणिवेच्या कक्षेत येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला प्रकाशित करणारा निर्गुण मी ॥*
*जाणिवांमध्ये गुंतून जाणिवांचे मोजमाप करणारा तो अहंभावित सगुण मी ॥7॥*

*मी निर्माण झाला तो मी अस्तित्वात नाही हे समजून घेण्यासाठी ॥*
*अपूर्णत्व निर्माण झाले आपल्यातले पूर्णत्व समजून घेण्यासाठी ॥8॥*

*अहं निर्माण झाले आपल्यातले निरहंकारत्व समजून घेण्यासाठी ॥*
*आकार निर्माण झाले आपल्यातले निरहंकारत्व समजून घेण्यासाठी ॥9॥*

*गुण निर्माण झाले आपल्यातले निर्गुणत्व समजून घेण्यासाठी ॥*

*मुक्ती निर्माण झाली आपल्यातले बंध समजून घेण्यासाठी ॥10॥*

*आहे निर्माण झाला शून्याच्या पलीकडे जाण्यासाठी ॥*
*अनंत निर्माण झाले आपल्यातल्या मर्यादा समजण्यासाठी ॥11॥*

# 90. मैं ना मालिक कहलावू रे

*सर्वव्याप्त जो आकाश वह लिप्त न होय किसीसे ॥*
*सदा रहे निर्गुण और जांई अनंत ही के परे ॥धृ॥*

*मै तो हुं अवगुण की खांई जहां जांऊ परिणाम जो पांवू ॥*
*ना मै समाऊं मेरा मुझमे तो खुदको मालिक क्यूं कहलावू ॥1॥*

*निराकार वो वायू सर्वत्र सदा बहता ही रहे ॥*
*प्राण देई सब जीव को जो है अमूल्य ही से परे ॥*
*सूक्ष्मता मैं कैसे जानू जो प्राण हाथ ना आवे ॥*
*मै क्यूं कहलावू मालिक खुदको जिसका प्राण पराई होवे ॥2॥*

*दाह को लेके साथ ही अपने ब्रह्मांड मे रहता हैं ॥*
*प्रकाशसहीत उष्मा जिससे निर्माण प्रकृती का होता हैं ॥*
*भूख प्यास सब उसकी माया अगन कुंड मे दिखता हैं ॥*
*जिसको सके ना हाथ लगाऊं वो होगा मेरा कैसा रे ॥3॥*
*शीतलता निर्माण जहा से वह जल कहलावे ॥*
*सदा वहन से धरती पर ये अगणित फसल उगावे ॥*
*तृप्ती का रूप हैं ये हर प्राणी की प्यास बुझाए ॥*
*नही हैं कोई उसका मालिक जहां जीव ही खुद प्यासा रहे ॥4॥*

*धरती सबका आधार जो अपनी माता ही कहलावे ॥*
*साथ अन्न का भांडार और उसमे रत्न कई छुपे है ॥*
*सहनशीलता जिसका तत्त्व निर्माण हुई सृष्टी उसी से ॥*
*मैं कैसे उसका मालिक जो खुद मेरा आधार हुई हैं ॥5॥*

*इस पंचतत्त्व की यह बनी हैं काया ॥*
*कार्य करे इंद्रीयोंसे यह माया ॥*
*पंचकोष से प्रकटे जीवन उस में ॥*

*इस जीवन का मालिक मैं कैसे कहलावू रे ॥6॥*

*ऐसे अगणित जीव जो संवेदीत रहे सदा ॥*
*मन माया का रूप हैं उसने सबका मैं बनाया ॥*
*एहसास से प्रतिसाद तक जाके अगणित क्षमता हैं उसमे ॥*
*जानना जिसका काम हैं उसका मालिक कहलावू मैं कैसे ॥7॥*

*मैं ना किसी का मालिक अब और हुं ना किसी का बंदा ॥*
*तेरा ही तू जाने भगवन कैसी प्रकट हुई ये माया ॥*
*अब जाके देखू इस माया को मैं तेरी ही नजर से ॥*
*कणकण में तु हैं निर्गुण अब मैं मेरा ना होई रे ॥8॥*

# 91. रंग नको टाकूस

श्रीकृष्ण गोपींच्या अंगावर रंग टाकतो आणि रंगपंचमी खेळतो. या गोपी म्हणजे मायेचेच स्वरूप आहे असे मानले, तर माया आता श्रीकृष्णाला काय म्हणते, ते येथे काव्याच्या स्वरूपात मांडले आहे.

*रंग नको टाकुस बेभान झाले मी मनमोहना ॥*
*थांब रे थांब आता मीच मला विसरले कन्हैया ॥धृ॥*

*नेसले होते मी शुभ्र वस्त्र निर्गुण निरंकाराचे ॥*
*तुझ्यात होते समर्पित ते गात गाणे परमानंदाचे ॥*
*तू मांडीयला खेळ रंगांचा रे तुझ्या मनोरंजना ॥1॥*

*तू पंचतत्त्वे मिसळली विश्वशक्तीरूपी जळात ॥*
*साकार केलेस त्रिगुण तू त्या अनेक रंगछटांत ॥*
*मुरलीच्या स्वरांनी त्या तू धुंद केलेस मजला ॥2॥*

*बेधुंद त्या अवस्थेत रे मीच मला ते प्रसाविते ॥*
*निर्मुनि जीव असंख्य त्यांच्यातूनि भावरंग खेळते ॥*
*मी ही टाकिला रंग तुझ्यावर त्या सृजनशीलतेचा ॥3॥*

*तू परम चपळ कधी होतसे दृश्य कधी अदृश्य ॥*
*मी भ्रांत झाले रे त्या असंख्य द्वैतांच्या रंगात ॥*
*विरहिणी तुझी मी झाले रे माझ्या गोविंद गोपाला ॥4॥*

*तव रंग हे सगुणांचे मी घालवू कसे रे ॥*
*मज लाज वाटे फार येऊ पुढे कशी रे ॥*
*तू गुरुयोगी म्हणून यावा हे द्वैतरंग घालविण्या ॥5॥*

*मी आले तव शरण दमले रे या रंगात रंगून ॥*
*तुझे स्मित पाहते मी शून्याच्या पडद्यामागून ॥*

*दे वरदान साधनशक्तीचे हे भवडाग धुवून टाकावया ॥6॥*

*तुझी लीला अपरंपार रे माझ्या हृदयनाथा ॥*
*तूच धुतले मम मायारंग पावले स्वस्वरूपाला ॥*
*घे मम हात हाती ओलांडावया शून्याचा उंबरा ॥7॥*

# 92. कसा साधावा परमार्थ

*सगुण ते आम्ही बाधलो द्वैताने ॥*
*द्वंद्वाशिवाय येथे संसार सांगा कोठे ॥धृ॥*

*काया मन बुद्धीला ना कळे अद्वैत ॥*
*भ्रमिष्ट ते झाले सर्व त्यांच्याच हो विश्वात ॥1॥*

*ऐसा आम्हा शाप असे देवा या द्वैताचा ॥*
*ना चुके त्यामुळे हा फेरा जन्ममरणाचा ॥*
*मायेचे भवारण्य निबिड ते फार असे ॥*
*गुरुविना इथे परमार्थ वाट ना मज दिसे ॥2॥*

*किती केले येथे ग्रंथांचे वाचन ॥*
*किती साधले येथे श्वासांचे अनुसंधान ॥*
*किती ती सर्वत्र फिरलो तीर्थे अनेक ॥*
*परि न जमला जीवनी परमार्थ तो एक ॥3॥*

*राहुनि जीवे संसारी साधावा तो परमार्थ ॥*
*सांगती साधुसंत परि कैसे करावे ते सार्थ ॥*
*चंचल ती चालती भ्रांत बुद्धीची पावले ॥*
*संसार तो वाटेमध्ये जशी केळीची साले ॥4॥*

*कैसे जाणावे आम्ही हे तत्त्व तुझे अद्वैत ॥*
*जे असे केवळ द्वैताच्या गूढ गर्भात ॥*
*अस्थिर ती बुद्धी, कैसे व्हावे अभ्रांत ॥*
*गुणदोष कसे जातील गुणदोषांना भेदून ॥5॥*

*साक्षात मूलतत्त्व ते देवा असे तुझे निर्गुण ॥*
*त्यावरी तू घातले अष्टसात्त्विक आवरण ॥*

*ऐसे जयाचे असे अद्भूत अवतार स्वरूप ॥*
*त्या श्रीगुरूतत्त्वकृपे येथे मिळावा हो उश्याप ॥6॥*

*द्या हो आता वरदान घट्ट त्या नामाचे ॥*
*जाऊ तरून संसार प्राशुनिया तव नामामृत ते ॥*
*द्या हो आता वरदान अश्रुंच्या वर्षावाचे ॥*
*जातील धुवून दोष ते व्याकूळलेल्या मनाचे ॥7॥*

*आता व्हावा संसार जैसी तुझीच रे सेवा ॥*
*अबाधित व्हावे द्वैत, जाणले जावे अद्वैता ॥*
*व्हावी ऐसी कृपा मजवरी श्रीगुरुदेवा ॥*
*त्रिगुणाचिया खुणे तू दाखवी निर्गुणा ॥8॥*

*अमृतानुभवी आता देवा अर्थामृत ते पिऊ ॥*
*निर्गुणाच्या साक्षी गुणातीत ते होऊन राहू ॥*
*तुझिया कृपे गुरुदेवा मरण न ते आता यावे ॥*
*आत्मभान ते माझे आत्मानंदी अनंत व्हावे ॥9॥*

# 93. स्वप्न आणि त्याची शक्ती

मूळ विश्व हे परम तत्त्वातून प्रसविले गेले आहे. आपण सगुण साकार आहोत तर परम तत्त्व निर्गुण निराकार आहे. निर्गुणातून सगुणत्व साकार होणे कदापीही शक्य नाही. पण आपल्या जाणीवेमध्ये तेच वास्तव म्हणून इतक्या प्रखरतेने येते की सगुणत्व आपण नाकारू शकत नाही. म्हणून वेदांत या अवघ्या सृष्टीला स्वप्नाची उपमा देतात. जेथे जेथे बुद्धीतत्त्व जाईल त्यापुढे ऊर्जा चैतन्य तत्त्व त्याआधी पोहोचलेले असते हे आत्यंतिक रहस्यमय आहे. अन्यथा आपल्याला या विश्वाचे आकलनच झाले नसते. ऊर्जा शक्ती ही निर्गुण आहे. उर्जेचा वापर करताना तिचा उपयोग कुठे केला जातो हे तिला कळत नाही. जसे वीज घरात येऊन प्रकाश देते का रस्त्यावर प्रकाश देते हे त्या विजेला समजत नाही. तिच्या केवळ असण्यामुळे सगुणत्वाचा आभास निर्माण होतो. परम तत्त्वाचा प्रकाश हा निर्गुण आहे, पण त्याच्या असण्याने सगुण जाणिवेच्या कक्षेत येते.

*जैसे मन:पटली उमटे दृश्य ॥*
*तैसे निर्गुणामाजी वसे शून्य ॥धृ॥*

*प्रकटे ओमकार ध्वनी तिथे एक ॥*
*शून्यातून उपजे तत्त्व ते सगुण ॥1॥*

*ते निर्गुण अपरिमित अनंत अपार ॥*
*सगुणातुनी पसरे त्याचे चैतन्य आरपार ॥2॥*

*निर्गुणामध्ये त्या सगुण ते ऐसे दाटे ॥*
*जणू निर्गुणची पाही स्वप्न तिथे जे प्रकटे ॥3॥*

*निर्गुण चैतन्य ऐसे भोगिले सगुणाने ॥*
*जैसे कर्तृत्त्वाचे शिखर गाठले अज्ञानाने ॥4॥*

*पाहा पाहा तो स्वप्नात जाणिवांचा कल्लोळ ॥*
*नसता चैतन्य तेथे सगुणत्व होई निष्फळ ॥5॥*

*सगुणातूनी पातल्या त्या क्षमता असंख्य ॥*
*स्वीकारले त्याने वैश्विक नियमांचे दास्य ॥6॥*

*असूनही स्वप्न हे ऐसे, असे ते बलवान ॥*
*वास्तवाच्या भासापुढे सगुण तुकवी मान ॥7॥*

*या स्वप्नी ते सगुणत्व शक्ती अनंत पाही ॥*
*ओलांडे ते निर्गुण चैतन्य त्या अनंतालाही ॥8॥*

*ऐसे हे निर्गुण चैतन्य अपरंपार अगम्य ॥*
*सत्यालाही प्रकटवी ते होऊन परम सत्य ॥9॥*

# 94. आपके लिये

*मुस्कुराती हुई जिंदगीसे पुछा क्या दिया तू ने उनको ॥*
*काय दिलेस तू त्यांना मी विचारले जीवनधारेला ॥धृ॥*
*वह बोली एक निहायत उमदा तोहफा मिला है उनको ॥*
*म्हणाली ती एक अत्यंत मौल्यवान भेट प्राप्त झाली त्यांना ॥1॥*
*खुलता है आपके लिये सहारे कायनात के यह अफ़्जाइश-ए-नसल ॥*
*पार्श्वभूमीवर विश्वाच्या बघ खुलतो निसर्ग हा ॥*
*पहाडोंकें कन्धोंसे बहते हैं कितने ये सफेद अब्शर ॥*
*खांद्यावरून पहाडांच्या वाहती अनेक शुभ्र सरिता ॥2॥*
*खुशबुभरे फुलोंसे बहती हवा को मिली एक नई हस्ती ॥*
*सुगंधाने फुलांच्या मिळाले वायूला अस्तित्व ॥*
*बहते हुये नहेरोंने ठंडे, बुझा दी प्यास उनके दो तर्फोंकी ॥*
*वाहत्या निर्झर जलाने त्याचे काठ झाले तृप्त ॥3॥*
*मुनाकीस किया आसमान को काहील-ए-झील के पानी ने ॥*
*शांत जलाने सरोवराच्या दाविले आकाशास स्वस्वरूप ॥*
*दिया नजारा कुदरत ने आपको वादियों में तक्सीम होके ॥*
*निसर्गाने दिला नजराणा तुला तो सर्वत्र आला फुलून ॥4॥*
*दिया वजूद आपको आप के मुकद्दस बुजुर्गोंने ॥*
*दिले स्वत्व तुजला तुझ्या पूज्य पूर्वजांनी ॥*
*भर दी जिंदगी आपकी शाउरसे खुदा की खुदाईने ॥*
*देवाने भरले आयुष्य तुझे चैतन्यरूप जाणिवांनी ॥5॥*
*बहार आने दे ये जिंदगी उनके लिये उस कादीर-ए-हद तक ॥*
*आयुष्य हे बहरणार आहे तुझ्यासाठी ते चिरंतन ॥*
*ए दोस्त हो जाये आपकी जिंदगी सदा रोशन रोशन ॥*
*प्रकाशमय आयुष्याने उजळू दे तुझे हे जीवन ॥6॥*

# 95. स्वप्न कसे पाहिले

*स्वप्न कसे पाहिले ग तू माये ॥*
*निर्गुणातूनि तू सगुणत्व ते प्रसविले ॥धृ॥*

*कसे राहतील एकत्र अनंत अन् सान्त ॥*
*सूक्ष्मातूनि येथे स्थूल विश्व कसे प्रसविले ॥1॥*

*शून्य अवकाशात हे पुंज अदृश्य क्षमतांचे ॥*
*त्यातूनि स्थूलसूक्ष्म विश्व ते कसे पातले ॥2॥*

*प्रसविले ग तू माये स्वत्व तू कसे प्रसविले ॥*
*निर्मूनिया जाणीवक्षेत्रे स्वत: जीवे कोंडियले ॥3॥*

*जाणिवांतून त्या तू जाणिवांना प्रसविले ॥*
*ऐसी तव लीला गूढ अगाध ती असे ॥4॥*

*अद्वैताची साम्राज्ञी तू द्वैत कसे प्रकटविले ॥*
*श्रुती श्रमली इथे तू अनिर्वचनीय सदा असे ॥5॥*

*असंख्य भोगांनी तू स्वत्व ऐसे भोगे वाटे ॥*
*परि सदा त्रुप्तीच्या पल्याड तू अनादी अनंत असे ॥6॥*

*अमर्याद तृष्णेतूनि तव निरोप मजला मिळे ॥*
*आभासी हे सत्य तव निव्वळ ती माया असे ॥7॥*

*अदृश्य मन माझे अनुभाव्य ते कसे अनुभवे ॥*
*अशक्य इथे त्या दोघांचे ते एकत्र कधी येणे ॥8॥*

*दृश्य शरीरामध्ये अदृश्य ग मन ते कसे ॥*
*जाणिवा त्यातील तिथल्या भ्रांतविश्व असे त्यांचे ॥9॥*

*जाणिवा न त्या कोणत्या ग माझ्या असे ॥*

*भ्रांत करण्या मम मालकीचा तो भाव दिसे ॥10॥*

*अकर्ता अकर्मी आत्मतत्त्व ते विलसे ॥*
*ब्रह्मतेजी तू हे स्वप्न तुझे पाहतसे ॥11॥*

*अशी तू ना भोक्ती ना तू कधी कर्ती असे ॥*
*स्वप्नांची ती रास तव जीवनानुभव इथले ॥12॥*

*अष्टसात्त्विक गुरुमूर्ती भेटता मज तव कृपे ॥*
*माझ्यामध्ये तू तुजला तेंव्हा प्रसवशील गे माये ॥13॥*

*स्वस्वरूपानुभवी पुन्हा मी जाईन त्या सुयोगे ॥*
*निर्गुण ते तत्त्व मी होऊन राहील स्वच्छंदे ॥14॥*

# 96. दीपोत्सव

*सर्व काही कळत असूनही दुर्लक्ष करण्याची वृत्ती प्रकाशित करतो*
*तर काहीही कळले नाही तरी सर्व कळल्याचा आणलेला खोटा आवही*
*प्रकाशित करतो. ॥1॥*

*मुद्दाम दुष्कृत्य करण्याच्या वृत्तीसह*
*सत्कर्मातील कर्तेपण व भोक्तेपणाचा त्यागही प्रकाशित करतो. ॥2॥*

*विनय, चारित्र्य शीलता, नितीमत्तेसह*
*उद्दामपणा, भ्रष्ट आचार व अनितीही प्रकाशित करतो. ॥3॥*

*दारि, दुःख, अज्ञान, अंधकारासह*
*समृद्धी, सुख, ज्ञान व प्रकाशालाही प्रकाशित करतो. ॥4॥*

*शांततेची शांती प्रकाशित करतो तर अशांततेची वेदनाही प्रकाशित करतो.*
*चांगले व वाईट यांच्या व्याख्या प्रकाशित करतो तर ॥5॥*

*त्या समजूनही त्याच्या उलट वागण्याचा मार्गही प्रकाशित करतो.*
*लाचारी, परावलंबित्व यांच्याबरोबर स्वावलंबित्वही प्रकाशित करतो. ॥6॥*

*देव, देश, अन् धर्मासह दानव, द्रोह व अधर्मही प्रकाशित करतो.*
*सर्व क्षणभंगूर आहे हे कळत असूनही मायेतील गुंतणे प्रकाशित करतो. ॥7॥*

*सर्व येथेच ठेवून जायचे आहे हे कळत असूनही,*
*हव्यासासह संन्याशाच्या त्यागालाही प्रकाशित करतो. ॥8॥*

*एक दिपोत्सव आपल्या अंतर्मनात युगानुयुगे सुरू आहे.*
*त्याला जाणून घ्यायचे जीवनाचे उद्दिष्ट क्षणाक्षणाला प्रकाशित करण्याचा*
*प्रकाशोत्सव म्हणजेच दिपोत्सव. ॥9॥*

# 97. अनिर्वचनीयतेच्या पलीकडे

*येथे निर्माण झाली अगणित कारणे कारणांशिवाय, ॥*
*त्यातून दिसले परिणाम कोणत्याही परिणामांशिवाय, ॥धृ॥*

*येथे अद्वैतातून प्रसाविते आहे द्वैत ते सर्वत्र, ॥*
*येथे वास्तव आहे अ-वास्तव आणि भासही केवळ आभासमात्र, ॥1॥*

*येथे जाणिवेतून संक्रमित झाला जाणिवांचा जाणता, ॥*
*कोण हा "मी" जो जीवन जगतो आहे हे सर्व अजाणता, ॥2॥*

*येथे जणू जीवन जगते जाणीव स्वतःहून, ॥*
*विसावा तिचा नेणीवेत असे, नसे काही वेगळे तेथे त्या मृत्यूहून, ॥3॥*

*जे काही नाही व जे काही आहे ते कधीच नव्हते येथे, ॥*
*गूढत्व आणि अनिर्वचनीयतेलासुद्धा शब्दांची वानवा तेथे, ॥4॥*

*हे सर्व जे वाटते ते एका क्षणी आहे वास्तव आणि एका क्षणी आभासी, ॥*
*कोठून मी आणू ते नवशब्दभांडार वर्णाविया त्या विश्वलीलेसी, ॥5॥*

*अखेर येथे विज्ञानही थकले अध्यात्म होऊन, ॥*
*"कोणती सत्यता परम" या प्रश्नाने ते गेले भांबावून, ॥6॥*

*परम उर्जारूपी श्रीगुरूंची करुणा अपार, तेथेच होतसे हा दृष्टांत, ॥*
*एक परम सत्य चैतन्य तेथे विलसे जेंव्हा होतसे द्वंद्वाचा अंत ॥7॥*

# 98. हे कवीमना

*लपून आहे रे स्त्रोत कवितेचा तुझ्या उत्स्फूर्ततेमध्ये... ॥*
*रांगोळी तू घालीशी सुंदर त्या शब्दांच्या ठिपक्यांमध्ये... ॥धृ॥*

*दे झोकून रे स्वतःला प्रतिभेच्या त्या प्रांगणात ॥*
*गवसेल तुला आनंद तेथे खोलवर त्या अंतर्मनात... ॥1॥*

*जाणकार आहेत इथे शोधण्या कवी तो तुझ्यामध्ये ॥*
*तू नच ठेव भीडभाड त्या समाजाची मनामध्ये... ॥2॥*

*सूर्याच्या तापातून त्या शीतलतेला जन्मू दे... ॥*
*सागराच्या सीमेला त्या असीम होऊन जाऊ दे... ॥3॥*

*वादळाची अस्ताव्यस्तता मिसळू दे ती शांततेत... ॥*
*धरणीकंप तो शोषून घे तुझ्याच रे मनोकंपात... ॥4॥*

*आकाशाची अवघी पोकळी तव स्वरांनी भरू दे... ॥*
*विश्वालाही त्याचे स्वस्वरूप नव्याने ते कळू दे... ॥5॥*

*आईलाही कळू दे ममता मुलायम तव शब्दांतून... ॥*
*बाबांच्या छत्राला मिळू दे आधार तुझ्या त्या काव्यातून... ॥6॥*

*भावाबहिणीच्या प्रेमाला दे सोनकिनार तव प्रतिभेची... ॥*
*प्रियकराने द्यावी रे साथ घेऊन शपथ तुझ्या काव्यांची... ॥7॥*

*देवालाही अर्पिन मी माला तव शब्दसुमनांची... ॥*
*मार्दव शब्द तुझे ते देतील साक्ष माझ्या भक्तीची ॥8॥*

*घे हे व्रत तू भेदण्या रहस्य त्या रे अवघ्या विश्वाचे... ॥*
*विश्वानेच दिधले काव्यशस्त्र तुज त्याच्या दिव्य प्रतिभेचे... ॥9॥*

# 99. तृष्णा

*पाण्याविना माठ त्यास माठ म्हणू नये ॥*
*प्राणाविना शरीर त्यास जीव म्हणू नये ॥धृ॥*

*माठ अन् शरीरे दोघे मृत्तिकेसमान ॥*
*पाणी आणि प्राण ते जीवनाधार ॥1॥*

*आग ओकति सूर्य जीव तृष्णार्त हा झाला... ॥*
*जल शितळ मिळे माठामुळे त्या जीवाला... ॥2॥*

*विठ्ठल ना भेटी तिथे तृष्णा विरहाची ॥*
*अनुसंधान श्वासांचे नित्य देव येती भेटी ॥3॥*

*जर ओळखले त्यांचे आगळे हे महत्व ॥*
*जैसी माठाची महती तैसे शरीर अमोलिक ॥4॥*

*मृत्तिकेसमान असती जरी ती दोघे ॥*
*तृष्णा शमविण्या... ते विश्व ऐसे प्रकटे ॥5॥*

# 100. मृत्युदान

*नीर नयनातून वाहे... ॥*
*वृद्ध मनात आर्त जागे ॥धृ॥*

*केस सर्व ते धवल जाहले ॥*
*बोलणे ते अतीव क्षीणले ॥1॥*

*गळून गेली ही सर्व गात्रे ॥*
*शरीर संपूर्ण कृश ते झाले ॥2॥*

*निद्रा नसे ती डोळ्यांमध्ये ॥*
*नजर अस्थिर सदा भिरभिरे ॥3॥*

*षड्रिपुंना ती स्मृती जागवे ॥*
*आवेग येती इच्छा वासनांचे ॥4॥*

*भूतकाळ सदा हसवे रडवे ॥*
*भ्रांतीने जणू ते वेड लागले ॥5॥*

*आसक्तीने मन थरकापे ॥*
*कंठ कोरडा भय तृष्णेने ॥6॥*

*आक्रंदन ते पश्चात्तापे ॥*
*असाहाय्य नित नित ते वाटे ॥7॥*

*आप्तेष्टांनी सोडीले एकले ॥*
*विश्वानेही मजला त्यजिले ॥8॥*

*जोडीदार अति अंधुक तो दिसे ॥*
*त्याचेही शरीर ते थकले ॥9॥*

*आता एकच आशा ती राहे ॥*

*माझी अवस्था प्रभू तू जाणे ॥10॥*

*दाता व्हावे तुझे सत्वर येणे ॥*
*क्षमा मागतो मृत्युदान ते द्यावे ॥11॥*

# 101. Universe And Me

*From a sperm to a handful of ash at death...*
*Shouldn't I take this opportunity as being extremely fortunate?*

*Isn't it my right to be always happy and healthy?*
*So I am always indebted to the God and everybody...*

*What did I bring here and what will I carry?*
*That I should understand very carefully...*

*Who am I that always spell the "what's next" urge...*
*Isn't it an abstract expression of our universe?*

*Who will be cremated?... I or Me..*
*I will not but the body as Me..*

*Isn't it our journey of being spiritual?*
*That shall be experienced by the Self of every Individual...*

*Let's extract us from the dialectical reality*
*and cross the sky high verge...*

*To Awaken the Self in the Eternity,*
*is the aim of our universe.*

# 102. The Mystery Of This Self-Realization

*When I use "I" for my self-introduction,*
*Entire universe sees in it my God's reflection.*

*When I interact with every person,*
*With an ornament of respect; I adorn that relation.*

*I wonder how sweet my speech is,*
*Everyone says it's like a melodious breeze.*

*I always see the miracles happening,*
*Where a gentle touch of mine creates a feel of caring.*

*Wherever my sight goes; I see the glimpses of divineness,*
*And my "Self" is evolving from the universal holiness.*

*Wherever I go; everybody is feeling safety,*
*Not only me but they see my shadow with full of sympathy.*

*God unveiled in me the mystery of this self-realization,*
*When I saw my tears sparkling with full of HIS reflection…*

# 103. I am the space

*I am the space, I am the space*
*Wherein the world changes at its own pace*

*I am the space...I am the space*
*Prevails in and out of the universe that's my God's grace*

*I am the space...I am the space*
*Let they move with good n bad, I am aloof as HIS blest ace.*

*I am the space...I am the space*
*A complete source of universal consciousness*

*I am the space...I am the space*
*I accommodate all as my God's mace.*

*I am the space...I am the space*
*I am not any being that born and dies.*

# 104. जे जे भेटे भूत

*ते ते मानिजे भगवंत ॥*
*ऐसे सांगूनि गेले ते तुकोबा संत ॥धृ॥*

*देखिता पुरुष तत्त्व ते नारायण पाहती ॥*
*देखिता स्त्री तत्त्व ते दिसे भगवती ॥*
*सर्वांभूती ते परब्रह्म वसती ॥1॥*

*परि समाज नियम पाळतो वास्तवी ॥*
*आमुचे मूळ स्वरूप ते झाकूनी ॥*
*आलो आम्ही अध्यात्म देशीचे रहिवासी ॥2॥*

*इथे रमलो तुमच्या मुक्कामी ॥*
*आहोत तुमच्या कृपेचे अभिलाषी ॥*
*घेतो दर्शन तुमच्यातून ते ईश्वरी ॥3॥*

*आम्ही तुमचे सेवेकरी ॥*
*तयार करतो शब्दांची शिदोरी ॥4॥*

*त्यात चटणी भक्तीची ॥*
*आणि श्रेयसाची भाकरी ॥5॥*

*तुम्हा पाणी देतो अद्वैताचे ॥*
*भरवितो तांबूल संत उपदेशांचे ॥6॥*

*चला चला हो आमुच्या सवे ॥*
*ते उतरु घाट अध्यात्माचे ॥7॥*

*मग दिसेल आमुचा गाव ॥*
*शून्य असे हो त्याचे नाव ॥8॥*

*सात्त्विकतेचे ते रस्ते अन् ॥*
*इमले साक्षात निर्गुण भाव ॥9॥*

*तेथे भेटविन त्या योग्यांशी ॥*
*भेदती ते चक्र लक्ष चौऱ्याऐंशी ॥10॥*

*दावतील स्वस्वरूप तुम्हा तुमचे*
*मिटतील सर्व भेद तुमचे आमुचे ॥11॥*

# 105. सप्तपदी

*सुमंगल सुमुहूर्त सौभाग्याचा सुयोगे तो हा आला ॥*
*चला गाऊ या गं सुस्वरे सप्तपदी ती गाऊ या ॥धृ॥*

*प्रथम पदी त्या नववधूने अशी लांघिली ती श्रद्धा, ॥*
*निष्ठा ठेवली श्रीगुरुपदी त्या भक्ती तिची ही अनन्या ॥1॥*

*द्वितीय पदी नववधू जीवात्मा ओलांडिती त्या वैराग्या, ॥*
*योग साधला तिने त्या सर्व इंद्रियांना दमुनिया ॥2॥*

*तृतीय पदी त्या नववधूने श्वास नामी गुंतविला, ॥*
*पावित्र्याचा ओघ तो तिच्या तनमनातूनि वाहिला ॥3॥*

*चतुर्थ पदे त्या नववधूने वळीला दोर दश इंद्रियांचा, ॥*
*अडकविले शून्यात तयाला समाधिस्थ होऊनिया ॥4॥*

*पाचव्या पदी त्या नववधूने ध्यायिले नाभिमंडला, ॥*
*परमानंदे उरली ती आता षटचक्रे भेदूनिया ॥5॥*

*सहावे पद ते ओलांडण्या पाऊल पुढे ते टाकले, ॥*
*शून्यत्व ते प्रकटे तिथे साक्षी असे श्री गुरूराया ॥6॥*

*सप्तपद ओलांडूनि तिने पति परमतत्व ते स्पर्शिले, ॥*
*अनादिअनंत निर्गुण रूपे ती राहिली होऊनिया ॥7॥*

*आता उमटे स्वर अनाहत शहनाई ती वाजली ॥*
*स्वेच्छे नांदती जीवात्मऊर्जा सवे परमपुरुषाच्या ॥8॥*

# 106. साज शृंगार

नमस्कार,

संत कबीर दासांसह शीख धर्माच्या गुरूंनी व संतांनी जीवात्म्याला वधू आणि परब्रह्माला पतीची उपमा दिली आहे. गुरुबानीमधील "हर प्रभ मेरे बाबुला, हर देवहो दान मे दाजो..." या सुंदर भजनावर आधारित ही रचना आहे. थेट भाषांतर नाही. यात वधूचे बाबा साक्षात श्रीगुरू आहेत हे ओघाने आलेच...

*बाबा मी चालले आज सासरला ॥*
*साज शृंगार हो द्या तुम्ही मजला ॥धृ॥*

*शुभाषिशरूपी कुंकुम तिलक हो लावा ॥*
*द्या कर्ण फुले जणू मूलमंत्र हरीचा ॥*
*मंगलसूत्र हार जणू ईशस्तुती सुमनांचा ॥1॥*

*ज्योत भक्तीची ती नथणी साजे ॥*
*काजळ नयनी जणू कवच अभय ते ॥*
*कंगण चुडा जणू सात्त्विकतेचा ॥2॥*

*द्या महावस्त्र ते वैराग्याचे ॥*
*लावीन अत्तर तव संस्कारांचे ॥*
*कमरपट्टा बांधीन षड्रिपू विजयाचा ॥3॥*

*श्रीगुरू प्रदक्षिणेचे पैंजण अन् ॥*
*घालीन जोडवी विवेकाची ॥*
*काढीन मेंदी ईशस्तवनांची ॥*
*माळीन गजरा ईशप्रेमाचा ॥4॥*

*निरोप घेते माहेर मायेचा ॥*
*आनंदाश्रुंनी भिजेल तुमचा खांदा ॥*
*ध्यास मज लागला माझिया परब्रह्म पतीचा ॥5॥*

# 107. रुखसत लेता हूँ

ही रचना एक स्वगत आहे. साधनेच्या मार्गावरील एका मुमुक्षूने स्वत:शी केलेला हा संवाद आहे.

*रुखसत लेता हूँ आज इस जिस्म और दिल से ॥*
*बस हो गई अब मेहमान नवाजी उनकी ॥धृ॥*

*अब अपनी मंजील की ओर चल मेरे मूरीद (साधक)*
*पहचान हमारी रुहबरुह हैं जहाँ की ॥1॥*

*देख तू मेरे पीर की शोहोरत (ख्याती) ॥*
*सबके दिल पे राज है, सब कायनात (निर्मिती) है उसकी ॥2॥*

*उनका खयाल आना यह इनायत (कृपा) है उनकी ॥*
*इन्तेहायी आरजू रख, रेहमत पानी है खुदा की ॥3॥*

*महफुज (सुरक्षित) रख बुराईसे तेरे यह नयना दुई ॥*
*निगाह करना है उनको, पाक हो जिंदगी तेरी ॥4॥*

*फर्ज कर लो फिक्र दस्त बरदार होने (आत्मसमर्पण) की, ॥*
*रूहबरुह हो जायेंगे उनसे, मिट जायेगी पेहचान खुद की ॥5॥*

# 108. का रे का रे कागा

या रचनेची संकल्पना श्री गुरू शेख फरीद जी यांच्या "देख बंदे के भाग" या रचनेवरून सुचली. या गुरूंची ही मूळ रचना इतकी आर्त आहे की अंगावर शहारे येतात. https://youtu.be/YDjdxBfqwww या लिंकवर अर्थासह मन घट्ट करून ऐकता येईल. हा इथे त्या रचनेचा थेट अनुवाद नाही परंतु त्यांची संकल्पना वेगळ्या पद्धतीने मांडली आहे. इथे कावळ्याला षड्रिपुंची उपमा दिली आहे. आयुष्यभर ते आपली तनमनाची शक्ती वाया घालविण्यास कारणीभूत होतात. शेवटी षड्रिपुंना बळी पडून वृद्धापकाळात मनाची आणि शरीराची शक्ती क्षीण झाली की मानवाला ईश्वरप्राप्ती दुर्लभ होऊ लागते. येथे अशाच एका साधकाला कळून चुकले आहे की आता जे काही उर्वरित जीवन हाती आहे त्या जीवनात हे षड्रिपू त्रासदायक ठरू नयेत आणि ईश्वरप्राप्ती करून घ्यावी. इथे प्रत्यक्ष शरीरावर हा कावळा हल्ला करत नसून तो मनरूपी सूक्ष्म शरीरावर हल्ला करतो आहे असे वर्णन केले आहे.

*का रे का रे कागा तू टोके मनोशरीर ॥*
*मी इथे जाहलो अस्थि पंजर पंजर ॥धृ॥*

*तुझी बाक काम क्रोध ॥*
*तुझे पंख मद मोह ॥*
*तुझे धड लोभ मत्सर ॥1॥*

*मनोशरीर एक आधार ॥*
*ते ईश्वरप्राप्तीचे रे माध्यम ॥*
*जा रे जा रे कागा तू आता सत्वर ॥2॥*

*ठेव ते शिल्लक काही मम शरीर ॥*
*मनोशरीरे साधून योगीयांचा योग ॥*
*तयात रे आता मी भोगीन ईश्वर ॥3॥*

# 109. आझ़ाद जिंदगी

*सब कुछ सिखते आये हैं लेकिन न मरने कि कला नही सिखते हम कभी जीवन में...*
*इसलिये हर बार जिंदगी से हारते हुए आये हैं हम आखिर में... ॥धृ॥*

*हर बार यहाँ मरना पडता हैं जिंदगी को...*
*तो अब इस तरह जिना हैं की फिर बार बार मरना न पडे जिंदगी को... ॥1॥*

*अब इस तरह जिना हैं की मरने का अवसर तक ना मिले जिंदगी को...*
*वह तो चलती ही रहे ऐसे कि जैसे न मरने की कला का प्रदर्शन हो... ॥2॥*

*सफलता मिले हम सबको की वह एक दिन मरना ही भूल जाए ऐसे...*
*के मृत्यू से तो क्या खुद से भी आजाद हो गयी हो जैसे... ॥3॥*

# 110. विवेके जाणीले मी

*विवेके जाणीले मी अहं ब्रह्मास्मि ॥धृ॥*

*लपेटून देह वैराग्याच्या वस्त्रातूनी ॥*
*बैसलो आज मनाच्या स्मशानी ॥1॥*

*जाळीली इंद्रिये ज्ञानाग्नि चेतवूनि ॥*
*लावियले भस्म भूषण ते सर्वांगी ॥2॥*

*महामाया आता शून्यत्व तिचे दावी ॥*
*पलीकडे साक्षात उभी निर्गुण भगवती ॥3॥*

*मध्ये श्रीगुरू मी शरण त्यांचे चरणी ॥*
*न्या हो न्या तुम्ही मजला पैलतीरी... ॥4॥*

# 111. तू एक ओमकार

या विश्वात केवळ दोनच महान तत्त्वे आहेत, एक चैतन्य आणि एक ऊर्जा. ऊर्जेने विविध गुणांच्या सान्निध्यात असंख्य स्वरूपे धारण करून विश्व साकार केले आणि त्यामध्ये असलेल्या चैतन्याच्या साहाय्याने आपण काय निर्माण केले ते त्या ऊर्जेने सजीवांच्या मार्फत समजून घेतले. साधक जेंव्हा साधना किंवा उपासना करतो तेंव्हा त्याचा अहंभाव किंवा मी पणा त्याच्या नेहमी आड येत असतो. हा अहंभाव नाहीसा व्हावा यासाठी तो साधक त्याचे सर्व स्वरूप ईश्वराच्या मालकीचे आहे असे येथे सांगत आहे. ईश्वराप्रती आत्यंतिक समर्पित भाव निर्माण होण्यासाठी तो त्याचे स्वत्वसुद्धा त्या ईश्वराचेच आहे असे नमूद करतो आणि आता केवळ निमित्तमात्रे साधनेच्या मार्गातून पुढे जात अंतिमत: त्या पूर्णत्वामध्ये पूर्ण म्हणून विलीन होतो.

*तू एक ओमकार तूची असे तुझी ग्वाही ॥*<br>
*दुसरा तुझ्याहून मी इथे वेगळा असा नाही ॥धृ॥*

*तुझेच हे हात तुजला नमन मी करतो ॥*<br>
*तुझिया सद्बुद्धीने जीवन तुला अर्पितो ॥1॥*

*तुझाच हा मी तूचि निर्मिला या देही ॥*<br>
*तुझिया देह क्षेत्रे निर्गुण मी तुला पाही ॥2॥*

*तुझेच हे दान धारा अश्रुंच्या लागल्या ॥*<br>
*चरणी झाला अभिषेक सर्व वृत्ती त्यात वाहिल्या ॥3॥*

*तुझिया स्वस्वरूपे हे स्वस्वरूप मिळाले ॥*<br>
*आता पूर्णत्वाने येथे केवळ पूर्णत्वची उरले ॥4॥*

# 112. तू मेरा पिता

*यह क्यों हैं जी बिरह बिरह बिरह ॥*
*ना दिसे मेरा पिता जो हैं मेरे रुहबरुह ॥धृ॥*

*बिस्म बिस्म बिस्म जी मैं अब भया ॥*
*मैं सोउ बिरथा जो वह जगाने आया ॥1॥*

*जाना जाना जाना उस को जी अब मैंने ॥*
*जो देखा उसकी दिखाई, की है उसही ने ॥2॥*

*जिया जिया जिया अब मैं वो हर पल ॥*
*बणत बनाई उस ने जिसकी इस कल ॥3॥*

*राखा राखा राखा इस माया में उसने ॥*
*देखो मेरे निशाण कही जमिन पे ना अब दिखदे ॥4॥*

*आओ आओ आओ मेरे साथ आप जी ॥*
*यही एक रास्ता हैं भाई नाम जपो जी ॥5॥*

रुहबरुह = आत्मरूप

बिस्म = विस्मयचकित

बिरथा = वृथा

बणत = कार्यकारणभाव

कल = कलीयुग

# 113. तव विन्मुखतेपरि विष चांगले

गुरू संत कबीर दासजी यांचे “लाग गले सुन बिनती मेरी, करवत भला न करवट तेरी...” हे भजन ऐकल्यानंतर त्यावर आधारीत खालील रचना स्फुरली. त्यांच्या रचेनेचे हे थेट भाषांतर नाही. पण त्या भजनाचा संपूर्ण प्रभाव या रचनेमध्ये एक तटस्थ म्हणून मला दिसून आला आहे. मूळ भजन आत्यंतिक प्रभावी, श्रवणीय व समर्पित भावयुक्त असे आहे. गुरू संत कबीर दास जी म्हटले की त्यांची रचना ऐका, अशी वेगळी विनंती करायची सुद्धा आवश्यकता नाही. त्यांचे शब्दामृत पिण्यासाठी सगळेच उत्सुक असतात. तुमच्यासाठी या भजनाची ही Audio Link — https://drive.google.com/file/d/0Bx9BBymNnxQYUjBqZGJFSkxsNm8/view?usp=drivesdk

*तव विन्मुखतेपरी विष चांगले*
*तुजविण माझा हा प्राण तळमळे ॥धृ॥*

*आत्मभाव तुज चरणी मी वाहे*
*तव विन्मुखता तरी मज का मारे ॥1॥*

*जन्मोजन्मी तव चरणी मी नित राहे,*
*काया त्या जाती परी तुज ना अंतरले ॥2॥*

*संत म्हणती तू निर्गुण असे रे*
*मी ज्ञानांध तुज पाहू कसा रे ॥3॥*

*वास करे तू मम कायेमध्ये*
*सांग कसे पाहू तुज कोण उपाये ॥4॥*

*विनंती तुज, छाया सोडू नको रे*
*मी अनाथ हा तुजवीण असा रे ॥5॥*

*सोडू ना प्रित किती ते देहांत झाले*
*तरी मज सन्मुख तू का न यावे ॥6॥*

*लेकरू आता तू दूर ना लोटी*
*माउली कधी ती निष्ठूर नसे रे ॥7॥*

*द्वैताची माया ही स्वप्न सत्य असे हे*
*अद्वैताचे मम वरदान तू दे रे ॥8॥*

*मम हृदयाची घालू आर्त तुजला रे*
*सन्मुख येऊनि मज प्रचिती दे रे*
*सन्मुख येऊनि मज प्रचिती दे रे ॥9॥*

# 114. सुंदर हा सारंगपाणि

*सुंदर हा सारंगपाणि हृद मंदिरी वसे,*
*तो एक मी, ही खूण हो आता पटे ॥धृ॥*

*काया तू विश्वऊर्जा असे ही साक्षात,*
*महायोगाचे मज तू अधिष्ठान द्यावे ॥1॥*

*अहंभाव निरीक्षक तू अंतर्बाह्य विश्वाचा,*
*केवळ अद्वैत तत्त्व इथे तू पाहावे ॥2॥*

*मना तू असे ग्राहक जाणिवांचा,*
*स्वस्वरूपी तू अमन होऊनि राहावे ॥3॥*

*बुद्धितत्त्वा तव गती ती अपार असे,*
*विवेक होऊन मम अंत:करण व्यापावे ॥4॥*

*ज्ञानेंद्रियांनो शूचित्व ते तुम्ही साधावे,*
*पंचसंवेदना-सखींनी त्यांचे मंगल गीत गावे ॥5॥*

*कर्मेंद्रियांनो तुम्ही एकदेशीय ते व्हावे,*
*निष्काम ते कर्म सदा हातूनि घडावे ॥6॥*

*श्वासांनो तुम्हा परमात्मविरह कथितो,*
*व्हा माध्यम करू द्या पार शून्या ते ॥7॥*

*पंचप्राणा तुम्हा असे मम विनंती आर्जव,*
*सगुणांच्या या देशी ते निर्गुण प्रकटावे ॥8॥*

*अवकाशा मम अस्तित्वाची तुज आण,*
*निरास्तित्वाचे मज दान तू द्यावे ॥9॥*

*महाकाल तुम्हा आत्मभान मी अर्पितो,*

*अकालक्षेत्री मी मजला कालातित अनुभवावे ॥10॥*

*हे महामायाविणी तव भ्रांतीचा हा घनपडदा,*
*विनवणी करितो सत्वर गं तो निवारे ॥11॥*

*विनम्रतेने करितो ही विनंती सर्वांना,*
*व्हा माध्यम जीव-परमात्म मिलनाचे ॥12॥*

*आता न येई मी पुन्हा गर्भवासी,*
*ऐसे मी आता श्रीकृष्णरूप व्हावे*
*ऐसे मी आता श्रीकृष्णरूप व्हावे - ॥13॥*

# 115. सखीरी मैं तो शाम की भई री

*सखीरी मैं तो शाम की भई री*
*उनके सनेह रंग ऐसी मैं रंगी री ॥धृ॥*

*देखे जो मैने उनके नयन री*
*नजर अब मेरी उनकी भई री ॥1॥*

*जह जह देंखू तह तह कान्हा पांऊ री*
*झांकू अंतर तो उत देखू मुरारीजी ॥2॥*

*धुन मुरली की सुन सुन रे सखी री*
*सुदबुध सब यह मैने खोई री ॥3॥*

*बिन हरीनाम अब कछु ना सुहावे री*
*हृद-कमल मेरे एकु गोविंदु विराजे री ॥4॥*

*मै भिगी ऐसी जो अमृतधारा बरसे री*
*गोपालभाव में आनंद धुंद भई री ॥5॥*

# 116. काया

आपला मी म्हणजे आपले शरीर नाही. काया त्या मी चे व्यक्त होण्याचे अधिष्ठान आहे. त्या कायेचे आपण खूप ऋणी आहोत कारण ती इतकी सर्वोच्च कल्पवृक्ष आहे की साक्षात ईश्वराला भेटवून देण्याची त्या कायेची क्षमता आहे. म्हणून तिलास्वत्वरूपी शिर अर्पण...

*मन बुद्धी विवेक आधारा ॥*
*तू काया कल्पवृक्ष स्वरूपा ॥धृ॥*

*मम काया अपरंपार विश्व ऊर्जा ॥*
*स्वरूपी तू पावली पंचमहाभूतांच्या ॥1॥*

*ऐसे तुझे बीज ते सूक्ष्म तन्मात्रा ॥*
*विज्ञानाच्याही त्या असती पलिकडल्या ॥2॥*

*विश्व ऊर्जेच्या अत्युच्च अविष्कारा ॥*
*धारण करीशी साक्षात ईश चैतन्या ॥3॥*

*निर्माण करूनी पंच संवेदना ॥*
*विश्वानुभव मजला तू सादर केला ॥4॥*

*तुझिया आधारे मनबुद्धिविलास ॥*
*उन्नतीचा कळस कलांचा विकास ॥5॥*

*सुख दुःख व्यंग वेदना संवेदना ॥*
*मजसाठी तू केलास गं संग तयांचा ॥6॥*

*सर्व सर्व तू मनोबुद्ध्यहङ्कारा ॥*
*केलेस अर्पण निष्काम भावा ॥7॥*

पोशिले वाढविले ॥

*मज सशक्त केले ॥*
*ईश विज्ञान दर्शन ॥*
*तूचि मज दाविले ॥8॥*

*तुज आधारे साधिले ॥*
*नाम संकीर्तन भक्ती ॥*
*साधकासी तव आधारे ॥*
*साधते गं मुक्ती ॥9॥*

*सर्व सर्व मज देऊनि ॥*
*तू हवन अग्निकांडी ॥*
*जाशील गं काया ॥*
*पुन्हा तव अद्वय स्वरूपी ॥10॥*

*तू कल्पवृक्ष तुझे ॥*
*दातृत्व परम निरपेक्षी ॥*
*स्वत्वरूपी शिर वाहतो ॥*
*तुझिया चैतन्य साक्षी ॥11॥*

*एवढीच माझी विनंती गं ॥*
*काया तुजपाशी ॥*
*भेटव श्रीरामचंद्र मजला ॥*
*तव निर्गुण हृदयकोशी ॥12॥*

# 117. परब्रह्म मायबाप

*परब्रह्म मायबाप पूर्णातिपूर्ण ॥*
*सदा प्रशांत परमानंदाचे निधान ॥धृ॥*

*शून्य अनंत नित्य अति अल्याड ॥*
*निर्गुण निराकार चैतन्य पल्याड ॥1॥*

*सगुणाचे मूळ, काळाचा उद्गम ॥*
*निष्कल आत्मरूप निर्मल विमल ॥2॥*

*उद्भवली माया परि ब्रह्म निरंकार ॥*
*अद्वय ते सकल परि द्वैताविष्कार ॥3॥*

*क्षमतांचे पुंज ते ऊर्जा शून्य स्वरूप ॥*
*सूक्ष्म पंचतत्त्व तिथे मायेचा उद्भव ॥4॥*

*मायेचे अवकाश तृष्णेचे स्वरूप ॥*
*धरा ममत्व, उर्मी इच्छेचे तोय ॥5॥*

*षड्रिपू अगन, वाहे चंचल वात ॥*
*परब्रह्म अधिष्ठान माया प्रपात ॥6॥*

*मायेचा आभास अति अति वास्तव ॥*
*सूक्ष्म कणकणांचा केवळ समुच्चय ॥7॥*

*विवेके देखिता पूर्ण माया विघटन ॥*
*दिव्य दृष्टी जेंव्हा हृद ईश प्रकटन ॥8॥*

*निर्भय निःशंक निर्वैर हा विवेक ॥*
*सदा उदास योग वैराग्य निरंतर ॥9॥*

*त्यागिता मी पण होई मायेचा क्षय ॥*

*सकल जीवन ऐसे होतसे निरामय ॥10॥*

*नाम संकीर्तनी गुंतविली मायेस ॥*
*स्वतः अभोगी परि भोगतो आत्मरूप ॥11॥*

*नित्य समर्पणी श्रीगुरू कृपा अपार ॥*
*ऐसे वर्णिले विवेके विज्ञान ब्रह्मरूप ॥12॥*

# 118. कर्ता नका बोलू

"मी कोणीतरी विशेष (कर्ता/भोक्ता) आहे" हा आविर्भाव जीवाला घनीभूत करून जडत्व देतो. त्याच्या आतील षड्रिपू त्या घनीभूत सावजाला क्षणार्धात पकडतात. असे कर्ता/भोक्ता या भ्रमाला सहा भ्रम पकडतात. पण आपले आत्मभान हा भ्रम नाही. कारण ते परम तत्त्व अनिर्वचनीय आहे. म्हणून आत्मभानी "मी" जागृत असेल, त्याला सन्मुख असेल तर त्याला षड्रिपू पाहू शकत नाहीत. षड्रिपुंचे आक्रमण टाळण्यासाठी हाच एक खूप चांगला चकवा आहे.

*कर्ता नका बोलू स्वतःस ॥*
*नका बोलू हो भोक्ता ॥*
*षड्रिपू इथे टपलेले ॥*
*घेण्यास आपुला ताबा ॥1॥*

*आत्मभान अदृश्य ॥*
*ते सदा षड्रिपूंना ॥*
*गर्वाभिमान पाहाता ॥*
*टाकती अज्ञान बुरखा ॥2॥*

*कर्त्या भोया जीवाला ॥*
*बांधूनी काळा बुरखा ॥*
*खेचती ते तयाला ॥*
*भ्रमांध कूप पाताळा ॥3॥*

*जाणून घ्यावे जीवनी ॥*
*की कसा न मी कर्ता॥*
*समजूनी त्यागावी समज ॥*
*की आहे मी भोक्ता ॥4॥*

*सजग सतर्क राहूनी सदा ॥*
*मोजावे एकेक श्वासाला ॥*
*तिथे "मी" अदृश्य, ध्यानी ॥*
*स्वात्मभान शून्य आकाशा ॥5॥*

*आचरण करिता ऐसे आता ॥*
*वायू ना लागे तप्त मायेचा ॥*
*गुंजन ऐका हो दशदिशांना ॥*
*जय श्रीरामा जय श्रीरामा ॥6॥*

*शिर ठेवूनि श्रीगुरू चरणा ॥*
*आर्त उठावी हृदयांतरा ॥*
*धावा धावा श्रीरघुराया ॥*
*अद्वैत ते ममात्म दाखवा ॥7॥*

# 119. In This So Called Human Society

*In this so called human society,*
*My status is said to be the most ordinary.*
*Oh god, where I am avoided by many,*
*Your abode in my heart makes me feel heavenly.*

*In this so called...*
*Competitive society,*
*My life is struggling*
*Without any luxury,*
*Oh god, I am thankful to your mercy,*
*I see myself in your chariot*
*The moment each and every.*

*No one listens to me*
*in this so called human society,*
*As they don't understand my words of witty.*
*Oh my god, your presence is so motherly,*
*As I see, only you are willing to hear me eagerly.*

*In this so called human society,*
*Many souls delude and establish the duality,*
*Oh god, as you see the world through me,*
*Now I see, only you exist everywhere perspicuously.*

# 120. आईचे एक गाव असतं

*आईचे एक गाव असतं ॥*
*पण गावात तिच नाव नसतं ॥धृ॥*

*आईचे आई हे एकच व्रत असतं ॥*
*ते निभावताना तिच भान हरपतं ॥1॥*

*भान तिचं हरपत इतकं ॥*
*की विसरते तीच तिचे सर्व विश्व ॥2॥*

*परिस्थितीचे सर्व घाव ॥*
*तिजपाशी निष्प्रभ ॥3॥*

*तरी नाही मिळणार ॥*
*कुणी माउलीहून मवाळ ॥4॥*

*आई समान इथं ॥*
*कोणीच नाही दुसरं ॥5॥*

*तिच्या चरणी नित्य ॥*
*माझ्या श्वासांचे समर्पण ॥6॥*

*तिची उतराई... ॥*
*सर्व प्रयत्न निष्फळ ॥7॥*

*अनसूयेचे ऋणी ॥*
*अद्याप श्रीगुरुदेव दत्त ॥8॥*

# 121. ऐसे पाहाता ते विश्व

क्वांटम शास्त्र आपल्याला असे सांगते, की जोपर्यंत आपण एखाद्या वस्तू विषयाला डोळे किंवा मनःचक्षुंद्वारा पाहात नाही तो पर्यंत त्याचे अस्तित्व अर्थहीन असते. ज्या क्षणी जीवा कडून पाहिले जाते त्या क्षणी मनरूपी क्षेत्रात त्या वस्तू विषयाला चैतन्यामुळे सार्थ सगुण पण आभासी स्वरूप प्राप्त होते. अद्वैत चैतन्य जिथे पोहोचते तिथे द्वैत निर्माण होते. हीच ती माया. अशा रीतीने आपले जीवन हे या आभासी आणि वास्तव या दोन सत्यतांचे व्यवस्थापन होय. हा सर्व mechanism क्वांटम शास्त्र सहज सुस्पष्ट करते. माझ्या मराठी पुस्तकात ते सविस्तर आले आहे. स्वामी निश्चलदास यांच्या विचार सागर रहस्य ग्रंथात सुमारे 200 वर्षांपूर्वी त्यांनीही हेच सांगितले आहे. चांगदेव पासष्टी हेच सांगते. वेदांतही हेच हजारो वर्षांपासून सांगतात. पण मग आपल्या शिक्षण व्यवस्थेत हा वैज्ञानिक भाग का समाविष्ट केला नाही याचे आश्चर्य वाटते. या वास्तव आणि आभासी सत्यतांच्या सीमेवर जे चैतन्य तोच ईश्वर. म्हणून संत जनाबाई श्रीविठ्ठलास “मायेचे कार्टे” असे थोड्याशा रागाने, पण आतील परम भक्तिभावाने संबोधते... अत्यंत विनम्रतेने...

*हरएक वस्तू विषयाची ॥*
*दोन स्थाने असती भिन्न ॥धृ॥*

*एक समोर वास्तव भौतिक ॥*
*दुजे मनोचैतन्यी गुणाभास ॥1॥*

*विश्वात जे वस्तू विषय ॥*
*ते ते निव्वळ अर्थहीन ॥*
*होता चैतन्यातून निरीक्षण ॥*
*जीवा भासे ते सार्थ सगुण ॥2॥*

*ऐसे सर्व वस्तुमय भौतिक ॥*

*ते ते असती अर्थहीन ॥*
*पाहता क्षणी त्यांना तिथे ॥*
*मनोक्षेत्री गुण विषयाभास ॥3॥*

*ऐसे पाहता ते विश्व नित्य ॥*
*तो पंच तत्त्वांचा समुच्चय ॥*
*ज्याने बांधीले अर्थार्थी तयांस ॥*
*चैतन्यात त्या ईश्वर नेमका पाहावा ॥4॥*

*हीच वेदवाणी ॥*
*हीच संतवाणी ॥*
*हेच ते विज्ञान ॥*
*आता विनम्रे सांगती ॥5॥*

# 122. नीर नयनो बहे

*नीर नीर नयनो सदसदा बहे ॥*
*मै चातक हे रसना मुझे ॥*
*गोविंद गोविंद रस पिलाईए ॥धृ॥*

रसना = जिव्हा

*निकट प्रभू सदा तुम हो हमारे ॥*
*पर इह घने अग्यान अंधकारे ॥*
*जाने हम प्रभू तुमको कैसे ॥1॥*

*कोट अघा आप निसतारे ॥*
*हाथ लिए कर तुम अपने ॥*
*हमे प्रभू आप भव पार उतारे ॥2॥*

अघा = पाप कर्म

*कोई नही इह हम है जाने ॥*
*आंस मिलन की लेके है खडे ॥*
*हाथ जोड प्रभू हम तुम्हरे दुआरे ॥3॥*

*तुम किरपाल इक किरपा होवे ॥*
*श्रीगुरू चरणी हम नीव नीव लागे ॥*
*जहां वैकुंठ हरि हरि हरि मिले ॥4॥*

# 123. मदमायेचे भव मद्य प्राशूनी

*मदमायेचे भव मद्य प्राशूनी ॥*
*नजर धुंद बेभान विषयांशी ॥*
*निष्फळ धडपड जीव अज्ञानी ॥धृ॥*

*सत्ता महत्ता प्रसिद्धी संपत्ती ॥*
*तनमन दारा पुत्रपौत्र संबंधी ॥*
*गर्वाहिंकार पोशिला त्यावरी ॥1॥*

*मानापमान पत प्रतिष्ठेसाठी ॥*
*उन्माद करूनी अति दुराग्रही ॥*
*अन्याय करीती निष्ठूर होऊनि ॥2॥*

*बहु वृत्ती वासना इच्छारूपी ॥*
*केसांना खेचूनी क्षणोक्षणी ॥*
*यमदूत जीवा नेती यमसदनी ॥3॥*

*दे ईश्वरा या जीवा सद्बुद्धी ॥*
*मदमायेचा प्रभाव जाऊनी ॥*
*समर्पित होऊ दे मृत्युपूर्वी ॥4॥*

# 124. जाऊ जेंव्हा

*जाऊ जेंव्हा आपण आपुल्या गावा ॥*
*नेऊ सवे परमानंदाचा ठेवा ॥धृ॥*

*सुफल सौभाग्य व्हावा जन्म आपुला ॥*
*श्रीगुरू चरणी विवेके ठेऊया माथा ॥1॥*

*शरण शरण तुजला आलो पांडुरंगा ॥*
*तुझिया कृपे आम्हा तव ध्यास लागला ॥2॥*

*अणुरेणू कायेचे व्हावे सम आकाशा ॥*
*भोगण्या तव शून्यरूप याची तनमना ॥3॥*

*नाद मंजुळ अनहद सर्वांगे नादावा ॥*
*पाहू हृदयी इथे नीत वैकुंठ सोहळा ॥4॥*

*अति आदरे घेऊ निरोप कायेचा ॥*
*कल्पवृक्ष ती शतशत वंदन तिजला ॥5॥*

*जीवनी या द्वैत संग तुटूनी जावा ॥*
*आत्मभावे एक रंग श्रीरंग रंगावा ॥6॥*

# 125. हरी संग

*आकाशाहून माझे अनंत अंग सर्वांग ॥*
*सगुण भोगतो परि न केला त्याचा संग ॥धृ॥*

*पंचसखी मजवर टाके मायावी बहुरंग ॥*
*खेळ खेळतो माझ्यातून सवे माझा श्रीरंग ॥1॥*

*मी आत्मरूप सदा माझ्यातच मी दंग ॥*
*कधीही ना झाला मज ह्या मायेचा संग ॥2॥*

*परि कोण कैसे हे पाहातसे इथून ॥*
*कर्त्या भोयाचे ऐसे आभासी स्वप्न ॥3॥*

*श्री गुरू चरणी अति विनम्रे शरण शरण ॥*
*तुकयाची गाथा व्हावी माझा ज्ञानयोग संपूर्ण ॥4॥*

*कृपा व्हावी यावे की ते भान मी अभंग ॥*
*मृत्युंजय होऊनि मिळो सदा हरि-संग ॥5॥*

# 126. नीत नीत शरण

*नीत नीत शरण प्रभ तेरे चरणी ॥धृ॥*

*तेरी बाणी मेरे हिरदे समाई ॥*
*मेरे रोमरोम अम्रित शबद है गाई ॥1॥*

*करम कारण मेरे सब शबद समाई ॥*
*मिल सतगुर अब मै पाऊ राम रघुराई ॥2॥*

# 127. फुलांचा रंग तुझ्या

*मित्रा फुलांचा रंग तुझ्या... ॥*
*मम फुलांनी घ्यावा... ॥धृ॥*

*सुगंधात तव फुलांच्या, ॥*
*मम फुलांनी गंध ल्यावा... ॥1॥*

*तुझ्या निरागस फुलांसंगे, ॥*
*तयांनी यथेच्छ बागडावे... ॥2॥*

*दवबिंदू असे कोमल हे, ॥*
*सवे हलकेच रे झेलावे... ॥3॥*

*सावलीतून तव फुलांच्या, ॥*
*तयांनी सूर्याला हलकेच पाहावे... ॥4॥*

*तव पवित्र फुलांसंगे, ॥*
*तयांनी ईश्वर चरण स्पर्शावे... ॥5॥*

*झाले निर्माल्य जरी तयांचे, ॥*
*जिद्दीवर तव फुलांच्या, ॥*
*तयांनी पुन्हा मातीतून उमलावे... ॥6॥*

# 128. मंगलाहून मंगल

दूर प्रांतातील गुरुकुलामध्ये योग शिक्षण घेणारा एक साधक त्याच्या आईला त्याच्या मध्यावधी प्रगती विषयी कळवितो अशी कल्पना या रचनेची पार्श्वभूमी आहे...

*मंगलाहून मंगल ॥*
*पाहा चहुदिशी दाटले ॥*
*शुभ शकुन गं माये ॥*
*अवघे जीवन जाहले ॥धृ॥*

*श्रीगुरू पदस्पर्श होता ॥*
*ज्ञानाने उत्तरी चालविले ॥*
*विज्ञान अध्यात्म संगमी ॥*
*न्हावू मज घातले ॥1॥*

*सगुणाच्या कणकणांमाजी ॥*
*निर्गुण ते जाणिले ॥*
*मायेनेच मायेला ॥*
*शून्य चिदरूप तिचे दाविले ॥2॥*

*पाहता रजतम ॥*
*क्षणात सात्त्विक ते जाहले ॥*
*मनदृष्टी ती पारसमणी ॥*
*लाभिली श्रीगुरुकृपेने ॥3॥*

*भ्रमांधःकारी मन मायेशी ॥*
*विसंवादी जाहले ॥*
*मम हृदयांतरी "तत्त्वमसि" ॥*
*अर्थरूपे प्रकाशिले ॥4॥*

*कर्मी राहूनही मर्म ॥*
*अकर्माचे म्यां जाणिले ॥*
*मन सजग सतर्क ॥*
*जरी भाव नयनी वाहिले ॥5॥*

# 129. राम सांग मज राम ग

नुकतेच एक अतिसुंदर श्रीगुरुबाणी शबद ऐकले...*रि माई मोरो प्रीतम राम बतावो॥* त्यावरून याची रचना झाली...

*गं मायेऽ राम सांग मज राम गं ॥*
*निमीष एक ना ठरे हे मन ॥धृ॥*

*परम पुरुष ईश श्रीराम रघुराय ॥*
*द्वैताधिन मी माझी मति ही भ्रमित ॥1॥*

*करुणा निधान हृद दशरथ पूत ॥*
*तृष्णा न जाई मी हा आर्त चातक ॥2॥*

*प्राणाधार मज नित्य हे पंचायतन ॥*
*कसा पाहू मी श्रीराम कणकणांत ॥3॥*

*मस्तकी गं माये मम तव आशिष ॥*
*पाहीन गं श्रीराम भेटता श्रीगुरुजन ॥4॥*

# 130. वर्षाव झाला

*वर्षाव जाहला भक्तिभावसुमनांचा ॥*
*मम हृदयी हो देव श्रीराम प्रकटला ॥धृ॥*

*तुटले बंधन अन् तुटल्या शृंखला ॥*
*श्रीगुरुमुखे देव श्रीराम आज पाहिला ॥1॥*

*समर्पित सदा श्रीगुरू चरणारविंदा ॥*
*तेणे सहजी देव श्रीराम मज दाविला ॥2॥*

*द्वैताचे अधिष्ठान अद्वय ते सदा ॥*
*अद्वयी पाहिला देव श्रीराम मत्सखा ॥3॥*

*कारुण्यघन श्रीराम बरसला ऐसा ॥*
*आंस जाणूनी देव अंतरी प्रकटला ॥4॥*

*इथे कोण उरले ब्रह्मांड शून्यभावा ॥*
*श्रीरामहृदयी आत्मभाव हो विरला ॥5॥*

# 131. माई मोको होली खेलन की आंस

*आज इस पावन होली के अवसर पर यह श्रीमाधव रंग लाया हुँ, आप रंग जाओ जी ॥धृ॥*

*माई मोको होली खेलन की आंस ॥*
*कहा है माधव ढुंडत है उनका दास ॥1॥*

*वृंदावन मे रंग रंगिला है हर ग्वालबाल ॥*
*कहा छिपा है ना पहचानू मेरा श्रीगोपाल ॥2॥*

*बतावो माई कवण रंग से है खेलत शाम ॥*
*जो ना कही मैं देख सकू मेरा श्रीमुरार ॥3॥*

*ब्रह्मांड लागे जैसे यह सब वृंदावन ॥*
*अर लागे कई जनम मैंने गवाये री मात ॥4॥*

*माई बोली,*
*श्रीगुरु है राधा चरणी उनके लाग ॥5॥*

*रख तनमन उनकी चरण धूर,*
*अर छड सब की तुम आंस ॥6॥*

*हरि नाम रंग रंगावो तुमरे मन तन ॥*
*तुम पावोगे कान्हा तुमरे ह्रदयांतर ॥7॥*

*खेलो होली इक हरिनाम के रंग संग॥*
*होली तुमरी खेलेंगे साथ तुमरे श्रीरंग ॥8॥*

# 132. परमानंद प्रशांत पद

*नाही चाहत हैं किछ हम तुमसे हो पंचसखियां ॥*
*हम बिरकत भयो मन तन धन को है त्यजिया ॥धृ॥*

*अग्यान अंधकारे उपजी हैं जो यह माया ॥*
*सब किछ हो कर भी कोई किछ नही पाया ॥1॥*

*माया का विधी विधान जो जन जाणिया ॥*
*लागे ब्रहम सत्य और सब जगत है मिथिया ॥2॥*

*केवल सत्व स्वरूप जो यह माया को पाया ॥*
*श्रीगुरूने प्रभू से संतन का मेल मिलाईया ॥3॥*

*शून्य शिखर पर पूरण पूरण मे जाई समाया ॥*
*ऐसा निरंजन परमानंद प्रशांत पद हैं हमे पाना ॥4॥*

# 133. शब्दब्रह्म

*शब्दब्रह्म हैं अत मन भावन ॥*
*सत्व सत्य का परम निधान ॥धृ॥*

*साधू संत ऋषी मुनी बखाण ॥*
*शब्दब्रह्म वह परब्रह्म समान ॥1॥*

*शब्दब्रह्म योग वाक-यज्ञ पठण ॥*
*मानव का हो सदा सत उद्धारण ॥2॥*

*शब्दब्रह्म ग्यान अति तेज अगन ॥*
*उपजे अर्थबोधन मन होई अमन ॥3॥*

*श्रीगुरु कृपा से शब्दब्रह्मामृत मंथन ॥*
*शब्दब्रह्म समाई हो सब पावन पूरण ॥4॥*

# 134. शबद

*जीवन मेरा है शबद ॥धृ॥*

*मेरे प्राण है शबद ॥*
*मेरी जान है शबद ॥1॥*

*रोमरोम मेरे कहत है शबद ॥*
*गुरु का प्यार है शबद ॥2॥*

*गुरु का आशिष है शबद ॥*
*मेरे गोबिंद है शबद ॥3॥*

*जय श्रीराम है शबद ॥*
*पारब्रह्म परमेशर है शबद ॥4॥*

*बली बली जाऊ मै गुर चरण शबद ॥*
*बली बली जाऊ मै गुर चरण शबद ॥5॥*

# 135. सखा मित मेरे

*जी सुण यार सखा मित मेरे ॥*
*सिर है नीत मेरा आगे तेरे ॥धृ॥*

*राज यहां का मोहमाया सब है ॥*
*दुतिया भाव मन भ्रम भ्रम रोवे ॥*
*कौन यहां मै-तूं, सब हम एक रे ॥1॥*

*अजाण मूरख हम अति फिके ॥*
*कठपुतली हम सब है मिट्टी के ॥*
*अंतर्यामी इक प्रभु जी खेलत है ॥2॥*

*श्रीगुरुकृपा हम पर हो जाए॥*
*अहं सियानप वहां चूर हो जाए ॥*
*तनमन सब जै श्रीराम हो जाए ॥3॥*

# 136. री माई मोसे हरिहर ना बिसारे

*री माई मोसे हरिहर ना बिसारे ॥*
*अजाण मन प्रभु को ना पहचाने ॥धृ॥*

*पंचतत मिल सब जगत रंगारे ॥*
*काम क्रोध लोभ है मेरो मन लुटेरे ॥1॥*

*मिटाए जैसे सूरज सब अंधकारे ॥*
*कोट किरण से कणकण जो उजले ॥2॥*

*तैसे जब पांऊ मै श्रीगुरुवर जी मेरे ॥*
*कोट सूर्य प्रकाश मेरे अंतर उपजिये ॥3॥*

*गुर किरपाल होवे तो मन जाए ॥*
*सदा संग रंग मै पाऊ हरिहर से ॥4॥*

*बली बली जाऊ बली बली बली मैं ॥*
*ना मिले प्रभु तो सिर धडी उतारे ॥5॥*

# 137. चोख प्रचिती

*देशील का तुझी रे देवा मला चोख प्रचिती ॥*
*सगुणामाजी तू निर्गुण अशी तुझी ख्याती ॥धृ॥*

*सर्वांभूती विराजे ईश्वर वदिली संतवाणी ॥*
*परि आम्ही अजाण इथे अहं हीच भ्रांती ॥1॥*

*पिंड ब्रह्मांड आहे ही सर्व तुझीच निर्मिती ॥*
*चराचरांत असे देवा तुझीच रे वसती ॥2॥*

*थकलो करकरून शुद्ध तनमन बुद्धी ॥*
*कोडे ना सुटे का हे षड्रिपू घात करिती ॥3॥*

*पहा या पंच संवेदना मजवर जोर करिती ॥*
*तव अद्वैतामृताचा आहे हा सदा चातक मी ॥4॥*

*ज्यांना तू धरिले देवा आपुल्या हृदयाशी ॥*
*धुळ त्या श्रीगुरू चरणांची लावियेली रे माथी ॥5॥*

*आता नको हे भव-फेरे किती करू रे विनंती ॥*
*कापूनिया हे शिर ठेवितो देवा तव चरणी ॥6॥*

*जरी पडेल हा पिंड ना सोडीन तव चरणांसी ॥*
*देशील का तुझी रे देवा मला चोख प्रचिती ॥7॥*

# 138. तुकयाची गाथा

अगदी लहान असताना शुक्रवार पेठेतून पायी तळ्यातल्या गणपतीला जाताना एक हात आई धरायची दुसरा हात बाबा. मग गंमत म्हणून मधूनच ते दोघे मला उचलायचे. माझे अधले मधले काही अंतर माझ्या हट्टाने तरंगत पार व्हायचे. असे करत करत आम्ही सारस बागेत पोहोचायचो.

संपूर्ण भारत वर्षातील संत वाङ्मय हे असे आईबाबांसारखे उचलून घेऊन ईश्वरापर्यंतच्या मार्गातील जीवन सहज सुकर सुलभ करते. जीवनातील खडतरता आपल्याला धक्का पोहोचवू शकत नाही.

जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज यांचा गाथा असाच अवर्णनीय आहे. आईची मृदूलता आणि बाबांचा कणखरपणा त्यांच्या या ग्रंथातील भाषाशैलीमध्ये प्रतीत होतो.

*तुकयाची गाथा हो तुकयाची गाथा ॥*
*स्त्रविले शब्दामृत तिथे टेकितो माथा ॥*
*जगद्गुरू तो ऐसा लिहिता जाहला ॥*
*जगी या दाविला भक्तीमुक्तीचा सोहळा ॥धृ॥*

*मात सरस्वती शब्दरूप जाहली ॥*
*संसार तमा नारायणे वाहिली ॥*
*परमानंदी तुका ऐसा स्थिर हो जाहला ॥1॥*

*अगोचर जरी तो परब्रह्म पुरुष ॥*
*तुकयाच्या ओवीत ऐसा गेला हो रंगून ॥*
*रंगात रंगुनी तयाचा विठ्ठल तो जाहला ॥2॥*

*अंतर्यामी जयाने हा गाथा वदिला ॥*
*हृद कमळी वसेल नित्य स्वर्गीय सोहळा ॥*
*मृत्युंजय होण्या वाचू वेद हा पाचवा ॥3॥*

# 139. श्रद्धेच्या पलीकडे

अश्रद्ध व्यक्ती कोणावरच विश्वास आणि श्रद्धा ठेवत नाही. अंधश्रद्धेचा तर विचारच नको करायला. अंध या शब्दातच सर्व काही आले.

श्रद्धेला मात्र अनेक आक्षेप घेतले जातात. मी श्रीराम अनुभवला नाही तर त्यावर किंवा त्याच्या संगमरवरी मूर्तीवर तोच माझा राम म्हणून का श्रद्धा ठेवावी. समर्थांना श्रीराम भेटले, पण तुला भेटले का, आणि त्यांच्या मार्गाने गेले तर तुलासुद्धा राम भेटतील हे कसे? बुद्धिवादी बुद्धिभेद करण्यात चलाख आणि तरबेज असतात. “श्रद्धा ठेवल्याने आत्मबल वाढते आणि सकारात्मकतेने जीवन पार पाडले जाते.” ह्या आपल्या उत्तरावर पण बुद्धिवादी म्हणतात “श्रद्धा ही कल्पनेहून वेगळी नाही. कल्पनेत राहू नका वास्तव काय आहे, ते समजूनच जीवन जगा.” बुद्धिवादी आपल्याला निरुत्तर करतात.

श्रद्धा खर्चिक असते. देवदर्शनाला गेल्यावर हल्ली वेगवेगळया दरांच्या वेगवेगळया रांगा असतात. श्रद्धा आहे असे म्हटल्यावर ती सिद्ध करण्यासाठी रांगेत उभे राहावे लागते आणि पैसे मोजावे लागतात. विश्वासराव तर कधीच पानिपतात गेले. त्यामुळे उंबऱ्याच्या बाहेर विश्वास हा विकतच घ्यावा लागतो. मोल दिले तरच काम होईल म्हणून विश्वास ठेवू शकता अन्यथा बसा वाट पाहात.

यासाठी आपल्याला श्रद्धेच्या पलीकडे जावे लागेल. बायकोच्या शेजारी बसून “ही माझी बायको आहे अशी माझी श्रद्धा आहे” असे कोणी म्हणत नाही. कारण अनुभवाला प्रत्यक्ष प्रमाण प्राप्त झाले, की आपण श्रद्धेच्या पलीकडे सहजच जातो. पण सर्वसामान्य लोकांना ईश्वराचा असा प्रत्यक्ष अनुभव घेता येणे अशक्य आहे. यासाठी प्रथम आपल्याला ईश्वर हा अमूर्त आहे, हे निश्चित करावे लागेल. जसे माझे शरीर मूर्त आणि त्यात राहणारा माझा “मी” अमूर्त अन् अदृश्य आहे अगदी तसेच. शरीराच्या खुणेने आपला अव्यक्त “मी”

आपल्या आणि इतरेजनांच्या जाणिवेच्या कक्षेत येतो. त्या अव्यक्त "मी" च्या जाणीव कक्षेत आपल्याला अव्यक्त ईश्वराला सुस्थापित करायचे आहे. ईश्वरापेक्षा त्याचा एखादा साक्षात आविष्कार आपल्याला श्रद्धेच्या पलीकडे जाण्यास मदत करेल.

आपण देव्हाऱ्यात देवाच्या मूर्तीकडे ती एक निर्जीव वस्तू म्हणून पाहत नाही. देवाच्या फोटोकडे तो छापील फोटो आहे, असे समजून आपण पाहत नाही. आपली ही अद्वितीय मनोकायिक अवस्था आणि तेथे डोळे मिटून घडून आलेली ती प्रार्थनेची भावपूर्ण घटना हे सर्व कोणताही materialistस्वत: निर्माण वा घडवून आणू शकणार नाही. खरेतर श्रद्धेच्या पलीकडे गेल्याचा हा ठोस पुरावा आहे. तरीही अधिक शंका समाधानासाठी आपण अजून एक साक्षात दृष्टांत पाहूया. "या व्यक्त स्थूल पादार्थिक शरीरात चैतन्यासह अव्यक्त सूक्ष्म "मी" त्या शरीराशी एकजीव होऊन कार्यास प्रवृत्त होणे" ही संपूर्ण घटनाच आपण त्यापलीकडील परम शक्तीची आहे असा निष्कर्ष काढू शकतो. कारण भाजीला फोडणी दिल्यासारखे या शरीराची जडणघडण सुरू असताना अमुक अमुक क्रिया करून त्यात तुझ्या "मी" ला आम्ही अमुक अमुक दिवशी प्रस्थापित केले असे कोणतेही तीर्थरूप आपल्या मुलांना म्हणत नाही. म्हणून या निष्कर्षावर श्रद्धा अगर विश्वास ठेवायची आवश्यकता नाही. तसेच आपले शरीर आणि त्यातील अव्यक्त असा आपला "मी" हे साक्षात एकमेवाद्वितीय प्रमाण आहे आणि असे दुसरे प्रमाण या जगात इतरत्र कोठेही नाही, ही काळ्या दगडावरची रेखा आहे. ती परम शक्ती म्हणजेच ईश्वर होय. अशा रीतीने श्रद्धेच्या पलीकडे गेल्याशिवाय आता आपल्याला पर्याय नाही. नाहीतर श्रद्धा आणि विश्वास यांच्या नावाखाली जनसामान्यांची लूटमार सुरूच राहील.

*श्रद्धेच्या पलीकडे जो जाई तो ना कधी कष्टी ॥धृ॥*

*अश्रद्ध ते भ्रमिष्ट सापडे श्रद्धेच्या अलीकडे*
*अंधश्रद्ध ते अज्ञानी तिथे उगा स्वत:ला कष्टी ॥1॥*

*विश्वास बंधू श्रद्धेचा परि तो असे अधुरा*

*श्रद्धा न पाही व्यवहार, ती विश्वासा पार जाई ॥2॥*

*ठेवीता श्रद्धा तो देवही येतसे भेटी*
*श्रद्धेसह देवाने निर्मिली अवघी सृष्टी ॥3॥*

*परि सांभाळावया श्रद्धा सदा सतर्क हवेत तुम्ही*
*अन्यथा किती ते भक्त दांभिक आणि भ्रमिष्टी ॥4॥*

*एक साधक सच्चा जो आहे सुबुद्ध शास्त्री*
*श्रद्धा करतो पार घेऊनिया तिला तळहाती ॥5॥*

*ऐसी ज्याने ओलांडली श्रद्धेची ती ओटी*
*परब्रह्म ते विलसे तयाच्या मनोसृष्टी ॥6॥*

# 140. चोरी झाली

ही थोडी दीर्घ कविता आहे. वेळ काढून वाचायला हरकत नाही. हो पण आवडेल तुम्हाला नक्की. आपण आपल्याला ज्या मी पणाने जाणतो, ते आपण नसून आपण वास्तविक निर्गुण मी आहोत. त्याला अध्यात्मशास्त्रात कूटस्थ मी असे म्हणतात. आपल्या सान्निध्यात जो अहं/ मी पणा निर्माण झाला आहे, तो कर्ता व भोगी झाला आहे असे दिसून येते खरे, पण तेही शेवटी आभासी आहे. जोपर्यंत अहं ला त्याची प्रत्यक्ष ओळख होत नाही, तोपर्यंत आभासी सत्यतेला सत्य मानूनच जगावे लागते, कारण तो मी पणाच मुळी आभासी आहे. हे असे का? तर इथे काही तरी अघटीत घडले आहे. काय अघटीत घडले आहे? इथे एक चोरी झालीये. आपल्या नकळत आपल्या निर्गुण मी तत्त्वाच्या सान्निध्यात दहा इंद्रियांच्या माध्यमातून विश्व ऊर्जा तिच्या अभूतपूर्व क्षमतेने आली आणि तिने मी पणाचा सत्य आभास निर्माण केला. आभास कधी सत्य असतो का? थोडे विचित्र वाटेल, पण हे असेच घडले आहे असे अध्यात्म शास्त्र सांगते. तो जीव कर्ता आणि भोक्ता यांचा अभिनिवेश घेऊन जीवन जगू लागला. पुढची कथा कवितेत नमूद केली आहे.

*चोरी झाली त्या निर्गुण मी तत्त्वाची ॥*
*आज सांगतो कथा त्याच्या बंधमुक्ततेची ॥धृ॥*

*निर्गुण निर्विकार निराकार आणि ॥*
*निर्गुण तत्त्व ते निरहंकार सदानंदी ॥1॥*

*बुध्दिमत्तेच्या सर्वोच्च शिखरावरी ॥*
*असंख्य अमर्याद मांदियाळी क्षमतांची ॥2॥*

*बांधुनिया त्या क्षमतांना काखोटी ॥*
*दहा चोरांची निघाली हो सवारी ॥3॥*

*गाठीला तो "मी" इथे त्या दश इंद्रियांनी ॥*

*धरीले त्याला जाळे क्षमतांचे ते टाकूनी ॥4॥*

*तत्क्षणी सळसळे तेथे वीज ही चैतन्याची ॥*
*जाणीव झाली जीवाला त्याच्या मी पणाची ॥5॥*

*गर्वभिमानाचा कोट मी पणाला घालुनी ॥*
*जोडीला त्याला त्या भ्रांतीच्या दावणी ॥6॥*

*असोनि जग आभासी भासविले ते सत्यची ॥*
*भागविली भूक त्यांनी आभासी वासनांची ॥7॥*

*मायेत गुंतुनिया थकली दशेंद्रिये ती किती ॥*
*तरीही अलिप्तची असे सदा तो निर्गुण मी ॥8॥*

*पश्चात्तापे अहं तो परिणाम आता भोगी ॥*
*पळाली दशेंद्रिये मागता लेखाजोखी ॥9॥*

*व्याकुळला जीव अन् आर्त उठले मनी ॥*
*मदतीला त्याच्या विवेक येई हो सत्वरी ॥10॥*

*केली गुरुसेवा अन् निस्सीम भगवदभक्ती ॥*
*वैराग्याची चादर ओढून झाला तो निवृत्ती ॥11॥*

*विवेके जाणिले वेदवाक्य ते "अहं ब्रह्मास्मि" ॥*
*लपेटला त्याने देह वैराग्याच्या वस्त्रातूनी ॥12॥*

*आला तो मी पणा त्या मनाच्या स्मशानी*
*योगी तो त्या दश इंद्रियांना देतसे ज्ञानाग्नि ॥13॥*

*लावियले त्याने भस्म भूषण ते सर्वांगी*
*महामाया आता त्याला शून्यत्व तिचे दावी ॥14॥*

*पलीकडे साक्षात उभी निर्गुण श्रीभगवती*
*मध्ये श्रीगुरू मी शरण त्यांचे चरणी ॥15॥*

*न्या हो न्या तुम्ही मजला पैलतीरी*
*कळवळे मी आता त्या श्रीगुरुचरणी ॥16॥*

*श्रीगुरुकृपे गेला मी पणा विलयाशी*
*परमानंदी तो परमानंद होऊनि राहशी ॥17॥*

# 141. जाऊ पंढरीला

एक प्रचंड मोठा भगवदभक्तीचा प्रेममय ऊर्जा स्त्रोत गेली शेकडो वर्षे सर्व दिशांनी पंढरपूरला वाहत आहे. ही वैश्विक ऊर्जा अशी अखंड प्रवाहित होऊन राहणे ही ईश्वराचीच अद्भुत किमया आहे. या वारीचा हा प्रसंग अत्यंत रहस्यमय आहे. ज्यामध्ये कोणीही एक असा प्रमुख नसताना, कोणताही आयोजक वा प्रायोजक नसताना, कोणताही वस्तूविषयात्मक फायदा तोटा नसताना केवळ अपरिमित अशा भक्तीच्या आणि देवावरील प्रेमाच्या कल्लोळात ही लाखो वारकऱ्यांची ऊर्जा उत्साहात पंढरीकडे वाहत असते.

असे सर्व अभूतपूर्व व अगम्य असेल, तर का नाही प्रत्यक्ष देव हा उत्सव पाहण्यास येणार? निश्चितच येणार. त्याच्या प्रत्येक भक्ताच्या दारी जाऊन त्याच्या हाताला धरून त्या भक्तीच्या प्रवाहात तो आणणारच. संतश्रेष्ठ श्री ज्ञानदेव, जगद्गुरू श्री तुकाराम महाराज आणि त्यांच्यासारखे अनेक संत या भक्तांचे वा वारकऱ्यांचे सर्वोच्च प्रेरणास्थान आहे. त्यांच्या अभंगांतून त्या वारकऱ्यांना या संतांची प्रेरणाशक्ती प्राप्त होते. मग भगवदभक्तीमध्ये लीन झालेल्या अशाच एका भक्ताला त्याच्या दारात आलेले पांडुरंग दिसले नाही तर नवलच. दारी आलेल्या विठ्ठलाला पाहून तो वारकरी म्हणतो...

*माझे बापरखुमादेव आले आले मज न्यायला ॥*
*जाऊ माहेरी पंढरी; सवे माझ्या अवघा वैष्णवांचा मेळा ॥धृ॥*

*मम त्राण ज्ञानदेव अन् प्राण झाला अवघा तुका ॥*
*पाहा माझ्यापुढे रखुमाई सवे चाले हा माझा पंढरीचा राया ॥1॥*

*गे विसरीन मी मजला; संसार खेळ हा घालून पालथा ॥*
*तो प्रेमवेग भरला अंतर्यामी आता पाय न ठरे धरणीला ॥2॥*

*काय वर्णू ते पंढरीचे वैभव साक्षात इथे स्वर्ग अवतरला*
*जे जे मी पाहीन ते तो मज दिसे माझा विठू हा सावळा ॥3॥*

*शून्यत्वाच्या गाभाऱ्यात चैतन्याच्या प्रकाश पडला*
*जाईन त्या पंढरी गे जिथे भान नसे मम आत्मभाना ॥4॥*

# 142. विवेक माझा भ्रतार

पती हा केवळ त्याचे नाते सांभाळणारा सर्वसामान्य पती नसावा तर सांसारिक जबाबदारीतून मोकळे झाल्यावर तो त्याच्या पत्नीचा अध्यात्मिक मार्गदर्शकसुद्धा झाला पाहिजे. सांसारिक उपभोगांच्या पलीकडे यशस्वीपणे जाण्यासाठी हे नाते अभूतपूर्व प्रगती करू शकते.

साधक जेंव्हा त्याची उपासना करत असतो आणि आध्यात्मिक प्रगती करत असतो, त्यावेळेस त्याचा विवेक त्याला आत्यंतिक मार्गदर्शक ठरतो. जणू साधकाच्या जीवात्मरूपी नववधूसाठी हा विवेक तिचा भ्रतार म्हणून तिला शोभून दिसत आहे. हा विवेक त्या जीवात्मरूपी वधूला श्रीगुरूपर्यंत घेऊन जातो आणि या मायेच्या पार जाण्यास जीवात्म्याला मदत करतो.

*विवेके केले भ्रतार तेणे मज सद्बुद्धी अलंकृत केले ॥धृ॥*

*वैराग्याचा लावियेला कुंकुम तिलक तयाने ॥*
*जीवन मंडपी शांतीचे शुभ तोरण बांधियले ॥1॥*

*सत्याचा रंग खेळला तयाने मन माझे विशुद्ध केले ॥*
*तटस्थतेचे मज देऊनिया वस्त्र मायेपासून दूर केले ॥2॥*

*श्रद्धेचा ओलांडूनी उंबरा मज साधनसंसारी रमविले ॥*
*पेटवूनी सतर्कतेचा दिवा मज सम्यकशयनी बैसविले ॥3॥*

*तयाचे केला संग तेणे मज भक्तीरत्न प्रसविले ॥*
*देवाप्रती उठला कल्लोळ प्रेमाचा मी आनंदाश्रुंनी भिजले ॥4॥*

*श्रीगुरुचरणी मज वाहिले तयाने तेथे मी माझी न राहिले ॥*
*आत्मभान हरपता तेथे साधनेत केला सांभाळ तयाने ॥5॥*

*ऐसा हा विवेक भ्रतार माझा ज्याने मज भवपार उतरविले. ॥*
*विवेके केले भ्रतार तेणे मज सद्बुद्धी अलंकृत केले ॥6॥*

# 143. संसाररूपी आखाड्यात

आपण या मायावी दुनियेत जन्म घेतला की आपल्यासमवेत आपली पाच ज्ञानेंद्रिये शरीराच्या माध्यमातून आपल्याला प्राप्त होतात. विश्वाच्या या पाच क्षमता भलत्याच ताकदीच्या असतात. या जीवनरूपी आखाड्यात हे पाच मल्ल दंड थोपटून आपल्याला सतत आव्हान देत असतात. ते आपल्यावर षड्रिपूरूपी डाव टाकून आपल्या नियंत्रणाच्या बाहेर जाण्याच्या प्रयत्नांतच असतात. ते आपल्याला दरवेळेस घडून येणाऱ्या संघर्षात नामोहरम करण्याचा प्रयत्न करतात. त्यांना रोखणे वेळप्रसंगी अत्यंत अवघड होते आणि आपल्या शरीर, मन व बुद्धी यामधील शक्तीचा अपव्यय होतो. कधी आपल्याला मान, सन्मान, प्रसिद्धी, संपत्ती इत्यादी तथाकथित वैभवात असल्याचा आभास निर्माण करून देण्यात ही पाच इंद्रिये यशस्वी होतात पण पुढे कोणत्याही क्षणी एका क्षणात माती चारून आपल्याला आसमान दाखवितात.

अशा या संघर्षमय जीवनात जो ईश्वराप्रती ओढ, भक्ती, उपासना या मार्गे एकदेशीय होतो त्यास निश्चितच ईश्वरकृपेने श्री गुरूंची प्राप्ती होते आणि ते त्या साधकाला मार्गदर्शन करतात. या पाच मल्लांच्या कोणत्याही डावांना निष्प्रभ करून त्यांच्यावर विजय मिळविण्यासाठी हे श्री गुरूच आपल्याला मार्गदर्शन करतात आणि शेवटी त्या परमात्मा पित्याच्या चरणी आपल्याला समर्पित होण्यास साहाय्य करतात.

या रचनेची संकल्पना श्री गुरू अर्जुन देव जी यांच्या "गुरमुख लाहा ले गये" या मूळ रचनेवर आधारीत आहे. तथापि हे त्या मूळ रचनेचे भाषांतर नाही. कुस्तीच्या फडाची संकल्पना दोन्ही रचनेत सारखीच आहे.

*संसाररूपी या मायावी आखाड्यात ॥*
*लावूनिया तू जीवन कुस्तीचे फड ॥धृ॥*

*कसा शांतचित्ते तू हा पाहतसी खेळ ॥*

*ही आता मजवर कशी आली वेळ ॥1॥*

*कोण कुठला मी असे हा अशक्त ॥*
*तरी उतरले पाच मल्ल माझ्या विरोधात ॥*

*हा न्याय असा झाला या विश्वात ॥*
*पाहा ही जीवन कुस्ती लागली या रिंगणात ॥2॥*

*षड्रीपुंचे डाव टाकूनी मज डोक्यावर घेती ॥*
*मग उचलूनिया मज खाली टाकिती ॥*
*शरीर मन बुद्धीला किती हे कुटती ॥*
*मम प्रयत्नांती तरी त्यांचीच होते सरशी ॥3॥*

*आता तुझ्यावर मी खिळविली नजर ॥*
*तू दयाळा कर कृपा आता मजवर ॥*
*सोडीन प्राण मी तेंव्हाच विजयपताका फडकविल्यावर ॥*
*भेटवि मजला ते पट्टीचे गुरुवर्य सत्वर ॥4॥*

*देता त्यांनी पाठीवर केवळ एक थाप ॥*
*पळतील रिंगणातून पंच-मल्ल आपोआप ॥*
*विजय पताका येता घेऊनिया देवा तव समीप ॥*
*मग वाहतील गुरू तव चरणी हा मम-आत्मदीप ॥5॥*

# 144. या अनाम गावी

*अस्तित्व नावाच्या या अनाम गावी*
*कसा आलो इथे कुठून आला हा मी... ॥धृ॥*

*बेअंत इथे शृंखला त्याची ही कार्यकारणे*
*ज्ञानंध मी इथे परिणामांचे कडे चहुकडे ॥1॥*

*जरी वाटे भोगी कधी ते दु:ख इथे मी*
*परि हात धरूनी पुढे मदमाया मज नेई ॥2॥*

*पाहा सुखाची ती किती विविध दालने*
*मदमायेने पाजिले मम तृष्णेचे ते प्याले ॥3॥*

*भ्रांतीच्या भूवर रचुनी इमले वासनांचे*
*षड्रिपू लाविले कामी रक्षण त्यांचे मी केले ॥4॥*

*चुकविले असेच मदमायेला त्या एकदा*
*चाललो दिशा उत्तरेची उजळे अद्वैत-तेज प्रभा ॥5॥*

*पाहिले तिथे मी ते किती दृश्य विलक्षण*
*द्वैतावळ होतसे अदृश्य स्पर्शिता श्रीगुरू चरण ॥6॥*

*स्पर्शिता मी ते श्रीगुरू चरणारविंद*
*मदमाया झाली स्वप्न पुरे एक तो क्षण ॥7॥*

*पाहिले दिशा दिशांमध्ये त्या विरल्या*
*अवकाशाचाही आता वास तिथे नुरला ॥8॥*

*दाविती मज श्रीगुरू स्वप्नमायेचा आखाडा*
*तिथे वास्तवाला आधार आभासी सत्याचा ॥9॥*

*गुणबलांचा समुच्चय कायामन जाणीवक्षेत्र*

*तीच ओळख मानतसे इथे हा जीव प्रत्येक ॥10॥*

*विश्वऊर्जेतुनी वाहे विविध गुणांचे ते पुंज*
*वृत्ती-वासनांचे उठे तिथे कित्येक ते झुंड ॥11॥*

*पाझरे येथे तो डिंक इच्छा-ममत्वाचा*
*ज्यासी म्हणती भ्रांती आभास वास्तवाचा ॥12॥*

*जन्म जीवन मृत्यू ही तर ऊर्जा स्थित्यंतरे*
*त्या अज्ञान वाटेवरती हे स्वप्न सत्य वाटे ॥13॥*

*ज्ञानदृष्टे श्रीगुरू मज दाविती ते बोलती*
*कुठे ती मदमाया आता नसे कुठे रे भ्रांती ॥14॥*

*ऐक एक परब्रह्म असे इथे रे अनंत*
*त्यात असे शून्यत्व पसरले ते दिगंत ॥15॥*

*अगणित विज्ञान-क्षमता शून्यात त्या असे*
*ऊर्जा आणि गुण असंख्य त्यातूनी ते प्रसवे ॥16॥*

*ऊर्जेसवे ब्रह्म तिथे चैतन्य निर्गुण निरहंकार*
*सगुण विश्वाचे असे ते दोन परम-मूलाधार ॥17॥*

*ऐसे पाही अनिर्वचनीय विहंगम विश्वदृश्य*
*जेथे प्रसवे सगुण त्याचा आधार निर्गुण तत्त्व ॥18॥*

*साधुनिया केवळ चैतन्य एक ते लक्ष्य*
*चल ओलांडून जाऊ ते अपार अनंत शून्य ॥19॥*

# 145. नामा तू आमुचा शिंपी

*मनोवस्त्र हे बहुरूपी ॥*
*नामा तू आमुचा शिंपी ॥धृ॥*

*शिकवी नामदेवा आम्हा ॥*
*कसा घालावा हा टाका ॥1॥*

*कसे जोडावे माझे चित्त ॥*
*विठ्ठलाच्या रे नामा ॥2॥*

*संतश्रेष्ठ श्री नामदेवा ॥*
*तुम्ही लाडके त्या विठ्ठलाला ॥3॥*

*घालुनी त्याने भक्तीचा डगला ॥*
*तुम्हा स्वर्ग दाविला आयता ॥4॥*

*तू दयाळा रे विठ्ठला ॥*
*तू शिव मला भक्तीचा डगला ॥5॥*

*ही भक्ती मी वाहीन ॥*
*होऊन तुज चरणी लीन ॥6॥*

*तुझी शिलाई मी चुकविन ॥*
*तुझिया चरणी प्राण अर्पून ॥7॥*

# 146. घट घट वासी

*तू घट घट वासी, मम हृद निवासी ॥*
*जेथे मी जाई तेथे मज तू पाही ॥धृ॥*

*तू बुद्धी प्रकाशी तरी तू ना दिसशी ॥*
*तुज पाहण्या ती स्वयं अंध अशी ही ॥1॥*

*चर्मचक्षु केवळ स्थूल ते पाहती ॥*
*कैसे मी तुज पाहू जरी तू सर्वनिवासी ॥2॥*

*सिद्ध म्हणती तू वसे मनमंदिरी ॥*
*त्यातून तू विश्व कसे ते पाहसी ॥3॥*

*माझे पाहणे ते तू मज पाहविशी ॥*
*माझे संचित ते तू मज दाखविशी ॥4॥*

*माझ्या जाणिवा त्या तू जाणविशी ॥*
*माझे बोलणे ते तू मज बोलाविशी ॥5॥*

*माझे चित्त जरी तव तेजराशी ॥*
*तरी मी अंध अजाण स्वस्वरूपी ॥6॥*

*तू सृष्टीकर्ता तू सर्वस्वव्यापी ॥*
*परि तूज पाहण्या तू सुद्धा अपयशी ॥7॥*

*जर मी हा अंध अन् तू असा अपयशी ॥*
*तर आपण दोघे ती एकची रे असती ॥8॥*

*कैसे हे कोडे तू तुज घालीशी ॥*
*निर्मुनी "मी" ती माया भोगिशी ॥9॥*

*तू आणि मी मध्ये ती माया-शक्ती ॥*
*भेटव गुरू भोगीन अहं ब्रह्मास्मि ॥10॥*

# 147. प्रतिपालक तू

पंजाबी भाषेमध्ये श्री गुरू अर्जन देव जी यांचे "प्रतिपाले नितसार समाले.." हे अतिशय सुंदर भजन असून त्यावर आधारीत ही रचना झाली आहे. तथापि मूळ रचनेचा हा थेट अनुवाद नाही.

या रचनेमध्ये आलेली गरीब, दीन, तिनका, बावळा, मुका, अज्ञानी, पामर, दुबळा इत्यादी विशेषणे पाहून स्वतःबद्दल नकारात्मक भाव निर्माण होतील असे क्षणभर वाटते. देवाने आपल्याला भौतिक पातळीवर असे जीवन दिले आहे की यातील एकही विशेषण या भौतिक चौकटीत आपल्याला लागू होत नाही. पण जेंव्हा आपण आध्यात्मिक पातळीवर मनाच्या माध्यमातून देवाची भक्ती करत असतो तेंव्हा मात्र त्याच्या अनंत क्षमतांच्या पुढे आपल्याला ही विशेषणे लागू होतात. ही विशेषणे आर्थिक शारीरिक अवस्थेशी निगडित नाहीत, तर ती मनाच्या अवस्थेशी निगडित आहेत कारण मनाने स्वतःच्या क्षमतांची कितीही जमवाजमव केली तरी ईश्वर शक्ती समोर ती कमीच असणार आहे.

*प्रतिपालक तू आमुचिया जीवांचा ॥*
*गरीब आम्ही तू दयाळ दीनांचा ॥धृ॥*

*अपरंपार तू अंत नसे तुज ठावा ॥*
*रोमरोमी मम नीज भाव हा उठला ॥1॥*

*श्रेष्ठ मानी जो हा प्राणी स्वतःला ॥*
*तू अमाप इतुका जेथे तो एक तिनका ॥2॥*

*बावळा जीव हा जोखे तुज कृपाळा ॥*
*परि संकटी देवा तूचि रक्षे तयाला ॥3॥*

*निर्गुण तू निराकार रे निरंकारा ॥*

*मी हा असे मुका वर्णना तुझिया ॥4॥*

*अज्ञानी मी वेग मतीचा आकुंचला ॥*
*नितनेम आता येई मम आधाराला ॥5॥*

*म्हणे सिद्ध तू पल्याड आकाशाच्या ॥*
*पामर मी कसे रे भेदू त्या शून्यत्वाला ॥6॥*

*तारले तू देवा त्या कित्येक पापियांना*
*गर्भवासी तू आता न पाठवि मजला ॥7॥*

*कृपाछत्र तुझे तयात मी हा दुबळा*
*शेवटचा श्वास माझा चिरंतन व्हावा ॥8॥*

# 148. मन हताश हताश

*मन हताश हताश तू दिसेना दिसेना ॥*
*अंतर्बाह्य तू...मी अंध रे तुज पाहण्या ॥धृ॥*

*मन हताश हताश तू भावेना भावेना ॥*
*सगुण माझे भाव न आकळति निर्गुणा ॥1॥*

*मन हताश हताश तू कळेना कळेना ॥*
*इथे द्वैताच्या जाणिवा तू पल्याड अद्वैताच्या ॥2॥*

*मन हताश हताश मी गर्दीत हा एकला ॥*
*आस तुझी एक काही विचार ना अन्यथा ॥3॥*

*मन हताश हताश ही कसली परीक्षा ॥*
*तू अन् मी एक परि मध्ये पडदा हा मायेचा ॥4॥*

*मन हताश हताश तू भेटता भेटेना ॥*
*कसा भेटशील मला सांग कोणत्या उपाया ॥5॥*

*मन हताश हताश दिसे सर्वत्र निराशा ॥*
*होता पूर्ण समर्पण प्रकटे दिव्यत्वाची आशा ॥6॥*

*मन हताश हताश हा मार्ग सापडेना ॥*
*कृपा तुझी व्हावी ऐसी मज गुरूराया हा भेटावा ॥7॥*

*मन हताश म्हणूनि चरणी वाहिले हा माथा ॥*
*जरी जातील रे प्राण ना सोडील चरणा ॥8॥*

*मन हताश इथे हा मदभाव आर्ततेचा ॥*
*तुझे हृदय पाझरू दे.. दे एक घोट अमृताचा ॥9॥*

# 149. मेरी मां

नमस्कार,

मित्राचा त्याच्या स्व. आईसोबतचा फोटो पाहून झरकन् काही ओळी सुचल्या. नंतर सगळे थांबले. काय झाले म्हणून मनात डोकावलो तर तिथे हृदभाव नावाने कोणीतरी शब्दांची आतुरतेने वाट पाहात होते. शब्द बहुधा संपत आले होते. जे जे शब्द येत होते त्यांच्यामध्ये एक आदब होती. हृदभाव त्या प्रत्येकाला त्यांच्या जागी आदबीने बसवत होता. पण पुन्हा सर्व थांबले. का? तर शब्द संपल्याने हा हृदभाव इतका आर्त झाला की त्याचे अश्रू झाल्याचे माझ्या लक्षात आले. माझे लिहिणे थांबले आणि अपूर्णतेची जाणीव झाली. मातृत्वाचे वर्णन करणारे शब्द उपलब्ध होऊ शकणार नाही इतके ते पूर्ण आणि अनंत आहे. ना आई ना लेकरू कोणीच त्या ईश्वरीय मातृत्वाचे वर्णन करू शकत नाही. त्याचा अनुभव घ्यावा आणि तो शब्दातित असल्याचे समजल्यानंतर त्या हृदभावाने अश्रू रूपाने वहावे अशीच ही विश्व रचना आहे. याच त्या अभिजात अपूर्णतेच्या कोंदणात आईची महती आजपर्यंत लिहिली गेली आहे आणि जगाच्या अंतापर्यंत ही अपूर्णता अभेद्यच राहणार आहे यात शंका नाही.

*धन धन हुआ मैं मुझे ममता जो मिली तेरी.. ॥*
*भगवान हैं तू, मुझे अस्तित्व दिया तू मेरी माई ॥धृ॥*

*कैसे जाऊं पार उपकार हैं अपार तेरे ॥*
*हर जनम मेरा होगा मां तेरी ही गोद में ॥1॥*

*दर्द ए दिल को कैसे करु बयाँ जो तू नही हैं अब ॥*
*इस दुनिया में बने ही नही हैं कोई ऐसे लब्ज ॥2॥*

*परवरदिगार तू ही एक जो दर्द जाने है मेरा ॥*
*बता तू कैसे हैं जिता सिवा मां के छत्र बिना ॥3॥*

*सिंचू मैं तेरी यादे अब आंसूओं की धारा से ॥*
*छोड़ूं मैं आखरी सांस मां तेरी ही पुकार से ॥4॥*
*आता लिहवत नाही...*

# 150. तव चरण रज कण ते उठले

*पाहा देवा तव चरण रजकण हे उठले ॥*
*त्यातील कण जणू असे मूळ त्या ब्रह्मांडाचे ॥धृ॥*

*जगतो भाव ऐसे, जैसे मीच इथला मालक असे ॥*
*परि शेवटी हा भाव धुळीस का हो मिळतसे ॥1॥*

*अज्ञानवश ते इमले रचितो इच्छा-वासनांचे ॥*
*विचारबीजाला अंकुर यावे करुणा, शील अन् प्रज्ञेचे ॥2॥*

*मायंध हा असा इथे मी, जीवन जगतो भ्रांतीचे ॥*
*द्यावी मजला सुबुद्धी अथर्व, जिंकेन शिखर विवेकाचे ॥3॥*

*दिसती मजला द्वंद्व इथे अन् भेदाभेद हा होतसे ॥*
*अद्वैताची ज्योत प्रकटू दे मम अंतर्चक्षूमध्ये ॥4॥*

*गुणावगुणांना येता वेग, कारण-परिणाम ते पातले ॥*
*शृंखलांना त्या तोडण्या येथे, आध्यात्मिक बल मज दे ॥5॥*

*सगुण मी पाही, परि ना पाही ॥*
*अशा दिव्य दृष्टीचे मज वरदान तू दे ॥6॥*

*निर्गुण मी पाही अन् वर्णन तयाचे करी ॥*
*अमृत वाणी ऐसी, मजकडून वदवून तू घे ॥7॥*

*वैराग्याच्या क्षितिजावर सात्त्विकतेचा सूर्य उगवू दे ॥*
*रज-तमांची वाफ होता, सर्वस्व मम सूर्यस्थ होऊ दे ॥8॥*

*अस्तित्वाच्या क्षमता माझ्या अनंतात अनंत होऊ दे*
*शून्यमंडळी तिथे लय लयाचा होऊन जाऊ दे ॥9॥*

# 151. भवरोग उतारा

*कित्येक रोग इथे मारिती शरीरे ॥*
*परि त्यावर असे औषधांचे उतारे ॥धृ॥*

*इथे माझिया मनात हा  भवरोग ॥*
*जुनाट असे हा म्हणती यास भोग ॥1॥*

*भवरोग होता सदा मी माझे म्हणती ॥*
*षड्रिपू मला ते किती हो डसती ॥2॥*

*मी भयभीत लोभी काम क्रोधी ॥*
*द्वेष मत्सर मज झाली भवभ्रांती ॥3॥*

*त्यावरी ना कोठे सापडे उतारा ॥*
*कोणताही वैद्य इथे हो चालेना ॥4॥*

*मज भवरोग या संसाराचा ॥*
*त्यावर उतारा प्रभू श्रीराम नामाचा ॥5॥*

*ठेवता मस्तक देवाच्या चरणी ॥*
*भवरोग हा जाईल त्या क्षणी ॥6॥*

*शील ते पथ्य घ्यावे चूर्ण त्या प्रज्ञेचे ॥*
*साधना असावी जसे काढे करुणेचे ॥7॥*

*भेटावा मज वैद्य श्रीगुरू ग्रंथरूपी ॥*
*मिळेल हा उतारा या भवरोगावरती ॥8॥*

# 152. श्वास

*श्वासातून मी असे जगावे ॥*
*जगताना मी मला शोधावे ॥धृ॥*

*श्वासात मी मजला पाहावे ॥*
*द्रष्ट्यासह दृश्य एक व्हावे ॥1॥*

*श्वासांशी मी असे गुज करावे ॥*
*बोलणे तिथे ते मौन व्हावे ॥2॥*

*श्वासांनी मी मला स्पर्शिता ॥*
*मी तिथे अस्पर्शित व्हावे ॥3॥*

*श्वासांना मी असे ऐकावे ॥*
*कर्ण माझे प्रशांत व्हावे ॥4॥*

*श्वासांसह मी गंधित व्हावे*
*अमृतगंधी मी धुंद व्हावे ॥5॥*

*कुंभकी तुझे ब्रह्मांड वसावे ॥*
*रेचकी भोगावे तुझे शून्यत्व साजिरे ॥6॥*

*श्वासांनी मज असे जगवावे ॥*
*थांबण्यापूर्वी अमरत्व द्यावे ॥7॥*

# 153. अजनबी

आपल्या प्रत्येकालाच मी, माझे आणि मला या जाणिवा असतात. कधी कधी ह्या तीन जाणिवा त्यांच्या मर्यादा ओलांडतात आणि आपल्याला संभ्रमात पडायला होते. आपले शरीर ही वास्तव सत्यता आहे, तर आपले "मी-माझे-मला" हे अदृश्य म्हणून आभासी सत्यता प्रकट करतात.

निर्गुण ऊर्जा आणि निर्गुण ब्रह्म यांच्या संयोगातून सजीवांच्या मनामध्ये "निर्गुण मी" निर्माण झाला. ज्याला कूटस्थ असे अध्यात्मात संबोधतात. या "मी" रूपी सर्वोच्च संवेदना जेंव्हा चैतन्याश्रित मनाच्या क्षेत्रातून संक्रमित झाल्या तेंव्हा तेथे "मी-माझे-मला" हा प्रतिसाद निर्माण झाला. निर्गुण ऊर्जा आणि निर्गुण ब्रह्म ही दोघे या भौतिक विश्वात अनोळखी किंवा अजनबी आहेत. त्यांचे अधिष्ठान विज्ञान आणि अध्यात्म यांनी अधोरेखित केले आहे खरे, पण ते आपल्या सर्व जाणिवांच्या पलीकडे आहेत. ते निर्गुणत्वच खरे तर आपली ओळख आहे.

हे तीन घटक संपूर्ण मायावी द्वंद्वात्मक असा जीवनपट आपल्यासमोर निर्माण करतात आणि तो चालवितात. अन्यथा एका आपल्या चैतन्यमयी निर्गुण व अद्वैत स्वरूपाशिवाय इथे काहीही नाही असे वेदांतामध्ये व सर्व धर्मग्रंथांमध्ये लिहून ठेवले आहे.

आता साधक म्हणून आपणच आपल्याला आपल्या निर्गुण स्वरूपात ओळखून त्यामध्ये स्थिर व्हायचे आहे. त्यासाठी "मी-माझे-मला" हे प्रत्यय शरीर, मन व बुद्धीसह ज्या ज्या घटकांना लागू होतील त्यांना ध्यान यज्ञात आहुती द्यावयाची आहे. या ठिकाणी या तिघांनी निर्माण केलेल्या द्वंद्वातून, संघर्षमय असा जो अग्नी निर्माण झाला आहे, त्यामध्ये या तिघांना आधारभूत होणाऱ्या शरीर, मन व बुद्धीला समर्पित करावयाचे आहे. त्यातून जो अद्भुत असा प्रकाश निर्माण होईल त्यामध्ये त्या अजनबीला त्याची स्वत:ची निर्गुण

ओळख होईल आणि पुन्हा तो या "मी-माझे-मला" पासून कायमचा अलिप्त होऊन राहील.

*लगता हैं यहां कोई अजनबी हैं भाई ॥*
*मैं, मुझे और मेरा इनका न हैं यहां कोई ॥धृ॥*

*कहांसे आते हैं तीनोफ्ल उस अजनबी को हैं चिपकते ॥*
*खुद ही रचते हैं माया इस अजनबी को नचाते नचाते ॥1॥*

*करके टुकडे अब इस अजनबीने उस के तनमन धी के ॥*
*जलाया उनको इस द्वंद्व की चिता में ॥2॥*

*इसकी ज्वाला से प्रकाश जो उठेगा ॥*
*उस ही में इस अजनबी को पहचाना जाएगा ॥3॥*

*अब इस अजनबी का वही हैं भाई डेरा ॥*
*जहां न मिलता हो कभी उसे मैं, मुझे और मेरा ॥4॥*

# 154. ये ग माझे माई

*ये ग माझी माई तू साक्षात निर्गुण रुपिणी ॥*
*मी सगुण तुझे स्वरूप कैसे ते जाणी ॥धृ॥*

*ये ग माझी माई तू साक्षात शून्यस्वरूपिणी ॥*
*शून्यातूनि मी उपजे परि शून्य न ते मी जाणी ॥1॥*

*ये ग माझी माई तू साक्षात सात्त्विकरुपिणी ॥*
*रज तमांनी मज केले भ्रांत तुज मी कैसे जाणी ॥2॥*

*ये ग माझी माई तू सगुणस्वरूप ही मूर्ती जशी ॥*
*भ्रांतीने हा इथे मी अंध तुज ते कैसे पाही ॥3॥*

*ये ग माझी माई तव शून्यातून क्षमता त्या प्रसवे ॥*
*मी असे तव क्षमतांचा पुंज त्या क्षमतारूपे तू प्रकटावे ॥4॥*

*मी गाईन ग स्वरूप तुझे, तू वाणी होऊन आली ॥*
*मी पाहीन ग स्वरूप तुझे, तू दृष्टी होऊन आली ॥5॥*

*मी ऐकीन ग ऐश्वर्य तुझे, तू कर्ण होऊन आली ॥*
*मी स्पर्शिन ग तुझिया चरणा, तू स्पर्श होऊन आली ॥6॥*

*तुव पूजा असे परम सुगंधित, तू गंधित अशी झाली ॥*
*जे जे मी अनुभवी विश्व बाह्यांतरी ॥7॥*

*त्याचे मूळ असे ग निव्वळ ते निर्गुणी ॥*
*गुणसंक्रमण होता तव ऊर्जेतूनी ॥8॥*

*ते ते भासे ग मला असे हे सगुणी ॥*
*ऐसे आता मी अनुभवे तव विश्वाधिष्ठान ते निर्गुणी ॥9॥*

*कृपा तू केली मजवर दिली मज ही दिव्य ज्ञानदृष्टी ॥*

*ऐसी या अपूर्व क्षमतारूपे तू नित्य वसे या मनी ॥10॥*

*भ्रांतीचे करण्या निर्दालन माई तू झालीस भवतारिणी ॥*
*दे मजला वरदान असे मन ते सात्त्विक होई ॥11॥*

*दे मजला वरदान असे ते शून्यत्व प्रकटे मम कायी ॥*
*दे मजला वरदान क्षणी एका निर्गुणची व्हावे मी ॥12॥*

*तुझेच मी स्वरूप असे ही जाण राख माझे मनी ॥*
*तुझिया स्वरूपे मिलन व्हावे माझे ग या जन्मी ॥13॥*

# 155. कन्यादान

उत्तरेकडील श्री शेख फरीद जी, श्री गुरू कबीरजी, श्री अर्जुनदेव जी, श्री गुरू नानक जी अशा अनेक संतश्रेष्ठांनी जीवात्म्याला नववधू आणि परब्रह्माला पतीची उपमा देऊन अनेक उत्तमोत्तम रचना केल्या आहेत. त्याच धर्तीवर ही एक लहानशी रचना झाली.

*श्रीगुरू माझी माता श्रीगुरू माझे पिता ॥*
*तव कृपाशिर्वच द्यावे माझ्या ह्या सौभाग्या ॥धृ॥*

*शुभकार्य हे विश्वरचित ती माझी गती, ॥*
*तव कृपा होता होतील परब्रह्म माझे पती, ॥*
*तुम्ही मिटवा माझ्या या प्रदीर्घ पती-विरहा ॥1॥*

*ना वर्णन असे ना चिन्ह अलेप्य माझा पती परमेश, ॥*
*तुम्ही द्यावी मज अद्वैतदृष्टी अशी ती विशेष, ॥*
*त्या निर्गुण ज्योतीने मी पाहीन परमात्म्याला ॥2॥*

*किलमिश ते जावे जन्मजन्मांतरीचे, ॥*
*निर्मल व्हावे मन त्यात आत्म-बिंब उमटावे, ॥*
*तुम्ही साहाय्य करा माझे या अध्यात्म-शृंगाराला ॥3॥*

*द्यावे मज महावस्त्र ते प्रखर वैराग्याचे, ॥*
*द्यावे मज ते अलंकार अष्टसात्त्विकतेचे, ॥*
*लावा कुंकुम तिलक मज हा सद्सद्विवेकाचा ॥4॥*

*मज हाती रंगवा मेंदी ही कारुण्याची, ॥*
*शीलतेचे काजळ व्हावे शोभा या नेत्रांची, ॥*
*द्या मज हाती ती प्रज्ञास्वरूप वरमाला ॥5॥*

*चालेन मी आता भावभक्तीची ही सप्तपदी, ॥*
*समर्पित व्हावे सर्वस्व या शुभ लग्नवेदी, ॥*
*व्हावे कन्यादान माझे त्या अविनाशी ईश्वराला ॥6॥*

# 156. अंतर्बाह्य मी व्हावे आकाश

*अंतर्बाह्य मी व्हावे अवकाश, अदृश्यति तिथे सकल भवपाश ॥*
*आकाशा तू असे जरी सर्वव्याप्त, तुझ्यासवे मी व्हावे सर्वालिप्त ॥धृ॥*

(सर्वालिप्त = सर्वांहून अलिप्त)

*स्फुल्लिंग तुझे ते अद्वैतानंत, माझ्यातून ते मज व्हावे प्रतीत ॥*
*आकाशा तू असे पूर्णत्वाचे उपाधिक, ना काही कधी त्यातून होतसे उणे-अधिक ॥1॥*

*शून्यत्वाचे तू असे परम निधान, त्या शून्याचे मी व्हावे रे विधान ॥*
*तुझिया गर्भी होई चौघांचा विस्तार, आता माझ्यातून त्यांनी तुज करावे साकार ॥2॥*

(जल, वायू, अग्नी आणि पृथ्वी ही चौघे अवकाश शून्यातून निर्माण होतात अशी वेदवाणी आहे. अवकाश हे अनंत क्षमतांचे ऊर्जा क्षेत्र आहे, हे आता क्वांटम शास्त्र सिद्ध करते.)

*रचावी त्यांनी योगसाधनेची पायरी, काया माझी व्हावी तुझ्या शून्याची उंबरी ॥*
*"ओलांडूनी तुझी शून्याची उंबरी, आत्मराज पाहे स्वस्वरूप परब्रह्माच्या उदरी" ॥3॥*

*ऐसी आहे अक्षय्य ती संतांची वाणी, शोभतील आत्मराज ते निर्गुणाच्या कोंदणी ॥*
*ऐसे जी साहाय्य तू करावे मज आता, प्रसव तू मज तूझ्यातून तूचि माझी माता ॥4॥*

# 157. जगद् मिथ्या

*मृग सापडे फास्यामध्ये ॥*
*तळमळे तो अति आकांते ॥धृ॥*

*तैसे अडके जीव भवबंधने ॥*
*भ्रांतीच्या या फसव्या फासे ॥1॥*

*जलविना ती मासोळी मरे ॥*
*ती ना जगे कोणत्या उपाये ॥2॥*

*तैसे जीव क्षणोक्षणी मरे ॥*
*श्रीगुरू ना तयाला जर कुठे दिसे ॥3॥*

*जे मन चाखेल संतरसामृत ॥*
*श्रीगुरू तयाला भेटी निश्चित ॥4॥*

*भेदतील ते रहस्य आपुले ॥*
*मायेत दाविती ब्रह्म एकले ॥5॥*

*पडतील गळून भवबंधन फास ॥*
*होईल जीवन जगदाभास ॥6॥*

*जीवन उद्दिष्ट इतुकेच असे ॥*
*''जगद् मिथ्या ब्रह्म सत्य'' जाणणे ॥7॥*

मिथ्या = अनिर्वचनीय = सत्-असत् असे एकाच वेळी प्रकटते.

# 158. भेटल्या एकदा

*भेटल्या एकदा श्रुती आणि प्रज्ञा ॥*
*भाव तिथे माझा नतमस्तक झाला ॥धृ॥*

*साक्षी ठेवून शून्य अवकाशाला ॥*
*म्हणाल्या चल मांडू तुझा लेखाजोखा ॥1॥*

*जोपर्यंत तुझ्यात आहे तू तुझा ॥*
*तोपर्यंत लागू हा तुला तुझा लेखाजोखा ॥2॥*

*म्हणाल्या ओळख तुझी लिही जरा ॥*
*ही काया माझी हा मी माझा ॥3॥*

*चुकलं काही याची जाणीव झाली मला ॥*
*दोघींनी पाहिले विस्मये वदल्या त्या मला ॥4॥*

*क्षमतांचा पुंज असे तुझी काया ॥*
*त्यात ही अदृश्य मनरूपी ऊर्जा ॥5॥*

*गुणांचे संक्रमण या ऊर्जेतून होता ॥*
*पाहा कशी प्रकटे ती आभासी सत्यता ॥6॥*

*जाणिवांचा ओघ तू हा तुझा कसा मानला ॥*
*मालकीचा भाव हा कोठूनी तू आणला ॥7॥*

*वदल्या पुन्हा त्या दोन्ही माता ॥*
*अरे तृष्णा तर सोड मृगजळ पण नाही उपमेला ॥8॥*

*भ्रांतीतून तू स्थापिले या तव विश्वाला ॥*
*अनाथ रे आहे भाव ते "मी माझे अन् मला" ॥9॥*

*इच्छा वासना आकांक्षा या तर निव्वळ कल्पना ॥*

*वृत्ती प्रवृत्ती निवृत्ती तर कधीच नाही निपजल्या ॥10॥*

*मानिले तू सत्य आभासी त्या षड्रिपुंना ॥*
*संघर्ष करण्या इथे जुंपले तू विश्वक्षमतांना ॥11॥*

*अरे काहीच इथे घडत नाही पाहा ना तू जरा ॥*
*कसा आम्ही मांडू तुझ्या भ्रांतीचा रे लेखाजोखा ॥12॥*

*दिङ्मूढ मी होता त्या म्हणाल्या पुन्हा ॥*
*प्रस्थापित कर त्या सुसंवादी भ्रांतीला ॥13॥*

*जाणून घेशी जर तू तूझ्या आत्मतत्त्वाला ॥*
*तू असून नसशील इथे ही भवबंधने भोगायाला ॥14॥*

*अरे स्रोत तू निर्गुण चैतन्याचा ॥*
*चिरंतन तू पुतळा अद्वैताचा ॥15॥*

*चल नेऊ आम्ही तुजला ॥*
*त्या श्रीगुरू परमपदाला ॥16॥*

*जाणशील तिथे तू अक्षय्य अद्वयाला ॥*
*जीवन अन् मृत्यू तटस्थतेने पाहायला ॥17॥*

# 159. जन्मों का प्यासा

*जन्मोंका था मै जो यह प्यासा, ॥*
*गोबिंद नाम मिला इक अमृतसा ॥धृ॥*

*नाम हरि का जो परमानंदसा, ॥*
*मिटे सब द्वय नासे विश्वाभासा ॥1॥*

*वेदन-संवेदन अब एक सपनासा, ॥*
*वासन-वृत्ती सब लागे अछूतसा ॥2॥*

*भाव-भगतसे होवे पार श्रद्धा विश्वासा ॥*
*तेरा नाम जैसे श्रीसद्गुरू का दिलासा ॥3॥*

*हरीनाम साक्षात जो स्वरूप अद्वयसा, ॥*
*मंगलमय वाणीसेही वह होवे अपनासा ॥4॥*

*देखा देखी विश्व की जो खेल इक घडीसा, ॥*
*सगुण निर्गुण आगे, पीछे तू चैतन्यसा ॥5॥*

*सहेज सुलभ उपजे इक मनो-अभिलाषा, ॥*
*मैं ना रहु कही जो इस हृद प्रकटे तू सांचा ॥6॥*

# 160. ओढी जो चुनरी

*ओढी जो चुनरी श्रीराम नाम की, ॥*
*माया से अब मै ना होऊ री मैली... ॥धृ॥*

*भावभक्ती से बनी  उसकी बुनाई सत्व की, ॥*
*निःशंक निर्भ्रम और निर्भय मैं भई री... ॥*
*दाग ना लग्गे कभी ऐसी है यह चुनरी, ॥*
*जीवन अब सब हैं श्रीराम की मरजी... ॥1॥*

(मरजी = मर्जी)

*श्रीराम प्रेम से वह इतनी रंगीन भई री, ॥*
*उस प्रेम रंग मे अब रत जांऊ मैं कितनी... ॥*
*सुदबुध इस मन की सब बिसर गई री, ॥*
*कौन हुं मैं अब तू बता रे सखी री... ॥*
*परमेशर खुद उनका हैं बिरद राखे जी, ॥*
*सांस सांस प्रतिपाल श्रीराम करे जी... ॥2॥*

(बिरद = ब्रीद, वचन)

*चरणधूल पाने उनकी, मैं वारी जांऊ री ॥*
*मैं वारी जांऊ री लख लख लख बारी जांऊ री ॥3॥*

(लख बारी = लक्ष वेळा)

*पारब्रह्म अब प्रकटे...*
*वह मेरे हृदयनिवासा हैं जी...*
*वह मेरे हृदयनिवासा हैं जी... ॥4॥*

# 161. प्रतिपाले तू

*प्रतिपाले तू दीनदयाला ॥*
*तेरा ब्रीद हैं राखे जय श्रीरामा ॥धृ॥*

*सांस सांस से तू दिये हम प्राणा ॥*
*उस सांसोंमें तू हैं बसा श्रीरामा ॥1॥*

*चौगिर्द हमारे हैं श्रीराम जयकारा ॥*
*तेरी हथेली हमे तू राखे हैं श्रीरामा ॥2॥*

*निर्भय किया तुद दर्शन जो पाया ॥*
*सहेज आनंद जो हृद से हैं उपजा ॥3॥*

*इस मनतनधन का तू हैं इक स्वामी ॥*
*चरणकमल पर तेरे मैं मेरा सब अर्पि ॥4॥*

# 162. या स्वरांनो आर्त व्हा

*या स्वरांनो आर्त व्हा ती ऐकवा त्या ईश्वरा ॥धृ॥*

*वाहतो तुम्हा आत्मभान ते माझे ॥*
*जा स्वरांनो ईश्वरा ते पोहोचवा ॥1॥*

*अद्भुत नाद जणू झरे अमृताचे ॥*
*नादमाधुर्य तुमचे द्या मम गळा ॥2॥*

*सूर, लय अन् ताल मज द्या ॥*
*आलापी घेऊन सहज समेवर येऊ द्या ॥3॥*

*राग रस माझ्या संगीत साधनेचा ॥*
*वाहू द्या ओघ मम भावभक्तीचा ॥4॥*

*स्वर-दृष्टी द्या स्वर-शक्ती द्या ॥*
*अध्यात्माची मज तुम्ही शांती द्या ॥5॥*

*श्रुती जणू या नादीनी ईश्वराच्या ॥*
*बरसा अमृतधारा होऊन स्वरांच्या ॥6॥*

*नादबिंदूच्या पल्याड तिथे त्या ॥*
*मज भेटवा हो त्या निर्गुणा ॥7॥*

# 163. तुझे एक नाम

*तुझे एक नाम असे माझा प्राण ॥*
*सर्वस्व तुज वाहिले ठेवूनी मनी ही जाण ॥धृ॥*

*आता नको विश्व-क्षमतांनो तुमचं हे प्रकटन ॥*
*नको पुन्हा इथे या जीवाचं येणं-जाणं ॥1॥*

*आले हे मध्यान्ह आता, हा जीव ठेवतो गहाण ॥*
*देवा तूच कर चिंता माझी, तुझीच तुजला आण ॥2॥*

*तू माझा मान देवा तू माझा सन्मान ॥*
*तुझ्या कृपेनेच देवा होते तुझे ध्यान ॥3॥*

*रात्रंदिन आता देवा तुझेच रे स्मरण ॥*
*हृदयात काही नाही, शिवाय तव स्फुरण ॥4॥*

*दे तव भक्तीचे वरदान, होईल मज आत्मज्ञान ॥*
*संतांचा हा अनुभव, सांगे मज ते ग्रंथ-वचन ॥5॥*

*होऊ दे तुझी पंचतत्त्वे या देहात सु-प्रमाण ॥*
*तुज भेटण्या देवा हेच असे उत्तम साधन ॥6॥*

*घालव घालव जन्मजन्मांतरीची भूक-तहान ॥*
*अमनाच्या सिंहासनी तू होतसे विराजमान ॥7॥*

*चेतव वैराग्याची ज्वाला घडू दे योगाचरण ॥*
*इच्छा-वासना-अहं-दुर्मतीचे जाळीन रे सरण ॥8॥*

*करुनिया ते भव-भाव-भस्माचे विलेपन ॥*
*या देहामध्येच तुजला मी विदेही भोगीन ॥9॥*

*तुझे अद्वैतरूप पाहण्या उघड माझे हे नयन ॥*

*अमृतवर्षाव होऊ दे, पाहता तुझे रूप निर्गुण ॥10॥*

*होईल जरी देहावसान, मी ना सोडू तव चरण ॥*
*धाव धाव वेगे आता... ॥*
*मी तुजला शरण देवा मी तुजला शरण... ॥11॥*

# 164. नाम ज्याचे ओठी

*नाम ज्याचे ओठी, तो असे भाग्यवंत ॥*
*जीवन त्याचे चालवी, तो सखा भगवंत ॥धृ॥*

*नाम ज्याने ध्यायिले, तो मनुष्य गुणवंत ॥*
*इच्छा वासनांचा त्याच्या, आपोआप होतसे अंत ॥1॥*

*नको आता कुबड्या, श्रद्धा अन् विश्वासाच्या ॥*
*देखियेला अंतर्बाह्य, श्रीराम तो रोकडा ॥2॥*

*ईश्वर चरणी ज्याने, अहं त्याचा वाहीला ॥*
*निर्गुणत्व अनुभवे, तो सगुणांचा पुतळा ॥3॥*

*कुठला योग अन्, कुठली ती समाधी ॥*
*तव स्मरण नित्य असे, दाटे अद्वैत रोमरोमी ॥4॥*

*सरली अमृताची मोहिनी, नासली मरणाची ती भीती ॥*
*देही असूनी विदेही, साक्षात तो चैतन्य भोगी ॥5॥*

*विश्वांतर्बाह्य तू भरला, अगम्य तू अगोचरी ॥*
*जिथे जिथे मन जाई, तिथे तू आधिच असशी ॥6॥*

*श्रुती म्हणती तू, अकर्ता अकर्मी परि ॥*
*तूच घेई तुझे नाम अन्, तूच तुझ्यातून असा प्रकटशी ॥7॥*

# 165. करू तुझे गं ध्यान

*करू तुझे गं ध्यान भगवती करू तुझे गं ध्यान, ॥*
*दे मजला तू विमल बुद्धी अन् सकल ज्ञान विज्ञान ॥धृ॥*

*तू क्षमतांचे महाशून्य रूप अन् मागे ती निर्गुण, ॥*
*पाच तत्त्वे ती प्रसवूनि त्यातून झालीस गं सगुण, ॥1॥*

*चैतन्य पातूनी शरीरी तू या झालीस विश्वजननी, ॥*
*बुद्धीशक्तीचे मूळ रूप तू दात्री जाणिवांची, ॥2॥*

*क्षमतांचा विस्तार पाहा ही प्रचिती  दिव्यत्वाची, ॥*
*कारणांतूनी परिणामांची ती शृंखला तू निर्मिली, ॥3॥*

*घे परतुनी भाव माघारी मी मला अन् माझे, ॥*
*जे जे जाणू जाता ते देखिले निर्गुण गे माये, ॥4॥*

*भूलवती मज ना आता देवी ते तुझे विश्ववैभव, ॥*
*स्फुरतो तव प्रेमानंद त्यास साक्षी ही आसवं, ॥5॥*

*शरण तुला ही आर्त घालतो मम हृदयातून, ॥*
*शून्यत्व लाभू दे त्या पाचांना या मम कायेतून, ॥6॥*

*तू कारुण्यसिंधू तू दाव दाव मज तव नीजरूप, ॥*
*उंबऱ्यावर तव शून्याच्या मी होईन गं तद्रुप, ॥7॥*

# 166. मन मैला

*मन मैला पर आस खरी रे, ॥*
*तूद बिन प्रभू यह जनम जलील रे... ॥धृ॥*

*कितने जनम पटका और धोया, ॥*
*यह मैल ना अब तक मैंने खोया... ॥1॥*

*मैं मनमुख मन की बातों में आया, ॥*
*वह गुरुमुख होवे किरपा कर दाता... ॥2॥*

*यह मन पावन जब रखूं चरण पर, ॥*
*तब तू आंवे मेरी आस बुझा कर... ॥3॥*

*ऐसा जो तेरा न्याय कठीण रे, ॥*
*तू मेरे अंतर पर तूद मैं पां ना सकू रे... ॥4॥*

*सब कुछ तेरा किता यह मैं मेरा कैसा रे, ॥*
*हे दीनदयाले दाते अब पतीत पुनित सब होवे... ॥5॥*

# 167. शून्यत्व मागतो मी

*शून्यत्व मागतो मी ॥*
*तव निर्गुण रूप पाहाण्या ॥*
*शून्यत्व मागतो मी ॥धृ॥*

*ती खूण तिथे अशी की ॥*
*अनहद तो वाजती गं ॥*
*तव सत्व रूप दर्शन ॥*
*हा मार्ग मी धरीन ॥1॥*

*अहंभाव मूक होता ॥*
*वैराग्य ते भोगीन ॥*
*अद्वैत रूप तव पाहण्या ॥*
*दिव्य दृष्टी मज तू दे गं ॥2॥*

*संवेदिता मनोशरीर ॥*
*देवी त्यास मी शरण ॥*
*तो तव विश्वविलास ऐसी ॥*
*राहू दे मज ती जाण ॥3॥*

*येथे त्या षड्रिपुंची ॥*
*ती होऊ दे गं वाफं ॥*
*मम आत्मभान प्रसाद ॥*
*तव चरणी ठेवला गं ॥4॥*

*सगुण तव स्वरूप ॥*
*कणकणांतूनी दिसे गं ॥*
*कर भस्म सर्व द्वैत ॥*
*तो जन्ममरणाचा गं फास ॥5॥*

*शक्ती तुझी ती ऐसी ॥*
*योगे एकवटीशी ॥*
*प्रकटव तिथे तू ऐसे ॥*
*शून्यत्व ते मम हृदयी ॥6॥*

*श्रीगुरू कृपा ती झाली ॥*
*शब्दसुमन वाहतो गं ॥*
*शून्यत्व मागतो मी ॥*
*शून्यत्व मागतो ॥7॥*

# 168. राखे तू

*राखे तू रहीम कर्ता तू करीम ॥*
*बक्षे तू बक्षंद दाता तू देहंद ॥धृ॥*

*जमिर तू अशर शेख तू दस्तगीर ॥*
*अंदर बाहर बेशूमार अकाल तू अपार ॥1॥*

*अलख तू निरंजन कृपा तू जगनमातर ॥*
*आत्मा तू विश्वंभर प्राण तू हरीहर ॥2॥*

*चैतन्य तू मनोहर अनादी तू अनंत ॥*
*निर्गुण तू निराकार ॥3॥*

*निर्विकार तू निरहंकार जगदपिता परमेश्वर ॥*
*गोसावी तू फकीर श्रीगुरू तू अपरंपार ॥4॥*

*पीरांचा तू पीर पाक तू पैगंबर ॥*
*साधुसंत तू कबीर नारायण तू ज्ञानेश्वर ॥5॥*

*अल्लाह ब्रह्म एक ॥*
*आता नुरे कोणता भ्रम ॥6॥*

# 169. बिरहा बिरहा

*आज तक हम दिल ढुंडते रहे ॥*
*अभी अभी कंबखत यही मिला ॥धृ॥*

*देखा खोया था कहा ॥*
*सब सन्नाटा सा मिला ॥1॥*

*आवाज की दुनिया मे खोनेवाले ॥*
*यह गुंगे को आसान नही हैं ढुंडना ॥2॥*

*आंस देखी उसकी देखी उसकी ओट ॥*
*जैसे लगी हो उसको कई गहरी चोट ॥3॥*

*कही आसमान में था खोया ॥*
*जहां देखू सब बिरहा बिरहा ॥4॥*

*मिलाओ परवरदिगार से वह बोला ॥*
*मिल जांऊ तो तुम्हारा नही तो बिरहा बिरहा ॥5॥*

# 170. नेती नेती

*न इति.. न इति...न इति... ॥*
*परब्रह्मासी ऐसे बोलली श्रुती ॥धृ॥*

*ध्यान विलय होवो सर्व बुद्धी मती ॥*
*शून्य व्हावी तिथे माया मनोगत ॥1॥*

*धरूनिया तिथे श्रीगुरुंनी मज हाती ॥*
*दावावे मज स्वस्वरूप त्यांनी अद्वय ते अति ॥2॥*

*तिथे सगुण निर्गुण अवघे भेद की हो मिटती ॥*
*मीच भेटावे मजला तिथे ॥3॥*

*चुको ती फेरी पुनर्जन्माची ॥*
*ऐसी व्हावी जी करुणा त्यांची मजवरती ॥4॥*

*मी समर्पित सदा त्या परम श्रीगुरुपदांसी. ॥*
*मी समर्पित सदा त्या परम श्रीगुरुपदांसी. ॥5॥*

# 171. म्या जीवरूप मी ब्रह्मरूप

*म्या जीवरूप मी ब्रह्मरूप असा ॥*
*म्या मायेत गुंते मी तटस्थ सदा ॥धृ॥*

*जलात जल वायुत वायू अन् अग्नी मिळो अग्निला ॥*
*रजकण रजात मिळो जैसे हा म्या नसे उरला ॥1॥*

*अनंताकार व्हावा तिथे हा मी असा ॥*
*भोगीन म्या त्या निराकार आकाशा ॥2॥*

*मी तो असा व्हावा सकल सगुणांचे मूळ ॥*
*होईल म्या त्या निर्गुण चरणांची धूळ ॥3॥*

*म्या सरूप परि मी अरूप चैतन्य सदा ॥*
*माझे सरूप अरूप मिळो एका चिन्मयी ब्रह्मरूपा ॥4॥*

*मी सकल निधान परब्रह्म स्वरूपाचे ॥*
*म्या त्या स्वरूपात मजला सहज मिळवावे ॥5॥*

*म्या सद्गुरू अभिलाष मी बीज विशुद्ध तिथे ॥*
*इतकीशी ही जाण माझी तिज तुम्ही उजवावे ॥6॥*

*म्या शरण श्रीरामा निष्फळ ना मी जावा ॥*
*तूचि सद्गुरूनाथ तूचि उतरव पैलतीरा ॥7॥*

# 172. साक्षी चैतन्य

*माझ्यात इथे प्रसवूनि मला ॥*
*हा मी श्वास घेतो अनंताचा ॥धृ॥*

*माझ्याच प्रारब्धाला मी सामोरा ॥*
*क्षणोक्षणी असे तो द्वंद्वानुभव माझा ॥1॥*

*बाहेर वस्तू अन् मनात विषय ॥*
*परि मी साक्षीचैतन्य अन् भाव चिन्मय ॥2॥*

*मीच मला ओळखून माझ्यात मी दंग ॥*
*मी अरूप इथे परि माया खेळते सरूपरंग ॥3॥*

*ऐसे जाणता आता प्रारब्ध की हो नासे ॥*
*प्रसविण्यास मजला पुन्हा तिथे कोणी मी नसे ॥4॥*

*जाता पैलतीरी तिथे सिद्ध योग समाधी ॥*
*शून्य तिथे निपजे पाच पंचवीसांतूनी ॥5॥*

*ऐसी पसरता ही शून्याची झोळी ॥*
*तयात गुरुप्रसाद निर्गुण चैतन्य अद्वयी ॥6॥*

# 173. अनंत अपार या ब्रह्मांडी

*अनंत अपार या ब्रह्मांडी, ॥*
*कोण झाले हो माझी आई, ॥धृ॥*

*आई होऊनि गर्भी राखिले, ॥*
*लहानसे कुणी मज अवकाश हो दिधले, ॥1॥*

*पंचसखींनी त्या अवकाशी, ॥*
*कसे मज त्यांचे रूपडे दिधले, ॥2॥*

*पंचतत्त्वे ही कुणी गुंफिली, ॥*
*त्यातून जाणीव ती कशी निपजली, ॥3॥*

*आकाशाच्या निळ्या मांडवी, ॥*
*भाव दिगंत मज कोण दाखवी, ॥4॥*

*स्वेच्छे वावरी मी या अवकाशी, ॥*
*हे स्वेच्छावकाश हो दिधले कोणी, ॥5॥*

*देहामध्ये मन बुद्धी ती विलसे, ॥*
*त्यांना त्यांचे कुणी अवकाश हो दिधले, ॥6॥*

*त्या मनो-अवकाशी मज स्वेच्छा आकळे, ॥*
*हिरीरीने किती मांडू  मतमतांतरे, ॥7॥*

*क्षमतांची हो मालकी कुणाची, ॥*
*अवकाश स्वेच्छेला दिधले कोणी, ॥8॥*

*मी सदा पराधिन, तू बक्षंद हरी, ॥*
*तुझ्याच कृपेने तुझे चरण धरी, ॥9॥*

# 174. स्त्रीशक्ती वंदना

*नको कुणाची दया अन् नको कुणाचे दाक्षिण्य ॥*
*मी सबल झुंजार जणू त्या झाशीचा हा स्कंध ॥धृ॥*

*नका बघू मजकडे स्त्री काया म्हणून ॥*
*मातृत्वाला प्रसवूनि इथे मी पुरुषत्वाला देते जन्म ॥1॥*

*सहनशक्तीच्या मर्यादा त्या सहजी ओलांडून जाते ॥*
*नव उत्तुंग शिखर मी त्यागाला दाविते ॥2॥*

*जिजाऊच्या मातृत्वाला शूरपणाचे तेज ॥*
*लखलख लखलख तळपली माझ्या शिवबाची तलवार ॥3॥*

*मारी क्युरीने पाहा केले अणू अणू चे भेदन ॥*
*मृत्युला नमवूनी केले तिने मानवाचे कल्याण ॥4॥*

*सरोजिनी ती लढवय्या पेटविला स्वातंत्र्याचा संग्राम ॥*
*आंग्ल देशीचे राजे तिच्यामुळे झाले किती हैराण ॥5॥*

*किती वदावी थोरवी त्या दिव्य मातृत्वाची ॥*
*अनसूयेने सांभाळली बालरूपे त्रिदेवांची ॥6॥*

*शक्तिरूपा मी सदा वसते प्रत्येक प्राणिमात्रांत ॥*
*मी होता शून्य तिथे उघडते मोक्षाचे ते द्वार ॥7॥*

# 175. ज्ञानियाचे चित्त

*ज्ञानियाचे ते चित्त अतिविमल ॥*
*सदा करुणेचे ते तिथे निर्झर निर्मल ॥धृ॥*

*षड्रिपू होती शांत पिऊनी करुणेचे ते जल ॥*
*कैवल्याचा पुतळा ऐसा धन्य धन्य ते विश्व सकल ॥1॥*

*चित्त असावे ऐसे निर्मल ॥*
*जैसे ज्ञानियाचे ते विमल ॥2॥*

*करुणेचा तो अखंड निर्झर ॥*
*तिथे काम क्रोध तृष्णा तिरस्कार ॥*
*जलपान करिती पाहा निरंतर ॥3॥*

# 176. जागला गं जागला

*जागला ग जागला ॥*
*श्रीराम मनी जागला ॥धृ॥*

*भक्तिसूर्य श्रीराम कृपे  उगवला ॥*
*अंधकार बुद्धी मतीचा  निमाला ॥1॥*

*विवेकरूपी नव किरण सोहळा ॥*
*शांतीस्वरूप मनी प्रकाश व्यापला ॥2॥*

*मनमायेच्या ग मंदिराला ॥*
*सद्गतीचे तोरण बांधुया ॥3॥*

*दरवळला सुगंध सुमतीचा ॥*
*प्रशांत अनंत परमानंद निधाना ॥4॥*

*पंचसखींनो या गं या ॥*
*मंगलाचरण ते गाऊ या ॥*
*श्रीरामनामानंदी जीव हा विसावला ॥5॥*

# 177. रोम है जितने

मला राग भीमपलासी खूप आवडतो. या रागातील "भज मन नीस दिन शामसुंदर" या बंदिशीवर आधारित.

*दे जिंव्हा उतनी तू प्रभ मेरे ॥*
*इस काया पर रोम हैं जितने ॥*

*बीत गये सब जनम अधुरे ॥*
*बीन गावे सब नाम तिहारे ॥धृ॥*

*नाम अनंत है गुण से तेरे ॥*
*नाम मधुर-रस अमृत रस से ॥1॥*

*नाम रस जब हम तेरा पिवे ॥*
*तुम को मनमंदिर हम पांवे ॥2॥*

*उजले मंदिर निर्भ्रम हम होवे ॥*
*जहां देखू तेरा वैकुंठ पांवे ॥3॥*

*अनंत अपार तू सकल सुहेले ॥*
*नामरस रंग रत हो जावे... ॥4॥*

*दे जिंव्हा उतनी तू प्रभु मेरे ॥*
*इस काया पर रोम हैं जितने ॥5॥*

# 178. मन पवित्र सुंदर

श्रीमद् शंकराचार्य हे जरी अद्वैत दर्शन शास्त्राचे जनक होते, तरी त्यांनी उपदेश-सहस्त्रीमध्ये असे म्हटले आहे की मन व्हावे तीर्थक्षेत्र आणि तिथे यावे ईश्वर साधुसंत... याच संकल्पनेवर आधारित ही रचना झाली.

*मन पवित्र सुंदर सुंदर ॥*
*जसा हा इथे त्रिवेणी संगम ॥धृ॥*

*जेथे होतसे मिलन ॥*
*विवेक भक्ती शक्तीचे ॥1॥*

*इथे सृष्टी वैराग्याची ॥*
*आकाश शोभा शून्यत्वाची ॥*
*वायूची शांत शीतल लय ॥*
*अगणित चैतन्य-सूर्य प्रतिदिप्त ॥2॥*

*घाट इथले उतरंड द्वैताची ॥*
*इथे उभी मंदिरे अद्वैताची ॥*
*मंदिरात मूर्ती स्वात्मभान ॥*
*इथे सर्व जमती साधुसंतजन ॥3॥*

*इथे पूजा जणू असे भक्ती योग ॥*
*आरती हो ऐसे समाधी ध्यान ॥*
*प्रसाद श्रीराम जय जय राम ॥*
*सवे ऐकावा हा नाद अनहद ॥4॥*

*इथे परम पुरुष ॥*
*जो नांदती आत्मराज ॥*
*जरी अवघे निर्गुण निरंकार ॥*
*तिथे वाहे परिमल सत्व सगुण ॥5॥*

# 179. खुल खुल जाए मेरे बंध

राग भैरवी मध्ये गुंफलेले शब्द.

*खुल खुल जाए मेरे बंध ॥धृ॥*

*मूल ना जानू ना जानू आप ॥*
*काम क्रोध मोह मन लिपटाए ॥*
*अगन कुंड यहा महाभयंकर ॥*
*प्रभू तुम मेरे हो तारणहार ॥1॥*

*तूम समरथ अगम अगोचर ॥*
*नौनिधी के दातार ॥*
*मै हर बारी हारा हुं भगवन ॥*
*लेऊ तुमरी चरणकमल ॥2॥*

# 180. अनंत संत अवस्था

संत श्री कबीरजी यांची निर्गुण भजने खूप भावतात, ज्यात त्यांनी त्यांच्या बंधमुक्त अवस्थेचं अतिशय सुंदर वर्णन केले आहे. जसे "युगन युगन हम योगी..., सखिया वा घर सबसे प्यारा..., निर्भय निर्गुण गुण रे गाउंगा..." इत्यादी... त्यावर कळस म्हणजे पंडित कुमारजी गंधर्व आणि विदुषी कोमकली यांची सर्वोच्च दर्जाची गायकी... संत श्री गोरखनाथ यांची "शून्य गढ शहर, शहर घर बस्ती..." ही योगी-अवस्थेचे यथार्थ वर्णन करणारी रचना पंडित कुमारजींनी अतिशय खुबीने गायली आहे. त्यांची गायकी आणि या संतांचे अमृतमय शब्द आपल्या मनाला एका वेगळ्याच जाणिवेपर्यंत घेऊन जातात. गुरुबाणीमध्ये तर ही मुक्तावस्था त्या संतांनी त्यांच्या आईला समर्पित करून लिहिली असल्याने अंतर्मनाला खोलवर स्पर्शून जाते. अशा या संत स्वरूपाच्या दिव्य वर्णनातून त्या संत स्वरूपाला प्रतीत करणारे काही शब्द सुचले. त्याचे सारभूत संक्षिप्तपणे इथे देत आहे.

*जे जाणायाचे ते जाणले गं माये, ॥*
*आता अंतर्बाह्य श्रीराम पाहिले गं माये, ॥धृ॥*

*महाकारण ते होऊनि ब्रह्म स्वेच्छे पातले, ॥*
*आपुल्याच शोधार्थ ते आपणची निघाले, ॥1॥*

*घेतली त्याने हाती पंचतत्त्वांची झोळी, ॥*
*जाणिवांची त्याने मांडीयली गं खेळी, ॥2॥*

*निमित्त केवळ केले ऐसे सगुण स्वस्वरूपाचे, ॥*
*षड्रिपू अन् वासनांचे सोबत पेव जणू ते फुटले, ॥3॥*

*आपणची होऊनि श्रीगुरू अन् ईश्वर आपणची, ॥*
*आपणची आपणात जागवी शिष्यत्व जन्मोजन्मी, ॥4॥*

*श्रीगुरू-कृपे जाणियले ते जाळे हो आभासांचे, ॥*
*स्थिर केले आत्मभान सगुणातून शून्यामध्ये, ॥5॥*

*मुक्तीचा हा योगमार्ग संत प्रशस्त करिती, ॥*
*दोष सर्व दुर्लक्षूनि स्व-आत्मभान जागविती, ॥6॥*

*आता काया-मन-बुद्धी ते नसे संतांचे सामान, ॥*
*होते केवळ ते निमित्त जागविण्या स्व-आत्मभान, ॥7॥*

*अनोळखी झाले भाव मी-माझे अन् मला, ॥*
*जाणिवा त्यागिल्या तिथे, नसे तू-तुझे अन् तुला, ॥8॥*

*बांधियली मोट ऐसी आम्ही आमुच्या जीवपणाची, ॥*
*रचूनिया सरण तिचे तिज आग लावली वैराग्याची, ॥9॥*

*साधनेत लोपली सिद्धी,साध्य एकत्वाचे साधले, ॥*
*ब्रह्म देखिले, ब्रह्म ऐकिले, ब्रह्मस्वरूप होऊनि राहिले, ॥10॥*

*संता नाही त्याग अन् नसे कुठे कुणाचा स्वीकार, ॥*
*संता नाही द्वंद्व कुठे, अद्वयची ते जाहले प्रखर, ॥11॥*

*संता नुरला काळ, ना आदी, ना अंत, ॥*
*आता रूप अरूपाच्या पल्याड संत होती दिगंत, ॥12॥*

*सहज सुलभ इथे योगी नांदती परमानंदे, ॥*
*कोटी सूर्य तेज प्रशांत संत-हृदयी ते प्रकाशे, ॥13॥*

*मुक्त केले सुखे संतांनी त्या मुक्तीला, ॥*
*निर्गुणाकडे नेती ते हा अनिर्वचनियतेचा हिंदोळा. ॥14॥*

# 181. श्रीराम-सीता कर्तव्य दर्शन

रामायणात शेवटी सीतामाई वाल्मिकी आश्रमात जाताना प्रभू श्रीराम लक्ष्मण आणि सीतामाई यांनी दुःखाचे शिखर भोगले. पण कर्तव्य निष्ठा प्रेम विश्वास आणि त्याग यांच्या साहाय्याने ते तिथे विजयी झाले. जनतेसह कोणालाही दोषी न धरता त्यांनी देवत्वाचा अत्युच्च आविष्कार घडविला. असे हे रामायण निर्दोष न्याय्य पुण्यप्रद महाकाव्य आहे याच विचारांतून खालील रचना झाली आहे.

*हे राज्य रघुवंशाचे न्यायाचे अन् समानतेचे ॥*
*नच करावा संदेह त्यांचे न्यायदान हो निस्पृहतेचे ॥धृ॥*

*वास्तव्य तिथे असे अनेक थोर थोर ऋषींचे ॥*
*घटना कायदे निर्मिले सर्व ते त्यांच्या आदेशाने ॥1॥*

*न्यायदान कठोर ते असे आयोध्या नगरीचे ॥*
*परि कधी न डळमळले ते नृप रघुवंशाचे ॥2॥*

*असाच होता कायदा एक अति कठोर ॥*
*जी स्त्री वसे परगृही ती होतसे सीमापार ॥3॥*

*नसे चाले तिथे काही साक्षी अन् पुरावा ॥*
*जरी ती असे पवित्र पश्चात त्या घटनेच्या ॥4॥*

*ऐसे कित्येक झाले न्यायदान त्या दरबारी ॥*
*कालांतरे शिक्षा भोगूनि परतल्या त्या भगिनी स्वगृही ॥5॥*

*साक्षात श्रीरामाची पत्नी देवी सीतामाई ॥*
*रावणगृही होती राहिली ती असता वनवासी ॥6॥*

*लंकेत श्रीरामाची झाली द्विधा स्थिती ॥*

*कैसे मी वाचवू सीतेला जननिंदेपासूनी ॥7॥*

*श्रीराम साक्षी तिथे तिने प्रार्थिले अग्निदेवा ॥*
*सर्वस्व त्यास करूनी अर्पण, तिने दिली अग्निपरीक्षा ॥8॥*

*काय वर्णावे तेज अन् पवित्रता सीतामाईची ॥*
*तेजाळला अग्नी त्यास झळाळी तिच्या पवित्रतेची ॥9॥*

*अश्रू ना थांबे तिथे कोणाचे लोट हो ते उठले ॥*
*श्रीराम लक्ष्मण हनुमान सहित बिभीषण अन् त्याच्या लंकेचे ॥10॥*

*होता अग्नी-परीक्षा ऐसी सीतामाईची ॥*
*सीतेसह सर्व परतले, धरिली वाट आयोध्येची ॥11॥*

*ऐसे सर्व लंकेत घडूनि जे गेले ॥*
*आयोध्येत ते सर्वतोपरी सर्वांना होते कळले ॥12॥*

*असेच गेले आनंदात कित्येक महिने आयोध्येचे ॥*
*परि धुमसत होते तिथे ते सीतेचे स्वगृही येणे ॥13॥*

*एका बुद्धी चंचल धोब्याचे निमित्त तिथे जाहले ॥*
*त्यागिले स्वपत्नीला घेऊनी नाव सीतामाईचे ॥14॥*

*आली फिर्याद राजाच्या महाली तिथे अर्धरात्री ॥*
*धोब्यासह त्याच्या पत्नीने केली न्यायाची मागणी ॥15॥*

*न्यायदान जाहले अन् तो धोबी असा जिंकला ॥*
*आयोध्या नगरीच्या काळजाचा ठोका असा चुकला ॥16॥*

*श्रीराम रात्रंदिनी रडती किती किती ते हमसूनी ॥*
*कोणा सांगावे ते दु:ख, होणार ताटातूट प्राणप्रियेशी ॥17॥*

*श्रीराम लक्ष्मणा म्हणाले "मज शब्द न ते फुटती ॥*
*कसे सांगू त्या अग्निशिखेला तू सोड आयोध्येशी" ॥18॥*

*“मी राजा आयोध्येचा पाईक न्यायाचा अन् समानतेचा ॥*
*कर्तव्यदक्ष असा मी सदा हा सेवक माझ्या जनतेचा” ॥19॥*

*“झाले असे कित्येक न्यायदान इथे या दरबारी ॥*
*परि आता सांगू कसे सीतेला तू परतूनी जा वनवासी” ॥20॥*

*“मरण यावे आता मी जातो रे स्वर्गाशी ॥*
*मी ना आता जाईल कधी सन्मुख माझ्या सीतेशी” ॥21॥*

*लक्ष्मण म्हणे “श्रीरामा पालक अयोध्येचे तुम्ही ॥*
*तुमचे कर्तव्य केवळ सकल जनांच्या सुखदु:खाशी” ॥22॥*

*ऐसे बोलूनी श्रीरामाशी नियोजन त्याने केले ॥*
*वदला सीतामाईशी जाऊ ऋषीघरी वना ते ॥23॥*

*जाता तिथे वनात जवळी वाल्मिकी आश्रमाच्या ॥*
*सोडिता सीतेला तिथे जणू आला प्राण कंठाशी त्याच्या ॥24॥*

*कालांतरे कळले सीतेला तिज श्रीरामाने त्यागिले ॥*
*राजाच्या कर्तव्यासी तिने असे शिरोधार्य मानिले ॥25॥*

*जरी ना वदले श्रीराम सीतेला, ठेविले गुपित ते त्यागाचे ॥*
*सीतेने जाणिले विवेके ते श्रीरामाचे प्रेमच झाले मुके ॥26॥*

*ऐसा राजा निस्पृह त्याने पाळिली त्याची न्यायसंहिता ॥*
*जरी त्यास होता अधिकार ती संहिता बदलण्याचा ॥27॥*

*ऐसी होती राणी सत्वशील देवी सीतामाई ॥*
*कधीही तिने श्रीरामराजाला धरीले नाही दोषी ॥28॥*

*साक्षात श्रीराम ते नारायण अन् सीता असे ती लक्ष्मी ॥*
*निर्मिली परिस्थिती कठीण, भोगिली ती त्यांच्या अवतारी ॥29॥*

*भोगीले त्यांनी दु:ख कष्ट, परि न सोडीले कठोर कर्तव्यासी ॥*

*ऐसे घडविले रामायणासी, ना धरीले इथे त्यांनी कोणाला दोषी ॥30॥*

*सहजी ते चालले अंगार त्याग स्वसंसाराचा करूनी ॥*
*सकल जन मानिले जसे लेकरू स्वत:चे त्यांनी ॥31॥*

*म्हणूनी ते प्रभू श्रीराम अन् देवी सीतामाई ॥*
*त्यांना पूजिले जाते असे अखंड या त्रिलोकी ॥32॥*

# 182. हे ऽऽ गोविंद हे ऽ गोपाऽळ

*हे ऽऽ गोविंद हे ऽ गोपाऽळ ॥*
*करीशी आमूचा तू सदा प्रतिपाळ ॥धृ॥*

*घनघोर द्वैत देवा ते इथे अंतर्बाह्य ॥*
*करिशी आमुचा तू तयात सदा सांभाळ ॥1॥*

*देशी सुबुद्धी तव नामामृत ध्याया ॥*
*ऐसा असशी तू एक परम दयाळ ॥2॥*

*नेणले जाणले त्यागिले सर्व काळ ॥*
*तुजसाठी रे दयाघन तू विश्व कृपाळ ॥3॥*

*तू बाप विठ्ठल गोविंद वनमाळ ॥*
*माई रुक्मिणी माउलीहून मवाळ ॥4॥*

*संतांनी आखिला हा मार्ग अति सरळ, ॥*
*पूजीन तुज अर्पूनी अद्वैताची माळ ॥5॥*

# 183. विठ्ठलाने घेतली भक्त पुंडलीकाची आण/ शपथ

*पंढरी पावन जिथे म्यां देखिला पुंडलिक ॥*
*त्यावरी मी प्रसन्न माझे बोलले सगुणरूप ॥धृ॥*

*"आत्म हे माझे तुला करावया प्रकट ॥*
*मज झाले साहाय्यक तुझे मायबाप" ॥1॥*

*"तुझी सेवा मी पाहतो डोळे भरून भरून ॥*
*म्हणूनी युगे अठ्ठावीस मी उभा वीटेवर" ॥2॥*

*"जिथे पुत्र माने मायबाप मजसमान ॥*
*उभा मी तिथे मज पुंडलीकाची आण" ॥3॥*

# 184. हीच एक आस

*अंग माझे ऊर्जा रूप तिचे शून्य ॥*
*आत ते वसे निर्गुण ब्रह्मचैतन्य ॥धृ॥*

*ल्यायले मी विश्व क्षमता वस्त्र ॥*
*जणू शुद्ध सत्वाचे ते सद्गुण ॥1॥*

*काढूनी बाहेर रज तमाची खडावं ॥*
*सत्व जलाने गुरू चरण प्रक्षालन ॥2॥*

*श्रीगुरू चरणी आता हीच एक आस ॥*
*भेटवावे ब्रह्म करूनी शून्य ते निरास ॥3॥*

# 185. समरथ है श्री नानकदेव गुरुबाणी

*सतनाम श्री वाहे गुरूजी ॥धृ॥*

*समरथ है श्री नानकदेव गुरुबाणी, ॥*
*जो गाए उसे माया पार उतारी ॥1॥*

*पवित्र तेज है गुरु ग्रंथ गुरुबाणी ॥*
*जो नर सुणे पावन पुनित हो जाई ॥2॥*

*विश्व शक्ती यह हरि बचन गुरुबाणी ॥*
*जो पावे फिर भौजल कबहु ना आई ॥3॥*

*अमृत मधुर पारब्रह्म है गुरुबाणी ॥*
*जो ध्याई वह रामनाम मुख पाई ॥4॥*

*जिस दे मस्तक प्रभू सुभाग लिखाई ॥*
*पावे अनहद नाद पूरण गुरुबाणी ॥5॥*

*सांस सांस मे बसहु गुरुबाणी ॥*
*गुरु चरण सदा हौ बल बल जाई ॥6॥*

**पंजाबी भाषेत सुचलेली कविता.**

# 186. प्रभ पाया

*प्रभ पाया तू देख सखी री ॥*
*चातक को हरि बुंद मिली री ॥धृ॥*

*हृद आकाश मेघा छायी री ॥*
*सावन आया रे सखी री ॥*
*किरपा उसने बरसाई री ॥*
*मै भिगी उस अमृत धारी ॥1॥*

*सुदबुध सब गयी री मोरी ॥*
*रोमरोम से अब मगन हुई री ॥2॥*

**पंजाबी भाषेत सुचलेली कविता.**

# 187. कमल नयन विशाल अतिसुंदर

*कमल नयन विशाल अतिसुंदर ॥*
*माधवा मनोहरा प्रिय तू मुरलीधर ॥धृ॥*

*गोविंदा गोपाळा तू यशोदानंदन ॥*
*बरसू दे श्रीकृष्णा तव प्रेमानंदघन ॥1॥*

*श्रीधरा पुरुषोत्तमा तू नारायण ॥*
*राधावर हरी हरी तू मधुमिलींद ॥2॥*

*तू साकार केशवा परि निराकार ॥*
*तू विठ्ठल सुकुमार रूक्मिणीचा वर ॥3॥*

*लक्ष्मीपती तू घननीळ मनमोहन ॥*
*प्रशांत मुद्रा अर्धोन्मीलित लोचन ॥4॥*

*संगे शेषनाग तू चक्रधर तू गदाधर ॥*
*तू अजानुबाहू तूची सकल प्राणाधार ॥5॥*

*तू जगद्गुरू विश्वंभर मम हृदयनाथ ॥*
*चरण तुझे देवा मज कैवल्याचे धाम ॥6॥*

# 188. मैं चातक जनमों का प्यासा

*मैं चातक जनमों का प्यासा ॥*
*पिंऊ हरि बुंद तो मिटे हर तृष्णा ॥धृ॥*

*ना उठाऊंगा दाना सुख का ॥*
*देख देख रे दूख अंदर छिपा ॥*
*मैं चातक जनमों का प्यासा ॥*
*पिंऊ हरि बुंद तो मिटे हर तृष्णा ॥1॥*

*अब तुम बिन ना कवण हमारा ॥*
*यह है सब माया भ्रम का पसारा ॥*
*लिया नाम प्रभु भवभय को नासा ॥*
*जह देंखू तह तेरा दर्स पियारा ॥2॥*

# 189. विश्व कणांनो

क्वांटम शास्त्रानुसार विश्व - ऊर्जा ही कण व तरंगांच्या रूपात प्रकट होते आणि त्यात जाणिवा निर्माण करून अनिर्वचनीय असा मायावी खेळ खेळते. आता त्या क्षमताधिष्ठित विश्व ऊर्जा कणांनी मानवी स्वरूपात हे समजून घेतले आहे की इथे आत्मतत्त्वाशिवाय काहीही नाहीये. ते आत्मभान आता त्या ऊर्जा कणांशी संवाद साधताना काय म्हणतेय ते इथे काव्यरूपाने मांडले आहे.

*घ्या परतूनी घ्या परतूनी ॥*
*प्रकटवलेल्या क्षमता माघारी ॥*
*मी तुमचा आभारी विश्व कणांनो ॥*
*मी तुमचा आभारी ॥धृ॥*

*दिले सगुणरूप जरी मी असे निर्गुणी ॥*
*जाणिवा देऊनी केलेत मला साक्षी ॥1॥*

*तुम्हीच तुमचे असे सुरूप घेऊनी ॥*
*ओळख दिली मज अहं ब्रह्मास्मि ॥2॥*

*प्रसवूनि क्षमता त्या वृद्धिंगत करूनी ॥*
*सत्वाचे शिखर ते गाठा हो तुम्ही ॥3॥*

*संत शब्दामृत तुम्ही प्राशन करूनी ॥*
*मजला हो ध्यानी ती द्यावी उन्मनी ॥4॥*

*सत्वाच्या या पवित्र दर्पणी ॥*
*माझे पाहाणे तयात करा हो तुम्ही ॥5॥*

*आता झालात श्रीगुरू चरण तुम्ही ॥*
*माझे स्वत्व सदा तुमचे हो ऋणी ॥6॥*

*खेळ द्वंद्वाचा हा सत्वर मिटवूनी ॥*
*तुमचे अद्वैत मिळो माझे अद्वयी ॥7॥*

# 190. प्रार्थना

*प्रभुजी हम अमृत के प्यासे ॥*
*इस प्यास को हम बुझाए कैसे ॥धृ॥*

*ऐसी किरपा करो हे दयाल ॥*
*हमरे मन बसो सदा तुमरा खयाल ॥1॥*

*अमृत गुरबाणी पिवो पिवो ॥*
*मैं मेरा सब जगत बिसराहो ॥2॥*

*अमृत गुरबाणी गावत गावत ॥*
*चूंके यमघाट हम प्रभू पावत ॥3॥*

**पंजाबी भाषेत सुचलेली कविता.**

# 191. सभै रचना तेरी

*सभै रचना तेरी सभै रचना तेरी ॥*
*हाऊ बारीक मै हर बारी हारी ॥धृ॥*

हाऊ = अहं,   बारीक = कमजोर

*ना दिसे "मै" उसकी पकड है भारी ॥*
*मन है माया मैं किछ नाही पाई ॥1॥*

*मै कछु नाही इह ग्यान तू कराई ॥*
*सब किछ तेरा इह गुरग्यान तराई ॥2॥*

*मै आकास तू परगास दिखाई ॥*
*आंस है इतनी तू मति मोरी द्रिडाई ॥3॥*

परगास = प्रकाश,   द्रिडाई = दृढ करणे

*मै मन मेरा हाऊ बलिहारी जाई ॥*
*कर किरपा प्रभ तू मोरी लाज रखाई ॥4॥*

**पंजाबी भाषेत सुचलेली कविता.**

# 192. पाहाणे

*पाहणाऱ्याने पाहता मनगुणदोषा ते ॥*
*होऊनिया ते नाहीसे अंती शून्यची उरे ॥धृ॥*

*पाहणाऱ्याने पाहता शून्याकडे ॥*
*शून्य होऊनिया तिथे साक्षीभाव उरे ॥1॥*

*साक्षीभावाने पाहता पाहणाऱ्याकडे ॥*
*तिथे अवघे ब्रह्मची दाटे चहुकडे ॥2॥*

*कलीकाळी वरदान दिले श्रीगुरूहरीने ॥*
*पाहता पाहता सगुण निर्गुणची झाले. ॥3॥*

*ऐसे माझे व्हावे जगी सिद्ध ते पाहाणे ॥*
*म्हणून श्रीगुरू चरणी सर्वस्व ते वाहिले ॥4॥*

# 193. प्रभु दर्शन प्यास बुझा पंचसखी री

विश्वातील पाच तत्त्वांनी मिळून आपले शरीर व मन निर्माण झाले आहे. संतांनी त्यांना पंचसखी म्हणून छान वर्णिले आहे. तिच संकल्पना घेऊन ही रचना झाली.

*प्रभु दर्शन प्यास बुझा पंचसखी री ॥*
*मुझे वेग मिलाओ हरगोविंद सखी री ॥धृ॥*

*सखी पंचसखी तुम काया मनी धारि ॥*
*माया नीत नीत दिसे इत उत सारी ॥1॥*

*श्रीगुरू परसाद अब हम सब जानी ॥*
*माया सगुण, वसे उस पार मुरारी ॥2॥*

*तुम हो सखी क्यों मेरा मोहन छिपाई ॥*
*किलविख त्याग मुझे प्रभुदरस दिखाई ॥3॥*

*अचरज हैं सखी जब पहचान मिटाई ॥*
*तुमरे अंदर अनहद तब तुम हो सुनाई ॥4॥*

*मंगल गावो, मंगल गावो सखी री ॥*
*मुझे प्रभु आण मिलाओ सखी री ॥5॥*

# 194. प्रित जुडी

*प्रित जुडी सखी प्रित जुडी ॥*
*हरगोविंद से मेरी प्रित जुडी ॥धृ॥*

*निंद गयी मोरी चैन गयी ॥*
*खानपान सब अब बिसर गयी ॥1॥*

*मायामोह मैं सब त्यागी मुरारी ॥*
*पर मोहन तेरे मोह से मै हारी ॥2॥*

*क्युं तुम छलसे मोरी सुध चुराई ॥*
*अब कहा गये मेरे कृष्ण कन्हाई ॥3॥*

*तेरे चरण ना छोंडू नारायण हरी ॥*
*प्राण जांई पर मेरी आंस ना जांई ॥4॥*

*तुम अंतर्यामी अद्वय हम जानी ॥*
*गुरु किरपा से तू मोहे दर्स दिखाई ॥5॥*

# 195. घन जलद सावळा

*अवनीवरती शीतल जलधारा ॥*
*विठू माझा प्रेमळ सावळा ॥*
*ओथंबले मन प्रेमामृतधारा ॥धृ॥*

*आकाश निरभ्र मोकळे ॥*
*नेसले अनंताचे सोवळे ॥*
*आकाश विठ्ठल विठ्ठल ॥*
*तेची दिसे परब्रह्म निष्कल ॥1॥*

*तिथे श्रीगुरू चरण एकची खुण ॥*
*त्यांचे पायीचा मी व्हावा एक कण ॥*
*ऐसी सर्व उपाधींची व्हावी राख ॥*
*जसे तिथे न उरे कोण खास ॥2॥*

*ज्ञात अज्ञात इथे अति अलीकडे ॥*
*पल्याड अव्यक्त दाटले चहुकडे ॥3॥*

# 196. जाळले जाळले

*जाळले जाळले अहंकाराला जाळले ॥धृ॥*

*आकाराला जाळले विकाराला जाळले ॥*
*मीपणाला जाळले माझेपणाला जाळले ॥1॥*

*मनाच्या स्मशानी त्याच्याच इच्छा वासनांना जाळले ॥*
*त्याच्या वृत्ती प्रवृत्तीला जाळले मालकीच्या भावालाही जाळले ॥2॥*

*द्वैताला जाळूनिया अद्वैत भस्म अंगी लावियले ॥*
*श्री गुरू चरणी आता सर्व शून्य होऊनिया राहिले ॥3॥*

# 197. पारब्रह्म परमेशर

*पारब्रह्म परमेशर सतगुरु ॥*
*आगम अगोचर नाथ ॥धृ॥*

*अजाण मैं कैसे जाणू ॥*
*जो घट घट हैं रहते आप ॥1॥*

*आप छुपे हैं मुझमें जाणू ॥*
*फिर क्यूँ लगता हुँ मैं अनाथ ॥2॥*
*कोटसूर्यसम तेज प्रकाश ॥*
*तूद देख न सके मेरी आँख ॥3॥*
*बिरहा बिरहा अंदर अगन ॥*
*कब बरसेगी तेरी अमृत धार ॥4॥*
*कैसे पार होगी भवनय्या ॥*
*थाम ले प्रभू तू हमरा हाथ ॥5॥*

*तू दयाल तू कृपाल स्वामी ॥*
*सदा मैं जाणू तू हमरे साथ ॥6॥*

*आठ पहर कर जोड रहू ॥*
*तुमरी चरण सदा हमरा माथ ॥7॥*

# 198. जे जे भेटे भूत

*आता जे जे भेटती भूत ॥*
*त्यासी जाणावे भगवंताशी सूत ॥धृ॥*

*जरी दिसे ते सगुण साकार ॥*
*जाणवे मागे तत्व निर्गुण निराकार ॥1॥*

*जो पाहती विश्व या देहबुद्धीतून ॥*
*त्या माजी जाणावे ते आत्मतत्त्व अनन्य ॥2॥*

*या तृष्णेची नदी मिळो अमृतसागरी ॥*
*द्वंद्वाचे तट बुडो अद्वैताचे पुरी ॥3॥*

# 199. तेज प्रखर

*तेज प्रखर तव ऐश्वर्याचे ॥*
*उजळती कणकण ब्रह्मांडाचे ॥धृ॥*

*जीवन आमुचे ऐश्वर्य तुझे रे ॥*
*तुझीच सत्ता अखंड असे रे ॥1॥*

*प्रकाशक तू ज्ञानविज्ञानाचा ॥*
*स्वामी असा तू अनंत तत्त्वाचा ॥2॥*

*ऐश्वर्य देखता आत्मभान हरपले ॥*
*जे जे तुझे ते माझेच मानले ॥3॥*

*तव कृपेने तव ऐश्वर्य देखिले ॥*
*तुझ्या विरहाचे इथे रण ते पेटले ॥4॥*

*तू माझ्यात तरी हा विरह कसा रे ॥*
*तव विरहाचा हा अग्नी चेतू दे ॥5॥*

*तनमनातून तव तेज येऊ दे ॥*
*ते तेज पुन्हा तव तेजात मिळू दे ॥6॥*

# 200. प्रिय बोल सखी री

*प्रिय बोल सखी री प्रिय बोल सखी री ॥*
*मेरे राम का नाम प्रिय बोल सखी री ॥धृ॥*

*जोड जोड तू अक्षर इक इक ॥*
*राम के नाम तू बोल अनगिनत ॥*
*कैसे...राम बिन हम सुख पाए सखी री ॥1॥*

*रामनाम जो हम औखद पाये ॥*
*किलविख सब मन के यह जाए ॥*
*न आए संकट निकट कभी री ॥2॥*

*रामनाम जप जप जो गाए ॥*
*मन में ब्रह्म प्रकट हो जाए ॥*
*पाए शांत अनंत मती गती री ॥3॥*

*जानू बाहर राम राम हैं अंदर ॥*
*जहां देखू पाऊ मेरे राम अति सुंदर ॥*
*रामरस पिऊ है यह अमृत शीतल री ॥4॥*

# 201. चल शोधू तिथे

*चल शोधू तिथे त्या हृदयतळाशी प्रेमाचा तो अपार सागर ॥*
*संध्या छाया पडतील तिथे जरी जिंकून घेऊ मृत्यूचे समर ॥1॥*

*एकटेच जरी चालावे लागे ओलांडण्या ते वृद्ध क्षितिज ॥*
*वर्षाव करूया प्रेमाचा त्यावर आपले जवळी जो जो येईल ॥2॥*

*विसरून सर्व तो भूतकाळ ऐसे होऊ प्रेमाचा स्रोत ॥*
*मृत्यूही जरी येऊ पाहाता प्रेमानेच करू त्याचे स्वागत ॥3॥*

# 202. जरी मी आहे इथला

*जरी आहे मी इथला ॥*
*तरी आहे तिथलाही, ॥धृ॥*

*इथे मी असा आहे प्रकट ॥*
*तिथे आकाश आहे मी. ॥1॥*

*पंचसखी गाता गीत हे मंगल ॥*
*तिथे ऐकू नाद अनहद हा मंजूळ ॥2॥*

*इथे आत्मभान ते आले चैतन्यातून ॥*
*ते केवळ पूर्णत्व पातले त्या ब्रह्मातून ॥3॥*

# 203. अज्ञानी मी असा

*अज्ञानी मी असा मी मलाच गं अजाण, ॥*
*कसे मज भेटतील ते श्रीहरी नारायण ॥1॥*

*सगुणी दिला जन्म तुम्ही माझे मायबाप ॥*
*निर्गुणी होण्या जन्म आता भेटावे श्रीसद्गुरू नाथ ॥2॥*

*ज्याचे मुखी सदा नाम हरी हरी, ॥*
*त्याचे चरण मी धरीन सत्वरी, ॥3॥*

*जो मज दाविल हृदयी श्रीराम, ॥*
*आई मी वाहीन गं त्याला माझे पंचप्राण... ॥4॥*

*दान गं द्यावे मज देवाने विरहाग्निचे, ॥*
*करीन दहन त्यात मी माझ्या तनमनाचे, ॥5॥*

*आता इथे पुन्हा न व्हावा सगुणाचा संग ॥*
*जलात जावे जल मिळूनी अन् ते व्हावे अथांग ॥6॥*

# 204. जीवन वास्तव प्रखर

*ऐसे हे जीवन वास्तव प्रखर ॥*
*असूनिया मिथ्या त्याची जाणीव कठोर ॥धृ॥*

*ऐसे माझे कित्येक मरून गेले मी ॥*
*माझ्यातूनच पुन्हा उपजले ते नवीन ॥1॥*

*पाहा तो मी अनेकदा जन्मलो ॥*
*जगलो मेलो फिरून जन्मलो ॥2॥*

*ऐसे जीवनचक्र लागले गतीला ॥*
*परि कोण मला निरंतर पाहत राहिला ॥3॥*

*तो पाहणारा मी व्हावा हाची हट्टाहास ॥*
*आला मी जीवनी घेऊनि नव काया आभास ॥4॥*

*आता तो पाहाणारा मी माझा झाला ॥*
*मी माझ्यातून मला पाहू लागला ॥5॥*

*आता अवस्थांतराच्या ना लागतील चवडी ॥6॥*

*आता नाही रचणार चवडी अवस्थांतरांच्या ॥*
*राहीन होऊन रेणू श्रीगुरू चरणांच्या ॥7॥*

# 205. लुटले लुटले

*लुटले लुटले मीच मला लुटले, ॥*
*लागला हरिचा नाद मीपण सरले ॥धृ॥*

*संसारी हा खेळ तृष्णेचा मांडियेला, ॥*
*सुखदुःखामाजी मीपणा कमाविला, ॥*
*आत्मभान मायेत ऐसे लयाला गेले ॥1॥*

*अवचित घडले कसे कोण जाणे, ॥*
*जाणविले मजला हरी पाहतो आहे, ॥*
*भासाभास तर्क तिथे क्षणार्धात तुटले ॥2॥*

*ऐकेना अहं तयाने विज्ञान शोधले, ॥*
*परि हरी तेज विज्ञानानेची दाविले, ॥*
*अंती सर्व अहं गर्व पुरते लुळे पडले ॥3॥*

*हरी पाही परि मजला ना कुठे दिसे, ॥*
*व्याकुळला जीव तो सैरभैर पळे, ॥*
*स्थिर करूनी मन श्रीगुरू चरण धरीले ॥4॥*

*श्रीगुरू वचन बोलले, ॥*
*श्रीगुरू वचन ऐकीले, ॥*
*तू पाहशील हरीला माझ्याच नजरेने ॥5॥*

*गुरवाणी गुंजे तू भोग संसार भोग ते, ॥*
*परि जळी जैसे कमलदल असे कोरडे, ॥*
*आठ प्रहर तू हरी नाम ना विसरे ॥6॥*

# 206. रखो राखणहारे

*राखो लाज मोरी राखणहारे ॥*
*हम द्वारे तुमरे हरि गोविंद मुरारे ॥धृ॥*

*माया खुद को कभी नही जाणे ॥*
*लापरवाह यहां हैं ब्रह्म खुद से ॥1॥*

*पारब्रह्म निरंजन परम परगासे ॥*
*उपजी माया जीवभाव भरम से ॥2॥*

*माया देखे सुणे माया माया ही बोले ॥*
*जैसे मैं मैं करती कठपुतली डोले ॥3॥*

*हम मीन तुम आतमसिंधू अपारे ॥*
*अंदर बाहर तुम एको प्रभु हमारे ॥4॥*

*जनम जनम हम माया में लपटे ॥*
*लाज गवांई मनइच्छे से नही छुटे ॥5॥*

*दरस तेरे के जन्मोंसे है प्यासे, ॥*
*श्रीगुरु आगे हम सिर धडी उतारे ॥6॥*

*कर जोड हरि हम द्वारे तुमरे ॥*
*गोविंद गोपाल जगदीश मुरारे ॥7॥*

*राखो लाज मोरी राखणहारे ॥*
*राखो लाज मोरी राखणहारे ॥8॥*

# 207. बिरहनिया

ईश्वर चैतन्य रूपाने आपल्यामध्ये असतो. पण तिथे त्या चैतन्यात दडलेले ईश्वरीय तत्त्व आपण थेट जाणू शकत नाही. त्याच चैतन्यामुळे आपल्याला ईश्वराचा विरह जाणवतो. एकीकडे तो विरह सहन होत नाही आणि दुसरीकडे आधीच कमकुवत असलेलो आपण मायेला निष्प्रभही करू शकत नाही.

यावरून एक गोपी तिची ही व्यथा श्रीकृष्णाला त्याच्यावर नाराज होऊन सांगते असे रूपक घेतले आणि ही रचना सुचली.

*जा जा मैं तोसे नाही बोलू कन्हैया ॥*
*तू मुझ में फिर क्युं लागि तनहांईया ॥धृ ॥*

*वेद कितेब पढपढ मन थकाया ॥*
*मूरत पूजी अर तुझे भोग चढाया ॥1॥*

अर = और

*घुम घुम तीरथ तनमन उलझाया ॥*
*प्रभू मिलन को कछु मिल नाही उपाया ॥2॥*

*तू मेरो प्राण तू हैं मनतन बसिया ॥*
*जन्मोंसे हुं क्युं मैं तेरी बिरहनिया ॥3॥*

बिरहनिया = जिसे बिरह हुआ हैं वह गोपी

*तू सत तू चित आनंद मन वसेया ॥*
*फिर भी क्युं तोसे मैंने नही पाया ॥4॥*

वसेया = निवास करनेवाला

*जब कोई संत भगत तुझे जाणिया ॥*

*सब को तुने तुझ मे ही समाया ॥5॥*

*जब तुद धियाऊ बाधत मोहमाया ॥*
*मै मसकीन इह होवे लखबरीया ॥6॥*

मसकीन = कमकुवत

लखबरीया = लाखो बार

*निमख इक बिसरु तो लागे जुग बिताया ॥*
*रोमरोम से भई मैं हरि तेरी जोगनिया ॥7॥*

निमख = क्षण

*तुम आओ जी बन के गुर-ग्यानिया ॥*
*बल बल जांऊ सदा मैं तेरी चेरीया ॥8॥*

चेरीया = शिष्या

*अब मैं हारी प्रभू बिरह से हो सखिया ॥*
*मिल गोविंद या लेवो प्राण मनहरीया ॥9॥*

**पंजाबी भाषेत सुचलेली कविता.**

# 208. प्राण सख्या श्रीरामा

नमस्कार, वृद्धपणी माणसाची परिस्थिती शक्तीहीन होते. सर्व क्षमता क्षीण झालेल्या असतात. मन सैरभैर होते व ते ईश्वराला सतत शरण जाते. पश्चात्तापाने मन उद्विग्न होते, कारण काळ हातून निसटलेला असतो. भोगवादी द्वैताने त्या निष्पाप जीवाला सपशेल चकवा दिलेला असतो. आणि आता अशा वेळी तो जीव भानावर येऊन देवाची करुणा भाकतो. ही रचना गुरबाणी मधील "रामराए होवे बैद बनवारी" हे अत्यंत करुण पण अमृतमयी शबद ऐकून सुचली. त्याचा अनुवाद केलेला नाही. मात्र मांडणी त्यास समांतर आहे.

*प्राण सख्या तू माझ्या श्रीरामा ।*
*मज समीप यावे वैद होऊनिया ॥*
*तव नामरूप औषध देऊनि ।*
*अद्वय मजला करावयाला ॥धृ॥*

*थकले तन ही निर्बलता ।*
*नयनी वाहे अश्रुधारा ॥*
*केस धवल कंठ बैसला ।*
*देह पैलतीरी आला राघवा ॥1॥*

*मन वढाय तो चंचल वारा ।*
*द्वैताने हा फास आवळला ॥*
*औषध नाही आत वेदना ।*
*धाव धाव आता रघुराया ॥2॥*

*तव दर्शन आस मज श्रीरामा ।*
*आर्त तुझी मी वाट पाहता ॥*
*प्राण आता कंठाशी आला ।*
*तव चरणी दे मज बेअंत विसावा ॥3॥*

# 209. मी अनाथ

आईबाबांच्या नंतर ईश्वर आपला आईबाबा होतो. वाटत असणारे अनाथपण तोच दूर करतो. केवल त्याला शरण जाणे आवश्यक आहे.

आईबाबांची आठवण ही अति हृद्य जरी असली तरी नैराश्यातून बाहेर काढणारी नितांत प्रेरणादायी आहे. नव उमेद आणि उत्साह वर्धक आहे. कारण ते त्यांच्या अपरिमित जाज्वल्य अशा आशीर्वाद रूपात आपल्या समवेत आहेत. त्यांचे प्रेम सतत तनमनातून स्फुरत असते. अक्षरशः त्यांच्या सावलीच्या रूपात त्यांचे प्रेम आपल्या समवेत आहे. त्यांची उणीव जरूर भासते पण ती उणीव पुढच्या क्षणी भरून काढण्यासाठी त्यांनी असे काही आपल्याला अमूल्य दिलेय की साक्षात ईश्वराला ही आश्चर्यच व्यक्त करावे लागेल. त्यांची परम पवित्र सूक्ष्म स्पंदने आपले सतत रक्षण करण्यासाठी सुसज्ज आहेत. ते आपल्या समवेतच आहेत यात शंका नाही. संपूर्ण जीवन त्यांचे चरणी अर्पण...

*मी अनाथ प्रभू तू मम प्रिय नाथ॥*
*अजाण मला तुझी प्राणमय साथ ॥धृ॥*

*तू अनंत अपार ।*
*परम पुरुष दीनानाथ ॥*
*अंतर्बाह्य तू जन्मोजन्मी ।*
*ना तुटे तव साथ ॥1॥*

*मायबाप माझे ।*
*तव स्वरूप साक्षात ॥*
*अप्रकट जरी उभयता ।*
*भेट होते तव दर्शनात ॥2॥*

*तू श्रीगुरू तत्त्व दयाळ ।*
*माझा जीवनाधार ॥*

*अपराधी मी तुझा ।*
*या मायेतून मज उद्धार ॥3॥*

*भावेल जैसे तुज देवा ।*
*मजला इथे तू राख ॥*
*ना सोडील तव चरण ।*
*होईल जरी देहपात ॥4॥*

# 210. येळकोट

*येळकोट देवा येळकोट ।*
*देवा तुझा सदानंदा ॥*
*षड्रिपू तुडवितो पायी ।*
*कृपा असावी देवा ॥धृ॥*

*माझा हात तू धरिला देवा ।*
*मल्हार मार्तंडा ॥*
*म्हाळसाई शक्तिरूपा ।*
*तिचा हा ब्रह्मांड सोहळा ॥1॥*

*तुझा जयघोष देवा ।*
*तुझा भंडारा उधळला ॥*
*खोबऱ्याची वाटी ।*
*माझा अहं मी फोडीला ॥2॥*

*अंतर्बाह्य हा जीव ।*
*सोनेरी भक्तीने रंगला ॥*
*माझ्या हृदयीचा देवा ।*
*तुम्हा आवडला देव्हारा ॥3॥*

*तुझ्या पालखीचे भोई ।*
*त्यांची चरण धूळ मस्तका ॥*
*तुझा ध्वज उंच उंच ।*
*डोलती अनंत रूप पताका ॥4॥*

*मायेचा हा डोंगर ।*
*मी चढीन माझ्या खंडोबा ॥*
*कडे पठारी तुझे अमृत वैभव ।*

*भोगिन रे देवा ॥5॥*

*तुम्ही माझे मायबाप*
*साक्षात पार्वती शंकरा ॥*
*श्रीगुरू म्हणून मज भेटावे*
*उधळीन अस्तित्वाचा भंडारा ॥6॥*

# 211. श्रीराम हृदयी पाहिले

आपल्या मायमराठीला कोटी कोटी प्रणाम. भावनांना चपखल व अर्थपूर्ण शब्दरूप देणारी आई श्रीसरस्वती साक्षात मातृभाषा म्हणून आपल्याला लाभली आहे. जसं मातृत्व सगळ्या मातांमध्ये समानतेने प्रतीत होते तसेच तिची इतर भाषा स्वरूपे सुद्धा तितकीच जाज्वल्य आहेत - जणू त्या तिच्या विविध तेजःपुंज प्रभा आहेत. शतशः वंदन.

*पाहिले पाहिले श्रीराम हृदयी पाहिले ॥*
*तनमनाचे करूनी मंदिर चित्त चरणी वाहिले ॥धृ॥*

*त्यागिले त्यागिले मी माझेपण त्यागिले ॥*
*कोटी सूर्य तेजाने हृद आकाश व्यापिले ॥1॥*

*गंगौघ खळखळते ह्या नयनांतून वाहीले ॥*
*जाणिवांच्या कोंदणी रघुनंदन मी जाणिले ॥2॥*

*सुमुखपंकज करपंकज पदपंकज उमलले ॥*
*श्रीराम मज सन्मुख समचरण मी वंदिले ॥3॥*

*द्वैताच्या भ्रम-पवनी आत्मभान जपिले ॥*
*जाता जे जे पाहू मज अद्वयची तू दाविले ॥4॥*

*आता निर्भय निःशंक निर्वैर मन ते जाहले ॥*
*मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम अखंड ध्यायिले ॥5॥*

*श्रीराम जय राम नाम श्रीराम दुमदुमले ॥*
*पिंडी हे ब्रह्मांड श्रीरामरूप प्रकटले ॥6॥*

*सफल सुफल जाहले जन्म मरणांचे फेरे ॥*
*दर्शनाने तुझ्या चिरंजीवीत्व मज लाभले ॥7॥*

# 212. स्वप्न माझे हे स्वप्न माझे

*ना कर्ता ना भोक्ता ॥*
*नाही मालक कोणी ॥*
*ह्या जाणिवांचा इथे ॥*
*स्वप्न माझे हे स्वप्न माझे ॥1॥*

*वृत्ती प्रवृत्तींचे पीळ पेटले ॥*
*इच्छा वासनांचा उठला धुराळा ॥*
*षड्रिपू गेले तपोभूमीत गाडले ॥*
*स्वप्न माझे हे स्वप्न माझे ॥2॥*

*देह केला धारण परि ॥*
*देहची आता गेला त्यागला ॥*
*आता मनाला शून्यत्व लाभले ॥*
*स्वप्न माझे हे स्वप्न माझे ॥3॥*

*भाव आविर्भाव सर्व निर्भाव ॥*
*मी निर्गुण निराकार निर्विकार ॥*
*माझ्यात सगुण विश्व म्या देखिले ॥*
*स्वप्न माझे हे स्वप्न माझे ॥4॥*

*सगुण ते भेदूनी विवेकाने ॥*
*सगुणी निर्गुण ब्रह्म ते आणिले ॥*
*बिंदू अमृत-सिंधू अद्वयची झाले ॥*
*स्वप्न माझे हे स्वप्न माझे ॥5॥*

*जाहली श्रीगुरू कृपा अपार ॥*
*आता नुरला तो मायेचा भार ॥*
*श्रीगुरू शिष्यासह सर्व भेद निमाले ॥*

*स्वप्न माझे हे स्वप्न माझे ॥6॥*

*आता अल्याड पल्याड मायेच्या ॥*
*खेळ मांडियेला द्वैताद्वैताचा ॥*
*परमानंद भोगतो अनंताचा तिथे ॥*
*स्वप्न माझे हे स्वप्न माझे ॥7॥*

# 213. श्री गुरू सन्मुख

राग जैतश्री मधील श्री गुरू अर्जुन देवजी यांची रचना अत्यंत विनम्रपणे मराठी भाषेत रूपांतरीत करण्याचा प्रयत्न केला आहे.

*अब मैं सुख पायो गुरु आगि ॥*
*त्यजी सियानप, चिंत विसारी, ॥*
*अहं छोडियो, है तियागि ॥धृ॥*

*श्रीगुरु सन्मुख होता, सुखरूप पावलो मी ॥*
*चतुराई त्यजिली, चिंता मिटली ॥*
*अहं हा सोडूनिया, तृष्णा त्यागिली ॥धृ॥*

*जवु देखु तवु सगल मोह मोहीयो, ॥*
*तवु सरणी परिउ गुर भागि ॥*
*कर किरपा टहल हरि लाइउ ॥*
*तवु जम छोडी मोरी लागि ॥1॥*

*ज्यास मी पाहू जाता ॥*
*त्यावरी मायेची मोहिनी ॥*
*धावलो तुझिया चरणी ॥*
*गुरुभाग्य योग उजळी ॥*
*तव कृपा होई सत्वरी ॥*
*मज घाला हो हरि चरणी ॥*
*तेणे मजलागी ॥*
*यम बाधणार नाही ॥1॥*

*तरिउ सागर पावक को ॥*
*जवु संत भेटे वड भागि ॥*
*जन नानक सरब सुख पाए ॥*

*मोरो हरि चरणी चित लागि ॥2॥*

*अग्नी सागर करण्या पार ॥*
*भेटे संत मम भाग्य अपार ॥*
*दास नानक सदा सर्व सुखी ॥*
*मम चित्त लागो हरीचे चरणी ॥2॥*

# 214. निर्गुण समाधी

*विश्व-क्षमतांची साम्राज्ञी ॥*
*आई तू जगदंब भवानी ॥धृ॥*

*सगुण ऊर्जेला स्थिर करूनी ॥*
*शिव समर्पित सहज होऊनि ॥1॥*

*लावलीस तू निर्गुण समाधी ॥*
*प्रकटले शिवचैतन्य तव अंतर्यामी ॥2॥*

*तुझे तेज गं यावे माझे बुद्धिमती ॥*
*श्रीगुरू कृपे मिळावी अद्वय गती ॥3॥*

# 215. मनोकमल

*ज्ञानसूर्य विवेक किरण पसरावे ॥*
*मनोकमल तेजाने न्हाऊन निघावे ॥धृ॥*

*तव सौंदर्यासम आमुचे भाग्य उजळावे ॥*
*आमुच्यातूनी सहज अद्वय उमलावे ॥1॥*

*अहं अली हा मुक्त होऊनि ॥*
*अनंतात तयाने विलीन व्हावे ॥2॥*

*ऐसे आमुचे सुंदर मनोकमल ॥*
*श्रीगुरू कृपेने हरी चरणी शोभावे ॥3॥*

अली म्हणजे भुंगा

# 216. निरागस तू निरागस मीही

खरे तर प्रत्येक जण निरागसच असतो. आपल्याला माया खेळविते. काही नवदांपत्य तर सपशेल भांडणाची शिकार होतात. भांडणाचा विजय कधीच नाही झाला पाहिजे.

*निरागस मी निरागस तू ही ॥*
*माया साधते डाव नकळत अशी ॥धृ॥*

*विषयाचे विष कालवून मनी ॥*
*वादविवाद तिथे घडविते ती ॥1॥*

*तिथे संघर्षांच्या ठिणग्या पडती ॥*
*भान हरपते दोघे भांडून दमती ॥2॥*

*सावध राहू जपूया नाती ॥*
*ओंजळ भरूया भावसुमनांची ॥3॥*

*मने सांभाळून एकमेकांची ॥*
*प्रेमाने जाऊ ईश चरणांशी ॥4॥*

# 217. Lets have a feeling

*Let’s have a FEELING of hand being held by the God*

*Let’s have a FEELING of ears listening Shri Gurbani*

*Let’s have a FEELING of heart understanding HIM*

*Let’s have a FEELING of mind engulfed by divinity*

*Let’s have a FEELING of eyes shedding tears with bliss*

*Let’s have a FEELING of Self-less-ness while surrendering to HIM.*

# 218. भगवंत तू माझा भगवंत तू

*भगवंत तू माझा भगवंत तू ॥धृ॥*

*श्वासात तू प्राणात तू ॥*
*स्पर्शात तू गंधात तू ॥*
*वाणीत तू रसनेत तू ॥*
*पंचकोशांचे मूळ तू*
*कायेच्या कणाकणांत तू ॥1॥*

*राग संगीत तू भावरंगात तू ॥*
*मनात तू बुद्धीत तू ॥*
*स्वत्व तू चैतन्य तू ॥*
*दृष्टीत तू सृष्टीत तू ॥*
*पिंडी ब्रह्मांडी तूच तू ॥2॥*

*सगुण तू निर्गुण तू ॥*
*साकार आकार निराकार तू ॥*
*अमृत तू त्याचा गोडवा तू ॥*
*अपरंपार तू अनंत तू ॥*
*सर्वस्व तू माझे जीवन तू ॥3॥*

*अस्तित्व तू आत्मभान तू ॥*
*ज्ञान तू विज्ञान तू ॥*
*प्रशांत तू अद्वैतानंद तू ॥*
*सापेक्ष तू निरपेक्ष तू ॥*
*समर्पण तू निर्वाण तू ॥*
*तुझ्यात तू अन् माझ्यातही तूच ॥4॥*

# 219. कठपुतळी ओळखली

*कठपुतळी ओळखली ती ॥*
*कठपुतळी मी ओळखली ॥धृ॥*

*मी - माझे - मला चे धागे बांधूनी ॥*
*खेळ नियंत्रण हो कुणाच्या हाती ॥1॥*

*भासे तिला सत्य या मायावी जगती ॥*
*कार्यकारण शृंखलेत स्वतः ती गुंतली ॥2॥*

*निर्मुनी संसार तयात धुंद बेधुंद रमली ॥*
*आभासी सत्यता लक्षात ना तिच्या आली ॥3॥*

*द्वैतात सुखदुःखे ती हसली रडली ॥*
*असूनी अमर कितीदा ती मृत्यू पावली ॥4॥*

*श्रीगुरू कृपे तिज लाभता ज्ञानदृष्टी ॥*
*कठपुतळी आता ती जाहली वेगळी ॥5॥*

*कठपुतळी आहे पण आत ती नाही ॥*
*अखरीत अनुभव अवतरला या जीवनी ॥6॥*

*या या मजसंगे या या हो झडकरी ॥*
*ऐकू गाऊ श्रीगुरुवाणी सदा मुक्तीदायी ॥7॥*

**अखरीत = आश्चर्यकारक**

# 220. देवपूजा

*परम सुखदायी परम सुखदायी ॥*
*देवपूजा अरदास परम सुखदायी ॥धृ॥*

*साक्षात चैतन्य सोहळा हा मी पाही॥*
*जळी स्थळी सर्वत्र देव ठायी ठायी ॥1॥*

*ऐकूनी अमृतमयी श्री गुरूंची वाणी॥*
*देव आले हो आले आज या हृद-गृही ॥2॥*

*स्वतः येती इथे स्नान स्वतः देव करिती ॥*
*पूजा आसन स्थापन स्वतः देव होती ॥3॥*

*स्वतः लावून चंदन गंध टिळा मस्तकी ॥*
*पवित्रतेची मंगल रूपडी साजरी गोजिरी ॥4॥*

*पाने फुले वस्त्रे आवडीची स्वतः देव ल्यायती ॥*
*सुगंधी ईष-सौंदर्य माझे मन मोहविती ॥5॥*

*मी निहाल निहाल ती देव पाहुनी ॥*
*काय वर्णावे सौंदर्य येते रोज नवे खुलूनी ॥6॥*

*श्री गुरू कृपे देवपूजनी मम भाग्य उजळती ॥*
*वाहतो देवा तव चरणी फुले ममाश्रुंची ॥7॥*

# 221. किती वाहती या नयनी

मायेच्या शक्ती समोर हतबल असल्याचे जाणवते तेंव्हा डोळयांतून नकळत पाणी वाहते.

*किती वाहती या नयनी ॥*
*अश्रुंच्या या संतत धारा ॥धृ॥*

*मन अशुद्ध नित्य ॥*
*कशी आणू शिष्य-पात्रता ॥1॥*
*आम्ही मायेच्या आधिन ॥*
*हार सपशेल होता षड्रिपुंचा मारा ॥2॥*

*मन विषयीची का रमते*
*जाता करावया तव आराधना ॥3॥*

*पश्चात्तापे मन उद्विग्न उदास ॥*
*श्रीगुरू तूची कृपाळा दयाळा ॥4॥*

*ही मायाशक्ती प्रबल प्रबल ॥*
*तुझ्या मार्गी टिकव तू मजला ॥5॥*

*आम्ही ना जाणू सार तुझे ईश्वरा ॥*
*श्रीराम नाम मुखी येऊ दे रे ईश्वरा ॥6॥*

*एवढीची आर्त मम हृदयीची देवा ॥*
*प्राण जावे श्रीगुरुवचनी मग्न असताना ॥7॥*

# 222. दर्शन की अभिलाषा

*तनमनधन छोड द्वार तुम्हरे आया ॥*
*दर्शन की अभिलाषा प्रभू जी ॥*
*दर्शन की अभिलाषा ॥धृ॥*

*ना पूजा भगत ना कभी सुकर्म किया ॥*
*श्रीगुरू चरणतल कभी शीश ना झुकाया ॥1॥*

*जपतप ध्यान ग्यान कुछ नही पाया ॥*
*मेरा मेरा करता जनम फिर गवाया ॥2॥*

*गती ना जानू मेरी लिखी है अब क्या ॥*
*पतित उद्धारण हेतू शरण तेरी मैं आया ॥3॥*

*तुम को मैं पांऊ जांउ ढुंडू मैं यहां वहां ॥*
*हृदय समाए मेरे अब ये दुनिया देखणवाला ॥4॥*

# 223. कठपुतली श्रीकृष्ण कन्हैया की

*कठपुतली भई सखी री ॥*
*कठपुतली कृष्ण कन्हैया जी की ॥धृ॥*

*कान्हा की मुरली धुन मधुर नादरी ॥*
*मगन भई सखी री मैं तो मगन भई ॥1॥*

*गोविंद संग खेलू रंग भरी पिचकारी ॥*
*ऐसी बिसर गई जगत को मैं हुई बावरी ॥2॥*

*मनमोहन सिंऊ जब वन रास रचाई ॥*
*मैं खोई कहां सब सुदबुध बिसरी ॥3॥*

*अब मै कहां ढुंडू खुद को री माई ॥*
*आठ पहेर मुझमे पांऊ जी मैं मुरारी ॥4॥*

# 224. आत्मनिवेदन

*श्रीगुरु चरण धूल लावूनी मस्तकी ॥*
*देवा...*
*अर्पियितो तुज मम आत्मनिवेदन भक्ती ॥*

*सुख अवीट जशी गोडी नामामृताची ॥*
*दर्शन क्षणभर होता जल वाहे नयनांतूनी ॥धृ॥*

*त्यजिले ते जे जे होते हवे त्या मनमानसी ॥*
*समर्पिले सर्वस्व दिली ज्ञानयज्ञी आहुती ॥1॥*

*आता नुरले भाव दुजे रे गेली ती भ्रांती ॥*
*आता आनंदी आनंद इथे भोगितो प्रशांती ॥2॥*

*आता श्रीगुरु चरण शरण नित्य हे मन धावती ॥*
*माझ्या रामराया तुजवीण मज अन्य ना दिसती ॥3॥*

*ऐसा तुझा संकल्प ती होतसे इथे पूर्ती ॥*
*आत्म्यातून परमात्म तुझे सहजी इथे प्रकटती ॥4॥*

# 225. ऐसी व्याकूळता

*ऐसी व्याकूळता दिलीस या जीवाला ॥*
*कैसे आभार मानू जीव निःशब्द आर्त जाहला ॥धृ॥*

*आता विषय वस्तू मधून जीव आरपार गेला ॥*
*तो अहं त्या अद्वयी ऐसा स्थिरावला ॥1॥*

*ऐसी दिधली दृष्टी श्रीगुरू आशिष लाभला ॥*
*जीव या चित्ती अति भरूनी भरूनी पावला ॥2॥*

*परम पावन पुण्यकाल अवतरला ॥*
*श्रीगुरू कृपे ईष चरणी प्राण एकटविला ॥3॥*

*श्रीसीतारामरघुराई विसावली हृदनयना ॥*
*जन्म जीवन मृत्यू आता एका स्वप्नाची कला ॥4॥*

# 226. कोंदण अद्वैताचे

*अस्तित्वाला माझ्या कोंदण हो अद्वैताचे ॥*
*विश्ववैराग्य प्रेमाचे त्यास पैलू हरिभक्तीचे ॥धृ॥*

*दारा-पुत्रपौत्र संपत्ती संबंधी प्रसिद्धीचे ॥*
*ना उरले ते कारण मम आनंदोत्सवाचे ॥1॥*

*संपला मालकीचा भाव मी-मला अन माझे ॥*
*जे जे जाणिवांत येती ते सर्व मूलकण हो अद्वैताचे ॥2॥*

*आता भ्रांतीचे मळभ ते विरले विरले ॥*
*श्रीरामनाम कारण निश्चित समाधानाचे ॥3॥*

*कार्य कर्म समाचरण घडते इथे जे जे ॥*
*क्षणाक्षणाला अर्पितो प्रभुच्या चरणां ते ॥4॥*

*लाभली गती अनंताची श्रीगुरू कृपेने ॥*
*समर्पित सदा सर्वस्व हरि चरणां ते ॥5॥*

# 227. कोण इथे?

*कोण इथे भोक्ता भोग जो भोगतो ॥*
*कोण इथे कर्ता कर्म जो करतो ॥धृ॥*

*कोण इथे द्रष्टा अंतर्बाह्य जो पाहातो ॥*
*कोण इथे अनुभावक अनुभव जो घेतो ॥1॥*

*कोण इथे ज्ञाता सदा ज्ञान जो घेतो ॥*
*कोण इथे जीव जीवन जो जगतो ॥2॥*

*आभास सत्यतेचा तोच इथे जन्मतो ॥*
*तथाकथित जीवन जगूनी तोच तो मरतो ॥3॥*

*सगुणांचा आविष्कार का इथे दिसतो ॥*
*जाणिवांचा जल्लोष का इथे उठतो ॥4॥*

*मायावी शक्तीचा जोर तोच इथे असतो ॥*
*अद्वैतातून अवघा हा द्वैतभाव उद्भवितो ॥5॥*

*केवळ श्रीगुरू चरण शरण आम्ही जातो ॥*
*कृपेने त्यांच्या सदा श्रीरामनाम उच्चारितो ॥6॥*

*श्रीराम नामे साक्षात सदा परब्रह्म हो पूजीतो ॥*
*द्वैतात असूनही अंतर्बाह्य अद्वैत जगतो ॥7॥*

# 228. कशी करू देवा मी पूजा आरती

*कशी करू मी देवा तुझी पूजा आरती ॥*
*नवक्षमतांचे दान दे करण्या तव आरती ॥धृ॥*

*अणुरेणूंपासूनी तू अनंत अशी तव किर्ती ॥*
*तुज ओळखण्या तू मज द्यावी सुबुद्धी सुमती ॥1॥*

*किती सूर्य चंद्र तुज ते नित्य ओवाळिती ॥*
*असंख्य तारकारूपी ऋषी तुज पुष्प अर्पिती ॥2॥*

*तुज दर्शन घ्यावया येती महाऋषीमुनी ॥*
*वेदघोष अखंड या ब्रह्मांडी हो निनादती ॥3॥*

*तुझे ऐश्वर्य देवा ही माया द्वैताद्वैताची ॥*
*तू मायबाप मज ऐसे घेतले मांडीवरती ॥4॥*

*श्रीगुरू तू माझा मज दिली विवेक शक्ती ॥*
*राखिलेस चरणी सतत शरणी शरणी ॥5॥*

*मी अजाण बालक असे तुझा या जगती ॥*
*पंचप्राणांच्या ज्योतीने देवा करितो तव आरती ॥6॥*

*देवा हीच माझी आरती हीच माझी आरती ॥*
*नवक्षमतांचे दान दे करण्या तव आरती ॥7॥*

# 229. पाहणाऱ्याने एक दिवस

*पाहणाऱ्याने एक दिवस ऐसेची पाहावे ॥*
*ठायी ठायी तयास तिथे चैतन्य दिसावे ॥धृ॥*

*पाहणाऱ्याने सर्व भिन्नता विसरून पाहावे ॥*
*पाहता पाहता त्या मागे एकतत्त्वची पाहावे ॥1॥*

*पाहणाऱ्याने एक दिवस त्या मायेकडे पाहावे॥*
*असूनही ती नाही तिचे मिथ्यापण ते जाणावे ॥2॥*

*पाहणाऱ्याने एक दिवस षड्रिपुंकडे पाहावे ॥*
*विवेक दृष्टीने तयांचे आभासीपण ते जाणावे ॥3॥*

*पाहणाऱ्याने एक दिवस ऐसे देवाकडे पाहावे ॥*
*पाहता पाहता श्रद्धेच्या पल्याड निघून जावे ॥4॥*

*पाहणाऱ्याने श्रीगुरू चरण ऐसे निष्ठेने पाहावे ॥*
*श्रीगुरू दर्शनी ते श्रीगुरुचरणामृतची प्राशावे ॥5॥*

*पाहणाऱ्याने एक दिवस आपुल्या अंतरात पाहावे ॥*
*भोगुनिया ते अद्वैत स्वतःमध्ये लीन व्हावे ॥6॥*

# 230. धर्म क्या हैं?

*जनम हमारा धर्म हैं ॥*
*जीवन हमारा धर्म हैं ॥*
*हमारी सांसे धर्म हैं ॥*
*हमारी भूख पियास धर्म हैं ॥*
*हमारी वेदना धर्म हैं ॥*
*हमारा प्यार धर्म हैं ॥*
*सबका विश्वास और सबकी इज्जत धर्म हैं ॥*
*हमारा हर एक अच्छा प्रयास धर्म हैं ॥*
*सब को संभालना हमारा धर्म हैं ॥*
*दूष्ट प्रवृत्ती निकालना धर्म हैं ॥*
*मानवता हमारा धर्म हैं ॥*
*सुखशांती के मार्ग धर्म हैं ॥*
*अभिन्नता का ग्यान धर्म हैं ॥*
*कर्तव्य हमारा धर्म हैं ॥*
*सेवा भाव हमारा धर्म हैं ॥*
*सुरज चंदा ग्रह तारे धर्म हैं ॥*
*प्रकृती और आत्मा हमारा धर्म हैं ॥*
*धर्म परम सत्य हैं ॥*
*हमारी सबकी मृत्यू धर्म ही हैं ॥*

# 231. अविद्येचे पेव फुटले

वैज्ञानिक दृष्टिकोनातून तर इथे फक्त दुःख आहे, पण सुख नावाच्या काल्पनिक गोष्टीकडे प्रत्येक जण जीवाच्या आकांताने पळत असतो. जीव व्याकूळ होतो... हाती काहीही लागत नाही... कारण दुःखाचा विसर म्हणजे सुखाचा आभास... पाहा किती किती विषमता ठायी ठायी संघर्ष जिकडे तिकडे अस्थिरता... पाहावत नाही अगदी... काही लोक अजाण तर काही लबाडीचा कळस... संत म्हणतात तसे सगळीकडे अविद्येचा सागर आहे... त्याला पार करण्यासाठी श्रीगुरू चरण निष्ठेने हृदयी ठेवावे.

*स्वतःला टाचणी मात्र बोचते ॥*
*तिथे पर दुःख शीतल भासते ॥*
*अविद्येचे पेव पाहा हो फुटले ॥*
*हृदयी श्रीगुरू चरण धरूया निष्ठेने ॥धृ॥*
*कोणाला कुणाचे इथे नाही देणे घेणे ॥*
*आपुल्याची दुःखात जीव सुख शोधे ॥*
*अविद्येचे पेव पाहा हो फुटले ॥*
*हृदयी श्रीगुरू चरण धरूया निष्ठेने ॥1॥*
*इथे फरकाचे ज्ञान द्वैतास निर्मिते ॥*
*कैफ चढतो धुंदीत ते जीवन वाया जाते ॥*
*अविद्येचे पेव पाहा हो फुटले ॥*
*हृदयी श्रीगुरू चरण धरूया निष्ठेने ॥2॥*
*कोणास बुद्धी अचाट मिळते ॥*
*कुणी निर्बुद्ध असती बापुडे ॥*
*अविद्येचे पेव पाहा हो फुटले ॥*
*हृदयी श्रीगुरू चरण धरूया निष्ठेने ॥3॥*
*कोणास मिळे धन धान अपार ॥*

*कुणी राहिले पाहा उघडे नागडे ॥*
*अविद्येचे पेव पाहा हो फुटले ॥*
*हृदयी श्रीगुरू चरण धरूया निष्ठेने ॥4॥*
*वाघिणीस तिचा बछडा प्यारा ॥*
*परि देते पाडसास मृत्यू वेदना ॥*
*अविद्येचे पेव पाहा हो फुटले ॥*
*हृदयी श्रीगुरु चरण धरूया निष्ठेने ॥5॥*
*इथे कुणास मिळे महासत्ता ॥*
*कुणी चाकर राही जन्मभरे ॥*
*अविद्येचे पेव पाहा हो फुटले ॥*
*हृदयी श्रीगुरू चरण धरूया निष्ठेने ॥6॥*
*इथे कुणास बल शक्ती मिळे ॥*
*परि अनेक दिसती का ते दुबळे ॥*
*अविद्येचे पेव पाहा हो फुटले ॥*
*हृदयी श्रीगुरू चरण धरूया निष्ठेने ॥7॥*
*इथे दुःखातची ते व्याकूळ जग सारे ॥*
*सुख शोधून ते ना कुणा सापडे ॥*
*अविद्येचे पेव पाहा हो फुटले ॥*
*हृदयी श्रीगुरू चरण धरूया निष्ठेने ॥8॥*
*जणू अज्ञानची इथे ऐसे पातले ॥*
*वस्तू विषय ऐसे सत्य ते भासले ॥*
*अविद्येचे पेव पाहा हो फुटले ॥*
*हृदयी श्रीगुरू चरण धरूया निष्ठेने ॥9॥*
*आमुच्या गावा केवल अद्वैत अद्वैत ॥*
*तिथे अधिष्ठान सदा सद्विवेकाचे ॥*
*परम प्रकाश अमृत हो परमानंदाचे ॥*
*या हो या शरणी श्रीगुरू चरणा ते ॥10॥*

# 232. वैराग्याचे सजीव पुतळे

*वैराग्याचे नव सजीव ते पुतळे ॥*
*जे द्वैताद्वैताच्या सदा पलीकडे ॥धृ॥*

*अलख निरंजन घन गंभीर निनादे ॥*
*तिथे भवताप तो कधी नुरे ॥1॥*

*श्री नवनाथ गुरू हो दयाळू माझे ॥*
*द्या वैभव मजला तुमच्या भक्तीचे ॥2॥*

*शरण शरण मी श्रीगुरुनाथ चरणां ते ॥*
*शरण शरण मी श्रीगुरुनाथ चरणां ते ॥3॥*

# 233. झडकरी मज कर तव चरणांची ती धूळ

परवा मला राग आसावरी शिकवायला सुरूवात केली सरांनी. त्यासाठी "हरी बिन तेरा कौन सहाई" ही अत्यंत आर्त भाव असलेली बंदीश निवडली. सराव करताना तनमनाला विसरून टाकणारा कारुण्य रस निर्माण होतो. हेच या रागाचे विशेष आहे. त्यामुळे सद्गदित व्हायला होते आणि काल सकाळी प्रॅक्टिस केल्यावर प्रवासात ह्या ओळी सुचल्या.

*मन विश्व ऊर्जा तिचे मूळ निर्गुण निर्गुण॥*
*कोण थांबवेल तयाचे हे इथले आंदोलन ॥1॥*

*आंदोलनी जहाले ते विश्व तयास सगुण ॥*
*कोणी नाही इथे परि पेटले आभासांचे रण ॥2॥*

*द्वैतसंघर्ष हा वाहीला पंचमहाभूतांतून ॥*
*तेणे कारणे अहंभाव राहिला इथे हा टिकून ॥3॥*

*द्वैतभाव जीवांस सदा करीतसे आगतिक ॥*
*कसे कळेल मजला पूर्णातिपूर्ण केवलाद्वैत ॥4॥*

*कठिणातिकठीण मजवरी आला हा प्रसंग ॥*
*क्षणोक्षणी मी इथे का हा असे तृष्णार्त ॥5॥*

*तू अति दयाळ कृपाल हरि हो मेहेरबान ॥*
*पेटला भवसागर तू वाचिव ममात्मभान ॥6॥*

*आता काय कशाची मी तुज घालू देवा आण ॥*
*झडकरी मज कर तव चरणांची ती धूळ ॥7॥*

आण = शपथ

# 234. महास्नान काकड आरती

*कार्तिक मासि ब्रह्म मुहूर्ती ॥*
*देव सकल आले भूवरती ॥*
*महासोहळा आज काकड आरती ॥*
*महासोहळा आज काकड आरती ॥धृ॥*

*देव विठ्ठल सवे ती रखुमाई उभी ॥*
*ओवाळिती त्यांसी संतजन सुरनरमुनी ॥1॥*

*आज जीवनी महाभाग्य उजळती ॥*
*सकल मंगलाचार इथे विठुच्या राऊळी ॥2॥*

*पुष्पपत्र तोरणे ठायीठायी बांधिली ॥*
*सुवासिनी काढिती दारी सडा रांगोळी ॥3॥*

*धवल धवल देव अभिषेक दही दूध लोणी ॥*
*लाविले चंदन उटी येती सप्तसरीता अभ्यंगस्नानी ॥4॥*

*रेशीम महावस्त्र सवे सुवर्णालंकार लेवूनी ॥*
*सुंदर मनोहर ल्यायला तो पुष्प मुकुट शिरी ॥5॥*

*कमलपुष्पाहार गळा माळ तुळशीची ॥*
*अष्टगंध चंदन टिळा लावला मस्तकी ॥6॥*

*आर्त संतवाणी सवे टाळ मृदंग वाजती ॥*
*थरारले अंगांग इथे अभंगात हो नाहूनी ॥7॥*

*प्रसन्न प्रसन्न देव स्मित हास्य करिती ॥*
*संतुष्ट संतुष्ट झाली अवघी संतमंडळी ॥8॥*

# 235. चिन्मय रूप घेऊन ये ग माय

“मा गो चिन्मयी रूप धोरे आय” ही बंगाली भाषेतील देवीची अतिशय आर्त प्रार्थना ऐकली. फारसे नाही कळले पण गायकाने भाव इतके आर्त कळकळीने उत्कट व्यक्त केले आहेत, की मनाचा त्यात आपोआपच लय झाला. नंतर उत्स्फूर्तपणे झालेली ही रचना.

*चिन्मय रूप घेऊन ये गं माय माझी ॥*
*मृण्मयी रूप तुझे तू दुर्गा सदानंदमयी ॥धृ॥*

*मी अजाण बाल तू महामाई देवी ॥*
*कर उद्धार सत्वरी अघोरी माई ॥1॥*

*ब्राह्मणी तू माई परात्परा ब्रह्मरुपिणी ॥*
*जगन्माता तू ब्रह्मांडोदरधारिणी ॥2॥*

*अद्वय तू माई महाविश्वविलासिनी ॥*
*मम द्वंद्व बुद्धी नाश कर गं माय माझी ॥3॥*

*प्रशांतीरूपा तू महामहाशक्ती दायिनी ॥*
*मम षड्रिपू विनाश कर गं माय माझी ॥4॥*

*तू सकल महाज्ञान विज्ञान दीपांकुरी ॥*
*मम विवेक जागृत कर गं माय माझी ॥5॥*

*श्रीगुरू स्वरूपा तू महामहायोगिनी ॥*
*हो मुक्तीदात्री माई तू महानिर्वाण रुपिणी ॥6॥*

# 236. आज माझा ज्ञानराज निवृत्ती पावला

काल कार्तिक वद्य त्रयोदशी. संत श्री ज्ञानेश्वर माउलींनी संजीवन समाधी घेतली. त्यावरून मला खालील ओळी सूचल्या, पण दिवसभर कामाच्या गडबडीत इथे द्यायचे राहून गेले.

माउली समाधिस्थ होताना तिघे भावंडे साश्रू नयनाने सद्गदित झाली होती. श्री नामदेव महाराज सांत्वन करत असताना श्री निवृत्ती नाथांजवळ आले, म्हणाले तुम्ही साक्षात श्रीगुरू व अद्वैताचे महाअधिकारी आणि आपल्या डोळयांत पाणी पाहून मला काही सूचत नाहीये. तुमचे सांत्वन मी कसे करू.

*तेंव्हा श्री गुरू निवृत्ती नाथ म्हणाले*

*आज माझा ज्ञानराज निवृत्ती पावला ॥*
*पाहा पाहा स्वसंवेद्याचा साक्षात ब्रह्म सोहळा ॥1॥*

*मज प्रेम आले उचंबळूनी दाटला हा गळा ॥*
*मी गुरू ज्ञानियाचा परि कसा रोखू बंधू प्रेमाचा उमाळा ॥2॥*

*माझ्या विठूच्या चरणतली आज वीट थरारली ॥*
*सद्गदित होई भगवंत ही ज्ञानलीला पाहूनी ॥3॥*

*शिष्य ऐसा मिळे अवघे गुरू पद आले फळाला ॥*
*धन्य जाहला हा गुरू ते ब्रह्मपद मिळे शिष्याला ॥4॥*

*ज्ञानराज माझी ऐसी सकल जगाची माउली ॥*
*भवसागरी सर्व जीवाची जाहली प्रेमळ साउली ॥5॥*

*काय वर्णू आता माझ्या ज्ञानियाचे हो ऐश्वर्य ॥*
*निःशब्द निःशब्द उमटले मनी विश्वाचे ते आर्त ॥6॥*

# 237. मोह ना अन्य जडो

*मोह ना अन्य जडो ॥*
*मज तुजवीण मनमोहना ॥*
*राख शरण सदा मज तुज श्रीचरणारविंदा ॥धृ॥*

*कुकर्म-कुविचारांची कधी ना हो ॥*
*मज ती बाधा ॥*
*दे मज ज्ञान-विज्ञान जप-तप ॥*
*योगाच्या क्षमता ॥1॥*

*तुझिया हस्ते तूच घडव रे ॥*
*तुझाच हा चेला ॥*
*सर्वस्व आहे अर्पण तुजला ॥*
*माझ्या गोविंदा गोपाला ॥2॥*

*काया-मन-बुद्धीची ना हो ॥*
*कधीच मज ती पीडा ॥*
*नांदो मज आत्मानंदी ॥*
*तू सदानंदा गोविंदा ॥3॥*

*विनवणी तुज दयाळा ॥*
*गोपाळा नारायणा ॥*
*तू श्रीगुरू म्हणूनी यावे ॥*
*मज निजधामी न्यावयाला ॥4॥*

सर्वोच्च ज्ञान विज्ञानाने तेजःपुंज झालेल्या माझ्या माय मराठीच्या चरणी शतशः नतमस्तक.

# 238. कोण हा “मी”

आपण निष्पाप निरागस आहोत, पण आपल्याला आपला मी अनेकदा त्रास देतो. आपल्या स्वतःच्याच “मी-माझे-मला” या तीन भावांवर निकराचा क्रांतिकारी हल्ला चढविण्याचे धाडस करण्यास खूप शौर्य लागते, हे सत्य आहे. त्या तिघांना सतत जाब विचारला पाहिजे. त्यांच्यावर सतत हल्ला केला पाहिजे. जेणे करून त्यांचे अस्तित्व आपल्याला त्रासदायक होणार नाही.

*समोरच्या व्यक्तीच्या मनाला ॥*
*लागेल असे बोलणारा “कोण हा मी” ॥धृ॥*

*स्वत:ला मान-सन्मान मिळावा ॥*
*म्हणून आटापिटा करणारा “कोण हा मी” ॥1॥*

*स्तुतीप्रिय, मानभावी इतरांशी ईर्ष्या राखणारा “कोण हा मी” ॥2॥*

*जे जे काही आहे त्याबद्दल गर्व बाळगणारा ॥*
*इतरांना कमी लेखणारा “कोण हा मी” ॥3॥*

*आपल्यासाठी इतरांना वाकडी वाट ॥*
*करायला लावणारा “कोण हा मी” ॥4॥*

*कमजोर व्यक्तींवर हुकूमत ॥*
*सत्ता गाजविणारा “कोण हा मी” ॥5॥*

*धुंद बेधुंद मनाप्रमाणे हट्टी व ॥*
*स्वार्थी वागणारा “कोण हा मी” ॥6॥*

*परम तत्त्वाला जाणून घ्यायचे ॥*
*टाळणारा अहंकारी “कोण हा मी” ॥7॥*

*“कोण हा मी” त्याची दखल व्हावी जी ॥*

*जाब त्यासी विचारूनी त्याची विल्हेवाट लावावी जी ॥*
*त्याच्या असण्याला शोभा येईल ती वाट धरावी जी ॥8॥*

*इतरांच्या दु:खात सहभागी होऊन ॥*
*ते वाटून घेणारा "इथे आहे" ॥9॥*

*इतरांच्या सुखात सुख मानून ॥*
*ईश्वराला त्यासाठी प्रार्थना करणारा "इथे आहे" ॥10॥*
*गरजू व अडलेल्या जीवांच्या ॥*
*निस्वार्थी उपयोगी पडणारा "इथे आहे" ॥11॥*

*सर्वांची काळजी घेणारा जीवलग ॥*
*निरपेक्ष प्रेमळ "इथे आहे" ॥12॥*

*सतत विनम्र विनयशील ॥*
*प्रयत्नशील, समर्पित "इथे आहे" ॥13॥*

*ईश्वरीय तत्त्वाला सदा समर्पित ॥*
*श्री गुरू वचन गाणारा "इथे आहे" ॥14॥*

*"इथे आहे" पण तो त्याच्या ॥*
*असणेपणात विरघळून गेलेला आहे ॥*
*अदृष्य आहे... अद्वय आहे... ॥15॥*

# 239. सांगतो तुला गुज दीपांचे

*सांगतो तुला गुज दीपांचे ॥*
*उत्सव चैतन्याचा ते तेज तयांचे ॥1॥*

*प्रकाशिती जैसे आपुले आत्म हृदयीचे ॥*
*घालवूनी अज्ञान तिमीरांधा ते ॥2॥*

*तैसे दाविती दृष्टांत दीपोत्सवी ते ॥*
*आत्मप्रकाशी घेऊ दर्शन श्रीहरीचे ॥3॥*

# 240. Revolutionary Thought Vibe

*Revolutionary thoughts vibe*
*Inspires the life*

*Revolutionary thoughts vibe*
*Illuminates the life*

*Revolutionary thoughts vibe*
*Solves mystery of life*

*Revolutionary thoughts vibe*
*Feels it an enthusiastic life*

*Revolutionary thoughts vibe*
*Makes us aloof from life*

*Revolutionary thoughts vibe*
*Helps us transcend above life*

*Revolutionary thoughts vibe*
*Takes us to Shri Guru's pious feet*

# 241. अश्रुंच्या या संतत धारा

मायेच्या शक्तीसमोर हतबल असल्याचे जाणवते तेंव्हा डोळ्यांतून नकळत पाणी वाहते.

*किती वाहती या नयनी ॥*
*अश्रुंच्या या संतत धारा ॥धृ॥*

*मन अशुद्ध नित्य ॥*
*कशी आणू शिष्य-पात्रता ॥1॥*

*आम्ही मायेच्या आधिन ॥*
*हार सपशेल होता षड्रिपुंचा मारा ॥2॥*

*मन विषयीची का रमते*
*जाता करावया तव आराधना ॥3॥*

*पश्चात्तापे मन उद्विग्न उदास ॥*
*श्रीगुरू तूची कृपाळा दयाळा ॥4॥*

*ही मायाशक्ती प्रबल प्रबल ॥*
*तुझ्या मार्गी टिकव तू मजला ॥5॥*

*आम्ही ना जाणू सार तुझे ईश्वरा ॥*
*श्रीराम नाम मुखी येऊ दे रे ईश्वरा ॥6॥*

*एवढीची आर्त मम हृदयीची देवा ॥*
*प्राण जावे श्रीगुरुवचनी मग्न असताना ॥7॥*

# 242. संतांची दिवाळी

खरी दिवाळी आपल्या संत ऋषी मुनी यांनी साजरी केली.

*सात्त्विक मायेच्या जीव पात्रात... ॥*
*घालून मनबुद्धी समर्पणाचे तेल... ॥धृ॥*

*तिथे पंचेंद्रियांची करूनी योग वात... ॥*
*बैसले अवघे संत होऊनि समाधिस्थ... ॥1॥*

*कौतुके लाविती श्रीगुरू ज्ञानज्योत... ॥*
*तेजाळले ब्रह्मांड तेजाळले आत्म... ॥2॥*

*साजिरा केला ऐसा दिव्य दीपोत्सव... ॥*
*देखिला हरी हृदयी लक्षलक्ष तेजात ॥3॥*

*हरि कृपा झाली तिथे प्रकटले शब्दब्रह्म ॥*
*ग्रंथरूप केले साक्षात ते स्वर्गीचे अमृत... ॥4॥*

*तुमच्या चरणी सर्व.. सर्व हो समर्पित... ॥*
*तुम्ही आमुचे श्रीगुरू लावण्या ज्ञानदीप... ॥5॥*

# 243. तू प्राणसखी माझी

*तू प्राणसखी माझी,*
*दिले तू श्वास माझ्या ओंजळी ॥1॥*

*श्वासांचे निरांजन त्यात भक्तीचे तेल पंचप्राणांची ज्योती ॥*
*तेजात लोपले मनतन, हे आत्म वाहीले तव चरणी ॥2॥*

*श्रीगुरू चरणी माथा, ज्यांनी समजाविला माझा हरी ॥*
*अखंड अश्रू आता जिथे अद्वैत दाटले इथे या आनंदघनी ॥3॥*

# 244. कुणी नाही इथे

वैज्ञानिक व आध्यात्मिक दृष्टिकोनातून मी हा भाव सपशेल आभासी आहे. तरी पण तो इतका प्रखर सत्य आहे की त्याला टाळता येत नाही. जर आभासच इतके प्रखर आहेत, तर त्यांच्या जाण्याने जे परब्रह्म अवतरते त्या परम सत्यरूप तेजाचे कोण वर्णन करेल?" केवळ श्रीगुरूच त्याचे वर्णन करतात. श्रीसमर्थ रामदास स्वामींनी दासबोधामध्ये म्हटलेय, "अहो हे विश्व अजून अस्तित्वातच आलेले नाही. मग इथे हा संसारी कोण आहे?

*कुणी नाही इथे ज्याला मान सन्मान अपमान आहेत ॥धृ॥*

*कुणी नाही इथे ज्याला जन्म जीवन मृत्यू आहेत ॥*
*कुणी नाही इथे ज्याच्याकडे आहेनाहीचे हिशेब आहेत ॥1॥*

*कुणी नाही इथे ज्याला सगेसोयरे संसार आहे. ॥*
*कुणी नाही इथे ज्याला शरीर मन बुद्धी आहे. ॥2॥*

*कुणी नाही इथे ज्याला इच्छा आकांक्षा वासना आहेत. ॥*
*कुणी नाही इथे ज्याला गुणावगुण त्रिदोष आहेत. ॥3॥*

*कुणी नाही इथे ज्याला बंध - मुक्तीचा ध्यास आहे. ॥*
*कुणी नाही इथे पण हे कोण परीक्षण करत आहे. ॥4॥*

*तेच गूढ रहस्य आहे ज्याचा भेद केवळ बाकी आहे. ॥*
*नीव नीव लागू पायी, श्रीगुरू कृपेचे त्यास एकमेव आर्त आहे. ॥5॥*

# 245. हा गडी आला कुठून

*हा गडी आला कुठून ॥*
*ह्याचा बाप ब्रह्म निर्गुण ॥*
*ह्याची आई ऊर्जा निर्गुण ॥*
*मग हा झालाच कसा सगुण ॥1॥*

*ह्याचा त्रिगुण गर्भी झाला जन्म ॥*
*संत म्हणती ते ब्रह्म प्रतिबिंब ॥*
*त्याच्या आजूबाजूला अज्ञान ॥*
*पाहूनी साधला डाव अन ॥*
*ते पहा लेकरू उचललं मायेनं ॥2॥*

*त्याचं पंचकोषांचं हो कोंदण ॥*
*परि मध्ये पारब्रह्म ते अटलं ॥*
*त्याला द्वैताचं घातलं आंगडं ॥*
*त्याला क्षमतांचे दिले हो आंदण ॥3॥*

*पाच ज्ञानेंद्रियांनी हा युक्त ॥*
*पाच कर्मेंद्रियांनी हा सुसज्ज ॥*
*माया वांझोटी ना फुटे पान्हा तिज ॥*
*लेकरू उपाशी नाही दूध परमानंद ॥*
*त्यास मायेने द्वैताचे पाजिले दूध ॥*
*म्हणूनी हा कायम वाढीला तृष्णार्त ॥4॥*

*दहा इंद्रियांनी केले ह्याला दिशाहीन ॥*
*भरूनी राहिला अहंकार गर्व अभिमान ॥*
*अहो मायेने ओतले षड्रिपू त्या दुधात ॥*
*त्यानेही प्यायले विष ते गोड मानून ॥5॥*

*सत्ता संपत्ती प्रसिद्धीचा हव्यास ॥*
*माया वाजवी टाळी बाळ वाढविला खास ॥*
*भोग भोगवूनी भोगवला तिने तयास ॥*
*कर्ता करूनी नागविला तिने तयास ॥*
*आता मृत्यूपासून करितो धावाधाव ॥*
*तिथे माया होते हतबल सपशेल ॥6॥*

*मृत्यू समयी त्यास हो हमखास ॥*
*उभा करूनी यमाच्या दरबारात ॥*
*जाती मायेची ती दशेंद्रिये पळून ॥*
*एकला उभा तो होतसे हतबल ॥*
*मिळे तयास न्याय अति कठिण ॥7॥*

*कोण दाविल त्यास त्याचे मायबाप ॥*
*कोण पाजील त्यास दूध अमृतपान ॥*
*श्रीगुरू भेटती तयास ऐकूनी आर्त हाक ॥*
*अलगद लाभती प्रांगण अद्वैताचे तयास ॥8॥*

*चरणी होता समर्पित समाधिस्थ ॥*
*श्रीगुरू दाविती त्यास शून्याची वाट ॥*
*तिथे आई उभी साक्षात श्री जगदंब ॥*
*बाळात सामावून तिचे होतसे निर्वाण ॥*
*भेटविशी बापाशी ते ब्रह्म निर्गुण निराकार ॥9॥*

# 246. जेंव्हा मन ते शिणते

*जेंव्हा माझे मन ते शिणते ॥*
*जेंव्हा माझे शरीर ते थकते ॥धृ॥*

*घेतो श्री गुरू चरणी विसावा ॥*
*होऊन संपूर्ण समर्पित तिथे ॥1॥*

*चरण धूळ मस्तकी लावता ॥*
*द्वैतभाव ते माझे सारे विसरले ॥2॥*

*शरीर गेले सवे मनही गेले ॥*
*बुद्धीचे आता काम ते नुरले ॥3॥*

*श्रीगुरू पदस्पर्श भाग्याने ॥*
*आनंदरूप मम आत्म अनुभवले ॥4॥*

*श्रीगुरू वाणीचे अमृत कानी पडले ॥*
*जीवन अवघे तृप्त तृप्त जाहले ॥5॥*

*जेंव्हा माझे मन ते शिणते ॥*
*जेंव्हा माझे शरीर ते थकते ॥6॥*

*घेतो श्री गुरू चरणी विसावा ॥*
*होऊन संपूर्ण समर्पित तिथे ॥7॥*

# 247. नमितो श्रीगुरुचरण मी

*नमितो श्रीगुरू चरणी मी ॥*
*ध्यायितो श्रीगुरू वाणी मी ॥धृ॥*

*पंचेंद्रियांवर विजय मिळवूनी ॥*
*जाईन माया सीमोल्लंघूनी मी ॥1॥*

*जनसेवेच्या मज देऊन संधी ॥*
*कर्मातून मज अकर्म दावूनी ॥*
*अहं पार षड्रिपू जाळूनी ॥*
*मज चालवा हाती तुम्ही धरूनी ॥2॥*

*द्वैतातील अद्वैत दावूनी ॥*
*वैराग्याचे वस्त्र देऊनी ॥*
*मुखी हरीचे नाम देऊनी ॥*
*मज उपकृत हो करा गुरूजी ॥3॥*

*यावे विश्वाचे आर्त तनमनी ॥*
*ते आसन उंच द्यावे हो तुम्ही ॥*
*जाता अश्रुंच्या ओघात वाहूनी ॥*
*व्हावे विशुद्ध विशुद्ध अमृतमयी ॥4॥*

*समाधिस्थ मज ऐसे बसवूनी ॥*
*दावा मज माझा हरी निर्वाणी ॥*
*विजयपताका शून्याच्या शिखरी ॥*
*स्वधर्माची हो फडकवेन मी ॥5॥*

# 248. तिथे तुला ईश्वरा

*तिथे तुला ईश्वरा सदा मी शोधेन ॥*
*जिथे सरहद्दीवर माझ्या वीरांचे सांडिले रक्त ॥1॥*

*तिथे तुला ईश्वरा सदा मी शोधेन ॥*
*ज्यांनी भागविली भूक शेतात उपाशी राबून ॥2॥*

*तिथे तुला ईश्वरा सदा मी शोधेन ॥*
*जिथे विद्यामंदिरी घुमती ज्ञान विज्ञान विवेक ॥3॥*

*तिथे तुला ईश्वरा सदा मी शोधेन ॥*
*जिथे हृदयी प्रेम निःस्वार्थ नसे अहंकार ॥4॥*

*तिथे तुला ईश्वरा सदा मी शोधेन ॥*
*बुद्धी माझी जिथे होईल रे कुंठित ॥5॥*

*तिथे तुला ईश्वरा सदा मी शोधेन ॥*
*जिथे निःशब्द मम वाणी अन् शब्द ॥6॥*

*तिथे तुला ईश्वरा सदा मी शोधेन ॥*
*जिथे श्रीगुरुवचन ऐकता हरवेल माझे मन ॥7॥*

*तिथे तुला ईश्वरा सदा मी शोधेन ॥*
*जिथे वदिता श्रीगुरुवाणी अश्रु अनाहूत वाहतील ॥8॥*

# 249. बाबा

*आज माझा बाबा अप्रकट जाहला ॥*
*सगुण माझा ईश्वर तो अनंतगत पावला ॥धृ॥*

*होतास तू सात्त्विक सज्जन भक्त समर्थांचा ॥*
*जीवन तुझे जाहले जणू भक्तीचा सोहळा ॥1॥*

*करूनी कठोर संघर्ष जीवनाला भिडला ॥*
*स्वत्व त्यागूनी माझा पिंड तू पोशिला ॥2॥*

*सुसंस्कारांचा मज मनी घालूनी ज्ञान सडा ॥*
*जीवनाचे मर्म मजला तो शिकवूनी गेला ॥3॥*

*योगक्षेम समर्पण अन् कर्तव्य कठोरता ॥*
*स्वजीवनी जगूनी मज आदर्श घातला ॥4॥*

*पिता माझा श्रीगुरू कधी मित्र तो सखया ॥*
*आज मला असा का पोरका करूनी गेला ॥5॥*

*कैसे ऋण फेडू तुझे कोणत्या उपाया ॥*
*माझ्या सर्व क्षमतांचा तूची असता दाता ॥6॥*

*बाबा...,*
*असेल तुझा आधार माझ्या अंतिम श्वासाला ॥*
*तव चरणी ठेवितो माझा सद्गदित माथा ॥7॥*

# 250. जशा पावसाच्या सरी

*जशा पावसाच्या सरी ॥*
*पडे दाटल्या मेघांतूनी ॥*
*मनी आठवणी वाहती ॥*
*महापूर त्या होऊनि ॥धृ॥*
*डोळे भरूनी भरूनी ॥*
*येते असे खूप पाणी ॥*
*आईबाबांच्या सयींची ॥*
*मनी वाहते गं नदी ॥1॥*
*किती किर्तने ऐकिली ॥*
*किती केले गं पूजाविधी ॥*
*त्यांच्या अशा सहवासाने ॥*
*जीवन पावलो मी भरूनी ॥2॥*
*त्यांनी मज राखिले निरोगी ॥*
*दिल्या सुसंस्कारांच्या राशी ॥*
*शिकविले मज त्यांनी ॥*
*किती पराकाष्ठा गं करूनी ॥3॥*
*किती ओवाळीले आईने ॥*
*तिची ज्योत गं संजीवनी ॥*
*किती स्पर्श तात मात चरणांसी ॥*
*त्याची होणार ना गणती ॥4॥*
*प्रेम अलोट त्यांचे गं ॥*
*असे सदा माझ्यावरती ॥*
*त्यांचा ऋणी जन्मोजन्मी ॥*
*नाही होणार मी उतराई ॥*
*नाही होणार मी उतराई ॥5॥*

# 251. अनंताचा ठाव

समईच्या शांत ज्योतीला डोळे भरून पाहून ध्यानात बसले, की एखादा क्षण मन निर्भाव होते. आपल्यातील निरीक्षक त्याचे स्वत्व हरवतो. त्या कोणत्या तरी एका क्षणी आपण हरवलो होतो. याची आपल्याला नंतर जाणीव होते. ते इथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

*एका क्षणी ऐसा हरवे हा अहंभाव ॥*
*आगळा अवर्णनीय तिथे हा अनुभव ॥धृ॥*

*केवळ असणे हे एक ते स्फुरण ॥*
*हाच का असावा आपुला निजभाव ॥1॥*

*काया मनाला तयाचा न लागे ठाव ॥*
*वाणीला ही तिथे नसे काही वाव ॥2॥*

*अकथ कथा त्याची शब्द शब्दातीत ॥*
*काय म्हणावे त्यास भाव की निर्भाव ॥3॥*

*व्हावी आता ती श्रीगुरू कृपा अपार ॥*
*एका क्षणाने त्या घ्यावा अनंताचा ठाव ॥4॥*

# 252. माया महाभयंकर

*माया यहां महाभयंकर ॥*
*जैसे अगन कुंड का हो सागर ॥धृ॥*

*श्रीराम नामसे ही जात हैं तर ॥*
*अन्य ना कोई काम का ॥*
*हैं लांघन उसका अति दुस्तर ॥1॥*

*लागे भवसुख पावत मन शरीर ॥*
*पर पिछे दूख कायम हैं हाजीर ॥2॥*

*नही मिले कर्म का कोई सच्चा सार ॥*
*भुलभुल्लैया भ्रम भ्रम अति असार ॥3॥*

*पल पल माया करे महाप्रपात ॥*
*अग्यान अंधेरे जीव चंचल हैं जात ॥4॥*

*श्रीराम नाम की पकडे जो डोर ॥*
*श्रीगुरू कहत है वह जाई पार ॥5॥*

*अब की बार बक्ष देवो भगवान ॥*
*ना होई फिर फेरा ॥*
*जहां हो यह सुपने सा संसार ॥6॥*

# 253. कधीच नाही

या रचनेमध्ये "मी" आणि भोक्ता वेगळे आहेत. मी ते भोयाला आलेले मायावी अनुभव नाकारतो आणि त्याची भूमिका विशद करतो. अशी संकल्पना आहे.

*मला उगाच या लाटांनी सतत भिजवलं... ॥*
*ऐक दर्यात पाऊल मी कधीच नाही ठेवलं... ॥धृ॥*

*भ्रम प्रभावे शरीर जरूर कधी असेल डोललं... ॥*
*मद्य प्राशन तर मी ते कधीच नाही केलं... ॥1॥*

*माहीत नाही पायात काटं कुठं कधी रूतलं... ॥*
*पायताण तर मी पायातून कधीच नाही काढलं ॥2॥*

*नयनी जल तर ते अनेकदा वाहीलं... ॥*
*ऐक सुखदुःखाच्या पलीकडून गं मीच ते पुसलं... ॥3॥*

*मला हो बोलताना सगळ्यांनीच पाहीलं... ॥*
*पण मौन ते माझं कधीच नाही गं तुटलं... ॥4॥*

*सूर लय तालात तर मी खूप काही गायलं... ॥*
*स्वर माझे नव्हते अन् कान तुझे नव्हते ते कुणालाच नाही कळलं... ॥5॥*

*जीवनभर मला माझ्या तनमनानं फिरवलं... ॥*
*ऐक..., तरी माझं विश्व व्यापकत्व ते कधीच नाही भंगलं... ॥6॥*

*सदा मी तटस्थ अन् माझं वैराग्य तुला जाणवलं... ॥*
*आहे-नाही च्या पलीकडून मी ही ते न्याहाळलं... ॥7॥*

*माया अनिर्वचनीय असं सर्व संतांनी सांगितलं... ॥*
*अनिर्वचनीयतेला तिथे प्रकाशित कोणी केलं... ॥8॥*

*ईश्वर चरणी झुकताना तू अनेकदा मला पाहिलं.... ॥*
*मला सोड, त्या झुकवणाऱ्या ईश्वराला तू कधीच नाही गं पाहिलं... ॥९॥*

# 254. परब्रह्म

*परब्रह्म हो सावळे सावळे ॥*
*प्रेमे पाहिले भरूनीया डोळे ॥धृ॥*

*वाणी थांबली शब्द थांबले ॥*
*अति मनोहर रूप मज भावले ॥1॥*

*पावले पावले ॥*
*जीवन भरूनी पावले ॥*
*तुज पाहता विठ्ठला ॥*
*आनंदाश्रू नयनांतूनी वाहिले ॥2॥*

*तुझिया माये जरी मन डुंबले डुंबले ॥*
*तुजविण ना काही मनी म्या चिंतिले ॥3॥*

*आई रखुमाई माझे बाप गं तू विठ्ठले ॥*
*तव चरणी मस्तक म्या ठेविले ठेविले ॥4॥*

*अघाध तृप्तीचे तुम्ही दान हो मज दिले ॥*
*घ्या मज तव हृदयी आता माझे ना काही उरले ॥5॥*

# 255. भरून पावलो

*भरून पावलो भरून पावलो रामराया ॥*
*संत वचने शीतल जाहली मनोकाया ॥धृ॥*

*शब्दामृत मिळता त्या राशी ग्रंथांचिया ॥*
*शुद्ध जाहली माझी मनबुद्धी काया ॥1॥*

*इच्छा वासना वृत्ती सकल ब्रह्ममाया ॥*
*तव कृपे राघवा जावी सत्वर विलया ॥2॥*

*अघाध तृप्ती लाभू दे प्राणसखया ॥*
*श्रीगुरुचरणधूळ म्या मस्तकी लाविलीया ॥3॥*

# 256. मी तर आकाश आहे

*मी तर आकाश आहे ।*
*मी तर आकाश आहे ॥धृ॥*

*माझ्या मध्ये हो मायेने ।*
*शरीर मन बुद्धीने ।*
*नाव ठेवून स्वतःचे ।*
*जीव जगविला जाणिवेने ॥1॥*

*मी तर आकाश आहे ।*
*चिरंतन आहे ।*
*चिरंजीव आहे ।*
*शून्यासह अनंत आहे ॥2॥*

*कोण हा जीव आहे ।*
*अद्वैतातील द्वैत आहे ।*
*नाही सह सुद्धा तो आहे ।*
*म्हणूनच तो मिथ्या आहे ॥3॥*

*जीवामध्ये आकाश आहे ।*
*आकाशापल्याड ईश्वर आहे ।*
*त्यास जीव समर्पित होताहे ।*
*खूण श्रीगुरूजी पटवून देताहे ॥4॥*

*मी तर आकाश आहे...*
*मी तर आकाश आहे....*

# 257. मैत्र

*धरती माझी मैत्र ॥*
*आधार देते स्वस्थ ॥धृ॥*

*अग्नी माझा मैत्र ॥*
*अन्न पूर्ण ब्रह्म प्रसाद ॥1॥*

*वायू माझा मैत्र ॥*
*प्राणायामे करतो विशुद्ध ॥2॥*

*जल माझा मैत्र ॥*
*जीव तृप्त तृप्त शांत ॥3॥*

*आकाश माझा मैत्र ॥*
*खूण आपले अस्तित्व सर्वत्र ॥4॥*

# 258. निष्कला परमात्म रूपा

श्री संत गुरू ज्ञानदेवांचा चांगदेव पासष्ठी हा लघुग्रंथ आपल्याला अत्यंत अंतर्मुख करतो. त्याचे अर्थानुबोधन हे आपल्याबद्दलची आपली समज अधिक विशुद्ध करते. यावरून इथे विचार असा आहे की पारब्रह्म परमेश्वराकडे त्याचा मी सुद्धा नाही इतका तो विशुद्ध व निर्मल आहे. आपल्याला त्याच्या या अद्वय अवस्थेची कल्पना करताना त्याच्या आणि आपल्यातील फरकाने तनमनातून थरथर निर्माण होते आणि ती कल्पना कल्पनाच राहते. तो आपल्यात असूनही ही आगतिकता निर्माण होते कारण तो त्याच्या स्व बद्दलच मुळी वेपरवाह आहे. खरे तर संत म्हणतात तसे तो आणि आपण एकरूप असूनही या वेपरवाह अवस्थेची कल्पनासुद्धा करण्याची पात्रता आपल्यात नाही हे गूढ रहस्य आहे. एकीकडे ही माया आपल्याला तिच्यातून निपजलेल्या आहे-नाही च्या कल्पनांचे सपशेल खेळणे करून टाकते. अशा वेळी आपल्या या आर्त अवस्थेची कैफियत मांडून देवाला आर्जव करण्या पलीकडे आपण काय करू शकतो...?

*निष्कला परमात्मरूपा देवा दयाघना ॥*
*करुणा व्हावी जी मजवरी तुझी प्राणप्रिया ॥धृ॥*

*स्वाधीन केलेस तू निरंकारा ॥*
*तुझे सर्वस्व त्या मायेला ॥*
*ब्रह्मांडी हा खेळ मायेने मांडला ॥*
*जीवाजीवांत पेरिला अहं फुकाचा ॥1॥*

*उठला इथे हा कल्लोळ जाणिवांचा ॥*
*द्वैताचा अन् त्या भ्रांत अहंभावाचा ॥*
*मी पणाचा मल तुज कधी ना लागला ॥*
*तू देवा अद्वया नित्य निर्मल निराळा ॥2॥*

*कसा स्वीकारू हा मीपणा मायेचा ॥*
*अति लज्जास्पद हे भाव मी-माझे-मला ॥*
*जरी असे सर्व तुझी सर्वत्र चैतन्य सत्ता ॥*
*भाव मालकीचा कैसा जीवांतूनी निपजला ॥3॥*

*क्षणभरही ना वाटेना लाज या जीवाला ॥*
*वृत्ती इच्छा वासनांचा हा जित्ता असे पुतळा ॥*
*तू ईश्वरा चैतन्याधारा सर्व जीवमात्रा ॥*
*वाटे तू भोगिशी परि कसा राहशी रे अभोगा ॥4॥*

*तुझीया प्रकाशे प्रकाशती माया ॥*
*परि तुज त्याचा नाही रे धांडोळा ॥*
*इथे दृष्य दर्शन हा मायेचा सोहळा ॥*
*परि तूज पाहाण्या तू अखम आंधळा ॥5॥*

*तू आणि मी असे एक जरी ईश्वरा ॥*
*परि मायेने हा इथे डाव रे साधला ॥*
*तुझ्यात तुझी परम अद्वयावस्था॥*
*मी अलीकडे मध्ये मायेचा पडदा ॥6॥*

*मी इथे जसा अधांतरी कठपुतळा ॥*
*कसा सोडवू हा मायेचा रे विळखा ॥*
*श्रीगुरू वचने यावे विज्ञान खड्ग हाताला ॥*
*आत्मज्योत ही मिळेल परमात्म्याला ॥7॥*

# 259. शबद रखो उरधार

भारतवर्षात होऊन गेलेल्या आपल्या सर्व संतांच्या माध्यमातून ईश्वराने हे संतरसामृत पृथ्वीवर पाठवले आहे. अशा सर्व ईश्वरीय संतसाहित्याचा उद्देश

श्री गुरू ज्ञानेश्वर माउलींचे पसायदान प्रत्यक्षात येणे हाच आहे.

तिथे भाषा धर्म यातील विविधता अडथळे करत नाही तर एक माध्यम होऊन राहतात.

*शबद रखो उर धार मेरे भाई शबद रखो उर धार ॥*
*सहेजी तरेगा भवसागर तू पार मेरे भाई... शबद रखो उर धार ॥1॥*

*काट लेवो मस्तक तूम अपना ॥ गुर चरणी हो कुरबान सदा ॥*
*जम डंडे का ना लगे तुझे मार मेरे भाई शबद रखो उर धार ॥2॥*

**पंजाबी भाषेत सुचलेली कविता.**

# 260. महादेवी योगिनी

*हे माता महादेवी योगिनी योगमयी ॥*
*जाग जाग तू मम तनमनातूनी ॥धृ॥*

*अद्वय शक्ती तू महामाता मृण्मयी ॥*
*अद्वय चैतन्य तू सतचिदरुपिणी ॥1॥*

*अगम्य क्षमतांची तू देवी साम्राज्ञी ॥*
*अथर्वा तू ते द्वंद्व तव चरणतलाशी ॥2॥*

*परतूनि मजला भेटव गं मजसी ॥*
*तोडून पंचभूतांची दूस्तर करणी ॥3॥*

*दान मागतो तुज हे परमेश्वरी ॥*
*जागव तव अद्वय या तनमनातूनी ॥4॥*

*समर्पित सदा श्रीगुरुदेव चरणांशी ॥*
*श्रीगुरू स्वरूपा तू माता मुक्तिदायिनी ॥5॥*

# 261. लाभो मज संतांची दृष्टी

श्रीमद शंकराचार्य जी यांच्या अद्वैत दर्शनानुसार खरतर ईश्वर सतत आपल्यातच असतो. मायावी कर्म आणि भोग यापासून आपण सदा सदा मुक्त असतो. पण अशा थोर संतांशिवाय आपल्या सारख्या सामान्य जनांस तसे जाणवत नाही. ही खंत खालील रचनेत मांडली आहे. संतांनी ही भक्तीची आंस त्यांच्या अभंगात रचली आणि साधकांच्या मनात तिच आंस आपोआप पेरली गेली. त्याचे अवर्णनीय परिणाम साधक जाणू लागला. शेवटी साधकाने दिव्य दृष्टीचे दान श्री जगद्गुरू यांना मागितले.

*ईश्वर पाहातो... ॥*
*परि ईश्वर दिसेना ॥धृ॥*

*ईश्वर भोगतो... ॥*
*परि हा जीव काही जाणे ना ॥1॥*

*माझी दृष्टी ही भ्रांतीची ॥*
*मती भवभयाची ॥*
*कर्त्याची अन् भोयाची ॥*
*पकड ही भारी ॥*
*मायावी द्वंद्वाची ॥2॥*

*परि दया अपार आम्हावर तुमची ॥*
*म्हणूनिया रास लाविली अभंगांची ॥*
*तुम्हांस सदा आंस विठू चरणांची ॥*
*ऐसी ती पेरिली तुम्ही माझिया चित्ती ॥3॥*

*गोड ध्यास मनी आंस जागवती ॥*
*जीव अति तनी मनी व्याकूळती ॥*
*ऐसी तव आंस मधुर अमृताची ॥*

*तेणे आकुंठली आत वाणी माझी ॥4॥*

*लाभो मज ती संतांची दृष्टी ॥*
*मजवर सदा ऐसी कृपा वृष्टी ॥*
*श्री जगद्गुरू हो तुमची ॥*
*आता व्हावी व्हावी जी ॥5॥*

# 262. परमानंद दर्शन

ईश्वराचे परमानंद दर्शन कुठे घ्यावे तर संत साहित्यात म्हटल्याप्रमाणे ते श्रीगुरू वचनात आहे. श्रीगुरू वचन हे अघाध तृप्ती निर्माण करणारे अमृत आहे. त्यासाठी प्रभू चरण शरण...

*अघाध तृप्ती ऐसे तव परमानंद दर्शन*
*नीव नीव लागे हे मन प्रभू चरण शरण ॥धृ॥*

*अति आर्जवे आळवितो तुज जन्मोजन्म ॥*
*घालव घालव माझे हे सर्व अज्ञान भ्रम ॥1॥*

*पूर्व कर्म जळो, चेतव परम ज्ञान यज्ञ ॥*
*सौभाग्ये लाभो मज मनी नित्यानंद नवनूतन ॥2॥*

*जागव जागव मनातून हे परमात्मभान ॥*
*विशुद्ध निरंकार मन व्हावे सहज उन्मन ॥3॥*

*तुझिया ध्यानाप्रति राहो वृत्ती सावधान ॥*
*घडू दे विवेक-प्रलय, लाभो तव दिव्य निधान ॥4॥*

*भवभय हरण पावन श्रीगुरू ग्रंथ वचन ॥*
*नारायण नारायण नारायण नारायण ॥5॥*

# 263. निर्गुण निर्गुण

काल आपण अगदी सोपे उदाहरण घेऊन परब्रह्म स्वरूपा निर्गुण ऊर्जा साऱ्या विश्वात सगुण साकार होण्यास कशी कारणीभूत झाली ते पाहिले. त्यावरून

*निर्गुण निर्गुण निर्गुण ॥*
*सकल सगुणाधार निर्गुण ॥धृ॥*

*निराकार निर्विकार निर्गुण ॥*
*परब्रह्म निष्कल चिरंतन निर्गुण ॥1॥*

*विश्व ऊर्जा चलन निर्गुण ॥*
*भासे परब्रह्म साकार सगुण ॥2॥*

*क्षमताधिष्ठित पूर्णातिपूर्ण निर्गुण ॥*
*अकर्मी अकर्ता उदासीन निर्गुण ॥3॥*

*शून्यानंता पल्याड निर्गुण ॥*
*कोटी सूर्य प्रकाश निर्गुण निर्गुण ॥4॥*

*परमानंद प्रशांत अद्वय निर्गुण ॥*
*अंतर्बाह्य केवल निर्गुण निर्गुण ॥5॥*

*कृपा व्हावी जी तुमची ऐसी निर्गुण ॥*
*मज द्यावी दृष्टी जाणाया निर्गुण ॥6॥*

*श्रीसतगुरू चरण दर्शन निर्गुण ॥*
*समर्पित सर्वस्व सदा हे सगुण ॥7॥*

# 264. साक्षात परब्रह्म

*तू साक्षात परब्रह्म परमेश्वर ॥*
*तुझ्या भक्तांचा हा मी चाकर ॥*
*चरण धूळ मस्तकी टिळा लाविला लाविला ॥धृ॥*

*तू कृपावंत दयासागर ॥*
*तुझ्या नामाचा नित्य जागर ॥*
*मनी माझ्या ऐसा तू केला तू केला ॥1॥*

*मज पार करण्या भवसागर ॥*
*तुझ्या हाती तू धरिला माझा कर ॥*
*भाव सर्वस्व तव चरणी मी वाहिला वाहिला ॥2॥*

*श्री गुरू मज तू भेटविशी अति उदार ॥*
*प्रेमाने मज ते सांगती तुझे परम सार ॥*
*जन्ममरणाच्या बंधातून हा जीव सुटला सुटला ॥*
*जन्ममरणा पल्याड हा जीव निघाला निघाला ॥3॥*

# 265. तू बा विश्वा

आपण आपल्या पंचेंद्रियांमार्फत विश्व जाणून घेतो त्याला विज्ञानात निरीक्षण असे म्हटले जाते. निरीक्षण झाले की द्वंद्व आणि त्यातूनच संभ्रम निर्माण होतो. हीच विश्वाची मूलभूत रचना आहे. सुसंवादी भ्रांती म्हणजे संतमार्ग/ सत्संग हा श्री प्रभू दर्शन घडवितो तर विसंवादी भ्रांतीने ते मायाधिन जीवन रसातळाला जाते.

*तू बा विश्वा माझ्यातून काय पाहाशी इथे ॥*
*निष्कल परब्रह्म केवळ ते विलसे ॥धृ॥*

*किती तुज औत्सुक्य वेग उत्स्फूर्ततेचे ॥*
*जीवनभर उलघाल ते इमले क्षमतांचे ॥1॥*

*अरे काय पाहाशी जग वस्तू विषयांचे ॥*
*तुझ्यातून निपजे तुझेच वादळ द्वंद्वाचे ॥2॥*

*पाहशील जगती तू जे जे काही इथे ॥*
*आभासी सत्य ते केवळ सगुणाचे ॥3॥*

*ऐसे पिंडी अहं तो प्रकटे मायोद्भावे॥*
*तो "मी" करी निरीक्षण सकल ब्रह्मांडाचे ॥4॥*

*द्रष्टा दृष्य दर्शन ते आपुलिया निर्मिले ॥*
*स्वस्वरूप ते तयाच्या विसरीची पडिले ॥5॥*

*चरण धरीता सत्वरी श्रीमहासतगुरूंचे ॥*
*अद्वैत स्थूलसूक्ष्मी ऐसी परम दृष्टी ही लाभे ॥6॥*

*नको वसवू संसार पुन्हा पुन्हा तू इथे ॥*
*तू कुणीही नाहीस जाण श्रीगुरू उपदेशे ॥7॥*

*तू बा विश्वा माझ्यातून काय पाहाशी इथे ॥*
*निष्कल परब्रह्म केवळ ते विलसे ॥*
*सकल परब्रह्म केवळ ते विलसे ॥8॥*

# 266. निहत्था मी उभा

नुकतेच एक सुंदर श्रीगुरुबाणी शबद ऐकले. ज्यामध्ये या जीवनरूपी आखाड्यात पंच महाभूतात्मक इंद्रीय रूपी पहेलवान साधकावर हल्ला करतात आणि ईश्वर ते पाहात असतात असे वर्णन आहे. मग श्रीगुरू कृपे साधक तिथे विजय मिळवून मोक्षाधिकारी होतात असे वर्णन आहे. थेट भाषांतर नाही. या रचनेची संकल्पना मात्र तिच आहे. साधकाचे मनोगत...

*निहत्था उभा मी आखाड्यात विश्वाच्या ॥*
*मध्ये एकला हा इथे संघर्ष कडाक्याचा ॥धृ॥*

*इंद्रिये पहेलवान मजवर करिती हल्ला ॥*
*क्षणात मी चितपट कसा करू सामना ॥1॥*

*आले आले माझे पुण्य हो फळाला ॥*
*मज आठवला दीनानाथ श्रीगोपाला ॥2॥*

*त्याचिया नजरेने त्यास मी पाहिला ॥*
*मजवर त्याची दृष्टी तो अति कृपाळ दयाला ॥3॥*

*पाठीवर थाप श्रीगुरू आशिष मिळाला ॥*
*इंद्रिये विझली तिथे आखाडाच संपला ॥4॥*

*श्रीगुरू चरणी पडलो जीव आक्रंदला ॥*
*पुन्हा नको तो मायावी द्वंद्वाचा आखाडा... ॥5॥*

*माझा गोविंद मला भेटवा... ॥*
*श्रीगुरू, माझा श्रीराम मला भेटवा... ॥6॥*

# 267. हे ईश्वरा

*हे ईश्वरा माझी प्रार्थना ऐकशील ना... ॥धृ॥*

*हिमालयाच्या उत्तुंग शिखरावरून ॥*
*क्षितीजाला टेकलेल्या आकाशाला पाहताना ॥*
*हे माझ्यात आहे. असे म्हणण्याचे मला धाडस दे ॥1॥*

*मी सगळ्यात आहे पण कशाचाही माझा संग नाही. ॥*
*याचा अनुभव घ्यायची कुवत माझ्यात निर्माण कर ॥2॥*

*अत्यंत सुंदर पवित्र मूर्ती पाहिल्यावर ॥*
*त्या पावित्र्याचा आणि सौंदर्याचा प्रकाशक तू आहे ॥*
*हे जाणण्याइतकी शुद्धता मला दे ॥3॥*

*बोधिचित्त स्थिर करून ॥*
*सम्यक मन अवस्था टिकवून ठेवण्यासाठी ॥*
*माझ्या मनी सामर्थ्य दे ॥4॥*

*श्रीगुरू चरणी अनेक वेळा समर्पित होताना ॥*
*मनाला स्थिरता दे ॥5॥*

*श्रीगुरू चरणी अश्रुंचा अभिषेक होताना ॥*
*मनाला त्यात वाहून जाऊ दे... ॥6॥*

# 268. म्हणून मला

भरभरून जिथे त्याने दिले त्याला ते सपशेल विसरलसे दिसतात...

*म्हणून मला ईश्वराचे डोळे भरून आलेले दिसतात ॥धृ॥*

*अमृताहूनी गोड नाम देऊनही ते त्या नसलेल्या मरणाला भिऊन मरतात*
*म्हणून मला ईश्वराचे डोळे भरून आलेले दिसतात ॥1॥*

*शोधत नाहीत ते त्याला रंजल्या गांजलेल्याच्या हास्यात...*
*म्हणून मला ईश्वराचे डोळे भरून आलेले दिसतात ॥2॥*

*असंख्य भेदाभेद करूनी भ्रमिष्ट होऊनि होलपडतात...*
*म्हणून मला ईश्वराचे डोळे भरून आलेले दिसतात ॥3॥*

*धैर्य स्वरूप जो सीमेवर जागृत ते त्या देवाला कुठे हो जाणतात...*
*म्हणून मला ईश्वराचे डोळे भरून आलेले दिसतात ॥4॥*

*रक्ताचे सिंचन करणाऱ्या शेतकऱ्यांची ते अवहेलना करतात....*
*म्हणून मला ईश्वराचे डोळे भरून आलेले दिसतात ॥5॥*

*निष्पाप प्राण्यांचे बळी देऊन ते त्यांची आसुरी भूक भागवतात*
*म्हणून मला ईश्वराचे डोळे भरून आलेले दिसतात ॥6॥*

*आईबाबांच्या संध्याकाळी ते त्यांना बेवारस सोडतात...*
*म्हणून मला ईश्वराचे डोळे भरून आलेले दिसतात ॥7॥*

*श्रीगुरूग्रंथातील शब्दब्रह्म स्वरूपाला सोडून भोग हव्यास करतात...*
*म्हणून मला ईश्वराचे डोळे भरून आलेले दिसतात ॥8॥*

# 269. तुज ठावे

आईबाबा आणि भगवंत यात काहीच फरक नाही. आईची आठवण झाली माता रुक्मिणीकडे पाहिले मन भरून पावले. बाबांची आठवण झाली बाप विठ्ठलाकडे पाहिले - मन स्थिर झाले. असा हा ईश्वर ठायी ठायी आपल्याला साहाय्यभूत होतो. बंधू मित्र सगे सोयरे श्रीकृष्णा सारखे सखा होतात. कधी तो इतका दाटून दिसू लागतो की भान हरपून जावे.

हे असे देव का करतो? याचे कारण काय असावे? तर त्याला माहिती आहे की जी मायावी सृष्टी त्याने निर्माण केली आहे त्यात आपल्या सारख्या सामान्य माणसाला जगणे कठीण आहे. मग अशा कृपाळू देवाचे आभार मानून त्याला हक्काने काही मागूया...

*तुज ठावे तव माया जिथे ना ठाव ना अंत कशाला ॥*
*म्हणूनी सांभाळीशी नित्य मज तू ईश्वरा परमेशा ॥धृ॥*

*आई होऊनि मज पाठीवरूनी तू हात फिरवताना ॥*
*उणीव तिची भरून काढतोस तू माउलीहून मवाळा ॥1॥*

*बाप होऊनि धैर्य देशी मज कर्तव्य निभावताना ॥*
*उणीव त्यांची भरून काढतो तू दयाळा पांडुरंगा ॥2॥*

*सावध सतर्क मज सतत ठेविशी हे जीवन झुंजताना ॥*
*बंधू मित्र सगेसोयरे माझे जसे श्रीकृष्ण अर्जुनाचा ॥3॥*

*जे जे पाहू जाता तेथे संग तुझा रे संग तुझा ॥*
*अरे आत्मभान हरपले पाहूनी तुझा परम चैतन्य सोहळा ॥4॥*

*अंतर्यामी दिलीस आंस मज श्रीगुरू चरण शरण जावया ॥*
*तू माझ्या अंतर्बाह्य ही अनुभूती दे रे मजला ॥5॥*

*क्षण शेवटचा ऐसा ईश्वरा परम ऐश्वर्याचा यावा ॥*
*तव हातावर देता टाळी परमानंदे हा जीवानंद जुळावा ॥6॥*

# 270. मन निर्मल निर्मल

*मन निर्मल निर्मल ॥*
*दिसे अनंताचा तळ ॥धृ॥*

*मन निर्मल निर्मल ॥*
*ते सदानंदाचे निधान ॥1॥*

*मन निर्मल निर्मल ॥*
*भाव भक्तीचे ते कमळ ॥2॥*

*मन निर्मल निर्मल ॥*
*ते सत्य सत्वाचे जल ॥3॥*

*मन निर्मल निर्मल ॥*
*श्रीरामनाम नित्य स्मरण ॥4॥*

*मन निर्मल निर्मल ॥*
*श्रीगुरुचरणाची धूल ॥5॥*

# 271. मांगन

*तू समरथ दाता अपार पूरण ॥*
*कुछ नही मैं इह देवो दान ॥धृ॥*

*कौन हुं मै इह नही सकीए जान ॥*
*इस जीवसे तुम हर लेवो अग्यान ॥1॥*

*अब नही इच्छा कुछ करन भोगन ॥*
*तुमरे इच्छे से सरब होवे पूरण ॥2॥*

*बैराग नही मांगन, भोग नही मांगन ॥*
*मुक्ती नही मांगन, बंधन नही मांगन ॥3॥*

*सांस ना मांगन, प्राण ना मांगन ॥*
*चेतन नही मांगन, जीवन नही मांगन ॥4॥*

*सगुण नही मांगन, निर्गुण नही मांगन ॥*
*सांत नही मांगन, अनंत नही मांगन ॥5॥*

*मन मेरो होवे हरी अमृत दर्पण ॥*
*इस इहलोक से अब कुछ नही मांगन ॥6॥*

*बदल देवो हरि सरब विधी-विधान ॥*
*श्रीगुरू हैं मेरो इक परम निधान ॥7॥*

*हम भगत किंचित किरपा मांगन ॥*
*रहू चरण धूल प्रभू हम तेरो आंगन ॥8॥*

**पंजाबी भाषेत सुचलेली कविता.**

# 272. क्या गत मिले.. क्या मन पावत

"अपने करम की गत मै क्या जानू बाबा रे" ही संत श्री गुरू कबीर जी यांची नखशिखांत हादरवून टाकणारी रचना ऐकून त्यावरून ही उत्स्फूर्त काव्य रचना झाली जी त्यांच्या रचनेशी समांतर आहे.

*क्या गत मिले.. क्या मन पावत ॥*
*अंत समय धुं धुं उठत हैं पावक ॥धृ॥*
पावक = अग्नी

*कैसी यह काया कौन इसका मालिक ॥*
*मान अभिमान गरब महापातक ॥1॥*
गरब = गर्व

*माया का जब इह मृगजल मन देखत ॥*
*सुखदुख आभास उसे सांचा हैं मानत ॥2॥*

*गुरग्यान नही पाया नही हुआ साधक ॥*
*लोभ अति भोगत जैसे कोई साकत ॥3॥*
साकत = आधाशी, अविचारी

*जम डंडा मुंड पडे ठण ठणक ॥*
*जनम गवाया अब मन मृत्यू से भागत ॥4॥*
जम = यम
डंडा = वृद्धत्व
ठणक = क्षमता कमी होणे

*भय भयाण अंध कूप सा अग्यान ॥*
*प्राण जाई तब मन खुद से हारत ॥5॥*

*काया जब जाए अगन से जलत ॥*

*खाक उडे गिरे धरतीपर इतउत ॥6॥*

*उठ अब मन सनेह प्रभु का पावत ॥*
*शरण हरि चरण रहो चिरजीवीत ॥7॥*

**पंजाबी भाषेत सुचलेली कविता.**

# 273. सगुण मी ही माया

*सगुण मी ही माया जिने ॥*
*पातले इथे या विश्वाला ॥धृ॥*

*चैतन्य घेऊन आधाराला ॥*
*मीच मांडले या खेळाला ॥1॥*

*थकले भागले मी नंदलाला ॥*
*कोण मिटवेल या तृष्णेला ॥2॥*

*घेऊन निघाले या पंचसखींना ॥*
*शोधावया परम आनंदाला ॥3॥*

*श्रीगुरू ज्ञान आता व्हावे मजला ॥*
*मी प्रसवावे माझ्यातून शून्याला ॥4॥*

*मुक्तीचा हा महासोहळा ॥*
*मला पाहू दे याची डोळा ॥5॥*

*लांघूनी त्या शून्य उंबरठ्याला ॥*
*भेटेन मी माझ्या विठू सावळ्याला ॥6॥*

# 274. रीक्त रीक्त तुम्ही श्वास हो माझे

हीच ती परम दिव्य शक्ती जी अहंच्या स्वरूपात आणि देहभानाच्या सगुण स्वरूपात प्रत्येक जीवात विराजमान आहे. ती श्वासांत लपलेली आहे. तिची पार्श्वभूमी किंवा मूळ अद्वैत निर्गुणच आहे तिलाच समर्पित होऊया... जेणे करून राहतील शेवटी फक्त श्वास रीक्त रीक्त तिच्या अद्वय अवतरणासाठी...

*रीक्त रीक्त तुम्ही श्वास माझे ॥*
*सदा निर्गुणाचे हो तुम्ही गीत गावे ॥धृ॥*

*रीक्त रीक्त श्वास माझे ॥*
*तुम्ही प्रेषित हो त्या अद्वैताचे ॥1॥*

*रीक्त रीक्त तुम्ही श्वास माझे ॥*
*प्रतिक व्हावे वैराग्याचे ॥2॥*

*रीक्त रीक्त श्वास माझे ॥*
*श्रीगुरू आशिष रूपी सदा वसावे ॥3॥*

*रीक्त रीक्त तुम्ही श्वास माझे ॥*
*श्रीराम नाम हो तेथूनी उपजावे ॥4॥*

*रीक्त रीक्त हो श्वास माझे ॥*
*रोमरोमी तुम्ही यावे आनंद रूपे ॥5॥*

*रीक्त रीक्त या श्वासांनी यावे ऐसे ॥*
*अमरत्वाचे जगणे व्हावे तेथे ॥6॥*

# 275. श्री गुरू चरण मानस पूजा

*श्रीगुरुचरण कमल मी जे ध्यायिले ॥*
*हृदयी पूजा आसन स्थापन ते केले ॥धृ॥*

*स्वरूप श्रीगुरूंचे साक्षात हो परब्रह्माचे ॥*
*चरणी वाहतो सुविवेकरूपी सुमने ॥1॥*

*संसार सोपा झाला श्रीगुरू उपदेशे ॥*
*चरणी सुगंध गंध लावितो भक्तीचे ॥2॥*

*श्रीगुरू मातपिता बंधु सखा जाहले ॥*
*चरणी वंदन करीतो अतिविनम्रभावे ॥3॥*

*श्रीगुरू मम प्राण आधार आत्म्याचे ॥*
*तळहाती दाविले मज अद्वैत ईश्वराचे ॥4॥*

*आता कुठे उरले मी मला अन् माझे ॥*
*श्रीगुरू चरणी आर्त... ॥*
*चुकवा चुकवा जन्ममरणाचे ते फेरे ॥5॥*

# 276. मन सात्त्विक सात्त्विक

*जिथे श्रीगुरू वंदन ॥*
*मन सात्त्विक सात्त्विक ॥धृ॥*

*ऐकता श्री गुरू उपदेश ॥*
*मन सात्त्विक सात्त्विक ॥1॥*

*निरपेक्ष जन कर्तव्य सेवेत ॥*
*मन सात्त्विक सात्त्विक ॥2॥*

*पाहाता अद्वैत सगुणात ॥*
*मन सात्त्विक सात्त्विक ॥3॥*

*होता अन्न ज्ञान दान ॥*
*मन सात्त्विक सात्त्विक ॥4॥*

*अंतरी षड्रिपू विलय ॥*
*मन सात्त्विक सात्त्विक ॥5॥*

*श्रीरामनाम बोले मुख ॥*
*मन सात्त्विक सात्त्विक ॥6॥*

# 277. संजीवन मज द्यावे

*सगुणातील मज निर्गुण दिसावे ॥*
*श्रीगुरू चरणी मज ब्रह्मांड दिसावे ॥धृ॥*

*द्वैतामाजी मज अद्वैत कळावे ॥*
*श्रीराम नामी मज परब्रह्म उमजावे ॥1॥*

*श्वासातील ते शून्यत्व मी जाणावे ॥*
*संसारी माया सर्व बंध हो तुटावे ॥2॥*

*आता शरण अणू रेणू कणां ते ॥*
*ब्रह्मांडा पल्याड सं-जीवन मज द्यावे ॥3॥*

# 278. आम्ही परब्रह्माचे हो पुत्र

श्रीगुरू आश्रमी राहात असलेल्या अध्यात्म उन्नत सतशिष्याला आलेला अनुभव...

*असो अपूर्णता कायेला ॥*
*असो अपूर्णता मनाला ॥*
*आम्ही परब्रह्माचे हो पुत्र ॥*
*तिथे प्रकाश केवल अद्वैताचा ॥1॥*

*आमुचे परब्रह्म हो पिता ॥*
*प्रेमळ मात असे ती ऊर्जा ॥*
*जरी लेकरू कवेत त्यांच्या ॥*
*झाले पोरके मायेच्या गावा ॥2॥*

*काय गावा श्रीगुरू महिमा ॥*
*दयाळा कृपाळा श्रीसद्गुरू नाथा ॥*
*लेकराची आर्त ऐकूनी तू आता ॥*
*भवबंध सोडावया धावला धावला ॥3॥*

*हाती देऊनी संतसाहित्याला ॥*
*कर्णी देऊनी श्रीरामनामाला ॥*
*बांधिल्या मनोवृत्ती मज श्वासांना ॥*
*तेंव्हा सगुणी पाहिले  निर्गुणाला ॥4॥*

*चुकविला जन्ममरणांचा फेरा ॥*
*सोडीले आणून घरी या मजला ॥*
*चिरंतन शिवशक्तीच्या हो गावाला ॥*
*बाळ भेटे तिथे आईबापाला ॥5॥*

*जीव ऐसा स्वप्नांतूनी जागला जागला ॥*
*नीजधामी दृढ प्रशांत जाहला ॥*
*देखिला चिर परमानंद सोहळा ॥*
*सहजी मी अनंताकार पावला ॥6॥*

# 279. भेटावी तिथे मज श्रीराम रघुराई

*ही आर्त असे फार तनमनाची ॥*
*डोळ्यांतून अश्रू अखंड ओघळती ॥धृ॥*

*व्हावी श्रीगुरूवर कृपा मजवरती ॥*
*शरण शरण मी तुमचे हो चरणी ॥1॥*

*कृपा मजवर ऐसी व्हावी तुमची ॥*
*अद्वैत दावा मज तुम्ही द्वैतामाजी॥*
*सगुणांची अती संगत ती तुटावी ॥*
*पिता परब्रह्माविना पोरका मी ॥2॥*

*आता माया ती प्रखर भासती ॥*
*टेकावया मज अद्वैत ना मिळती ॥*
*द्या दान भक्ती श्रीरामनामाची ॥*
*द्या वरदान साधीन योगसमाधी ॥3॥*

*तुम्ही धरा श्रीगुरू हात माझा हाती ॥*
*शून्याचा उंबरा द्यावा ओलांडूनी ॥*
*मज दावा निर्गुण या तळहाती ॥*
*अनाहत ऐकता भेटावी श्रीराम रघुराई ॥4॥*

# 280. श्रीमंती हवी

*श्रीमंती हवी निरोगीपणाची ॥*
*श्रीमंती हवी धैर्याची ॥*
*श्रीमंती हवी निर्व्याज प्रेमाची ॥धृ॥*

*श्रीमंती हवी संवेदनशीलतेची ॥*
*श्रीमंती हवी आदराची ॥*
*श्रीमंती हवी भक्तिभावाची ॥1॥*

*श्रीमंती हवी जनसेवेची ॥*
*श्रीमंती हवी दातृत्वाची ॥*
*श्रीमंती हवी परोपकाराची ॥2॥*

*श्रीमंती हवी श्रीसद्गुरू कृपेची ॥*
*श्रीमंती हवी ज्ञानविज्ञानाची ॥*
*श्रीमंती हवी विवेकाची ॥3॥*

*श्रीमंती हवी वैराग्याची ॥*
*श्रीमंती हवी ध्यानाची ॥*
*श्रीमंती हवी समर्पणाची ॥4॥*

# 281. शिवकारा

*शिव शिव शिव शिवाकारा ॥धृ॥*

*त्रिगुणातिता त्रिगुणापारा ॥*
*निर्विकारा निराकारा निरंकारा ॥1॥*

*नकाराया अरुपाया अद्वया ॥*
*दिग दिग दिग दिगंबराया ॥2॥*

*महा महा महा महादेवाया ॥*
*निर्विकल्पा अनिरुद्धाया ॥3॥*

*नील नील नील नीलकंठाया ॥*
*डम डम डम डमरूधराया ॥4॥*

*हर हर हर हरमहादेवाया ॥*
*फणी फणी फणी फणिंद्रधराया ॥5॥*

*भस्मविभूषितांगा शूर वीरभद्राया ॥*
*आत्मलिंगाया परमात्मनाया ॥6॥*

*तड तड तडतांडवनृत्यप्रिया ॥*
*ज्योती ज्योती ज्योतिर्लिंगाया ॥7॥*

*अति अतिमनोहरा चंद्रशेखरा ॥*
*अज्ञानहरा भवभयहरा भवहरा ॥8॥*

*सदा सर्व पापशापमुक्ताया ॥*
*अलिप्ता अलेप्या वैराग्या विरक्ता ॥9॥*

*दयाळा कृपाळा श्रीजगद्गुरुनाथा ॥*
*शरणी आलो तव साक्षात दर्शना ॥10॥*

# 282. जागर व्हावा माय मराठीचा

*जागर व्हावा माय मराठीचा ॥धृ॥*

*जागर व्हावा तिच्या शक्तीचा ॥*
*जागर व्हावा तिच्या गोडीचा ॥1॥*

*जागर व्हावा तिच्या रांगडेपणाचा ॥*
*माय मराठीच्या सर्वसमावेशकतेचा ॥2॥*

*जागर व्हावा तिच्यातून स्त्रवणाऱ्या सृजनशीलतेचा ॥*
*प्रतिभेला सोनेरी कोंदण देणाऱ्या ॥3॥*

*माय मराठीचा जागर व्हावा ॥*
*संतसाहित्यातून संतांचा सहवास घडविणाऱ्या ॥4॥*

*माझ्या माय मराठीचा जागर व्हावा जागर व्हावा ॥*
*जागर व्हावा लोकहो जागर व्हावा ॥5॥*

# 283. आई माझी पार्वती

आईबाबांची आठवण शेवटच्या श्वासापर्यंत सतत येतच राहाते. अशा वेळी पार्वती व महादेव आपले मातपिता होतात. ऊर्जा स्वरूप आई जवळच असते पण चैतन्य स्वरूप पिता पारब्रह्म शिव आईसह असूनही दूर असते. जो पर्यंत आईची कृपा होत नाही तोपर्यंत बाप दिसत नाही अशी या सृष्टी संसाराची रचना आहे.

*आई माझी पार्वती ॥ बाप शिवा महादेव ॥*
*एक ऊर्जा ब्रह्मांडाची ॥ दुजा चैतन्याचा स्त्रोत ॥धृ॥*

*निर्गुणाच्या गर्भी तिने ॥ रुजवला सगुणाचा गर्भ ॥*
*चैतन्याची छाया त्यात ॥ तेणे उपजला भाव स्वत्व ॥1॥*

*ब्रह्मांड तिचे महा बुद्धिवंत ॥ तयास क्षमतांचे दिधले दान ॥*
*उपजला तिथे जाणिवांचा अर्थ ॥ त्यासी जीवन माने हा जीव ॥2॥*

*त्रिगुणांचे हो उठले वादळ ॥ पाठी लागले षड्रिपू सशस्त्र ॥*
*कर्ता भोक्ता माजला अहंकार ॥ जीव शिणला जाहला समर्पित ॥3॥*

*उंची तिने अध्यात्माची ॥ आपोआप इथे होती गाठली ॥*
*श्रीगुरू तत्त्व तिचे अवतरले ॥ भूवरी हो ठायीठायी ॥4॥*

*आई पार्वती कृपाळ जाहली ॥ आंस दिली जीवा व्याकूळ करूनी ॥*
*श्रीगुरू दिशेने सन्मार्गी चालूनी ॥ तिथे जीव भेटावा परब्रह्म पित्यासी ॥5॥*

*पूर्णत्व पावू दे तव दान सौभाग्य ॥ आई तू आम्हा दाव आमुचा बाप ॥*
*बैसलो ध्यानासी लेऊन वैराग्याला ॥ मिळो आमुचे चैतन्य सदाशिव चैतन्याला ॥6॥*

# 284. हे ईश्वरी प्रकृती गे माये

माउलींचे अमृतानुभव वाचताना सुचलेली ही रचना...आपल्या जीवनाचे उद्दिष्ट आपण ठरवलेले नाही तर प्रकृतीनेच ते ठरविले आहे. त्याची जाणीव होणे ही तिची कृपा आहे. तिला सहज सर्वस्व स्वाधीन करून त्या जाणिवेचे बंधमुक्तीमध्ये रूपांतर व्हावे ही श्रीगुरू चरणी प्रार्थना आहे.

*हे ईश्वरी प्रकृती गे माये ॥ तव स्वरूप मज तू दिधले ॥धृ॥*

*तो पुरुष अव्यक्त सर्वत्र प्रकाशे ॥ परब्रह्माचे शांत आनंद रूप ते ॥*
*त्यासी इथे प्रकटवूनी तू स्वये ॥ द्रष्टेपण ते तू मजसी गं दाविले ॥1॥*

*निर्गुणाचे ठायी ऐसे सगुण पातले ॥ शून्य वेदीवरी तू हे खेळ मांडिले ॥*
*द्वैतासी भेदूनी ते अद्वैत गं ऐसे ॥ तुझ्या इच्छेने मी ते परब्रह्म पाहावे ॥2॥*

*परि म्या विसरलो तव उद्दिष्टा ते ॥ गुंतलो आभासी इथे या मायोद्भावे ॥*
*अज्ञान न जाई अन् षड्रिपू माजले ॥ तू श्रीगुरू होऊनि ये ये गं माये ॥3॥*

*तुजला मी सहज सर्वस्व वाहिले ॥ तुझिया इच्छे मी वैराग्य ल्यायले ॥*
*भक्ती ज्ञानामृत तव दयार्द कृपेने ॥ तू जागव तव या काया मन वाचे ॥4॥*

*त्या अमृती घालूनी सगुण गुणां ते ॥ हे ईश्वरी प्रकृती गे माये ॥*
*त्यातूनी तू परब्रह्म भोगावे ॥ त्यातूनी तू परब्रह्म भोगावे ॥5॥*

# 285. ग्रंथ साहित्य शब्दामृत

*जे जे सुचले संतांना ते दिव्य ते लिहिते जाहले ॥*
*मोह अनावर होता तिथे ओंजळ धरली श्रीप्रभुने ॥धृ॥*

*तेणे सर्व ग्रंथ साहित्य श्रीप्रभू ओंजळी दिधले ॥*
*शब्दांना त्या ऐसे तिथे दैवी सामर्थ्य हो लाभले ॥1॥*

*प्रतिभेचे भांडार अवघे अमृताने ओथंबले ॥*
*ऐसे संतवचनी अमृत अपार ओसंडूनी वाहिले ॥2॥*

*धन्य जाहले श्रीप्रभू ग्रंथासी पावित्र्य ते लाभले ॥*
*जन्म आपुला उद्देश की हे शब्दाअमृत हो प्राशावे ॥3॥*

*होऊनि तृप्त तृप्त आम्ही पूर्णत्वासी पावावे ॥*
*तिथे श्रीप्रभू चरणी आम्ही सदा लीन लीन व्हावे ॥4॥*

# 286. अपार आधार

वृद्धावस्था ही एक कधीही न चुकवता येणारी आपत्ती असते. कितीही व्यवस्थापन केले तरी शेवटी हाती काही लागत नाही. अगदी जवळचे सुद्धा कामानिमित्त इतरत्र गुंतलेले असतात आणि आपण एकटेच असतो. शरीर थकलेले असले तरी अशा वेळी ईश्वरीय साक्षात्कार होण्यासाठी मन पवित्र व शांत असणे ही खूप मोठी गोष्ट आहे. तोपर्यंत केलेल्या आयुष्यातील सर्व चांगल्या गोष्टी व श्रीराम नाम जप मनाला आधार देतात. अंतसमयी यम येण्यापूर्वीच मला ईश्वराने बरोबर घेऊन जावे अशी विनवणी इथे केली आहे. ही रचना श्रीगुरुबाणीतील एका शबद वरून सुचली आहे.

*अपार आधार रघुनाथ एक ॥*
*अपार आधार रघुनाथ ॥धृ॥*

*तुम मात पिता हम तेरे पूत ॥*
*इस भवसागर मे हैं अनाथ ॥1॥*

*बिन ग्यान ध्यान बिती हैं उमर ॥*
*हूं अकेला बिन मितर बिरादर ॥*
*अब ना कोई मेरे संग ना साथ ॥2॥*

*कंप पावत हैं वृद्ध सरीर ॥*
*दृष्टी कम है कर्ण बधीर ॥*
*पर मन मे मेरे हैं रघुवीर ॥3॥*

*जो जो किया जीवन मे नेक ॥*
*मन को बस उसकी हो टेक ॥*
*श्रीरामनाम सुमिरण हो साथ ॥4॥*

*हो तन खीना पर मन शांत पवित ॥*
*अंत समय वहा पांऊ श्रीभगवंत ॥*
*जम आये तो जाए खाली हाथ ॥5॥*

# 287. जाहलो सुखरूप

संत श्री गुरू नामदेव महाराज नेहमी म्हणायचे की आपण दुःखात देवाला आळवतो पण सुखी आनंदी असताना जर आपण देवाला मनातल्या मनात सतत आळवले तर आपणच पूर्ण सुखरूप होऊन जाऊ.

*जाहलो आम्ही सुखरूप ॥*
*पाहुनी तुझे नित निजरूप ॥धृ॥*

*जरी तू विठ्ठला अति सुंदर अनुप ॥*
*तव सौंदर्यामाजी तू अद्वय अरूप ॥1॥*

*ब्रह्मांडी घालून हा द्वैताचा मेळ ॥*
*तू चालविसी हा सगुणाचा खेळ ॥2॥*

*तुझिया कृपेने सर्व होईल विठ्ठल ॥*
*पाहीन अद्वैत जिथे जाईल मन ॥3॥*

*सुखदुःख सारी गेलो विसरून ॥*
*मी-माझे-मला गेले विरघळून ॥4॥*

*श्रीगुरू मज नेतील त्या शून्याच्या पार ॥*
*तिथे माझे मन तव चरणी लीन लीन ॥5॥*

# 288. रोज तुझे दर्शन घेता

एका परम तत्त्वाच्या शिवाय खरं तर काही सुचलंच नाही पाहिजे पण माया भारी दुस्तर आहे त्यासाठी श्री ईश्वर चरणी ही कळकळीची विनंती आहे.

*रोज तुझे दर्शन घेता ॥*
*नयनी अश्रू ओघळू दे ॥धृ॥*

*रोज तुझे दर्शन घेता ॥*
*मन चरण समर्पित होऊ दे ॥1॥*

*रोज तुझे दर्शन घेता ॥*
*पंचप्राण ते उजळू दे ॥2॥*

*रोज तुझे दर्शन घेता ॥*
*बुद्धी अद्वय होऊ दे ॥3॥*

*रोज तुझे दर्शन घेता ॥*
*भक्ती उचंबळून येऊ दे ॥4॥*

*रोज तुझे दर्शन घेता ॥*
*मनी श्रीराम प्रकटू दे ॥5॥*

*रोज तुझे दर्शन घेता ॥*
*तुझी अशी कृपा होऊ दे ॥6॥*

*देवा मला श्रीगुरू भेटू दे ॥*
*देवा मला श्रीगुरू भेटू दे ॥7॥*

# 289. कोण तू कुठलासा तू

*कोण तू कुठलासा तू ॥*
*काय तुझे अस्तित्व आहे ॥धृ॥*

*काय तुझे स्वतःचे ॥*
*जे तू इथे आणिले आहे ॥1॥*
*भाव मी पणाचा पाहा ॥*
*हक्क त्यावर तुझा नाही ॥2॥*
*शरीराचा कण न कण ॥*
*तुझ्या मालकीचा नाही ॥3॥*
*मन अन् बुद्धी ऊर्जा ॥*
*वैभव आहे विश्वाचे ॥4॥*
*तू भिकारी कोटी जन्मांचा ॥*
*काय इथे तुझ्या मालकीचे आहे ॥5॥*
*तू कुणीच नाही कधीच नाहीस ॥*
*आभास उठले अस्तित्वाचे ॥6॥*
*मृत्यू पलीकडे पाहा जरा ॥*
*अमृतमय जग आनंदाचे ॥7॥*
*शरणी येशील श्रीगुरू चरणी ॥*
*घे ओंजळीत दान अनंताचे ॥8॥*
*एक परब्रह्म तू कुणीच नाही ॥*
*शून्याच्या अंगणी आभास क्षमतांचे ॥9॥*
*मी पणाचा भाव जाता ॥*
*स्वस्वरूपी उरेल रूप परब्रह्माचे ॥10॥*

# 290. प्राणांना तळहाती घेऊन

*प्राणांना तळहाती घेऊन ॥*
*टाकूनी सागर सहज पाठीवर ॥धृ॥*

*जिद्दीची ती परिसीमा गाठून ॥*
*पेटविला संग्राम स्वातंत्र्याचा ॥1॥*

*साखळदंडा पुरते विरघळवून ॥*
*शौर्य शब्दांची माला गुंफून ॥*
*भिंतींचा तो कागद करून ॥*
*आग लावली पारतंत्र्याला ॥2॥*

*मातृभूमीच्या चरण सेवेत ॥*
*त्यागिला मान सन्मान संसार ॥*
*ठेवली ज्याने धगधगती क्रांती ज्वाला ॥*
*शिरसावंद्य नमन त्या स्वातंत्र्यवीराला ॥*
*शिरसावंद्य नमन त्या स्वातंत्र्यवीराला ॥3॥*

# 291. घर माझे

जगात कुठेही गेलो तरी आपल्या घराची आपल्याला सतत ओढ असते. पण हे विटा सिमेंटचे घर आपले मूळ घर नाही असे संत म्हणतात. मग आपले मूळ घर आपण विसरलो तर नाही ना...चला पाहुया...

*पैलतीरी निर्गुण निराकार माझे घर ॥*
*अलीकडे विश्व सारे सगुण साकार ॥धृ॥*

*शून्याच्या पल्याड अनंत निरंजन ॥*
*अलीकडे मायेचे नित्य गुण अवगुण ॥1॥*

*नसे घरी माझ्या इच्छा वासनांचा मल ॥*
*अलीकडे त्याच्या सर्व आकार विकार ॥2॥*

*घरी माझ्या निश्चिंत मी हो सदानंद ॥*
*अलीकडे ममत्व षड्रिपू हो फार ॥3॥*

*घर माझे अवघे परम ज्ञान विज्ञान ॥*
*तिथे चैतन्य-प्रकाश असे स्वसंवेद्य ॥4॥*

*घर माझे हृदयी नित्य अमृताचे निधान ॥*
*मार्ग हा जेथे रुजे श्रीगुरू संताची वचनं ॥5॥*

*घर माझे निकट ते परब्रह्म स्फुरण ॥*
*माझ्यातची पावले मज पूर्णाचे पूर्णत्व ॥6॥*

# 292. परब्रह्म पिता

*आम्ही पुत्र आमुचा परब्रह्म पिता ॥*
*पिंड हा स्वसंवेद्य स्त्रोत चैतन्याचा ॥धृ॥*

*वंश आमुचा अद्वय अनंतभावाचा ॥*
*परि देही इथे हा जीवभाव दाटला ॥1॥*

*बंधू आमुचे पंच दूत पंच प्राण ॥*
*बहीण सदा बुद्धी सदसद्विवेक ॥2॥*

*आई आमुची ब्रह्म शक्तीचा पसारा ॥*
*ओज सगुणाचे दिले तिनं आम्हांला ॥3॥*

*प्रसवूनि तिच्या दिव्य क्षमतांना ॥*
*ठेविले सदा ब्रह्म सन्मुख आम्हांला ॥4॥*

*अद्वयी ती प्रकटली परमानंद जाहला ॥*
*दाविला बाप अद्वयी ऐसा तिने आम्हांला ॥5॥*

*केला तिने अहं आमुच्यातूनी वेगळा ॥*
*परब्रह्म चरणी तिचा समर्पण सोहळा ॥6॥*

*कुठे हो द्वैत सर्व अद्वैताचा हो पसारा ॥*
*जीवभाव ऐसा या निरंजनी निमाला ॥7॥*

# 293. याचसाठी केला आहे अट्टाहास

*याचसाठी केला आहे अट्टाहास ॥*
*म्हणूनी हा मानव देह असा लाभला ॥धृ॥*

*याचसाठी केला आहे अट्टाहास ॥*
*राम नाम घोष सदा मुखी यावा ॥1॥*

*याचसाठी केला आहे अट्टाहास ॥*
*हरीरस तृप्तीने आत्मभाव हरपावा ॥2॥*

*याचसाठी केला आहे अट्टाहास ॥*
*विश्वार्त ध्वनी हृदयातून उठावा ॥3॥*

*याचसाठी केला आहे अट्टाहास ॥*
*कीर्तनी पाहु दे संतांचा मेळा ॥4॥*

*याचसाठी केला आहे अट्टाहास ॥*
*प्रेमाला सुगंध समर्पणाचा यावा ॥5॥*

*याचसाठी केला आहे अट्टाहास ॥*
*ऐकावे बोलावे श्रीगुरू वचनाला ॥6॥*

*याचसाठी केला आहे अट्टाहास ॥*
*जीवन मिळावे श्रीगुरू चरणाला ॥7॥*

# 294. होऊ दे प्रेमवर्षाव

*होऊ दे प्रेमवर्षाव मेघ मल्हारा ॥*
*माझा देव मम हृदयी हो प्रकटला ॥धृ॥*

*आनंदघन नभ हा मनी दाटला ॥*
*गोविंद रस अमृत वर्षाव जाहला ॥1॥*

*निमाली माझी जन्मजन्मांतर तृष्णा ॥*
*भवसागरी मम ऐसा फेरा चुकविला ॥2॥*

*शबद प्रकटले श्रीगुरू प्रसाद मिळाला ॥*
*श्रीगुरू चरणी माझा हा जीव विसावला ॥3॥*

*व्हावा ऐसा दिव्य समर्पण सोहळा ॥*
*कोटी सूर्य प्रकाश ज्योतीस ज्योत मिळता ॥4॥*

# 295. चैतन्य स्पर्श

चैतन्य स्पर्श... एक चिंतनशील वैचारिक प्रयोग...

आपण आपल्यातील चैतन्याला स्पर्श करू शकत नाही कारण ते अद्वैत तत्त्व आहे. पण जेंव्हा आपण नमस्कार करण्यासाठी हात जोडतो तेंव्हा तळहातांना स्पर्शाची जाणीव होते. त्या जाणिवेची पार्श्वभूमी आपले चैतन्य म्हणजे आपण स्वतः असतो.

स्पर्श शरीरापूरताच मर्यादित आहे, पण जाणीव चैतन्याने भरलेल्या आणि भारलेल्या मनाला होते. आपणच आपल्या मनामध्ये चैतन्य रूपाने असतो. जाणिवेच्या पल्याड आपण स्वतः चैतन्य स्वरूप असतो.

आता ज्याच्यामुळे स्पर्श निर्माण झाला ते शरीर आणि स्पर्शाची जाणीव ज्याला झाली ते मन दोघे आपल्याहून वेगळे आहेत असे सुस्पष्ट दिसते अन्यथा हे वर्णन आपण करू शकलो नसतो.

आता उरले चैतन्य म्हणजे आपणच स्वतः.पण आपण तो स्थूल स्पर्श आणि जाणणारे सूक्ष्म मन याहून वेगळे आहोत. आपल्याला वेगळेपणाने जाणण्यासाठी आपल्याकडे माध्यम नाही आणि ते जाणलेही जाणार नाही कारण ते तत्त्व स्वसंवेद्य आहे.

म्हणजे स्थूल स्पर्शाच्या माध्यमातून आपण स्थूल सूक्ष्माच्या पलीकडे स्वसंवेद्य तत्त्वापर्यंत म्हणजे आपल्या स्वस्वरूपापर्यंत विचारांच्या साहाय्याने सहज पोहोचलो.

आता श्रीगुरू कृपेने हा विचार नाहीसा झाला की निव्वळ चैतन्य म्हणजे स्वस्वरूपानुभव येईल. पण त्या दिव्य सोहोळयाचे निरीक्षण करणारा निरीक्षक अहं तिथे नसेल.

अशा रीतीने गंध, चव, श्रवण, दृश्य, वाचा यांच्या अनुभव क्रियेच्या माध्यमातून आपण आपल्या चैतन्य स्वरूपापर्यंत पोहोचतो.

आता प्रत्येक अनुभवात चैतन्य सुस्पष्ट दिसते आहे. आता गुंतून कुठे राहायचे ते आपणच ठरविले पाहिजे.

*मन पंचेंद्रिये तेथे गूढ चैतन्याचे ॥*
*दृश्या माजी चैतन्य पाहावे ॥धृ॥*

*स्पर्शा माजी चैतन्य स्पर्शावे ॥*
*गंधातून ते चैतन्य गंधावे ॥1॥*

*श्रावणात चैतन्य ऐकावे ॥*
*वाचेतूनी चैतन्य बोलावे ॥2॥*

*अणुरेणूच्या उदरी पाहावे ॥*
*ते तेथे घर अद्वय ऊर्जेचे ॥*
*परि प्रकृती सजे कोणत्या सगुणे ॥3॥*

*परम पुरुष सदा प्रकृतीसंगे ॥*
*मनातूनी चैतन्य असे हे पसरले ॥4॥*

*कर्ता भोक्ता अहं मनी प्रकटे ॥*
*अद्वयी ब्रह्मांडे द्वैत पाहातसे ॥5॥*

*माझिया श्रीगुरू ज्ञानदेवा वचने ॥*
*पासष्ट अनुभवे श्रीचांगदेव व्हावे ॥6॥*

*भेदूनी सगुण सकल प्रकृतीचे ॥*
*अद्वयी अद्वय होऊनि राहावे ॥7॥*

# 296. काहीच नाही घडले

एकदा का जीवाला मुक्ती मिळाली की सर्व काही स्वप्नवत होऊन जन्म जीवन मुक्तीचे प्रयत्न असे काहीही घडलेच नसल्याचे अनुभव येतात व आपण कधीच बंदिस्त नव्हतो असे अनुभव ग्रंथांमध्ये वाचावयास मिळतात. त्यावर आधारित ही रचना...

*तपे तापली काया मन केले मोकळे ॥*
*लावूनिया चिताभस्म ॥*
*राहिलो होऊन चैतन्याचे ॥*
*जसे इथे काहीच नाही घडले ॥धृ॥*

*पिंडी ब्रम्हांड ते उमजले ॥*
*देखिल्या त्या अनंत क्षमता ॥*
*पाहतो स्वप्न इथे ॥*
*जसे इथे काहीच नाही घडले ॥1॥*

*श्रीगुरू कृपे वैराग्य ल्यायले ॥*
*द्वैती पाहिले अद्वैताला ॥*
*परि अद्वैताचे गावी ॥*
*तिथे काहीच नाही घडले ॥2॥*

*काया वाचा बुद्धी मने ॥*
*कोंदणी सजविले सात्त्विकतेला ॥*
*शून्याच्या उंबरठ्यावर पाहा ॥*
*जसे इथे काहीच नाही घडले ॥3॥*

*आत्म्याचे ते बंध हो तुटले ॥*
*प्राण वाहिले श्रीरामाला ॥*
*अहं हा आता गेला कुठे ॥*

*जसे इथे काहीच नाही घडले ॥4॥*

*तपे जाळूनी काया मन केले मोकळे ॥*
*लावूनिया चिताभस्म ॥*
*राहिलो होऊन चैतन्याचे ॥*
*जसे इथे काहीच नाही घडले ॥5॥*

# 297. श्रीगुरू माझे पाठीराखे

*श्रीगुरू माझे पाठिराखे ॥*
*ते झाले मायबाप ॥धृ॥*

*भव सागरी तारले मज ॥*
*अजाण मी त्यांचा बालक ॥1॥*

*शून्यातून उपजे हा पिंड ॥*
*काया सगुणाचा अंगरखा ॥*
*श्रीगुरू वचन जाण ॥*
*वसे ब्रह्मचैतन्य आत बाहेरा ॥2॥*

*मज काय हवे ॥*
*ते त्यांसी हो ठाऊक ॥*
*पुरवितसे भक्तीचा ॥*
*हट्ट माझा अलोट ॥3॥*

*विज्ञानाचा भरवूनिया घास ॥*
*देई सवे शबदामृताचे पान ॥*
*वस्त्र जरतारी कीर्तनाचे*
*त्यावर समर्पणाचा साज ॥4॥*

*कृपादृष्टी झाली त्यांची ॥*
*मज ठेविले चरणांसी ॥*
*काय वर्णू आता ॥*
*मम हृदयातील श्रीहरी ॥5॥*

# 298. चित्त माझे विसरेना तुला

*चित्त माझे विसरेना तुला ॥*
*का तू विलंब लावितसे देवा ॥धृ॥*

*निर्गुणाच्या कोऱ्या पाटीवरी ॥*
*सगुण ब्रह्म तू नाहीस का देवा ॥1॥*

*विश्वाच्या महाऊर्जेमधला ॥*
*परम प्रकाश तू नाहीस का देवा ॥2॥*

*आर्त माझे भाव तव चरणी ॥*
*भावभुकेला तू नाहीस का देवा ॥3॥*

*श्रीगुरुवाणीचा तू लावलासि लळा ॥*
*अमृताहूनी गोड तिथे तू नाहीस का देवा ॥4॥*

*चरण तुझे उरधार मी जपतो ॥*
*कोणत्या उपाये शरण येऊ तुजला ॥5॥*

*मन बुद्धी शरीर प्राण असे तू ॥*
*तुजवीण आता उरले काय देवा ॥6॥*

*जातील कधी मम प्राण जरी ॥*
*तव चरण नाही सोडणार देवा ॥7॥*

# 299. मातपित्यांचा मिळता आशिष

*मात पित्याचा मिळता आशिष ॥*
*नाम मिळाले हरीचे ॥*
*झाला कुलोद्धार जीवनी ॥*
*ते धरिता चरण जगदिशाचे ॥धृ॥*

*वस्त्र दिले मातेने ॥*
*ती आवड कीर्तनाची ॥*
*अन्न दिले पित्याने ॥*
*मुखी नाम हो हरीचे ॥1॥*

*झाले मायबाप श्रीगुरू ॥*
*दिला आसरा भक्तीचा ॥*
*तृष्णा जन्मांतरीची मिटे ॥*
*पाहिले ब्रह्म ब्रह्माचिया खुणे ॥2॥*

*मायबाप सदा माझ्या सवे ॥*
*ते अद्वैत चैतन्य पिंडाचे ॥*
*हृदयी हरिचरण पाहीन ॥*
*सफल होतील आशिष तयांचे ॥3॥*

# 300. शक्ती तुझी

*शक्ती तुझी ॥*
*तुझे चैतन्य ॥*
*मी तुझ्यातून ॥धृ॥*

*बुद्धी तुझी ॥*
*गती तुझी ॥*
*बाजी अहंची ॥1॥*

*जीवन तुझे ॥*
*मानिली मालकी ॥*
*भ्रांती अशी ॥2॥*

*सुख दुःखात ॥*
*धावून पळून ॥*
*थकला जीव ॥3॥*

*पीळ हृदयी ॥*
*अश्रु गंगौघी ॥*
*टाहो गगनी ॥4॥*

*विरह चित्ती ॥*
*माथा चरणी ॥*
*समर्पण सर्वस्वी ॥5॥*

*श्रीगुरु भेटता ॥*
*पाहीन मी ॥*
*तुज माझ्यातूनी ॥6॥*

*तुज भेटता ॥*
*ईश्वरा सखया ॥*
*होईल मी ॥*
*स्वस्वरूपी अद्वया ॥7॥*

# 301. तु मेरा प्राण सखा

कधी कधी गाण्याच्या ओळी सुचण्याआधी संकल्पना अवतरते. यावेळी असेच झाले. त्या संकल्पना आधी लिहिल्या आणि नंतर रचना झाली. संकल्पना मातृभाषेत आली आणि दोन दिवसांनी रचना हिंदीतून. मी फक्त टायपिंग केले.

तुझ्या प्रती मजला एवढी आर्त ओढ दे ईश्वरा की माझे अश्रु पाहून तू सद्गदित होशील.

*दे इतनी आंस तेरी कृष्णकन्हाई ॥*
*आंसू देख के मेरे तू निहाल हो जाई ॥1॥*
*तू मेरा प्राण सखा ॥ प्रभू तू अंतर्यामी ॥धृ॥*

माझे तुझ्या प्रति होत असलेले समर्पण इतके सुंदर होऊ दे ईश्वरा, की तुझे सौंदर्य त्यापुढे फिके पडेल.

*सुंदर मोहन तेरी सुरत सुहानी ॥*
*ऐसे नीव नीव मैं लागू तेरे पाई ॥*
*हो सुंदर तुझ से मेरी कुर्बानी ॥2॥*

नीव नीव = अतिशय विनम्रतेने

माझी वाणी व भक्ती इतकी अवीट गोडीची कर ईश्वरा की तुझ्या अमृताचा तुला विसर पडेल आणि मी त्यामध्ये सामावून जाईन.

*ऐसी बाणी भाव भगत कर मीठी ॥*
*प्रभू तू तेरा अम्रित भूल जाई ॥3॥*

तुला तुझे अनंत तत्त्व नाही समजणार ईश्वरा तू माझ्यामध्ये ये आणि माझ्या नजरेतून पाहा आणि माझे कल्याण कर.

*तू ना जाणिया तू है अपार ॥*
*नजर से मेरी देख उस पार ॥*
*गोविंद मेरा कल्याण हो जाई ॥4॥*

तू करुणेचा कृपेचा अथांग सागर आहेस. ईश्वरा तू या मदस्वरूप लाटेला तुझ्या सागरात विलीन कर आणि मला तुझे संपूर्ण दर्शन देत्यात मी सामावून जाईन.

*मैं लहेर, किरपा सागर मुरारी ।*
*जब सागर लहेर मिल जाई ।*
*तेरा दर्श मुझे तुझ मे समाई ॥5॥*

या मायेत फिरणाऱ्या असंख्य ऊर्जा कणांनी माझ्या भोवती त्यांच्या गुण अवगुणांचा जणू फेर धरला आहे आणि तुझ्या चैतन्यरूप प्रकाशात मी ते पाहात आहे. तू माझ्या चैतन्यात अवतरीत हो म्हणजे मी मायेतून तुझ्यासह मुक्त होईन.

*यह माया सब तेरे जोरे ।*
*गुण अवगुण के लागे फेरे ॥*
*जब आवे तुम मेरे चित ।*
*ता माया पार हो जाई ॥6॥*

तुझ निर्गुण तत्त्व तू नाही जाणू शकणार ईश्वरा तू तुझ्या प्रती वेपरवाह आहेस. तू माझ्या मनाचा शून्य उंबरठा तयार कर आणि तिथून तू तुझे निर्गुण तत्त्व पाहा म्हणजे मी ही पुन्हा तुझ्यासह निर्गुण होऊन जाईन.

*तेरे गुण तुझसे है परेहे ।*
*तू बैठ शून्य मन के दहेले ॥*
*हे पारब्रह्म परमेशर स्वामी ।*
*तू खुद देखे ता मै समाई जाई ॥*
*तू पाहिले पाहिजे. मी काय पाहाणार? मी भ्रमांध आहे.*

# 302. कर्मे जळाली

ज्ञानरूपी ज्योतीच्या परम प्रकाशात अज्ञान नेमके काय, कशाला म्हणतात अन् कशातून निपजते, हे पाहणे झाले की, ते असार म्हणून सहजच बाजूला पडते आणि मग पुढे होणारी विवेकाधिष्ठित कर्म बाधत नाहीत. पूर्वीची अज्ञान वश झालेली कर्मे व फळे या ज्ञान ज्योत तापाने जळून जाऊ लागतात.

*जळाली जळाली ॥*
*सर्व कर्मे जळाली ॥*
*देखिले अज्ञान ॥*
*सर्व कर्मे जळाली ॥धृ॥*

*स्वामी तिन्ही जगाचा ॥*
*वसे हृदयांतर्यामी ॥*
*कृपेने तयाच्या ॥*
*विज्ञान ज्योत उजळली ॥1॥*

*ब्रह्मात अखंड वाही ॥*
*महाऊर्जा अशी ती ॥*
*अवस्थांतर तिचे सदा ॥*
*मज वास्तव भासविती ॥2॥*

*आभास मी पणा चा ॥*
*जगतो या संसारी ॥*
*त्याच्या सर्व वृत्तींना ॥*
*राही ब्रह्म सर्व साक्षी ॥3॥*

*नको पश्चात्ताप ॥*
*विसर षड्रिपू फास ॥*
*ते होते एक दुःस्वप्न ॥*

*आत्मभानी जाग आली ॥4॥*

*श्रीगुरू चरण कमल ॥*
*तिथे होई ब्रह्म दर्शन ॥*
*मायेचे ऊर्जा वादळ ॥*
*न आता भिववितो ॥5॥*

*आता योग क्षेम ॥*
*आता कर्म विवेक ॥*
*आता भक्ती अनन्य ॥*
*श्रीगुरू चरणांशी ॥6॥*

# 303. प्रभ बिन नाही कोई दुजा

सतनाम श्री वाहगुरू

*प्रभ बिन नाही कोई दुजा॥*
*करता धरता तू प्रभ मेरा ॥1॥*

*करते का होई सदा सहारा ॥*
*शरण हरि चरण देवो आसरा ॥2॥*

*अद्वैत तू तेरी माया दुतिया ॥*
*माया विच खेल तुने रचाया ॥3॥*

*माया डोले तू परम परगासा ॥*
*करता ऐसा होवे अकरता ॥4॥*

*करता अकरता प्रभ इक मेरा ॥*
*दरश पाया नानक गुर पुरा ॥5॥*

**पंजाबी भाषेत सुचलेली कविता.**

# 304. यार मितर

*एक ओमकार सतगुरू प्रसाद*

*यार मितर यह ऐसा जीवन हे भाई ॥*
*मनमुख तरसे गुरमुख तर जाई ॥धृ॥*

*सीरी रामनाम सदा सुखदायी ॥*
*तनमन पावन पुनित हो जाई ॥*
*मिल सतगुर जाऊ सरनाई ॥1॥*

*आठ पहर सीरी राम जपाइ ॥*
*काज करे रघुराई साईं ॥*
*मन मेघा अम्रित धार बरसाई ॥*
*मै कौन कहा सब माईया बिसराई ॥2॥*

**पंजाबी भाषेत सुचलेली कविता.**

# 305. भरम सुणिया, भरम बोलिया

*भरम सुणिया, भरम बोलिया ॥*
*सब किछ जाणिया ॥*
*पर किछ नही पाया ॥धृ॥*

*वेद कितेब लखलाख पढीया ॥*
*पंडित मुनी जन विवाद रचाया ॥*
*तीरथ घुमा करमकांड कराया ॥1॥*

*रोज भुलावत मोहिनी माया ॥*
*भरम करत सुखदुख को पाया ॥*
*मालिक बन के अहं रचाया ॥2॥*

*जब तक हमने आम नही खाया ॥*
*उचार उसका काम नही आया ॥*
*वैसे प्रभ जाणे तो कैसे जाई पाया ॥3॥*

*जब गुर सुणाई तब ही सुणिया ॥*
*जब गुर बोले तब ही बोलिया ॥*
*गुरप्रसादी जब रामनाम मन बसिया ॥*
*तब माया भूलिया गुंगा होइ जाईया ॥4॥*

# 306. कित्येक जन्मी तो मी जाळला

*कित्येक जन्मी तो मी जाळला ॥*
*राखच झाली ती नाही आली कामा ॥धृ॥*

*जळणार आता या जन्मीही मी ॥*
*तो मी एक भास हे कळणार कधी ॥1॥*

*हा खेळ फसवा केवळ स्वप्नांचा ॥*
*याचा आरंभ अंत फक्त शून्याचा ॥2॥*

*मनाला जे जे सत्य वाटे ॥*
*ते ते सर्व आभास असे ॥3॥*

*इथे जरी सर्व काही घडते ॥*
*परि बाकी शून्यची उरते ॥4॥*

*मी ना गर्भी ना मी जन्मी ॥*
*मी ना जीवनी ना मी मरणी ॥5॥*

*मी कोण कोण मजला पुसता ॥*
*कळे श्रीगुरू चरणीचा धुरळा ॥6॥*

# 307. शेवटच्याच चार पायऱ्या

*चाल रे गड्या शेवटच्याच या चार पायऱ्या ॥*
*संत म्हणती आता त्या राहिल्या रे इतुक्या ॥धृ॥*

*ग्रंथ म्हणती लक्ष चौऱ्यांशी होत्या तिथे पायऱ्या ॥*
*बघू नकोस माघारी ना दिसतील आता तुला त्या ॥1॥*

*पुढेही न दिसे काही, जाता तिथे पाहण्या ॥*
*परि चाल पुढे श्रद्धेच्या, या चारच उरल्या पायऱ्या ॥2॥*

*पहिली पायरी संसाराची नको चुकूस कर्तव्या ॥*
*देव देश अन् धर्मासाठी झोकून दे तू सर्वस्वा ॥3॥*

*उपासनेसह साध योग पायरीवर या दुसऱ्या ॥*
*जा पार पल्याड सर्व श्रद्धा अश्रद्धांच्या ॥4॥*

*तिसरी पायरी जीवनाची बैस सवे तू संतांच्या ॥*
*कर दृष्टी विकसित ऐकून कथा स्वस्वरूपाच्या ॥5॥*

*आता पायरी चवथी, धारण कर त्या वैराग्या... ॥*
*श्रीगुरू साहाय्य मिळे तिथे, तू लांघ असे त्या शून्याला ॥6॥*

*संत म्हणती आता ना कुठे असे रे त्या पायऱ्या ॥*
*परमानंद परमशांती तू पलीकडे विश्वस्वप्नांच्या ॥7॥*

# 308. बसावे सुखासनी

"ध्यान करताना काहीच करू नये आणि फक्त आत्मभानी सावध असावे" असे अनेक ग्रंथ साहित्यात नमूद केले आहे व यातील अनेक तज्ज्ञ असेच काही सांगतात. पण सतत काही तरी करत असणाऱ्या मनाला एकदम थांबविणे शक्य होत नाही. म्हणून त्याला असे काही तरी विशेष करावयास लावणे की जे विज्ञान आणि अध्यात्म यांना अनुसरून असेल. आपण सर्वच या स्वशोधार्थ निघालेल्या मार्गाचे पांथस्थ आहोत. त्यामुळे हे प्रयत्न व युक्त्या सर्वांच्या उपयोगात येतील व त्यामध्ये बदल करून आपण आपली पांथस्थ प्रणाली तयार करू शकू. ही प्रांजळ आशा मनी बाळगून इथे ही ईशकृपेने झालेली रचना देत आहे...

*॥ बसावे सुखासनी होऊन शुचिर्भूत ॥*
*॥ ना पाळावे कोणते ते दिशांचे बंधन ॥धृ॥*

*॥ घ्यावे नाम श्री प्रथमेशाचे ॥*
*॥ शुभ चिंतावे सकल विश्वाचे ॥1॥*

*॥ आशीर्वाद घ्यावे सकल कुलदेवतांचे ॥*
*॥ आभार मानावे पूर्वजांचे अन् पंचतत्त्वांचे ॥2॥*

*॥ नयन मिटुनी जावे आराध्या शरण ॥*
*॥ घट्ट धरूनी श्रीसद्गुरूंचे चरण ॥3॥*

*॥ आता मानावे आजूबाजूस शून्य ॥*
*॥ त्यात आपण केवळ ना कोणी अन्य ॥4॥*

*॥ शून्यात असती विश्वाच्या क्षमता ॥*
*॥ सिद्धांत सत्य हा विज्ञान-वेदांताचा ॥5॥*

*॥ मानावी आपुली मन-अहं-काया ॥*

*॥ जणू विश्वक्षमता त्या इथे प्रकटल्या ॥6॥*

*॥ पंचसंवेदना अन् अस्तित्वाच्या जाणिवा ॥*
*॥ घ्यावे दर्शन तयांचे त्या विश्वाच्या क्षमता ॥7॥*

*॥ डोळयांसमोर अंधार जाणिवेने पाहावा ॥*
*॥ त्यात शून्यत्वाचा वेध तो साधावा ॥8॥*

*॥ आता व्हावे सावध येथे ॥*
*॥ परि राहावे निश्चिंत तटस्थ ते तिथे ॥9॥*

*॥ मनातील आंदोलन अन् चाळे स्मृतीशी ॥*
*॥ तीसुद्धा मानावी क्षमता त्या सृष्टीची ॥10॥*

*॥ साधूनी अभाव भाव-प्रतिसादांचा ॥*
*॥ व्हावे अथर्व साक्षी त्या विश्वक्षमतांचा ॥11॥*

(अथर्व = स्थिर चित्त)

*॥ मानावा शून्यत्वात पुंज स्वयं-क्षमतांचा ॥*
*॥ अदृश्य सर्वत्र परि आविष्कार जाणिवांचा ॥12॥*

*॥ होता होईल तेवढे ते साधावे ॥*
*॥ शून्यावरूनी हळूहळू श्वासावरी यावे ॥13॥*

*॥ जरी का तेथे वाटे कधी अस्वस्थ ॥*
*॥ ऐकावा सोहम होऊन आतून तटस्थ ॥14॥*

*॥ ऐसा एकांत प्रशांत साधता ॥*
*॥ मंत्रोच्चारण करूनी साधावी विशुद्धता ॥15॥*

*॥ मंत्रोच्चारण एक महाविश्वक्षमता ॥*
*॥ विश्वक्षमतांना प्राप्त होते तिथे ती शून्यता ॥16॥*

*॥ मंत्रोच्चारण होता भोगावी ती प्रशांतता ॥*

*॥ तोच जाणावा साक्षात्कार आपुल्या आराध्याचा ॥17॥*

*॥ ऐसे ते शून्य मानावे स्वस्वरूप ॥*
*॥ पल्याड वसती आपुले आराध्य निर्गुण ॥18॥*

*॥ वाट पाहावी तिथे आर्त हाक द्यावी ॥*
*॥ श्रद्धेच्या पलीकडे दृष्टी कायम ठेवावी ॥19॥*

*॥ येईल वेळ निश्चित दृढ करावी भक्ती ॥*
*॥ दावील निर्गुण स्वरूप ती श्रीजगद्गुरू महाशक्ती ॥20॥*

# 309. प्रस्थान त्रयी

या आधीच्या रचनेतील चार पायऱ्या "ऊर्ध्व मूल अध:शाखा..." प्रमाणे वरून खाली वाढत्या क्रमाने आहेत. सर्व संत ऋषी मुनी हे एक पायरी खाली आले आणि आपल्याला मार्गदर्शन करून गेले. संत तुकारामांसारखे काही संत गृहस्थाश्रमाच्या चौथ्या पायरीवर आले. पायरी 4 गृहस्थाश्रम, पायरी 3 व 2 वानप्रस्थाश्रम आणि पहिली पायरी संन्यासाश्रम. तिसरी पायरी हा मनाचा orientation program आहे. त्यामुळे शक्य असल्यास ही पायरी गृहस्थाश्रमातही समाविष्ट होऊ शकते.

ज्यावेळेस आपल्या धर्माचे पतन होत होते. "ब्रह्म सत्य जगद् मिथ्या" मधील मिथ्या (असत्य नव्हे अनिर्वचनीय) शब्दाच्या विपरीत अर्थामुळे जेंव्हा प्रयत्नवाद संपुष्टात येऊ लागला होता आणि इतर धर्मीय प्रखर टीका करत होते, तेंव्हा श्रीजगद्गुरू शंकराचार्य यांनी असंख्य मुनींना एकत्र करून सनातन धर्माची संहिता तयार केली आणि सर्व ग्रंथसाहित्याचा एक आकृतिबंध तयार केला. त्याचे Cementing & Bonding होण्यासाठी स्वत: असंख्य रचना लिहिल्या. सनातन धर्माला पुन्हा अढळ स्थान प्राप्त करून दिले. या आकृतीबंधात प्रस्थान त्रयी अत्यंत महत्वाची मानली गेली आहे. वरीलप्रमाणे शेवटच्या तीन पायऱ्या म्हणजे या प्रस्थान त्रयीचा अभ्यास करणे आणि त्याचा अनुभव घेणे होय. मानव अवतारातून आपल्या मूळ स्वरूपाकडे प्रस्थान ठेवण्यासाठी ही प्रस्थान त्रयी साधकांना श्रीमद्शंकराचार्यांनी सांगितलेली आहे. यामध्ये उपनिषदे हे श्रुती प्रस्थान, श्रीमदभगवद्गीता हे स्मृती प्रस्थान आणि ब्रह्मसूत्रे हे न्याय प्रस्थान असे भाग करण्यात आले आहेत.

*परब्रह्म परमात्म ग्राम असे अद्वैताचे ॥*
*करूया महाप्रस्थान तोडूनिया भवबंधने ॥धृ॥*

*कैसे सांगावे स्वस्वरूप साधकाशी ते आपुले ॥*

*पडला प्रश्न ऐसा कित्येक मुनिजनां ते ॥1॥*

*सनातन धर्मा विरूद्ध उभे परधर्म ठाकले ॥*
*श्रीजगद्गुरू शंकराचार्य तेथे ऐसे धावले ॥2॥*

*रचिली मुनिजनांनी एकशे आठ उपनिषदे ॥*
*त्यास म्हणती साधका हे श्रुती प्रस्थान पहिले ॥3॥*

*भगवद्गीता लिहिली जी वदिली श्रीनारायणे ॥*
*लिहिले स्मृती प्रस्थान दुसरे ऐसे हे साधकाचे ॥4॥*

*बादरायणे रचिली पाचशे पंचावन्न ब्रह्मसूत्रे ॥*
*न्याय प्रस्थान ऐसे तयास मुनींनी संबोधिले ॥5॥*

*अनन्यसाधारण महत्व असे हे प्रस्थान त्रयीचे ॥*
*तात्त्विक विवेचन तयात प्रवृत्ती अन् निवृत्तीचे ॥6॥*

*सनातन धर्म झाला अद्वितीय अढळ ऐसे ॥*
*प्रस्थान त्रयी ऐशी जणू मुक्तीद्वार ते साधकाचे ॥7॥*

# 310. सोहळा मिलनाचा

*गातो गीत आपुल्या या अपूर्व विवाहाचे ॥*
*आज सोहळा मिलनाचा, प्रभू तुज मी भेटे ॥धृ॥*

*उभा मंडप विवेकाचा माझे अंतर्यामी पाहा तेथे ॥*
*सजविला त्याला किती साधू संतांच्या त्या वचने ॥1॥*

*माझे वस्त्र वैराग्याचे तेज अनोखे अनोखे ॥*
*माझे दागिने त्यागाचे किती तेजाने चमके ॥2॥*

*माझे यौवन ते ध्यान धीर गंभीर ते असे ॥*
*निर्मल सौंदर्य पाहा तू मन शून्यात ते वसे ॥3॥*

*मेंदी लावली रगडून दया करुणेची पाने ॥*
*रंग माझा हा उजळे सत्वगुणांच्या रे संगे ॥4॥*

*माझे शरीर असे हे प्रभू मंदिर प्रेमाचे ॥*
*भेटता करीन अर्पण तुझिया चरणी ते ॥5॥*

*आज मंगल दिनी हात माझा श्रीगुरू हाती ॥*
*देऊनिया दिव्य दृष्टी मज चालविती सप्तपदी ॥6॥*

*पेटविता यज्ञवेदी अग्नी द्वंद्वाचा हा उठे ॥*
*अद्वैतस्पर्श होता तुझा, तव पूर्णत्व मी भोगे ॥7॥*

*अनंतमय होता आता माझे माझ्यात काही नसे, ॥*
*सोहळा हा मिलनाचा जसे कधी झालाची नसे ॥8॥*

# 311. अंतरानुभूती प्रार्थना

*निर्गुण रुपिणी तू परमात्मतत्त्व धारिणी ॥धृ॥*

*महाऊर्जा महाशक्ती तू ब्रह्मांडोदरधारिणी ॥*
*महाशून्या महातारा तू सकल विश्वतारिणी ॥1॥*

*सगुण रूप तू घेतले तव क्षमतांना प्रसवूनि ॥*
*जीवांमाजी असे तू शिवचैतन्यधारिणी ॥2॥*

*प्रकटे रोमरोमांतून तू सत्वरूप घेऊनी ॥*
*अ-मनक्षेत्र स्थापिनी तू अहं-शवारूढिनी ॥3॥*

*षड्रिपू निर्दालिनी वासनेच्छा विनाशिनी ॥*
*भवभ्रम तू हारिणी समत्वदृष्टी प्रदायिनी ॥4॥*

*आरोग्यशक्तीदायिनी तू मनोबुद्धीनिवासिनी ॥*
*भुक्तिमुक्तीदायिनी अद्वैत तत्त्व विलासिनी ॥5॥*

*श्रीगुरुशक्ती साक्षात तू जागृत कुंडलिनी ॥*
*श्वासात तू असे माझ्या स्वस्वरूपदर्शिनी ॥6॥*

*समर्पित सर्वस्व तुज, दे मज अंतरानुभूती ॥*
*प्रणाम महामायाविनी तूज, प्रणाम महामायाविनी ॥7॥*

# 312. आओ आओ जी मेरे पीर

पीर म्हणजे श्रीगुरू किंवा ईश्वरीय अवतरण झालेले महान संत ऋषी मुनी.

*आओ आओ जी मेरे पीर ॥*
*जाणियो मन की मेरे पीड ॥धृ॥*

*श्रीगुरू है आप ईश्वर हो जी ॥*
*हृद वैकुंठ है विलसत चिर ॥1॥*

*पंच दूत है बांधियो मुझ को ॥*
*जुग जुग गये हैं यहा बीत ॥2॥*

*मायाजाल बिख सागर जीवन ॥*
*आप बिना कैसे पाऊ भव तीर ॥3॥*

*अब ना रहू बिन अपने प्रभू के ॥*
*बह गया नयनों से सब नीर ॥4॥*

*समरथ पूरण आप है सतगुर ॥*
*हाथ पर राखे मिले मन धीर ॥5॥*

*नवाजो मुझ को मिल मेरे गोबिंद ॥*
*नीव नीव रखू जी चरणी सीर ॥*
*भगवन ॥*
*नीव नीव रखू जी चरणी सीर ॥6॥*

# 313. कोइ न आयेगा साथ तुम्हारे

*कोई न आएगा साथ तुम्हारे ॥*
*तू है अकेला पथ पर तेरे ॥धृ॥*

*तेरी चाली गोविंद की ओर ॥*
*तू समझ यह उस का ही जोर ॥*
*श्रीगुरू है पलपल साथ तुम्हारे ॥1॥*

*काम क्रोध तुम्हे बहु डरावे ॥*
*पवन माया का बेधुंद करावे ॥*
*तुम ना छोडो चरण हरि के ॥2॥*

*अहंभाव सुख दुख पहुंचाए ॥*
*दारा धन मोहजाल अटकावे ॥*
*रहो पथ क्रमित श्रीगुरू इशारे ॥3॥*

*वैकुंठ धाम घट घट तू देखे ॥*
*वेणू बाजत तू सदा धुन सुणे ॥*
*हरि हरि हरि तेरी जिव्हा बोले ॥4॥*

*तेरा पथ जाई तेरे अंतर्यामी ॥*
*सत्व शिखर पर शून्य कमानी ॥*
*श्रीगुरू किरपा ते हरि को पावे ॥5॥*

# 314. तूच शोध देवा आता

*तूच शोध आता देवा ॥*
*हृदयी रे माझ्या तुला ॥धृ॥*

*नाद तू लावला मज हा ऐसा ॥*
*निघालो शोधण्या मम हृदयातून तुजला ॥1॥*

*ओलांडिता त्या पंचकोष क्षेत्रा ॥*
*विसर कसा हा मज माझा पडला ॥2॥*

*आता कुठे कसा शोधू मी तुजला ॥*
*शोधणारा सांग कुठे तो उरला ॥3॥*

*तू लावूनिया छंद तुज शोधण्याचा देवा ॥*
*का आता केलास हा आपल्यात दुरावा ॥4॥*

*विनवितो तुजला देवा आता ॥*
*मी नाही कोठे तूच शोध तुजला ॥5॥*

*परि मी तुज देतो मम विरहाश्रुंची ग्वाही ॥*
*तू भेटशील तुजला निश्चित मम हृदयी....॥*
*तू भेटशील तुजला निश्चित मम हृदयी....॥6॥*

# 315. श्रावण आला ग सखी हा

श्रीगुरुबाणी मधील "सावन आया हे सखी" या राग मल्हार मधील रचनेवर आधारित त्याच राग मल्हार मध्ये सुचलेली ही मराठी रचना...

*श्रावण आला ग सखी हा ॥*
*हरि नामामृत आनंदघन बरसे ॥धृ॥*

*मन तन तृष्णा मिटे ग साजणी ॥*
*हरपले भान हरि प्रेमाने ॥1॥*

*श्रीगुरू प्रसाद मिळे या जीवनी ॥*
*अमृतधारा मनी बरसल्या ॥2॥*

*शिर उतरवूनी ठेविले ग चरणी ॥*
*अद्वय दाटले परमानंदे ॥3॥*

# 316. दीनानाथा नारायणा

*दीनानाथा नारायणा ॥*
*दीनानाथा नारायणा ॥धृ॥*

*रश्मी तव तेजःपुंज ॥*
*सकल ब्रह्मांड नायका ॥1॥*

*अन्नदाता अग्निदेवा ॥*
*भानू तू आदित्यनाथा ॥2॥*

*दया करा प्राणनाथा ॥*
*ममात्म तेज प्रकाशा ॥3॥*

# 317. आनंद

*आनंद घन ।। आनंद वनी ।।*
*आनंद बरसे ।।1।।*

*आनंद तन ।। आनंद मन ।।*
*आनंदी भिजले ।।2।।*

*आनंद आत्मा ।। आनंद सुखे ।।*
*अनादी आनंद जाहला ।।3।।*

*श्रीगुरू चरण आनंद ।।*
*श्रीगुरू सेवा आनंद ।।4।।*

*श्रीगुरू वचन आनंद ।।*
*श्रीगुरू आशिष आनंद ।।5।।*

*अल्याड आनंद ।।*
*आनंद पल्याड पावला ।।6।।*

# 318. या झोळीचा संग सुटू दे

*या झोळीचा संग सुटू दे, संग सुटू दे रे, का कोंडीले अनंत इथे ॥*
*मज अथांग होऊ दे, अथांग होऊ दे, अथांग होऊ दे रे...॥धृ॥*

*किती कष्टीली किती झिजविली संसारी काया रे... ll*
*परि हात रिकामे रिक्त असा मी भक्त अभागी रे...॥1॥*

*तुटले बंध नाती तुटली दूर जाहले सगेसोयरे ॥*
*तूच बंधू सखा मात पिता अन तूचि श्रीगुरू रे ॥2॥*

*द्वंद्वाच्या या भांडवली हा विठ्ठल नामाचा व्यापार रे ॥*
*विठ्ठल घ्या हो विठ्ठल द्या हो तव नामाची ही वखार रे ॥3॥*

# 319. परब्रह्म अद्वितीय

## अद्वैत चिंतन

माझ्यामध्ये सर्व ब्रह्मांड आहे, पण त्याचा मला पत्ता किंवा संग नाही. पण आता एक पायरी खाली उतरून माझे मीपण भोगणारा कोण हे मी पाहतोय. शरीर आणि मन यासह (संवेदना जाणून घ्यायच्या अंत:करणाच्या पाच क्षमता (क्वांटम शास्त्रानुसार क्षमता धारण करणारी ऊर्जा तिच्या पुंजीय स्वरूपात शून्यातून निर्माण होते), पंचप्राण, पंचमहाभूते, पंचज्ञानेंद्रिये आणि पंचकर्मेंद्रिये अशी ही पंचवीस तत्त्वे) 25 ऊर्जा तत्त्वे एकत्र येऊन एक जीवरूप समुच्चय निर्माण झाला. ही प्रत्येक ऊर्जा तत्त्व स्वतंत्रपणे निर्गुणच आहेत, पण माझे चैतन्य या ऊर्जा समुच्चयात प्रकट झाले आणि त्या मनाला मात्र या विश्वात सगुणाचा आभास निर्माण झाला आणि त्याचा संग त्याला जडला. तो जीव म्हणजे मी नव्हे. पण तो जीव स्वतःला मी म्हणतो. त्या मनाने 25 ऊर्जा तत्त्वांच्या सहवासात तयार केलेला मी सगुण स्वरूप निरीक्षक आहे, तर मी त्यापासून अलेप्य आहे. "समुच्चयात सगुणत्व" हा विश्व सिद्धांत आहे. मी कोणत्याही समुच्चयाचा भाग नाही, म्हणून मला सगुणत्वाची बाधा नाही. "एकतत्त्वात निर्गुणत्व" हा ब्रह्म सिद्धांत आहे. मी निर्गुण, निराकार, निरहंकार, निर्विकार व अनंत आहे असे तो जीवाचा मी म्हणतो, पण मला त्याची जाणीव नाही आणि त्या जीवाच्या मी ला ही सर्व वैशिष्ट्ये जाणण्यासाठी इंद्रिये नाहीत म्हणून तोसुद्धा त्या वैशिष्ट्यांना जाणू शकत नाही. मी माझ्यासह सर्व ब्रह्मांडांना अज्ञेय आहे. म्हणून हा अज्ञेय-नाद त्याने सोडावा. ऊर्जा समुच्चयातून निर्माण झालेल्या सगुणापासून जीवाच्या मी ने अलिप्त राहून मला चिंतावे. प्रथम स्वतःला आकाश स्वरूप मानून मला तेथे चिंतावे. पूरक श्वासांनी आकाशाला आत घ्यावे आणि रेचक श्वासांनी सोडून मधल्या बाह्य कुंभक अवधीत मला निश्चित करावे. (आत घेतला जाणारा श्वासरूप पूरक, बाहेर सोडला जाणारा प्रश्वासरूप रेचक आणि दरम्यान काही काळची स्तब्धता म्हणजे बाह्य-कुंभक होय.)

आकाशाच्या अनंत व्याप्तीला मी अर्थ प्रदान करतो म्हणून मी आकाशाहून अलिप्त आहे, असा भाव निश्चित करावा आणि त्याचे चिंतन करावे. हा भाव त्या जीवरूप मीला मदस्वरूप करेल. मी त्या जीवाच्या मी सह सतत आहे. आभासी सत्य अशा भवतापांपासून सुटण्यासाठी त्याने मला प्रकट करावे इतकेच सांगणे.

## द्वैताद्वैत चिंतन

ज्यांना हे जमणार नाही त्यांनी माझे शुद्ध सात्त्विक स्वरूप म्हणून ईश्वरीय सगुण अधिष्ठान चिंतावे. क्रियाकर्म नाममात्र ठेवावे. तिथे भक्तिमार्गाने जाऊन मनाचा भक्तीमध्ये लय साधावा. तत्क्षणी मनाचा मी लय पावेल आणि मी तिथे प्रकट होईल. दोन्ही मार्गाने तो जीव मदस्वरूप होऊ शकतो. पण तेंव्हा जीवाचा मी त्या जीवात नसल्याने मी अ-जाणता किंवा अज्ञेय म्हणून त्या जीवात प्रकट होईल. जीवाचे जन्म मृत्यू कायमचे मिटतील. जो जीव त्याच्यातील 25 ऊर्जा तत्त्वांपासून अलिप्त झाला तो कायम प्रशांत, प्रज्ञावान, कारुण्यसिंधू आणि सतशील असा प्रतित होईल. तरीही माझे वर्णन करण्यास तो मुका असेल. आता ती 25 ऊर्जा तत्त्वे निर्गुण तत्त्वात विलीन होतील. कारण त्यांच्या समुच्चयात सगुणत्वाचा आभास निर्माण करणारा जीवाचा निरीक्षक मी आता तिथे नाही.

इथे मराठी भाषेचे वैभव इतके की माझी प्रत्येक ओळीच्या शेवटी "य" यावा ही इच्छा पूर्ण झाली.

*परब्रह्म तत्त्व अद्वितीय अप्रमेय ॥*
*त्याच्यासह सकळांसी ते असे अज्ञेय ॥धृ॥*

*महाऊर्जेचा पंचवीस तत्त्व समुच्चय ॥*
*त्यात विलसे ब्रह्म होऊन जीवाचे चैतन्य ॥1॥*

*"समुच्चयात सगुणत्व" सिद्धांत हा विश्वमय ॥*
*"एकत्वात निर्गुणत्व" परमतत्त्व हे ब्रह्ममय ॥2॥*

*ब्राह्मानुरोधे हे विश्व असे जे आभासमय ॥*
*जीवानुरोधे ते विश्व प्रखर वास्तव सत्य ॥3॥*

*ब्रह्मास ना ठावे ते सर्वव्याप्त अन् अलेप्य ॥*
*ओळखण्या ते नसे जीवास कुठले इंद्रिय ॥4॥*

*जीव जर जाणे सगुणापासोनी तो अन्य ॥*
*धारण जर करील जीवनी प्रखर वैराग्य ॥5॥*

*जर ना चुकवे कधी कुंभक तो बाह्य ॥*
*प्रकटेल अंतर्यामी ब्रह्मभाव एक अनन्य ॥6॥*

*अर्थबोधन आकाशाचे जेंव्हा प्रकाशे चैतन्य ॥*
*आकाशाहून ब्रह्म अलिप्त ऐसा व्हावा दृढनिश्चय ॥7॥*

*ऐसे करावे चिंतन जरी ते ब्रह्म अचिंत्य ॥*
*होईल जीव ब्रह्ममय ते एक परम सत्य ॥8॥*

*जो साधक न जाणे श्रुती-अद्वैतभाष्य ॥*
*चिंतावे मनी सुंदर अधिष्ठान ईश्वरीय ॥9॥*

*भक्ती होता अनन्य तेथे मनाचा होईल लय ॥*
*प्रकटेल तिथे ते ब्रह्म जरी असती ते अज्ञेय ॥10॥*

# 320. महाप्रसाद

*हा परमार्थ ज्ञान एक महाप्रसाद*
*शमवूनी मम मानस प्रमाद, आज मज भेटला गा ॥1॥*

*येथे न काही चाले देहबुद्धी*
*श्रीगुरुकृपे प्रकटावी हो इथे आत्मसिद्धी ॥2॥*

*तेथे व्हावी मम बुद्धी हो आंधळी*
*कोटी सूर्य तेजात ती जाऊनी मिळावी ॥3॥*

*अकर्ता अकर्मी होऊनि न काही होई*
*ऐसे ते अनिर्वचनीय इथे प्रकटावे काही ॥4॥*

*म्हणोनी अर्पिले तनमन या विरहाग्नी*
*तुम्ही माझे नाथ सद्गुरू, नतनत मी तव चरणी ॥5॥*

# 321. आभार श्रीगुरूंचे

*अवघा सागर हा परम ज्ञानाचा ॥*
*पुतळा प्रज्ञा, शील अन् करुणेचा ॥धृ॥*

*जो असे शरण सदा त्या दिव्यत्वाला ॥*
*आम्ही नतमस्तक ऐशा श्रीगुरुरूपाला ॥1॥*

*लाभो ऐसे श्रीगुरुजन सर्व साधकांना ॥*
*विनम्र हे मागणे आमुचे असे ईश्वराला ॥2॥*

*श्रीगुरू साक्षात अवतार परमेश्वराचा ॥*
*जो अलगद नेईल पल्याड त्या शून्याच्या ॥3॥*

*आभार श्रीगुरूंचे मानती साधक हे सदा ॥*
*ज्यांनी घालविले आमुच्या अहंकाराला ॥4॥*

*प्रणाम आमुचा श्रीगुरूराया तुम्हा ॥*
*प्रणाम श्रीगुरूराया... ॥5॥*

# या! या! घ्या! घ्या! घेऊन जा! लुटा! लुटून न्या!

# काव्य  समर्पणाचे

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

पुस्तकांना दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.